29-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SMT/ 13:00

29-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SMT/ SBT/ MMP/ 13:00

सभापतीस्थानी - माननीय सभापती

नियम 289 अन्वयेच्या सूचनेबाबत

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री रामदास कदम, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री परशुराम उपकरकर, किरण पावसकर, अनिल परब, वि.प.स. यांनी यांनी "83 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन किंवा समारोपाला राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची प्रथेप्रमाणे उपस्थिती असणे."याबाबत नियम 289 अन्वये एक सूचना दिलेली आहे. हा नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव होत नाही. तसेच आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर असा कुठलाही विषय नाही म्हणून मी या सूचनेला दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

सिंधुदुर्गात वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही

(१) * ३००० श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत, श्री.अनिल परब : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैद्यकिय अधिकाऱ्यांची ३२ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता या आगोदरच असतांना सदरहू पदे रिक्त ठेवण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास त्यात काय आढळून आले व तद्नुसार रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : (१) सिंधुदुर्ग जिल्हयातील वैद्यकीय अधिकारी (असुधारीत वेतनश्रेणी रु.८०००-१३५००) यांची जाने,२०१० मध्ये ३३ टक्के पदे रिक्त होती.

(२) वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळून विभागांतर्गत मंडळामार्फत भरण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पदे भरण्याची कार्यपध्दत ठरविणे तसेच महाराष्ट्र लोकसोवा आयोगाने वैद्यकीय अधिकारी पदासाठी दिलेल्या जाहिरातीबाबत न्यायालयीन प्रकरण उदभवल्यामुळे पदे रिक्त राहिलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तराव सुरु असून गट क व ड संवर्गातील रिक्त पेद भरण्याबाबतची कार्यवाही उपसंचालक आरोग्य सेवा ठाणे यांचे तथा जिल्हा स्तरावर सुरु आहे. तसेच अस्थायी स्वरुपात वैद्यकीय अधिकारी पदी नियुक्ती देण्यात येत आहे..

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या प्रश्नाचे माननीय मंत्रिमहोदयांनी जे छापील उत्तर दिलेले आहे त्यामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना काही दुरुस्ती करावयाची आहे काय? सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्याची परिस्थिती भयानक आहे. याठिकाणी 33 टक्के पदे रिक्त आहेत असे सांगण्यात आले आहे. कणकवलीला एक मिनी रक्तपेढी झालेली आहे. याठिकाणी सर्व साहित्य असताना देखील कर्मचारी नसल्यामुळे सात वर्षापासून ही रक्तपेढी बंद आहे. जिल्हा रुगणालयात 195 रिक्त पदे आहेत उत्तरामध्ये 33 टक्के पदे रिक्त आहेत असे म्हटलेले आहे. सभापती महोदय, रिक्त पदे 33 टक्के नसून 60 टक्क्याच्यावर ही रिक्त पदे आहेत.

सभापती महोदय, कणकवली असेल मालवण असेल या जिल्हयांना पर्यटन जिल्हे म्हणून घोषित केलेले आहे. या जिल्हयामध्ये हत्ती रोगाचे 270 रुग्ण आहेत. त्यापैकी 90 टक्के रुग्ण हे फक्त मालवणमध्ये आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लेप्टो स्पायरोसीसमुळे 50 शेतकऱ्यांचा मृत्यू झालेला आहे अशा वेळेला अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची याठिकाणी कमतरता आहे. असे असताना देखील ही पदे रिक्त असल्याचे आता 2010 मध्ये राज्य शासनाला कळलेले आहे असे उत्तरामध्ये म्हटले आहे. सात ते आठ वर्षापासून सर्व पदे रिक्त आहेत असे असताना त्याबाबतीत कुठलीही उपाययोजना केलेली नाही. आचरा येथे शवविच्छेदन केंद्र उभारण्यात आलेले आहे. यासंदर्भात मागच्या अधिवेशनामध्ये प्रश्न विचारण्यात आला होता त्यावेळी त्याबाबतीत कार्यवाही होईल असे सांगितले होते.

सभापती महोदय, जिल्हयामध्ये 60 टक्के वैद्यकीय कर्मचारी नाहीत ते तातडीने भारणार काय? तसेच उत्तरामध्ये जी आकडेवारी दिलेली आहे ती चुकीची असल्यामुळे सभागृहाला खरी आकडेवारी देण्यात येईल काय?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील रिक्त पदांच्या संदर्भात जो प्रश्न मांडला आहे तो खरा आहे.

सभापती महोदय, गेल्या आठवडयात याच प्रश्नावर चर्चा झाली होती. त्यावेळी उत्तर देताना मी सांगिते होते की, तीन महिन्यात आरोग्य खात्यातील सर्व रिक्त पदे भरण्यात येतील. खास करुन सिंधुदुर्ग जिल्हयात वर्ग-4 ची 115 पदे रिक्त आहेत. काही पदे जिल्हा परिषदे मार्फत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी. . .

भरण्यात येणार आहेत पण राज्य स्तरावर जी पदे भरावयाची आहेत त्यासंबंधीचे सिव्हिल सर्जनचे अधिकार काढून ते जिल्हाधिकाऱ्याला देण्यात येणार आहेत तसेच 45 दिवसांच्या आत ही सर्व वर्ग-4 ची रिक्त पदे जिल्हास्तारावर भरण्याबाबत त्यांना आदेश देण्यात येतील. वर्ग- 3 ची जी रिक्त पदे आहेत त्यासंदर्भातील लेखी परीक्षा ऑलरेडी झालेली आहे. त्यांची तोंडी परीक्षा बाकी आहे. मला वाटते दोन महिन्यात वर्ग-3 ची सर्व रिक्त पदे भरण्यात येतील. वर्ग-2 आणि वर्ग-1 च्या पदाच्या संदर्भात एमपीएससीकडे रिक्विझिशन यादी पाठविण्यात आलेली आहे. ही पदे एमपीएससीकडे पेंन्डिग आहेत. शासन याबाबतीत पाठपुरावा करीत आहे. गेल्या कॅबिनेट मिटिंगमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी एमपीएससीकडे पाठपुरावा करण्यात यावा असे सी.एस.ना आदेश दिले होते. एम.पी.एस.सी.कडे आरोग्य खात्याचे रिक्विझिशन पेंन्डिग आहे ती पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण मला असे सांगावयाचे आहे की, सिंधुदुर्ग आणि नंदूरबार या जिल्ह्यांमध्ये आपण कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याला पोस्टींग दिले की ते कोणाची तरी शिफारस आणून सिंधुदुर्ग आणि नंदूरबार जिल्ह्यातून बदली करुन कोल्हापूर किंवा पुण्याला देण्याचा प्रयत्न करतात. सिंधुदुर्ग आणि नंदूरबार या दोन जिल्ह्यामध्ये कोणीही अधिकारी जाण्यास तयार नाहीत. त्याची कारणे काय आहेत हे मला समजत नाही. या दोन जिल्ह्यांमध्ये पोस्टींग झाले तर दोन दिवसात ते शिफारस घेऊन येतात. म्हणून मी आता असा निर्णय घेतला आहे की, आता जी नवीन पोस्टींग सिंधुदुर्ग आणि नंदूरबार जिल्ह्यामध्ये होईल त्या ठिकाणी कोणीही शिफारस केली तरी आम्ही त्यांची बदली करणार नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी नंदूरबार आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याची परिस्थिती सांगितली. आदिवासी विभागात जे डॉक्टर जातात त्यांना प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना आहे. त्याप्रमाणे सिंधुदुर्ग हा पर्यटन किंवा दुर्गम जिल्हा आहे म्हणून त्या ठिकाणी अशा प्रकारे प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना शासन करणार काय ? या जिल्ह्यामध्ये मालवण रुग्णालयात एकमेव असलेल्या डॉ. झाट्ये या वैद्यकीय अधिकारी सातत्याने रजेवर असल्यामुळे हॉस्पिटल बंद आहे. त्या ठिकाणी डॉक्टर देऊन त्या मालवण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सिंधुदुर्ग जिल्ह्यात आपण कोठल्याही वैद्यकीय अधिकाऱ्यांना तो देणार नाही. सन्माननीय सदस्यांनी उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत दुसरा प्रश्न विचारला. त्याबाबतीत तपासून योग्य ती कार्यवाही करु.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय अधिवेशन सुरु झाल्यापासून सांगत आहेत की, तीन महिन्यात पदे भरु. ही पदे आकाशातून पडणार की, जमिनीतून तयार होणार आहेत ? माननीय मंत्रिमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, आपण 45 दिवसात किंवा तीन महिन्यांमध्ये ही पदे कोठून भरणार ? अनेक डॉक्टर्स कोणत्याही पदावर दुसऱ्या विभागात दिले जातात. उदाहरणार्थ गृह खात्याला काही डॉक्टर्स दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3000 ..... डॉ.दीपक सावंत ....

जातात तसेच अन्य खात्यांमध्ये डॉक्टर्स दिले जातात. हे डॉक्टर्स पुन्हा खात्यात परत आले तर हा प्रश्न सुटू शकतो. माननीय मंत्रिमहोदय अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेणार काय ? सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर आणि आम्ही गेल्या चार वर्षापासून भांडत आहोत. सहा महिन्यात डॉक्टर्सची ही सगळी पदे भरणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी माझ्या उत्तरामध्ये सांगितले की, वर्ग 1 ची बाब एमपीएससीकडे प्रलंबित आहे. त्याचा पाठपुरावा करीत आहोत. त्याच्या जाहिरातीची प्रोसेस झालेली आहे. एमपीएससीकडून यादी आली की वर्ग 1 ची पदे भरण्याची कार्यवाही ताबडतोब होणार आहे. वर्ग 3 च्या बाबतीत मी सांगितले की, लेखी परीक्षा झालेली आहे. तोंडी परीक्षा बाकी आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, आमच्या खात्याचे डॉक्टर्स प्रतिनियुक्तीवर गेले आहेत ही गोष्ट खरी आहे. कमीतकमी 440 डॉक्टर्स दुसऱ्या खात्यामध्ये प्रतिनियुक्तीवर पाठविले आहेत. काही डॉक्टर्स पोलीस खात्यामध्ये, काही डॉक्टर्स जेलमध्ये, काही डॉक्टर्स कोर्टामध्ये तसेच आदिवासी विभागात, आय.टी.आय. मध्ये प्रतिनियुक्तीवर पाठविले आहेत. 349 स्पेशालिस्ट डॉक्टर्स वैद्यकीय शिक्षण खात्यामध्ये आहेत. मी आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ. विजयकुमार गावित, आम्ही त्याबाबत निर्णय घेतला आहे की, 303 एम.बी.बी.एस. आणि 46 स्पेशालिस्ट डॉक्टर्स डी.एम.ई.आर. मध्ये काम करतात त्यांना ताबडतोब आरोग्य खात्यामध्ये परत घेऊन त्यांना रुरल पोस्टींग देणार आहोत. जेल आणि कोर्टामध्ये जे डॉक्टर्स आहेत त्याबाबत सांगू इच्छितो की, त्यासंबंधी आम्ही माननीय गृहमंत्र्यांबरोबर चर्चा करु. जेल आणि कोर्टाचा जो प्रश्न आहे तो कॉम्प्लीकेटेड आहे. त्याबाबतीत आश्वासन देऊ शकत नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3000 श्री.सुरेश शेट्टी....

परंतु आदिवासी विभागातील 37 आणि आयटीआय मधील 15 डॉक्टरांना पुन्हा आरोग्य विभागामध्ये आणून त्यांना पोस्टींग देऊ.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मालवण नगरपरिषदेच्यावतीने एक हॉस्पिटल चालविण्यात येत होते. परंतु त्या हॉस्पिटलचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करण्यासाठी शासनाने ते ताब्यात घेतले. तेथे एक डॉक्टरऐवजी 3 डॉक्टर नेमून ग्रामीण रुग्णालय सुरु केले जाणार होते. तेथील विद्यमान डॉ.झाट्ये हया रजेवर गेल्यामुळे वैद्यकीय व्यवस्था कोलमडून गेलेली आहे. तेथे दुस-या डॉक्टरची नेमणूक झालेली नाही. अन्य कोणतीही व्यवस्था केलेली नाही. म्हणून तेथे तातडीने डॉक्टर नेमण्याची कार्यवाही शासनाकडून केली जाईल आणि ती किती दिवसात केली जाईल ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मालवण येथील रुग्णालयामध्ये वर्ग-1 चे वैद्यकीय अधिका-याचे पद रिक्त आहे. परंतु वर्ग-3 ची पदे भरलेली आहेत. मी स्वत: प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर याबाबतची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करतो.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. जे डॉक्टर्स पोस्टिंगच्या ठिकाणी हजर होणार नाहीत त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय आणि हा विभाग उपसंचालक, कोल्हापूरला जोडलेला होता, आता तो ठाणे जिल्हयाला जोडला असल्यामुळे डॉक्टरांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून हा विभाग पूर्वीप्रमाणे कोल्हापूर जिल्हयाला जोडला जाईल काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, कणकवली येथे लेप्टोच्या केसेस मोठया प्रमाणावर इ ालेल्या आहेत, हे सर्व गरीब रुग्ण आहेत, शासनाच्या हलगर्जीपणामुळे या केसेस झाल्यामुळे शासनाकडून त्यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी पूर्वीप्रमाणे हा विभाग कोल्हापूर जोडला जाईल काय असा प्रश्न विचारला आहे. त्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून या महिन्यामध्ये आदेश काढणार आहोत. जे डॉक्टर नेमणुकीच्या ठिकाणी रिपोर्ट करीत नाहीत त्याबाबत मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, आपण कोणीही बदली वा नेमणुकीबाबत शिफारस करु नये. त्यामुळे हा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3000.....

श्री.विनोद तावडे : सन्माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. परंतु त्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरविला पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पावसाळयात भात कापणीच्या वेळी लेप्टोच्या केसेस मोठया प्रमाणावर वाढतात, त्यापैकी काही लोक दगावतात. म्हणून पुढील 15 दिवसामध्ये याबाबतची कार्यवाही झाली पाहिजे. त्यामुळे तेथे जाणा-या व्यक्तीच्या मुलांना शाळेत प्रवेश घेणे सोयीचे होईल. अन्यथा, तेथे कोणी जात नाही, बदलीची जागा बदलून येतात असे सांगावे लागणार नाही. म्हणून याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.सुरेश शेट्टी : 15 दिवसात होणार नाही. कारण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे विभागाने केलेली मागणी 4 वर्षांपासून प्रलंबित आहे. त्याबाबत आम्ही पाठपुरावा करीत आहोत. म्हणून मी मघाशी उत्तर दिले आहे की, यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना सूचना केली आहे.....

श्री.विनोद तावडे : 15 दिवसात याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

श्री.सुरेश शेट्टी : बाकीच्या विभागाचे आदेश आम्ही आजच काढू.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

सिंधूदुर्ग जिल्ह्यातील कालव्यांच्या दुरावस्थेमुळे हजारो हेक्टर जमीनीचे झालेले नुकसान

(२) * ३०१६ श्री.परशुराम उपरकर, श्री.रामदास कदम , श्री.किरण पावसकर, श्री.अनिल परब : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २३ धरणे असूनही कालव्याच्या दुरावस्थेमुळे हजारो हेक्टर सिंचनक्षेत्र कोरडे राहून शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालव्यांची गळती दुरुस्तीबाबत शासनाची उदासिनता आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यातील पाणी वाहून जावून धरणाच्या पातळीतही घट झाली आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाकडून काही उपाययोजना करण्यात येत आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता: (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माडखोल धरणाला कालवा नसल्यामुळे त्या शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही, अशी वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. मी स्वत: तेथील परिस्थिती पाहिलेली आहे. त्याचप्रमाणे निळेली या धरणाला सुध्दा कालवा नसल्यामुळे तेथील शेतक-यांना पाणी मिळत नाही. काही कालवे नादुरुस्त झाल्यामुळे कालव्याने पाणी जात नाही असे कालवे दुरुस्त करण्यासाठी व नवीन कालवे निर्माण करण्यासाठी शासन तातडीने उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.अजित पवार : होय.

४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

रोहा (जि.रायगड) तालुक्यातील कुंडलिका नदीच्या दोन्ही तिरावरील गावांचे दुषित पाणी पुरवठयामुळे झालेल्या नुकसानीबाबत

(३) * २७४९ श्री. जयंत प्र.पाटील , श्री. कपिल पाटील : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील एम्.आय.डी.सी. मधील केमिकल कंपनीने कुंडलिका नदीमध्ये सोडण्यात येणाऱ्या दूषित पाण्यावर प्रक्रिया न करता सोडल्यामुळे कुंडलिका नदीच्या दोन्ही तिरावरील भात शेतीचे व मच्छिमारांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूषित पाणी पुरवठयामुळे नुकसान झालेल्या काही गावांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एकूण किती गावाना नुकसान भरपाई देण्यात आली आहे,

(४) तसेच नुकसान भरपाईपासून अद्याप किती गावे वंचीत राहिली आहेत,

(५) असल्यास,नुकसान भरपाई पासून वंचीत असलेल्या गावाना भरपाई न देण्याची कारणे आहेत तसेच दूषित पाणी नदीत सोडणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे **?**

श्री.सचिन अहिर, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता: (१) दुषित पाण्यावर सामाईक सांडपाणी प्रक्रिया केल्यानंतरच कुंडलिका नदीच्या खारे पाणी क्षेत्रात सोडण्यात येते. भरतीच्या वेळी नदीतील सदर सांडपाणी शेतीत जाऊन त्या भागातील शेतकऱ्यांचे/मच्छिमारांचे नुकसान झाल्याचे तहसिलदार रोहा यांच्या अहवालावरुन दिसून येते.

(२) तहसिलदार रोहा यांच्या मार्फत बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना/मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

(३) ८ गावांना शेती नुकसानीपोटी व ०६ गावांतील ११३ होडीधारक व ४७ बिगर होडीधारक तसेच ४ मृत गुरांच्या नुकसानीपोटी भरपाई देण्यात आली आहे.

(४) व (५) कुभोशी, आरे बु. झोलांबे, निडी त.अष्टमी या गावांचे नुकसान भरपाई मिळण्याबाबतचे अर्ज तहसिलदार रोहा यांचेकडे प्राप्त झाले असून ते पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, उप विभाग रोहा यांच्याकडे पाठविण्यात आलेले आहेत.

कारखान्यांचे सांडपाणी एकत्र केल्यानंतर सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत प्रक्रिया केल्यानंतर कुंडलिका नदीच्या खारेपाणी क्षेत्रात सोडण्यात येते. तथापी ज्या कारखान्यांचे सांडपाणी पृथ:करण अहवाल विहित मर्यादेत आढळून येत नाहीत अशा कारखान्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, उत्तरात संबंधित शेतक-यांना व मच्छिमारांना नुकसान भरपाई दिल्याचे कबूल केले आहे. परंतु ही नुकसान भरपाई ठराविक लोकांना व गावांना दिलेली आहे. त्यामुळे जे या नुकसान भरपाईपासून वंचित राहिले आहेत त्यांना शासनाकडून नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच ज्या कारखान्यामुळे पाणी प्रदूषित होत आहे त्या कारखान्यांवर कारवाई करण्यात येईल काय ? शेतामध्ये शिरणारे प्रदूषित पाणी थांबविण्यासाठी उपाययोजना करण्यात येईल काय ?

श्री. सचिन अहिर : नेरी यांच्याकडून हायड्रोग्राफिक अहवाल मागविलेला आहे. तो अहवाल आल्यानंतर आणि तहसीलदारांनी पाहणी केल्यानंतर नुकसान भरपाई देण्यात येईल. सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा स्थापन केलेली आहे. या यंत्रणेद्वारे प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया करुन ते 1000 मीटर खोल समुद्रामध्ये सोडण्याच्या संदर्भात एमसीसीबीने एमआयडीसीला सूचना दिलेल्या आहेत. एमआयडीसीने कारवाई सुरु केलेली असून 2011 पर्यन्त या यंत्रणेचे काम पूर्ण होईल.

श्री. जयंत प्र. पाटील : अनेक गावातून नुकसान भरपाई बाबत अर्ज आलेले आहेत. खारआपटी मधून 63, पडम मधून 17 पिंगळसई मधून 1, तारेघर मधून 2, खारगावमधून 4, इ ोळांबे-कोपरे मधून 59, निडी तर्फे अष्टमी मधून 6, खारी मधून 15 याप्रमाणे अर्ज आलेले आहेत. या अर्जानुसार शेतक-यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

श्री. सचिन अहिर : 3 कोटी 8 लाखापर्यन्त नुकसान भरपाई दिलेली आहे. हायड्रोग्राफिक अहवाल आल्यानंतर, तहसीलदारांनी जमिनीची तपासणी केल्यानंतर ज्या ज्या लोकांचे नुकसान झालेले आहे त्या सर्व लोकांना नुकसान भरपाई देण्यात येईल.

श्री. भाई जगताप : 3 कोटी पेक्षा जास्त नुकसान भरपाई दिल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. काही लोकांना नुकसान भरपाई दिली आणि काही लोकांना ती दिलेली नाही. 3 कोटी रु. नुकसान भरपाई देत असताना जे निकष लावलेले आहेत तेच निकष लावून नुकसान भरपाईसाठी आलेले अर्ज निकाली काढण्यात येतील काय ?

श्री. सचिन अहिर : होय.

श्री. विनोद तावडे : प्रक्रिया केलेले सांडपाणी समुद्रात सोडल्यानंतर बॅकवाटरमुळे शेतीचे नुकसान होते का ?

श्री. सचिन अहिर : सीईटीपीमधून पाणी समुद्रात सोडल्यानंतर भरतीमुळे ते पाणी बॅकवॉटरमध्ये जाते आणि शेतीचे नुकसान होते. सीईटीपीमधून जे पाणी समुद्र किनारी सोडले जाते ते समुद्रामध्ये 1000 मीटर आत सोडावे अशा सूचना एमआयडीसीला दिलेल्या आहेत. त्याबाबतीत एमआयडीसीने कारवाई सुरु केलेली आहे. 2011 पर्यन्त हे काम पूर्ण होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : ज्या कारखान्यांचे सांडपाणी पृथ:करण अहवाल विहित मर्यादेत आढळून येत नाहीत अशा कारखान्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येते असे उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. पृ:थकरण अहवालासंबंधीची विहित मर्यादा किती आहे ? यासंदर्भात किती कारखान्यांवर कारवाई केलेली आहे ?

श्री. सचिन अहिर : एफडीसी आणि कोअर्स कंपन्यांना क्लोझर नोटीसा दिलेल्या आहेत. इटीपी तयार करुन तसेच सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत प्रक्रिया करुन पाणी समुद्रामध्ये सोडायचे असते. परंतु ज्यांनी इटीपीची व्यवस्था केलेली नाही अशा कारखान्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडून बँक गॅरण्टी घेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे निकष तुम्ही पाळले नाहीत तर बँक गॅरंटी दिलेली आहे ती बँक डिपॉझिट होईल आणि कायदेशीर कारवाई देखील करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, या प्रश्नाशी संबंधित असा प्रश्न मी उपस्थित करु इच्छितो. काल कित्येक दूरदर्शन वाहिन्यांनी उल्हासनगर येथील उल्हास नदीमध्ये मोठया प्रमाणात दूषित पाणी सोडले गेल्यामुळे नदीतील मासे मृत झाल्याची दृश्ये प्रसारित केली. इतकेच नव्हे तर त्या भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून लोकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे. या दूषित पाण्याचा शेती व्यवस्थेवर देखील परिणाम होत आहे. अशी गंभीर परिस्थिती असतानाशासनाने उल्हास नदीमध्ये होणाऱ्या प्रदूषणाबाबत काय कारवाई केली? असे प्रकार यापुढे होणार नाही यासाठी शासन काय खबरदारी घेणार आहे?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा असला तरी शासन आरआरझेड अंतर्गत रिव्हर झोन पॉलिसी तयार करीत आहे. त्या अंतर्गत निकष तयार करीत आहोत. त्या निकषानुसार निश्चित कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे बोईसर (ता.पालघर, जि.ठाणे) येथील मागास समाजाच्या व्यक्तीची जमिन घेऊन केलेली फसवूणक

(४) * ६१५२ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोईसर (ता.पालघर, जि.ठाणे) येथील सं.नं.११४/अ ही जमीन नवीन अविभाज्य शर्तीची असून ती हरिजन समाजाच्या व्यक्तीची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर अनधिकृत बांधकाम करून तेथे पंचमी नावाचे अनधिकृत उपहारगृह व परमीटरूम बीअर बार सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तहसिलदार पालघर यांनी अनधिकृत बांधकामामुळे सदर हॉटेलचा परवान रद्द केला असूनही स्थानिक पोलिस ठाणे व उत्पादन शुल्क विभाग यांनी सदर हॉटेल व परमीट रूम बिअर बारचा परवाना रद्द करण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ता.पालघर येथे अशाच प्रकारे अनेक ठिकाणी शासकीय जागेवर अनधिकृत बांधकाम करून व जमिनीची अकृषीक परवानगी नसताना हॉटेल परवाना परमिटरूम बिअर बार तसेच देशी दारूची दुकाने यांना महसुल विभाग, ग्रामपंचायत, उत्पादन शुल्क विभाग, स्थानिक पोलिस ठाणे यांनी परवाने दिले असून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : (१) व (२) होय,

(३) तहसिलदार, पालघर यांनी अनधिकृत बांधकामामुळे सदर हॉटेलचा परवाना रद्द केला आहे. सदर आदेशाविरुध्द हॉटेल मालकाने उप-विभागीय अधिकारी, डहाणू येथे अपील केले आहे तथापि, तहसिलदार, पालघर यांनी सर्व्हे क्र. ११४/अ/१२ या जमिनीवर हॉटेल व लॉजिंग या वाणिज्य प्रयोजनार्थ रेखांकन व बांधकामास परवानगी दिलेली असल्यामुळे मे. हॉटेल पंचमीचा बिअरबार परवाना रद्द करण्यात आलेला नाही.

(४) राज्य उत्पादन शुल्क खात्याकडून मंजूर करण्यात येणारी परवानाकक्ष (बिअरबार) अनुज्ञप्ती ही गौण असून सदर अनुज्ञप्ती खाद्यगृह अनुज्ञप्ती, तसेच अन्न व औषध प्रशासन यांनी मंजूर केलेल्या अनुज्ञप्तीच्या आधारे मंजूर करण्यात येते. खाद्यगृह अनुज्ञप्ती मंजूर नसल्यास बिअरबार अनुज्ञप्ती मंजूर करण्यात येत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्रीमहोदयांचा आभारी आहे. त्यांनी उत्तराद्वारे आमचे समाधान केले आहे. मात्र या भागामध्ये अशी प्रकरणे घडतात त्याबाबत शासनाने अशीच दक्षता घेतली पाहिजे.

श्री.गणेश नाईक : धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी</u>

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक ५ व ७ वरील प्रश्न हे कोकण पॅकेजशी निगडित आहेत. हे दोन्ही प्रश्न क्लब करण्यात यावेत. प्रश्न विचारणारे सदस्य समान आहेत. त्यामुळे हे दोन्ही प्रश्न एकमेकाशी निगडित असल्यामुळे क्लब करण्याची अनुमती मिळावी.

सभापती : तारांकित प्रश्न क्रमांक २६८१ आणि ३०६४ हे एकत्रित घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोकणच्या विकासासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यास जाहिर केलेल्या ५,३२३ कोटी रुपयांचे पॅकेजबाबत

(५) * २६८१ श्रीमती अलका देसाई, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती मधु जैन, श्री.राजन तेली , प्रा.सुरेश नवले, श्री.सय्यद ज़मा : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे जून, २००९ च्या सुमारास सिंधुदुर्ग जिल्ह्यात मंत्रीमंडळाच्या बैठकीत कोकणाच्या विकासासाठी ५,३२३ कोटी रुपयाचे कोकण पॅकेज जाहिर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी राज्यशासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) अद्याप, कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व ती केव्हा करण्यात येईल?

श्री.सुनील तटकरे : (१) होय, हे अंशत: खरे आहे, शासनाने कोकण विकास कार्यक्रम -२००९ घोषित केला असून त्याची एकूण किंमत रु,५३११.०७ कोटी आहे.
(२) याप्रकरणी शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.कोविका-२००९/प.क्र.६/१४२०, दिनांक २५ ऑगस्ट, २००९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(३) सदर पॅकेज सन २००९-१० ते सन २०११-१२ या तीन वर्षाकरिता असून वर्षनिहाय विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

सन २००९-१०	रु.२९०८.२६ कोटी
सन २०१०-११	रु.१३७०.७५ कोटी
सन २०११-१२	रु.१०३२.०६ कोटी
एकूण	रु. ५३११.०७ कोटी

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणातील पर्यटन विकासासाठी तेथील नगरपालिकांना विशेष पॅकेज देण्याबाबत

(७) * ३०६४ श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक उर्फ भाई जगताप , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.संजय दत्त : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील पर्यटन विकासासाठी नगरपालिकांना विशेष पॅकेज देण्यात येईल असे मा.वित्त मंत्री यांनी जानेवारी २०१० च्या पहिल्या आठवड्याच्या सुमारास सावंतवाडी येथे जाहीर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) साठी किती रकमेची तरतूद करण्यात आली आहे,
(४) असल्यास, त्याचा थोडक्यात तपशील काय आहे,
(५) अद्याप उक्त प्रकरणी कार्यवाही केली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.वर्षा गायकवाड, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, जून, २००९ पासून मार्च, २०१० पर्यंत कोकण पॅकेज अंतर्गत कोकणामध्ये कोणती कामे पूर्ण झाली? नसतील तर विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सभापती महोदय, कोकण विकासाचा जो कालबध्द कार्यक्रम २००९ मध्ये घोषित करण्यात आला त्यामध्ये पर्यटन, पर्यावरण, गृह, बंदरे, पशुसंवर्धन, दुग्धविकास, सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, जलसंपदा, जलसंधारण, पणन अशा वेगवेगळ्या विभागांर्मुत जे काही कार्यक्रम हाती घेण्यात येणार होते त्यासंबंधीचा कार्यक्रम त्याठिकाणी घोषित करण्यात आला आहे. यामध्ये पर्यटन विभागामार्फत जो कृती विकास आराखडा तयार केला त्यासाठी पर्यटन विकास महामंडळाकडे निधी वर्ग करण्यात आला. त्या आराखड्याला अंतिम स्वरुप देण्याचे काम सुरु आहे. पर्यटन विकास महामंडळाला निधी देण्यात आलेला असल्यामुळे दोन वर्षात १०० कोटी २५ लाखाची कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे. पर्यावरण विभागामार्फत जो निधी दिला गेला त्यामध्ये सीआरझेडमध्ये विशेष सवलती देण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे यासाठी निधी वितरीत करण्यात आला. फिशिंग जेटींचे बांधकाम आणि इतर कामे मेरिटाईम बोर्डाकडे दिली असून मेरिटाईम बोर्डाने बंगळुरु येथील संस्थेकडून त्यांचा अहवाल मागितला आहे. तो अहवाल प्राप्त होताच मेरिटाईम बोर्डामार्फत त्यावेळी जी काही कामे मंजूर केली त्या कामांना प्रत्यक्षपणे निश्चितच सुरुवात होऊ शकते. सागरी महामार्गाच्या दृष्टीकोनातून यावर्षी नाबार्डच्या अर्थसहाय्यातून काही कामे निश्चितपणे सुरु करण्यात येणार आहेत. त्यामध्ये साकवांचे बांधकाम आणि साकवांची विशेष दुरुस्ती व वाडीजोड रस्त्यांसाठी मंत्रीमंडळाने जो नियतव्यय मंजूर केला तो वितरीत करण्यात आला आहे. त्याप्रमाणे कामे सुरु झाली आहेत. जलसंपदा विभागामार्फत खार भूमी विकासाचे मापदंड बदल करावयाचे आहेत ते मापदंड मंत्रीमंडळामध्ये मान्य करुन घेतले. खार भूमी विकासाचा विशेष कार्यक्रम या वर्षापासून हाती घेत आहोत. यामध्ये उरण तसेच ठाणे जिल्हयापासून सिंधुदुर्ग जिल्हयापर्यंत चारही जिल्हयातील समुद्र किनारी असलेल्या खार बंदिस्तीचे बांधकाम करण्याचा कार्यक्रम हाती घेणार आहोत.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 2681 व 3064..... श्री. सुनील तटकरे .....

कोकणातील जलसंपदा विभागाच्या कार्यक्रमासाठी 300 कोटी एवढा अधिकचा नियतव्यय देण्याचे शासनाने कबूल केले होते व त्यानुसार सदर प्रस्ताव हा माननीय राज्यपालांकडे गेलेला असून त्या प्रस्तावाला त्यांची अनुमती मिळाल्यानंतर जलसंपदा विभागामार्फत कोकणात सुरु असलेल्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. सामान्य प्रशासन विभागामार्फत स्मारकांच्या कामासाठी संबंधित यंत्रणेकडे निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. अशा प्रकारे वेगवेगळ्या योजनांतर्गत जो निधी मंजूर केला होता तो निधी वितरित करण्याचे काम चालू आहे. तीन जिल्ह्यांमध्ये नर्सिंग कॉलेजेस सुरु करण्याचे शासनाकडून घोषित करण्यात आले होते त्यानुसार जुलै, 2010 मध्ये सिंधुदुर्ग, रायगडमधील अलिबाग आणि रत्नागिरी येथे मुख्यालयाच्या ठिकाणी असे कॉलेजेस सुरु होतील.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, जून, 2009 मध्ये शासनाने कोकण विकासाचा जो कार्यक्रम घोषित केला त्यासंबंधी नियोजन विभागाने ऑगस्ट, 2009 मध्ये आदेशही निर्गमित केले आहेत. या पॅकेज अंतर्गत प्रत्येक हेडखाली किती रक्कम खर्च झालेली आहे ? तसेच प्रश्न क्रमांक 7 च्या संदर्भात मी असे विचारु इच्छितो की, सिंधुदुर्ग जिल्हा हा सन 1991 मध्ये पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. त्या अनुषंगाने कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोणकोणत्या कामांसाठी किती निधी खर्च करण्यात आला ? त्याचप्रमाणे श्रीवर्धन ते सावंतवाडीच्या दरम्यान ज्या नगरपरिषदा आहेत त्यांना विशेष दर्जा देऊन विशेष निधी शासनाने दिलेला आहे काय ? तिसर प्रश्न असा आहे की, सावंतवाडीमध्ये नगरपालिकेच्या वतीने माननीय मंत्री महोदयांचा नागरी सत्कार करण्यात आला होता त्यावेळेस त्यांनी या जिल्ह्यातील नगरपालिकांना पर्यटन विकासासाठी निधी देण्याबाबत घोषित केले होते. त्यावर माननीय वित्त मंत्री ठाम आहेत काय ? तसेच पर्यटनाच्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी नगरपालिकांना विशेष निधी देण्यात येईल अशा प्रकारे सावंतवाडी येथे बिलकूल घोषित केलेले नाही. दुसरे म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी येथे तलावाचे काम, भोसले उद्यानाचे काम आणि पर्यटक निवास, तारकर्ली येथे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 2681..... प्रा. वर्षा गायकवाड....

पर्यटक निवास, खारेपाटण येथे रस्त्यालगतच्या सुविधा आणि आंबोली येथे पर्यटक निवास ही कामे चालू आहेत. तसेच रायगडमध्ये अक्षी-नायगांव येथे 72 लाख, दिवे-आगार येथे 37 लाख रुपये आतापर्यंत खर्च झाले असून आतापर्यंत एकूण 5.48 कोटी एवढा निधी खर्च झालेला आहे.

श्री. भाई जगताप : महोदय, कोकणच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे, त्याबद्दल मी शासनाचे आभार व्यक्त करतो. शासनाने 5323 कोटीचे पॅकेज कोकणासाठी दिलेले आहे. सन 2009-10 साठी 2908 कोटी एवढा खर्च करण्याचेही सांगण्यात आले. ही रक्कम अर्थसंकल्पात मात्र कुठेही रिफ्लेक्ट होत नाही....

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2681 व 3064 श्री.भाई जगताप ...

हे पैसे कोठून व कसे येणार आहेत.? त्याचबरोबर 2 हजार 908 रुपये कोकणातील विविध कामांसाठी 2009-2010 या वर्षात खर्च होणार आहेत काय ? या पैशासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली होती काय ?

श्री.सुनील तटकरे :सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, वेगवेगळया विभागाच्या अंतर्गत वेगवेगळया योजना कोकणासाठी मंजूर करण्यात आल्या आहेत. या विविध योजनांसाठी नियतव्यव उपलब्ध करुन दिला होता. त्यापैकी बरीचशी रक्कम अर्थसंकल्पीत झालेली आहे. जी रक्कम अजूनही अर्थसंकल्पीत व्हावयाची राहिली आहे त्याबाबतीत मी सांगितले की 350 कोटी रुपये जल संपदा विभागाच्या मार्फत कोकणातील चालू प्रकल्पासाठी द्यावयाचे आहेत . तो प्रस्ताव मान्यतेसाठी माननीय राज्यपाल महोदयांकडे पाठविण्यात आला आहे या प्रकल्पाला माननीय राज्यपालांची मान्यता मिळाळयानंतर निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. हा कार्यक्रम तीन वर्षाचा असून 2009-2010 या आर्थिक वर्षात काही निधी खर्च करावयाचा राहिला असेल तर तो नंतरच्या वर्षात खर्च केला जाईल एकूण तीन वर्षाचा कालबध्द कार्यक्रम शासनाने मंजूर केला आहे व तेवढा निधी कोकणासाठी निश्चितपणे खर्च केला जाईल.

श्री.परशुराम उपरकर :सभापती महोदय,याच प्रश्नाच्या संदर्भात गेल्या अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी प्रश्न विचारला होता .2 हजार 809 रुपये या वर्षी खर्च करण्याचे मान्य करण्यात आले होते. त्या बाबतीत दिनांक 30 जून रोजी जो जी. आर. काढण्यात आला होता. पाटबंधारे विभागाला 729 कोटी रुपये देण्यात येईल असे त्या जी.आर.मध्ये म्हटलेले होते.ते पैसे या विभागाला देण्यात आले आहेत काय ? त्याचप्रमाणे त्या ठिकाणी मच्छिंद्र कांबळी कला अकादमी आणि शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी एक कोटी रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले होते. या संदर्भात दोन्ही पुरवणी मागण्यांमध्ये तसेच या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली नाही या बाबतीत माननीय मंत्री महोदय खुलासा करणार आहेत काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय,जलसंपदा विभागामार्फत जो निधी द्यावयाचा होता त्याबाबतीत मी मघाशी खुलासा केलेला आहे. मच्छिंद्र कांबळी कला अकादमी आणि शिवाजी महाराजाच्या मंदिराच्या कामासाठी स्वतंत्रपणे अहवाल मागविण्यात आला आहे .अहवाल प्राप्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2681 व 3064 श्री सुनील तटकरे..

झाल्यानंतर या कामासाठी किती निधी लागणार आहे हे समजू शकेल. ज्या वेळेस हा अहवाल प्राप्त होईल, अंदाजपत्रके प्राप्त होतील त्यावेळी आराखडे मंजूर होतील आणि त्यावेळी तात्काळ या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय 2908.26 कोटी रुपये खर्चाच्या विविध योजना राबविण्यात येणार आहेत . शासनाच्या ज्या योजना आहेत त्यामध्ये या योजनांबरील खर्चाचा सामावेश करण्यात आला आहे काय ? की हे पैसे कोकणच्या पॅकेजमधील आहेत ? पर्यटनाच्या संदर्भात 187 कोटी रुपये हे राज्य शासनाचे नसून ते पैसे केन्द्र सरकारने पाठविलेले होते परंतु चार वर्षात त्यातील 5 कोटी रुपये खर्च केले आहेत. तेव्हा पर्यटनाच्या बाबतीत व्यवस्थित प्लॅन करुन हे पैसे खर्च करण्यात येणार आहेत काय, त्याचबरोबर हे पैसे केव्हा खर्च करण्यात येणार आहेत ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितल्याप्रमाणें वेगवेगळया विभागाच्या ज्या कामाचा अर्थसंकल्पात समावेश केला होता त्या व्यतिरिक्त काही कामे मंजूर केलेली आहेत त्यासाठी देखील निधी उपलब्ध करुन दिला जाईल. पर्यटन विकास महामंडळाला सागरी पर्यटनासाठी 187 कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री राजन तेली यांनी प्रश्न विचारला असून मी त्यांना सांगू इच्छितो की, या बाबत आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीची बैठक एक दोन दिवसात होईल त्याचबरोबर मी स्वत: या कामामध्ये लक्ष घालत असून येत्या वर्षभरात कोकणातील सागरी किनारपट्टीवर हा निधी खर्च होणार आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील पर्यटनाच्या विकासासाठी शिरोडा, मोचेमाड आणि मिठबाव येथे पंचतारांकित हॉटेल्स सुरु व्हावीत या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. एक हॉटेल टाटा कंपनी बांधणार आहे दुसरे हॉटेल अवधूत तिमलो बांधणार आहे या सर्व पंचताराकित हॉटेल्सची काय स्थिती आहे ? त्या ठिकाणी हॉटेल्स सुरु होणार आहेत काय ? त्यांना जी जमीन देण्यात आलेली आहे त्या जमिनीची सद्यस्थिती काय आहे ?

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीपाठ नाही

ता.प्र.क्र. 2681, व 3064...

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, त्या परिसरामध्ये पंचतारांकित हॉटेल्स असावेत म्हणून माननीय श्री. शरद पवार साहेब मुख्यमंत्री असल्यापासून म्हणजे गेल्या 15-20 वर्षापासून प्रयत्न सुरु होते. त्याकरिता संबंधित हॉटेल्सच्या व्यवस्थापनांना तशाप्रकारची जागाही देण्यात आली. परंतु त्यांच्याकडून हॉटेल्सच्या उभारणीचे काम सुरु झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. फक्त एक-दोन ठिकाणी कामांची प्रगती झाल्याचे दिसते. आणि म्हणून या सर्व गोष्टींचा उच्च स्तरीय बैठकीमध्ये आढावा घेऊन ज्यांच्याकडे हॉटेल्सच्या बांधणीकरिता ज्या कालावधीसाठी जमीन देण्यात आली होती त्या हॉटेल्सच्या व्यवस्थापनाकडून त्यांना देण्यात आलेल्या जागेचा विनियोग करण्यात आला नाही तर पर्यटन विभागाकडून स्वतंत्रपणे कामे सुरु करण्यात येतील.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हॉटेल्सच्या व्यवस्थापकांना देण्यात आलेल्या जागेवर हॉटेल्सची उभारणी करण्याकरिता निश्चित कालमर्यादा घालून देण्यात आली होती काय? ज्यावेळी शासनाकडून एखाद्या प्रकल्पासाठी जमीन दिली जाते त्यावेळी ठराविक कालमर्यादा घातली जाते. याठिकाणी जर कालमर्यादेचे बंधन पाळले गेले नाही तर त्यांना देण्यात आलेली जागा परत घेण्याची कारवाई करणार काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, त्याठिकाणी हॉटेल सिरॅडी गोवा, हॉटेल ओबेरॉय व हॉटेल ताज या तीन पंचतारांकित हॉटेल्सना जमीन देण्यात आली होती. त्यापैकी एक हॉटेल सुरु झाले नाही, आणि एक पंचतारांकित हॉटेल सुरु झाले आहे. त्यांना देण्यात आलेल्या विहित कालमर्यादेमध्ये ते आपले काम लवकरात लवकर पूर्ण करणार आहेत. ओबेरॉय हॉटेलच्या व्यवस्थापनाने त्यांना देण्यात आलेली जागा विकसित न केल्यामुळे त्यांच्याकडून जागा काढून घेऊन ती एम.टी.डी.सी. ला देण्यात आली आहे. तसेच, ताज हॉटेलच्या व्यवस्थापनास देण्यात आलेली जागा "तुम्ही डेव्हलप करणार नसाल तर ती आपल्या ताब्यातून काढून घेऊन एम.टी.डी.सी. कडे देण्यात येईल" अशाप्रकारची नोटिस त्यांना देण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

नांदूरमध्यमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) कालवा फुटल्याबाबत

(६) * २९७२ श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.मोहन जोशी, श्री.उल्हास पवार, श्री.सय्यद ज़मा : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारुखेडले (ता.निफाड, जि.नाशिक) येथे दिनांक ६ जानेवारी, २०१० रोजी नांदूरमध्यमेश्वर उजवा तट फुटल्याने परिसरातील दहा हेक्टर क्षेत्रातील पिके वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पहाणी वा चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासनाने कोणती मदत केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार :

(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, छापील उत्तराने माझे समाधान झाले असल्यामुळे मला उपप्रश्न विचारावयाचे नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात धान्यापासून मद्यनिर्मिती करण्याबाबतचा शासनाचा निर्णय

(८) * ३९८४ श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धान्यापासून मद्यनिर्मिती करणेसंदर्भात शासनाची सर्वसाधारण भुमिका काय आहे,

(२) राज्यात सध्या धान्यापासून मद्यनिर्मितीचे किती कारखाने आहेत,

(३) पुढील भविष्यात मद्यनिर्मितीसाठी नवीन कारखान्यांना परवानगी देणेसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय ?

श्री.रमेश बागवे, श्री.गणेश नाईक यांच्याकरिता : (१) मद्यार्काचा (अल्कोहोल) उपयोग औषध व सौंदर्य प्रसाधने, पेय मद्य, तसेच औद्योगिक प्रयोजनार्थ आणि पेट्रोलमध्ये मिश्रणासाठी करण्यात येतो. शासन निर्णय, गृह विभाग, दि.८.६.२००७ अन्वये "धान्याधारीत आसवनी व एकात्मिक घटक व अर्थसहाय्य-२००७" हि योजना सुरु करण्यात आली. सदर योजनेअंतर्गत राज्यात उत्पादित धान्य खरेदी करुन त्यापासून बनविलेले मद्यार्क (अल्कोहोल) राज्यातील औषध व सौंदर्यप्रसाधने तसेच मद्यनिर्मिती करणाऱ्या घटकांना विकल्यानंतर प्रति लीटर रु.४५०/- इतके उत्पादन शुल्क शासनास मिळते. त्यापैकी रु.१०/- इतकी प्रतिपूर्ती घटकास करण्यात येते.

(२) धान्यापासून मद्यार्क निर्मिती करुन त्या मद्यार्कापासून देशी / भारतीय बनावटीचे विदेशी मद्य तयार करणारे प्रत्येकी तीन कारखाने आहेत.

(३) धान्याधारित आसवणी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य-२००७ या योजनेअंतर्गत दि.२०.८.२००९ नंतर प्रकल्प उभारणीसाठी इरादापत्रे देण्याचे बंद करण्यात आले आहे.

(२) धान्यापासून मद्यार्क निर्मिती (मद्य नव्हे) करण्याकरिता एकूण १७ घटकाना प्रत्यक्ष उत्पादनाचे परवाने (नमुना "आय" अनुज्ञप्ती) देण्यात आली आहे.

(३) धान्यधारित आसवणी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य-२००७ योजनेअंतर्गत दि.२०.८.२००९ नंतर प्रकल्प उभारणीसाठी इरादापत्रे देण्याचे बंद करण्यात आले आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, आजच्या तारखेला महाराष्ट्रामध्ये किती प्रकल्पामार्फत मद्यनिर्मिती होते? छापील उत्तरामध्ये म्हटले आहे की, "दि.२०.८.२००९ नंतर प्रकल्प

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

ता.प्र.क्र. ३९८४....

श्री. अरुण गुजराथी...

उभारणीसाठी इरादापत्रे देण्याचे बंद करण्यात आले आहे". माझा प्रश्न असा आहे की, पुनश्च इरादापत्रे देण्याचा शासनाचा विचार आहे काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, आजपर्यंत २० ठिकाणी मद्यार्क निर्मिती करण्यास परवानगी दिली आहे. शासनाने दि.२०.८.२००९ नंतर नवीन प्रकल्पांना परवानगी देण्याचे बंद केले आहे. त्यामुळे नवीन परवाना देण्याचा शासनाचा विचार नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, राज्यामध्ये ६८ मद्य निर्मिती कारखाने आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये काजूची बोंडे फुकट जात आहेत. त्यापासून मद्य निर्मिती करणाऱ्या कारखान्यांना परवानगी देण्याचा शासनाचा विचार आहे काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, काजूच्या बोंडापासून मद्य निर्मिती करण्याबाबत अनेक माननीय सदस्यांकडून शासनाकडे विचारणा करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये द्राक्षावर प्रक्रिया करुन वाईन तयार केली जाते. त्याठिकाणी आपण एक्साईजमध्ये सूट दिलेली आहे. त्याप्रमाणे काजूच्या बोंडापासून, चिकू, जांभूळ इत्यादी विविध फळे आणि फुले यांच्यापासून मद्य निर्मिती करण्याबाबत शासन गंभीरपणे विचार करीत आहे. त्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, दि.२०.८.२००९ नंतर इरादापत्रे देण्याचे शासनाने बंद केले आहे. कालपरवा आपण माननीय श्री. अण्णा हजारे यांना यापुढे मद्य निर्मितीकरिता परवाने देण्याचे बंद करु असे आश्वासन दिल होते असे आम्हाला समजले.परंतु ते यापूर्वीच आपण बंद केले होते. याचा अर्थ आपण माननीय अण्णांना फसविले आहे. म्हणजे यापुढे आम्ही इरादापत्रे देण्याचे बंद करु असा त्याचा अर्थ आहे काय? धान्यापासून मद्यार्क बनविण्यास परवानगी देणे हा देखील त्यातील भाग असून त्यासाठी अर्थ सहाय्य देण्याची शासनाला गरज कां भासली ?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3984 . . . .

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, यावर्षी म्हणजे 2007 रोजी सदरहू योजनेस परवानगी देण्यात आली होती, त्यानंतर 2008 मध्ये ती बंद करण्यात आली. कारण एकूणच मद्याची असलेली गरज लक्षात घेता आणि याबाबतीत विविध माहिती घेतल्यानंतर अगोदरच सदरहू निर्णय घेण्यात आलेला आहे. शासनाकडून मद्यार्काच्या निर्मितीसाठी . . . .

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : अण्णा हजारे यांच्याबाबत . . . .

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, याबाबतीत मी सांगू इच्छितो की, तो निर्णय अगोदरच झाला होता आणि त्यांना माहिती देण्यात आली होती. यापुढे अशा कारखान्यांना परवानगी दिली जाणार नाही असे आश्वासन देण्यात आलेले आहे. धान्यापासून मद्यनिर्मिती मोलॅसिसपासून मद्यनिर्मिती हे दोन प्रकार आहेत. आता धान्यापासून मद्यनिर्मिती करण्यासाठी परवानगी देण्यात येणार नाही अशा प्रकारचे आश्वासन देण्यात आलेले आहे. याठिकाणी असा गैरसमज निर्माण झालेला आहे की, राज्य शासन सरसकट धान्यापासून मद्यनिर्मिती करणाऱ्या कारखान्यांना एक ठोक रक्कम देत आहे. परंतु यामध्ये असे आहे की, मद्य निर्मिती झाल्यानंतर जर त्याचे या राज्यामध्ये कन्झमशन इंडस्ट्रीअल बाबीसाठी किंवा पिण्यासाठी किंवा औषध निर्मितीसाठी झाले तर त्यातील काही परतावा दिला जाणार आहे आणि तो किती असेल तर 10 रुपये पर लिटर. तसेच आजच्या क्षणाला अशा प्रकारचे मद्य निर्मिती करणारे कारखाने तीन आहेत.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : साधारणपणे ही रक्कम 1200 कोटी इतकी होणार आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, हा आकडा चुकीचा आहे.आपण असे म्हणतो की,....

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी माझ्याकडे पाहून उत्तरे द्यावीत.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, शासनाने ज्यांना यासाठी लायसन्स दिलेले आहे, त्यांना सरसकट एक ठोक रक्कम दिली जाणार आहे असा एक गैरसमज निर्माण झालेला आहे. यामध्ये ज्यांनी अशा प्रकारचे कारखाने सुरु केलेले आहेत, त्यांनी निर्माण केलेल्या मद्याचे राज्यामध्ये कन्झमशन झाले असेल तर त्यांना त्यातील पर लिटर 10 रुपये परतावा दिला जाणार आहे. भविष्य काळामध्ये अन्नधान्यापासून मद्य निर्मिती करण्याच्या बाबतीत लायसन्स देण्यात येणार नाहीत अशा प्रकारचे ठोस आश्वासन संबंधितांना देण्यात आलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी तिसऱ्या क्रमांकाच्या उत्तरामध्ये शेवटी

. . . .आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3984 . . . .

श्री.दिवाकर रावते . . . .

म्हटलेले आहे की,"धान्याधारित आसवणी व एकात्मिक घटक अर्थसहाय्य 2007 या योजनेअंतर्गत दि.20-08-2009 नंतर प्रकल्प उभारणीसाठी इरादापत्रे देण्याचे बंद करण्यात आले आहे." या संबंधात श्री.अण्णा हजारे यांनी उपोषणाला बसण्यासंबंधात घोषणा केली, तेव्हा त्यांना ही बाब का कळविण्यात आली नाही की श्री.अण्णा हजारे यांना अशा प्रकारे इरादापत्रे देण्याचे बंद करण्यात आले आहे हे माहिती असूनही याबाबतचे श्रेय लाटण्यासाठी ते उपोषणाला बसले आहेत. या दोन्हीबाबत उत्तर द्यावे लागेल. माझा प्रश्न असा आहे की, दि.20-08-2009 पूर्वी किती इरादा पत्रे देण्यात आलेली आहेत. तसेच आता सांगितल्याप्रमाणे याठिकाणी मद्य निर्मिती करतात. तसेच अन्य राज्यात मद्य निर्मिती करताना त्याठिकाणी आणि इतर घटकांसाठी जे अल्कहोल वापरतात, त्यांना दहा रुपये परतावा देतो. तर आतापर्यंत लातूरच्या कारखान्याला किती परतावा देण्यात आला आहे आणि त्यांनी किती मद्य निर्मिती केली आहे ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, याबाबतीत शासनाने राज्यामध्ये एकूण मद्याची असलेली गरज, अन्नधान्याचा उपलब्ध असलेला साठा या अनुषंगाने निर्णय घेतलेला आहे. या विषयाच्या संबंधात कोणी उपोषणाला बसणार आहे किंवा कोणी काही करणार आहे याची तेव्हा शासनाला कल्पना नव्हती. परंतु इन टाईम . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे बरोबर नाही.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, याठिकाणी अजून कोणी उपोषणाला बसणार आहेत म्हणून त्यांना पत्र द्यावे किंवा त्यांना कळवावे असे काही गरजेचे नाही.

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी माझ्याकडे पाहून उत्तर द्यावे.

(डॉ.दीपक सावंत खाली बसून बोलतात.)

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्याशीच बोलत आहे. याठिकाणी कोणी उपोषणाला बसणार आहे याची शासनाला कल्पना नाही. त्यामुळे शासनाने इन ॲडव्हान्स कोणाला काही कळवावे असे शासनावर बंधनकारक नाही. त्यांची उपोषणाच्या संबंधातील घोषणा एका बाबीला अनुसरुन नव्हती. त्याममध्ये अनेक प्रश्न समाविष्ट असल्यामुळे याबाबतची माहिती दिलीच पाहिजे असे काही बंधनकारक नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नांदेड जिल्ह्यातील पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत
केलेल्या कामात झालेला भ्रष्टाचार

(9) ***3459 श्रीमती उषाताई दराडे,डॉ.निलम गोऱ्हे, श्री.दिवाकर रावते,डॉ.दिपक सावंत, श्री.किसनचंद तनवाणी, श्री.अनिल परब, श्री.परशुराम उपरकर,श्री.विक्रम काळे** :सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतीलकाय :-

(1) नांदेड पाटबंधारे विभागांतर्गत पुर्णा पाटबंधारे विभागाने अतिवृष्टीच्या नावाखाली केलेल्या कालव्यांची दुरुस्ती व गाळ काढण्याच्या कामात सुमारे 9 कोटीचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे डिसेंबर, 2009 मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे संबंधीतांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.विजय वडेट्टीवार श्री.अजित पवार यांच्याकरिता : (1) व (2) या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीचे अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता, पथक, औरंगाबाद यांचेमार्फत प्राथमिक अन्वेषण करण्यात आलेले आहे.

(3) प्राथमिक अन्वेषणांती विभागांतर्गत कामे करतांना अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले असून त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, या विभागात जेव्हा अतिवृष्टी झाली होती तेव्हा करण्यात आलेल्या कालव्याच्या दुरुस्तीच्या कामामध्ये तसेच गाळ काढण्याच्या कामामध्ये नऊ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. यासंदर्भात शासनाने प्रश्न क्रमांक 1 व 2 ला दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, "या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीचे अनुषंगाने अधीक्षक अभियंता दक्षता, पथक, औरंगाबाद यांचेमार्फत प्राथमिक अन्वेषण करण्यात आलेले आहे." तसेच प्रश्न क्रमांक 3 ला दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की," प्राथमिक अन्वेषणांती विभागातंर्गत कामे करतांना अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले असून त्याअनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे." सभापती महोदय, भ्रष्टाचार झालेला आहे हे साधारणपणे लक्षात आलेले आहे.तेव्हा यासंदर्भात निश्तिच कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात येणार आहे? ही कारवाई कधी पूर्ण होईल आणि संबंधितांवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येणार आहे?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, यासंदर्भातील अनियमिततेच्या संदर्भात दिनांक 10-5-2007 ला तक्रार प्राप्त झाली. त्यानंतर दिनांक 26-6-2007च्या तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता पथक औरंगाबाद यांना अन्वेषणाबाबत कळविण्यात आले होते. या दक्षता पथकाने यासंदर्भातील प्राथमिक अन्वेषण अहवाल शासनास दिनांक 5-6-2008 ला सादर केला आहे. त्यानंतर त्यातील काही त्रुटींच्या अनुषंगाने पुन्हा माहिती मागविण्यात आली. त्यासंदर्भात अधीक्षक अभियंता यांच्याकडून पुरवणी अहवाल प्राप्त झाला. यामध्ये अनियमिततेच्या संदर्भात काही प्राथमिक गोष्टी निश्चितपणे आढळून आलेल्या आहेत. पाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेल्या 152 कामा पैकी 43 कामे जिल्हा मजूर सोसायटयांना देण्यात आलेली होती. यासंपूर्ण प्रकरणाची चौकशी केल्यानंतर आणि अनियमितता दिसल्यानंतर या सगळया अनियमिततेच्या दृष्टिकोनातून संबंधित अधिकाऱ्यांचे दोषारोपण मागविण्यात आलेले आहेत. यानंतर आता यामध्ये झालेल्या अनयमिततेच्या संदर्भात जे अधिकारी सहभागी आहेत त्यामध्ये एक कार्यकारी अभियंता आहेत पण आता ते सेवानिवृत्त झालेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : ते सेवानिवृत्त कधी झाले?

श्री. विजय वडेट्टीवार : दिनांक 31 मे, 2007 ला ते सेवानिवृत्त झालेले आहेत. नऊ उप विभागीय अभियंता आणि 21 शाखा अभियंता यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केलेली आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3459....

श्री. दिवाकर रावते : सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार?

श्री. विजय वडेट्टीवार : शासन त्यांच्यावरसुध्दा निश्चितपणे कारवाई करेल. यामध्ये अनियमितता झालेली आहे हे प्राथमिकदृष्टया शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. अनियमितता झाली हे शासन मान्य करण्यास तयार आहे. यासंदर्भात संबंधितांवर दोषारोपण करुन जी प्रस्तावित कारवाई करावयाची आहे ती शासन करणार आहे त्यामध्ये सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यावर सुध्दा कारवाई करण्यात येईल.

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, ज्या अनियमितता आढळून आलेल्या आहेत आणि ज्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे त्या संबंधित अधिकाऱ्यांची नावे काय आहेत?

श्री. अजित पवार : सभापती महोदसय, सन्माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी सांगितले त्याप्रमाणे दोषारोप मागविण्यात आलेले आहेत. सदर दोषारोप कुठल्याही परिस्थितीत दि.10 एप्रिल, 2010 पर्यंत शासनास सादर होतील आणि त्यानंतर लगेच एप्रिल,2010 अखेर प्रचलित कार्यपध्दतीनुसार विभागीय चौकशी सुरु करण्यात येईल. सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, यामध्ये एक एक्झिक्युटिव्ह, 9 उप अभियंते आणि 21 शाखा अभियंते यांची नावे या अनियमिततेत आलेली आहेत. यामध्ये ज्यांनी आर्थिक भ्रष्टाचार केलेला आहे असे आढळून आल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारची मुभा दिली जाणार नाही. त्यांच्यावर रीतसर कारवाई करण्यात येईल. दि.31 मे, 2007 रोजी जो अभियंता सेवानिवृत्त झालेला आहे त्यांचे नाव श्री. जी.एस.सेंद्र असे आहे. जे 9 उप अभियंते आहेत त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. 1) व्ही.पी.वानखेडे 2) व्ही.सी.गेहरवार 3) पी.डी.अमिलकंठवार 4) व्ही.एम.मगर 5) पी.आर.मेहता 6) पी.जी.पाटील 7) ए.ओ.गायकवाड 8) बी.डब्लू काळे 9) एस.एस.खिलारे याशिवाय जे 21 शाखा अभियंते आहेत त्यांच्या नावाची यादी देखील उपलब्ध आहे.

सभापती : ती यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी पुन्हा सभागृहाला सांगू इच्छितो की, त्यांच्यावर दोषारोप ठेवल्यानंतर त्यांची विभागीय चौकशी केल्यानंतर लक्षात येईल की, यांच्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे त्यांच्याकडून ते आर्थिक नुकसान भरुन घेण्याच्या दृष्टिकोनातून 100 टक्के कारवाई केली जाईल.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्रक नाही

ता. प्र. क्र. 3459.....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, ही सगळी कामे मजूर सोसायट्यांच्या माध्यमातून झालेली आहेत. मजूर सोसायट्यांना 15 लाख रुपयांच्यावर काम देता येत नाही. या 9 कोटीच्या कामांचे किती कामांमध्ये वाटप केले ? ती बाब वाटप कमिटीपुढे गेली होती काय ? ज्या वाटप कमिटीने ही कामे मंजूर केली त्या कमिटीचे डी.डी.आर. असो, कार्यकारी अभियंता असो किंवा मजूर फेडरेशने चेअरमन असो, शासन त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मघाशी मी उत्तर देताना सांगितले की, आपण दोषारोप ठेवतो. यामध्ये चौकशी करण्यात आली. गेली दोन वर्षे चौकशी चालू होती. ही चौकशी झाल्यानंतर दोषारोप मागविण्यात आलेले आहेत. 10 एप्रिलपर्यंत दोषारोप मागविण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आता मुद्दा उपस्थित केलेला आहे की, यामध्ये सहकार विभागाचे कोणी दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई करणार काय ? शासनाच्या कोणत्याही विभागाचा कोणताही अधिकारी असेल मग डी.डी.आर. असो किंवा ए.आर. असो किंवा अन्य कोणीही असो, दोषारोपामध्ये जे दोषी असल्याचे लक्षात येईल आणि ज्यांच्यामुळे आर्थिक नुकसान झाले असे लक्षात येईल तो कोणत्याही विभागाचा अधिकारी असला तरी त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी खूप मोठे उत्तर दिले तसेच नावे सुध्दा सांगितली. दोन वर्षे ही चौकशी चालू आहे. याबाबत कालबध्द कार्यक्रम करणार काय ? ही चौकशी किती दिवसात पूर्ण् होणार ? माननीय मंत्रिमहोदयांनी ज्या अधिकाऱ्यांची नावे वाचून दाखविली ते अधिकारी शासकीय सेवेत कार्यरत आहेत की त्यांना निलंबित केले आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ते आता कार्यरत आहेत. त्यांना निलंबित केलेले नाही. त्यांच्याकडून दोषारोप मागविण्यात आलेले आहेत. प्रचलित कार्यपध्दतीनुसार आपण विभागीय चौकशी सुरु करीत आहोत. हे सर्व करीत असताना जर काही अधिकारी सेवानिवृत्त झाले असतील, 1 कार्यकारी अभियंता आणि 1 उपभियंता सेवानिवृत्त झालेले असले तरी जी प्रचलित कार्यपध्दती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे त्यानुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या बाबतीत जी ॲक्शन घेण्याची गरज असेल ती ॲक्शन त्यांच्यावर घेतली जाईल.

डॉ. दीपक सावंत : अधिकाऱ्यांना निलंबित करुन कारवाई करणार काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, 10.5.2007 ला तक्रार केली. त्यानंतर त्यांच्यावर ॲक्शन घेण्यास सुरुवात केली. याबाबतीत विलंब का लागला असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. जून, 2007 ला दक्षता पथकाच्या अधिक्षक अभियंत्यांना याबाबत अहवाल देण्यासाठी कळविले. त्यांनी एका वर्षामध्ये प्राथमिक अहवाल दिला. त्या अहवालामध्ये आम्हाला काही त्रुटी जाणवल्या म्हणून आम्ही त्यांना सांगितले की, आम्हाला आणखी पूरक माहिती पाहिजे. अशा पध्दतीने दोन तीन वेळा ती माहिती घेतली. कारण ॲक्शन घेत असताना विभागाचा हा प्रयत्न आहे की, ॲक्शन घेतल्यानंतर यातून चूक केलेला कोणताही अधिकारी सुटू नये. याकरिता थोडासा विलंब झालेला आहे.

डॉ. दीपक सावंत : जे अधिकारी शासकीय सेवेत आहेत त्यांना निलंबित केले पाहिजे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करणारच आहोत. यामध्ये अनियमितता आढळून आली आहे....

सभापती : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि अन्य सन्माननीय सदस्यांचा असा प्रश्न आहे की, याबाबतीत दोषी असणारे जे अधिकारी असतील, ज्यांचे गंभीर दोष असतील त्यांच्या निलंबनाची कारवाई शासन करणार काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सदरचे दोषारोप 10 एप्रिलपर्यंत शासनाला सादर होतील. 10 एप्रिलपर्यंत म्हणजे पंधरा दिवसामध्ये ते सादर होईल. सदरचे दोषारोप सादर झाल्यानंतर त्यामध्ये कोणाचे गंभीर दोष आहेत हे लक्षात येईल. त्या संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने त्याच दिवशी कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुलुंड (पश्चिम) येथील राज्य कामगार विमा रूग्णलयातील समस्या दूर करण्याबाबत करावयाची कारवाई

(१०) * ६१३७ श्री.शिवाजीराव पाटील, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या मुंबई उपनगर जिल्ह्यातील मुलुंड (पश्चिम) एल.बी.एस. मार्ग, मुंबई येथील आय.ई.एस. कामगारांच्या रूग्णालयातील प्रसुतिगृहात गेले तीन महिने डॉक्टर नसल्याचे कारण देऊन तेथील गर्भवती महिलांना खाजगी रूग्णालयात पाठविले जात असल्याची माहिती उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांच्या नातेवाईकांना रूग्णालयातील व्यवस्थापनाकडून उडवाडवीची उत्तरे देण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बेजबाबदार व उध्दट व्यवस्थापनाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, बेजबाबदार व्यवस्थापनावर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : (१) हे खरे नाही.

सदर रुग्णालयात स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्रातील अर्हता प्राप्त केलेले वैद्यकीय अधिकारी दि.१६.७.२००८ पासून कार्यरत आहेत. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत काही गर्भवती महिलांना शासकीय/महापालिकेच्या रुग्णालयात पुढील उपचारासाठी संदर्भ करण्यात आले होते. परंतु एकाही गर्भवती महिलेला खाजगी रुग्णालयात पाठविण्यात आलेले नाही.

(२),(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, या कामगार रुग्णालयामधील महिलांना दुसरीकडे पाठविले जाते. त्यांना खाजगी किंवा अन्य रुग्णालयांचा खर्च परवडत नाही. त्यामुळे त्यांचे फार हाल होतात. वर्तमानपत्रांमध्ये ही माहिती जाहीर झालेली आहे. याबाबतीत शासन काय करणार आहे ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6137.....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्याकडे जी आकडेवारी उपलब्ध आहे त्यानुसार फक्त 6 रुग्णांना बीएमसीच्या रुग्णालयात रेफर केले आहे. जानेवारी ते 10 मार्चपर्यंत मुलुंडच्या हॉस्पिटलमध्ये डिलिव्हरीच्या 55 केसेस, सिझरिनच्या 41 केसेस झाल्या आहेत. 2009 मध्ये एकूण डिलिव्हरीच्या 345 आणि सिझरिनच्या 75 केसेस झालेल्या आहेत. आतापर्यंत 7 रुग्णांची स्थिती कॉम्प्लीकेटेड असल्यामुळे त्यांना शासकीय रुग्णालयात रेफर केलेले आहे. अन्य कोणत्याही रुग्णांना गायनॅक डिपार्टमेंटकडून खाजगी रुग्णालयात वा शासकीय रुग्णालयात रेफर केलेले नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या योजनेचे 75 लाख लाभार्थी आहेत. त्यांच्यासाठी 150 कोटी रुपये दिले जातात, अशी मला माहिती कळली आहे. राज्यातील 13 इएसआयएस रुग्णालयातील 1158 पदे रिक्त आहेत, ही पदे केव्हा भरली जाणार आहेत ? मागील 10 वर्षामध्ये या रुग्णालयांमधील कोणतीही यंत्रसामुग्री बदलेली नाही, हे खरे आहे काय ? ही यंत्रसामुग्री बदलण्यासाठी शासन उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : शासनाच्यावतीने संपूर्ण राज्यात इएसआयएस हॉस्पिटल्स चालविली जातात. त्यासंबंधी आढावा घेऊन शासन लवकरात लवकर एक नवीन धोरण आखणार आहे. यासंदर्भात केंद्रीय कामगार मंत्रालयाच्या अधिका-यांबरोबर माझी एक बैठक झालेली आहे. माझ्या मरोळ मतदार संघातील इएसआयएस हॉस्पिटल केंद्र सरकारकडे हस्तांतरित केले आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडून 260 कोटी रुपये आले आहेत. त्या निधीतून त्या हॉस्पिटलचे अपग्रेडेशन केले जात आहे. त्याठिकाणी पोस्ट ग्रॅज्यूएट सेंटर केले जाणार आहे. त्याचप्रमाणे आणखी 1-2 हॉस्पिटल्स केंद्र सरकरकडे हस्तांतरित केली आहेत. केंद्र सरकारचे असे म्हणणे आहे की, राज्यातील संपूर्ण इएसआयएस हॉस्पिटल्स हस्तांतरित करावीत. त्यासाठी 2,500 कोटी रुपये महाराष्ट्र शासनाला देऊन या सर्व 13 हॉस्पिटल्सचे अपग्रेडेशन करुन देण्याचा त्यांचा प्रस्ताव आहे. परंतु यासंबंधी शासनाचा धोरणात्मक निर्णय झालेला नाही. यासंबंधी चर्चा सुरु आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यासंबंधी डॉक्टरांच्या संघटनांबरोबर चर्चा करुन लवकर निर्णय घेऊ. त्यामुळे महाराष्ट्र शासनाचा फायदा होईल आणि सर्व हॉस्पिटल्सचे अपग्रेडेशन होईल. त्यादृष्टीकोनातून केंद्र सरकारच्या प्रस्तावाकडे पाहून सकारात्मक निर्णय घेतला जाईल. त्यामुळे आपल्या कामगारांचा फायदा होईल असे मला वाटते.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता एक चांगली व महत्वाची माहिती सभागृहाला दिली आहे. मरोळ येथील इएसआयएस हॉस्पिटलचे केंद्र सरकारच्या माध्यमातून अपग्रेडेशन झाले आहे त्याचे आम्ही सर्व साक्षीदार आहोत. या हॉस्पिटलचा कॉम्प्लेक्स मोठा आहे. महाराष्ट्रातील या हॉस्पिटल्सचे केंद्र सरकारच्या माध्यमातून अपग्रेडेशनचा कार्यक्रम ठराविक कालावधीत पूर्ण करुन कार्यान्वित केला जाईल काय ?

श्री.सुरेश शेट्टी : या प्रश्नाशी संबंधीत टेक होल्डर्स आहेत. त्यातील काही संघटना या प्रस्तावाला विरोध करीत आहेत. केंद्र सरकारला हॉस्पिटल हस्तांतरित करु नये असे त्या कर्मचारी व अधिकारी संघटनांचे म्हणणे आहे. त्यांचा काय इंटरेस्ट आहे ते समजत नाही. इएसआयएसच्या हॉस्पिटल्सचे जेवढे टेक होल्डर्स आहेत त्यांच्याबरोबर यासंबंधी चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. कारण केंद्र सरकारने मध्य प्रदेश व इतर राज्यांमध्ये टेक ओव्हर केलेले आहे. त्यासाठी 2000 ते 3000 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली असल्यामुळे आपल्या राज्यामध्ये त्याप्रमाणे सुध्दा निर्णय घेतला जाईल.

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

जीवनदायी योजनेतील २४ दवाखाने कागदावरच असल्याबाबत

(११) * २८७० श्री.दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.संजय दत्त, श्री.सय्यद ज़मा, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.राजन तेली, श्री.सुभाष चव्हाण, श्री.मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.संजय पाटील, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.भगवान साळुंखे, श्री.विनोद तावडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जीवनदायी योजनेत ज्या २४ खाजगी रुग्णालयांना मान्यता देण्यात आली होती त्यांना या योजनेच्या खर्चाविषयी कोणतीही कल्पना न दिल्याने या सर्व रुग्णालयांची नावे केवळ कागदावर राहिली असल्याचे माहे जानेवारी, २०१० च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाची मान्यता न घेताच जीआरसदृक्ष पत्र काढण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एका कोल्हापूर जिल्ह्यासाठी केलेली खरेदी संपूर्ण राज्याला लागू करण्याच्या निर्णयाला वित्त विभागाची मान्यातच घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जीवनदायी दर करारावरील बाबींसाठी कोणते तांत्रिक निकष लावण्यात आले आहेत,

(५) तसेच, प्रश्न भाग १,२,३, व ४ याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीचा तपशील काय आहे व त्याअनुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप,कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : (१) अशा आशयाची बातमी दैनिक लोकमतमध्ये जानेवारी, २०१० मध्ये आलेली आहे. जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत एकुण ५७ खाजगी रुग्णालयांना मान्यात देण्यात आली आहे. या रुग्णालयांना जीवनदायी योजनेची संपूर्ण कल्पना दिलेली असून या रुग्णालयामार्फतच आरोग्य सेवा संचालनालय व शासनास प्रस्ताव पाठविण्यात येतात.

(२) व (३) जी आर सदृश्य पत्राचा विषय अथवा दिनांक स्पष्ट होत नाही. तथापि हृदय शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या डिस्पोजेबल बाबींचे दरकरार केवळ एका जिल्ह्यासाठी केलेले नसून संपूर्ण राज्यासाठी केलेले आहेत. याचा निर्णय दि.२१/५/२००५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय खरेदी समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेला आहे. या समितीमध्ये उपसचिव, वित्त विभाग यांचा समावेश आहे.

(४) हृदयरोग शल्य चिकित्सक व भिषक जे.जे.रुग्णालय, मुंबई, ससून रुग्णालय, पुणे, मेडीकल कॉलेज, नागपूर, सी.व्ही.टी.सी.कोल्हापूर यांचेकडील आलेल्या मागणीपत्रानुसर व तज्ज्ञांनी दिलेले विनिर्देश व शासनाच्या विहित पद्धतीनुसार निकष लावण्यात आले.

(५) व (६) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत माहे जानेवारी, २०१० पासून आजतागायत चौकशी सुरु आहे. तसेच सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्या एक सदस्यीय समितीमार्फत सुद्धा चौकशी चालू आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

ता.प्र.क्र.2870.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न जीवनदायी योजनेबाबतचा आहे. पहिल्या प्रश्नात असे विचारले होते की, "जीवनदायी योजनेत ज्या 24 खाजगी रुग्णालयांना मान्यता देण्यात आली होती त्यांना या योजनेच्या खर्चाविषयी कोणतीही कल्पना न दिल्याने या सर्व रुग्णालयांची नावे केवळ कागदावर राहिली असल्याचे माहे, जानेवारी, 2010 च्या सुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला कोणतेही उत्तर दिलेले नाही. केवळ लोकमतवर हा प्रश्न टकलून सरकारने बाजी मारुन नेली आहे. जे.जे.हॉस्पिटलमध्ये जीवनदायी योजनेसाठी यंत्रसामुग्री पुरविण्यात आली आहे. मग एनजीओग्राफी असेल, एनजीओप्लास्टी असेल, अशाप्रकारचे सर्जिकल आयटेम ज्यांनी पुरविले आहेत त्यांची बिले रखडल्यामुळे त्यांनी पुरवठा बंद केला आहे. परंतु जे.जे.हॉस्पिटलचे डीन डॉ.लहाने यांनी विनंती केल्यामुळे त्यांनी पुरवठा पुन्हा चालू केला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जे.जे. हॉस्पिटलला दोन ते अडीच कोटी रुपये देणे प्रलंबित आहे अशी माझी माहिती आहे. तेव्हा या जीवनदायी योजनेंतर्गत ऑपरेशन्स सुरु करण्यासाठी हे पैसे लवकरात लवकर देण्यात येतील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : या जीवनदायी योजने ऐवजी पहिल्या टप्प्यामध्ये सहा जिल्हयातून श्री राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु करण्यासंबंधी शासनाने घोषणा केलेली आहे. या योजनेसंबंधी विधानसभेमध्ये चर्चा झाली. या सभागृहामध्ये देखील निवेदन करण्याची माझी तयारी आहे. ही नवीन योजना पहिल्या टप्प्यामध्ये 6 जिल्हयामध्ये राबवित असताना उर्वरित जिल्हयांमध्ये जुनी जीवनदायी योजना चालू राहाणार आहे. मुंबईतील जे.जे. हॉस्पिटल हे पहिल्या टप्प्यामध्ये येत असल्यामुळे जे काही पैसे देणे बाकी असतील ते लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करु.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अधिक माहिती सादर करणे

मु.शी : पुरवणी मागणीच्या चेर्चेच्या अनुषंगाने अधिक माहिती सादर करणे

श्री. गुलाबराव देवकर (दुग्धविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 23 मार्च 2010 रोजी श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी पुरवणी मागण्यावरील चेर्चेच्या वेळी दुग्धविकास विभागातील श्री. बी.एस.मोरे, सहायक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी याच्यासंदर्भात उपस्थित केलेल्या मुद्याबाबत अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

<u>अधिक माहिती</u>

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती :सन्माननीय सदस्य श्री. किशनचंद तनवाणी यांनी "औरंगाबाद येथील प्रादेशिक परिवहन आरटीओ कार्यालयात दलालांमार्फत न जाणा-या व अतिरिक्त पैसे न देणा-या ग्राहकांना दोन-दोन महिने लायसन्स मिळत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "अकोला जिल्ह्याच्या पुरवठा विभागाच्या भरारी पथकाने टाकलेल्या धाडीत हजारो क्विंटल धान्यसाठा जप्त केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र. पाटील, प्रा. बीटी.देमुख व श्री. वसंतराव खोटरे यांनी "कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 20 जुलै 2009 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या अनुदानाच्या धर्तीवर अनुदान मंजूर करावे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक कृती समितीने दिनांक 25 मार्च 2010 पासून आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषणसुरु केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे व संजय केळकर यांनी " संजय गांधी हायस्कूल, वर्धा या शाळेस 12 लाखापेक्षा अधिक रकमेचे वेतन अनुदान नियमाबाह्य पध्दतीने व शासकीय अधिका-यांनी संगनमत करुन अदा केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते व भगवान साळुंखे यांनी "शहापूर, जिल्हा ठाणे तालुक्यात 100 पेक्षा जास्त नळ पाणीपुरवठा योजना मंजूर झाल्या असून शासनाच्या दुर्लक्षामुळे मौजे-डोंगनमाळ, तेलनपाडा या 100 टक्के आदिवासी लोकवस्ती असलेल्या व दुर्गम भागात वसलेल्या गावात नेहमीच पाण्याचा दुष्काळ जाणवत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे,सर्वश्री जयंत प्र. पाटील व कपिल पाटील यांनी "मुंबई शहर आणि उपनगरात सुरु असलेल्या मोनो, मेट्रो आणि रस्ता रुंदीकरणाच्या कामादरम्यान कंत्राटदाराला भूमिगत जलवाहिन्यांच्या नोटीसीबाबत कल्पना नसणे, त्याशिवाय रस्त्यावरील कामाचे कंत्राट घेणा-या कंपन्याना देखील त्याचे फारसे गांभीर्य नसणे, त्यामुळे माहे 2010 वा त्या सुमारास 15 वेळा जलवाहिन्या फुटण्याच्या घडलेल्या घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर व चंद्रकात पाटील यांनी "मुंबई उपनगरातील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांना अकृषिक आकारणी कराची 2006 पासूनची थकबाकी मागण्याची नोटीस जिल्हाधिका-यानी देणे, सदर अकृषिक आकारणी कर हा सुमारे 300 टक्के वाढीव दराने भरण्यासाठीच्या नोटीसा सहकारी गृहनिर्माण संस्थाना देण्यात आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुमुख जगवानी, यांनी "रविवार, दि.28 मार्च, 2010 रोजी भायखळा येथील वीरमाता जिजामाता प्राणी संग्रहालयात बंदीस्त आवारात असलेल्या हत्तीणीने एका इसमाला सोंडेने आपटून ठार मारल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते, डॉ.नीलम गो-हे यांनी "विदर्भाच्या अनेक जिल्हयात वाढत्या उन्हाळ्यासोबत भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण होणे, परिणामी शेतकऱ्यांमये मोठया प्रमाणावर निर्माण झालेली नैराश्याची भावना, त्यामुळे दि.26 मार्च, 2010 रोजी एका दिवशी 9 शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब यांनी "सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील बांदा पंचक्रोशीतील ग्रामीण भागातील शेतकरी, देवस्थान मंडळे व अनेक संस्था यांनी जमा केलेला पैसा बँकेत ठेवण्याकरिता बांदा अर्बन बँकेमध्ये ठेवून बांदा अर्बन बँकेच्या संचालकांनी व बँकेच्या प्रशासनाने विनातारण कर्ज वितरण करुन नातेवाईकांना कर्ज देऊन गैरव्यवहार केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, कपिल पाटील, भगवान साळुंखे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "राज्यात 1067 ग्रंथपाल हे अर्धवेळ म्हणून तसेच निम्म्या वेतनावर काम करीत असल्याने त्यांचा पेन्शन ग्राह्य योजना, घरभाडे भत्ता, वाहन भत्ता व अनुकंपा तसेच पदोन्नतीच्या संधी मिळत नसल्याने त्यांनी 22.3.2010 रोजीपासून आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण सुरु करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, निवेदन करण्याचे आदेश दिल्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. संपूर्ण राज्यभर ही स्थिती आहे. फेब्रुवारीमध्ये वेतन मिळाले नाही. मार्च-एप्रिलमध्ये वेतन होण्याची शक्यता नाही. या आठवड्याच्या शेवटी किंवा पुढील आठवड्याच्या पहिल्या दिवशी हे निवेदन करण्याचे आदेश दिले तर त्या प्रश्नाला न्याय मिळेल.

सभापती : सन्माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी याठिकाणी उपस्थित आहेत. या आठवड्याच्या शेवटी किंवा पुढील आठवड्याच्या पहिल्या दिवशी या संदर्भातील निवेदन करण्यात यावे आणि अन्य निवेदने सुध्दा लवकरात लवकर होतील असे पहावे.

इतर सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

श्री.सुरेश शेट्टी : होय.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा रंग बदलण्याबाबत बनावट शासन निर्णय निर्गमित होणे

मु. शी. : जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा रंग बदलण्याबाबत बनावट शासन निर्णय निर्गमित होणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, भगवान साळुंखे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती, जमातीच्या तसेच १०३ विकास गटातील विद्यार्थ्यांना मुंबईच्या मे. सरस्वती इंडस्ट्रीज या संस्थेमार्फत गणवेश पुरवठा करण्याचा तसेच गणवेशाचा रंग बदलण्याचा बनावट शासन निर्णय फेब्रुवारी २०१० च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, विदर्भातील काही जिल्हा परिषदांवर याचा परिणाम होणे, गडचिरोली जिल्ह्यात सिलाईचे काम रद्द करण्यासाठी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी पत्रे रवाना करणे, २७ नोव्हेंबर, २००९ रोजी शासन निर्णय क्रमांक - गणवेश २००९/प्र.क्र.२३४ पं.रात्र ३ यानुसार ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या नावाने बोगस शासन निर्णय राज्यातील काही जिल्हा परिषदांना पाठविण्यात येणे, यात मे. सरस्वती इंडस्ट्रीज मुंबई या संस्थेला पंचायत समिती स्तरावर जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती, जमातींच्या तसेच १०३ विकास गटातील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठ्याचा आदेश देण्यांत येणे, या बनावट शासन निर्णय प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, राज्य शासनाचे याप्रकरणी होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना तथा शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यामध्ये बनावट गुणपत्रिका तयार करणे किंवा बनावट नोटांचे प्रकार उघडकीस येणे अशा प्रकारच्या अनेक घटना या राज्यामध्ये घडत आहेत. शिक्षण विभागामध्ये सुध्दा बनावट शासन निर्णय काढून संबंधित कार्यालयांना तो पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे. त्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. राज्य शासनाने राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळातील अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याची योजना लागू केलेली आहे. या मोफत गणवेश योजनेंतर्गत पंचायत समिती स्तरावर या संदर्भातील ठेका देण्याचे आणि गणवेश शिवून घेण्याचे काम केले जाते. विदर्भातील गडचिरोली जिल्हयामध्ये 27 नोव्हेंबर, 2009 रोजी एक शासन निर्णय आला असे समजून त्या जिल्हयाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी जिल्हयातील पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांना पत्र पाठवून कळविले की, अशा प्रकारचा शासन आदेश आला आहे आणि या शासन आदेशानुसार सरस्वती इंडस्ट्रीज, मुंबई या संस्थेला गणवेशाचे काम देण्यात यावे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

यासंबंधीची संपूर्ण कार्यवाही पूर्ण झाली आणि नंतर असे निदर्शनास आले की, 27 नोव्हेंबर रोजी जो आदेश काढण्यात आला तो पूर्णपणे खोटा व बोगस आहे. त्यावर आपल्या शिक्षण विभागाचे अवर सचिव श्री. नागरे यांची सही आहे. नंतर शासनाने लक्षवेधी सूचनेला दिलेल्या उत्तरात स्पष्टपणे मान्य केले आहे की, हे आदेश शासनाने काढलेले नसून बोगस व बनावट आहेत व शासनाची फसवणूक करण्यासाठी तो आदेश काढण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडे हे प्रकरण दिलेले असल्याचेही म्हटले आहे. या निमित्ताने माझा प्रश्न आहे की, हा जो बनावट आदेश जिल्हापरिषदेला देण्यात आला आहे तसेच अन्य जिल्हा परिषदांनाही देण्यात आला आहे त्या अनुषंगाने जी कार्यवाही सुरु करण्यात आली ती थांबविण्यात आलेली आहे काय ? तसेच यासंदर्भात संबंधित आरोपिविरुध्द कारवाई सुरु असल्याचे म्हटले आहे. परंतु सरस्वती इंडस्ट्रीजलाच हे कंत्राट देण्यात यावे असे बनावट आदेश काढणारा हा आरोपी कोण आहे ? त्या आरोपीचे नाव काय आहे ? यासंबंधीची सखोल चौकशी शासनाने केली आहे काय ? तसेच हे प्रकरण उघडकीस आदेश काढून शासनाची दिशाभूल करण्याची शंका निर्माण होत आहे म्हणून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे देण्याची कारवाई शासन करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. तसेच सर्व जिल्हापरिषदांना कळविण्यात आलेले आहे की, हा जी.आर. बनावट व बोगस असून जुन्या पध्दतीनेच गणवेश शिलाईचे काम आपण करावे अशाही सूचना दिल्या आहेत. वारंवार असे प्रकार होत आहेत त्याबाबत दि. 9 मार्च, 2010 रोजी एफआयआर दाखल केला आहे. तसेच सरस्वती इंडस्ट्रीजशी संबंधित एक मोबाईल नंबर आढळून आला आणि तपासणीअंती श्री. प्रवीण झरे असे नाव समोर आले. दुसऱ्या वेळेस पोलिसांनी फोन केला असता तो मोबाईल "आऊट ऑफ रेंज" येत आहे. प्रोसिजरप्रमाणे एस.पी. ना चौकशीबाबतचे पत्र द्यावे लागते त्यानुसार सदर मोबाईचे सीम कार्ड कोणाच्या नावावर आहे यासंबंधीची चौकशी देखील सुरु आहे. तिसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, वारंवार असे प्रकार होऊ नयेत म्हणून जो जी.आर. शासनाकडून काढला जातो त्यावर कॉम्प्युटर कोड नंबर असतो आणि कन्सर्न विभागाच्या वेबसाईट वर देखील आपण तो जी.आर. उपलब्ध करुन देतो. अशा प्रकारे या आदेशामध्ये कोणताही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे .....

कॉम्प्युटर कोड नव्हता. वास्तविक अशी अपेक्षा होती की, शिक्षणाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशा प्रकारे तपासणी करुनच त्या आदेशाची अमलबजावणी करणे आवश्यक होते, पण ही त्यांची सुध्दा चूक झालेली आहे. तरी सुध्दा जो जी.आर. आहे तो शासनाच्या धोरणाच्या विरोधात होता म्हणून किमान वेबसाईटवर व्हेरिफाय करुन घेणे आवश्यक होते पण तसे केले नाही. तसेच असा जी.आर. हा शिक्षण विभागाने काढण्याची आवश्यकता होती परंतु हा जी.आर.ग्रामविकास विभागाचा म्हणून काढण्यात आला आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर तशा स्पष्ट सूचना जिल्हापरिषदांना देण्यात आल्या आहेत की, कोणताही जी.आर. आल्यानंतर कॉम्प्युटर कोड आणि वेबसाईटवर व्हेरिफाय करुनच पुढील कार्यवाही करावी.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नाशिक महानगरपालिकेतील प्रशासनात सुरु असलेला गैरव्यवहार

मु. शी. : नाशिक महानगरपालिकेतील प्रशासनात सुरु असलेला गैरव्यवहार यासंबंधी डॉ. वसंत पवार, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक महानगरपालिकेतील प्रशासनामध्ये प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार सुरु असणे, शहरामध्ये जकात खाजगीकरणास स्थानिक नागरिकांचा विरोध असतानांही माहे मार्च, २०१० मध्ये महानगरपालिकेतील संबंधितांच्या संगनमताने निर्णय घेण्यात येणे, यामुळे प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार होणे, उक्त महानगरपालिकेच्या यंत्रणेमध्ये गैरव्यवहार करणारी टोळी कार्यरत असल्याने याप्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करण्याची मागणी दिनांक २ मार्च, २०१० रोजी बंद पाळून उद्योजक, व्यापारी, लोकप्रतिनिधी तसेच हजारो नागरिकांनी वा त्यासुमारास शासनाकडे करणे, तसेच महानगरपालिकेवर मोर्चा काढून निषेध व्यक्त करणे, तथापि यासंदर्भात अद्याप शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये शासनाविरुध्द पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, प्रत्येक महानगरपालिकेला जकातीपासून सर्वात जास्त उत्पन्न मिळत असते आणि या पैशातून महानगरपालिकेचा कारभार सुरु असतो. नाशिक महानगरपालिकेला 100 कोटी रुपये जास्त मिळणार आहेत. त्यामुळे जकात वसूल करण्यासाठी खाजगी ठेकेदार नेमण्याचा ठराव नाशिक महानगरपालिकेने मंजूर केला आहे. त्याच्या विरोधात दिनांक 2 मार्च 2010 रोजी नाशिक इन्डस्ट्रिज ॲन्ड मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, अंबड इन्डस्ट्रिज ॲन्ड मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, जकात खाजगीकरणाविरोधी सुकाणी समितीव्दारा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज ॲन्ड ॲग्रिकल्चर, नाशिक आणि नाशिक सराफ असोसिएशन यांनी निवेदन सादर करुन लोकप्रतिनिधींना घेऊन मोठा मोर्चा काढला होता .या जन मताची दखल शासन दखल घेणार आहे काय ? त्याचबरोबर जकातीच्या खाजगीकरणाला स्टे देण्यात येणार आहे काय ? यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की निविदा देण्यासंबंधी मुदत जाहीर करण्यात आल्यानंतर एकही निविदा प्राप्त झालेली नाही त्यामुळे फेर निविदेसंबंधी पंधरा दिवसांची मुदतवाढ दिली आहे. 10 एप्रिल 2010 या निविदेच्या संदर्भातील मुदत संपत आहे. खाजगी ठेकेदाराला जकात वसूल करण्यासंबंधीचा ठेका देत असतांना गेल्या तीन वर्षातील जकातीच्या वसुलीची आकडेवारी लक्षात घेण्यात येणार आहे काय ?. नाशिक महानगरपालिकेच्या जकातीच्या संदर्भात जवळजवळ 100 कोटी रुपयांची गळती होत असते. त्याचबरोबर या ठेकेदाराला अमर्यादत असे अधिकार देण्यात येत आहेत. त्याला हे अधिकार दिल्यानंतर त्याच्याकडून काही गैरप्रकार होता कामा नये म्हणून त्याची झडती घेणे किंवा रजिस्टर तपासून पहाणे इत्यादी अधिकार कायद्याने आयुक्तांना दिलेले आहेत तेव्हा हे अधिकार त्यांच्याचकडे ठेवण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ? अन्यथा जो ठेकेदार आहे तो भविष्यात घाशीराम कोतवाल सारखी कारवाई करुन उद्योजकानां आणि व्यापा-यांना त्रास देऊ शकेल तेव्हा हा त्रास टाळण्यासाठी सरकार कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, जकातीच्या खाजगीकरणासंबंधीचा निर्णय नाशिक महानगरपालिकेच्या अंतर्गत स्थानिक पातळीवर घेण्यात आला आहे. नगरपालिकेचा जकात राज्य शासनाने माफ केलेला आहे. तसेच "ड" वर्ग महानगरपालिकेच्या जकातीला पर्यायी व्यवस्था करण्याच्या बाबतीत लोकल बॉडी टॅक्स आकारण्याची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे याची सर्वाना कल्पना आहेच.जकात वसूल करण्याच्या बाबतीत स्थानिक पातळीवर मोठया प्रमाणावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

विरोध होत असतो त्याचबरोबर जकात वसूल करण्याऐवजी पर्यायी मार्ग काढण्यात यावा. अशी मध्यंतरीच्या काळात मागणी करण्यात आली होती . त्यामुळे या संदर्भात विधीमंडळात एक विधेयक मंजूर करण्यात आले होते आणि त्याचे कायद्यात रुपांतर झाले आहे. नाशिक महानगरपालिकेमध्ये जी जकात वसूल केली जाते त्यामध्ये वेळोवेळी गळती होत असते. जकातीच्या माध्यमातून जेवढे उत्पन्न महानगरपालिकेला मिळावयास पाहिजे होते तेवढे उत्पन्न मिळत नाही. अशा प्रकारच्या तक्रारी केल्या जातात म्हणून ही गळती थांबविण्यासाठी किंवा त्यातून जे काही गैरप्रकार होत असतात ते गैरप्रकार थांबविण्यासाठी निश्चित रक्कम ठेकेदाराने टेंडरमध्ये भरावयाची आहे आणि जो हायेस्ट बिडर आहे त्याला हा ठेका द्यावयाचा असून त्यातून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे अशी अपेक्षा आहे. ज्याला व्यक्तिला ठेका मंजूर करण्यात आला आहे त्याने खाजगीकरणांच्या माध्यमातून जकात वसुली करावयाची असते. सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेच्या बाबातीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2009-2010 सालचा हिशोब पाहिला असता 19 मार्चपर्यंत जी आकडेवारी आली आहे त्यानुसार 373 कोटी रुपये महानगरपालिकेने वसूल केलेले आहेत. त्यामुळे खाजगीकरण केल्यानंतर या पेक्षा जास्त रक्कम महानगरपालिकेला मिळणे अपेक्षित असल्यामुळे टेंडर काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. सन्माननीय सदस्यांनी मघाशी उल्लख केला होता की, जे टेंडर मागविण्यात आले होते त्याला प्रतिसाद मिळालेला नाही.निविदा प्राप्त करुन घेण्यासंबंधीची जी शेवटची तारीख होती त्या तारखेपर्यंत कोणताही रिस्पान्स मिळाला नाही त्यामुळे फेर निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. खाजगी करणाच्या माध्यमातून जकात वसूल केली जात असतांना त्यातून लोकांना नाहक त्रास होता कामा नये या दृष्टीने दक्षता घेणे आवश्यक आहे. बऱ्याच ठिकाणचा असा अनुभव आहे की,महानगरपालिकेच्या क्षेत्रातील जकात वसूल करण्यासाठी खाजगी व्यक्तिची नेमणूक केल्यानंतर लोकांना त्रास होत असतो आणि त्या संदर्भात तक्रारी केल्या जातात.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

नंतर श्री.सरफरे`

श्री. अशोक चव्हाण ...

सभापती महोदय, जकात चोरी होते ही वस्तुस्थिती आहे. परंतु ती रोखल्यामुळे फायदा होत असून राज्यामध्ये काही ठिकाणी उत्पन्न वाढल्याची उदाहरणे मिळालेली आहेत. माननीय सदस्य श्री. पवार साहेबांनी उल्लेख केला व त्यांनी केलेल्या अपेक्षेप्रमाणे निविदा प्रक्रियेमध्ये चूक झाली असेल तर शासन ती तपासून घेण्यास तयार आहे. काढण्यात आलेली निविदा चुकीची असेल किंवा त्यापासून अधिक उत्पन्न मिळणे अपेक्षित असेल तर ती तपासून घेऊ, तोपर्यंत ताबडतोबीने निविदा प्रक्रिया आपण थांबवू. त्याचप्रमाणे त्या महानगरपालिकेचे काही सदस्य मला भेटले व त्यांनीही हा विषय उपस्थित केला असून त्याबाबत जरुर लक्ष घालण्यात येईल. आणि म्हणून मी सांगू इच्छितो की, निविदा प्रक्रिया चुकीची असेल, ऑफसेट प्राईस कमी दाखविली असेलतर ती जरुर दुरुस्त करु. तसेच, यामध्ये खाजगीकरणाला विरोध आहे की, निविदा प्रक्रियेला विरोध आहे हे एकदा स्पष्ट झाल्यावर पुढील कारवाई करु.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, व्यापारी व औद्योगिक संस्था जकात बंद करण्याची मागणी पहिल्यापासून करीत आहेत. तेव्हा आपण जनमताचा प्रक्षोभ लक्षात घेऊन ही जकात वसूली थांबविणार काय? निविदा प्रक्रिया पार पाडीत असतांना फेव्हरेबल व्यक्तिला निविदा दिली जाते काय? तसेच, ऑफसेट प्राईस किती कोटी लावली आहे?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी ऑफसेट प्राईस काय आहे ? असे विचारले होते. दिनांक 28 फेब्रुवारी 1994 च्या नियमानुसार निविदा प्रक्रियेच्या बाबतीत स्पष्टपणे गाईडलाईन्स दिल्या आहेत. कोणत्याही महानगरपालिकेला स्वत:च्या मर्जीनुसार ठेका ठरविता येत नाही. शासनाने ठरविलेल्या सूत्रानुसार ठेका दिला जातो. आपणास सांगितले पाहिजे की, सर्वसाधारणपणे वर्षभरामध्ये एकूण किती जकात महसूलाची वसूली झाली हे गृहीत धरले जाते. नाशिकमध्ये काही औद्योगिक व्यवस्थापनांना त्यामध्ये सूट दिली, ती देत असतांना त्यामध्ये जी अपेक्षित रक्कम होती ती वजा केली. त्याचप्रमाणे जकात कर्मचाऱ्यांच्या एकूण पगारावर साडे सहा कोटी रुपये खर्च होत होता. त्यापैकी निम्मा खर्च त्यामध्ये लावण्यात आला. गतवर्षी जेवढी जकात गोळा झाली त्यापेक्षा 20 टक्के जादा वाढ गृहीत धरुन आणि त्यामध्ये शासनाला येणारा निम्मा अधिकचा खर्च समाविष्ट करुन ही ऑफसेट प्राईस 471 कोटी 50 लाख इतकी लावण्यात आली. त्याबाबतचे सूत्र हे शासनाच्या नियमानुसार ठरविण्यात आले असून शासनाने त्याची तपासणी केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, दिनांक 28 फेब्रुवारी 1994 रोजी शासनाने निर्णय घेऊन खाजगी ठेका देऊन जकात वसूली करण्यासंदर्भात निर्णय घेतला. या निर्णयामुळे हजारो लोक रस्त्यावर आल्यामुळे संपूर्ण नाशिक शहरामधील वातावरण बिघडल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो की काय अशाप्रकारची भीती निर्माण झाली होती. आपण कशापध्दतीने ऑफसेट प्राईस काढतो याचे सूत्र सांगितले. त्यासाठी काहीतरी नियमावली केली पाहिजे. महानगरपालिकेचा जकात रद्द करीत असतांना महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल आणि नागरिकांनाही त्रास होणार नाही अशाप्रकारची नियमावली शासन करणार आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आदरणीय श्री. गुजराथी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे जकात वसूली करीत असतांना त्यामुळे जनतेला त्रास होणार नाही याची निश्चितपणे काळजी घेण्यात येईल. तशाप्रकारे महानगरपालिकेला शासनाच्या वतीने नोटिस दिली जाईल. तिसरी गोष्ट अशी की, अशापध्दतीचे लोकांचे म्हणणे असले तरी आपल्याला माहीत आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांना याबाबत ठेका नेमण्याचे घटनेतील तरतुदीनुसार अधिकार दिलेले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला या विषयाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांना एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, एकंदर 15 "ड" वर्ग महानगरपालिका आहेत. त्यांना एल.बी.टी.चा विषय झाला होता, पण तो व्यापाऱ्यांना मान्य नाही आणि याबाबतीत आपल्याला 1 तारखेपर्यंत काही ठरवावयाचे आहे. तेव्हा आता आपण एल.बी.टी. किंवा ऑक्ट्रॉयच्या बाबतीत महानगरपालिकांना अधिकार देणार आहोत काय ? याबाबतीत शासनाचे काही धोरण ठरलेले आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, आपण विधीमंडळामध्ये कायदा पारीत केलेला आहे. त्यामुळे शासनाने तो निर्णय घेतलेला आहे. मला विधानसभेचे सन्माननीय विरोधी पक्षनेते येऊन भेटले आणि सन्माननीय सदस्य श्री.सुरेशदादा जैन देखील भेटलेले आहेत. अगोदर सन्माननीय सदस्य श्री.सुरेशदादा जैन हे राज्यामध्ये ऑक्ट्रॉय लावू नये या भूमिकेचे होते आणि नंतर ते पुन्हा मला भेटले, तेव्हा मी असे सांगितले की, तुम्ही याबाबतीत ऑक्ट्रॉय लावावा की लावू नये याबाबतीत एक काहीतरी भूमिका घेतली पाहिजे. आपण त्यावेळेस सर्वांच्या म्हणण्यानुसार तो निर्णय घेतलेला आहे आणि "ड" वर्ग महानगरपालिकेला ऑक्ट्रॉय लावू नये. आता पुन्हा आपण याबाबत फेरविचार करीत आहोत. त्यामुळे मला असे वाटते की, रोज निर्णय घ्यावयाचे आणि ते नंतर बदलावयाचे ही भूमिका योग्य रहाणार नाही. याबाबतीत काय मार्ग काढणे शक्य आहे यादृष्टीने माझी विरोधी पक्षनेत्यांबरोबरही बैठक झालेली आहे. तसेच बाकी नगरपालिकेचे काही सन्माननीय अध्यक्षांच्या बरोबरही माझे बोलणे झालेले आहे. याबाबतीत माझी काही निर्णय घेण्याची तयारी आहे. पण आम्ही एक-दोन दिवसामध्ये निश्चित याबाबतीत निर्णय घेऊ.

. . . .आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर शहरामध्ये मोठया प्रमाणात तयार होणाऱ्या ओला व सुका घनकचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न

मु. शी. : ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर शहरामध्ये मोठया प्रमाणात तयार होणाऱ्या ओला व सुका घनकचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न यासंबंधी सर्वश्री मुझफ्फर हुसेन सय्यद, चरणसिंग सप्रा,सय्यद ज़मा,संजय दत्त वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्हयातील भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेची लोकसंख्या जवळपास 10 लाख असणे, तेथे मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी असणे तसेच त्याठिकाणी पॉवर-लूमचा मुख्य उद्योग असणे, त्यामुळे दररोज 300 ते 325 टन ओला व सुका धनकचरा निर्माण होत असणे, सध्या फेणा गाव येथील खाजगी जागेवर हा धनकचरा टाकण्यात येत असल्याने तेथील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असणे, येथील नागरिक श्वसनाच्या अनेक दुर्धर रोगांनी व्याधीग्रस्त असणे,धनकचरा निर्मुलन व प्रक्रिया उभारण्याकरिता शासनाने दापोडा येथे 26 हेक्टर जमीन उपलब्ध करुन तेथे वॉलकंपाऊडचे बांधकाम देखील पूर्ण झालेले असणे, स्थानिक ग्रामपंचायतीच्या विरोधामुळे व त्यांनी मा. न्यायालयात दावा दाखल केल्याने तसेच न्यायालयाने स्टे दिल्याने सदर प्रकल्प गत 3 ते 4 वर्षांपासून बंद असणे, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रांतील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेवून दापोडा येथील बंद पडलेला प्रकल्प तातडीने सुरु होणे आवश्यक असल्याने शासनाने वरिष्ठ पातळीवर निर्णय घेवून धनकचरा निर्मुलन व प्रक्रिया प्रकल्प त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

. . . .आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .आर-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, अशा प्रकरणांमध्ये बऱ्याचशा ठिकाणी कचऱ्याच्या बाबतीत स्थानिकांचा विरोध असतो, कारण तेथे बरीच दुर्गंधी येत असते. सदनामध्ये अशा प्रकारचे विषय बऱ्याच वेळेस चर्चेला देखील आलेले आहेत. बऱ्याच वेळेस असे दिसून आले की, या विषयाच्या संबंधातील प्रश्न किंवा लक्षवेधी सूचना लागण्यापूर्वीच तेथे औषधांचा फवारा मारला जातो आणि तेथील लोकांचा विरोध शांत करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु मूळ प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत नाही. मग काही ठिकाणी हे मॅटर कोर्टामध्ये देखील दाखल होते. याठिकाणी ज्या दोन स्पेसिफीक केसेस आहेत, त्यातील दुसऱ्या केसमध्ये असे सांगण्यात आले आहे की, यासंबंधात बैठका घेण्यात आल्या, परंतु तक्रारीचे निवारण झाले नाही म्हणून ते कोर्टामध्ये गेले आहेत. त्यामुळे याबाबतीत ज्या तक्रारी येतात, त्यावरुन दिसून येईल की, याबाबत स्थानिकांचा मोठया प्रमाणात विरोध आहे हे निश्चित आहे. कारण जर स्थानिक लोकांना त्रास होत नसेल तर मग विरोध करण्याचे कारण काय आहे ? हा प्रश्न उपस्थित होतो. माझा दुसरा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, शासनाने या घटनांच्या बाबतीत एका माणुसकीच्या दृष्टीकोनातून विचार करण्याऐवजी याबाबतीत दडपण आणण्याचा प्रकार का केला जात आहे ? याबाबतीत शासनाचे नेमके धोरण काय आहे ? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजयजी दत्त यांनी सांगितले की, प्रत्येक ठिकाणी कचऱ्याच्या बाबतीत अडचण होते आणि मग तेथील लोकांची ओरड सुरु होते, तक्रारी केल्या जातात. म्हणून यासंदर्भात शासनाचा मानवतावादी दृष्टीकोन काय आहे ? सभापती महोदय, सध्या महानगरपालिका, नगरपालिका आणि त्याचबरोबर शासनासमोर सर्वात मोठी व महत्वाची आणि महाभंयकर ही समस्या आहे की, खूप मोठया प्रमाणात गोळा होणारा कचरा कुठे टाकावयाचा ? काही वर्षापूर्वी अशी परिस्थिती होती की, शहरे अत्यंत छोटी होती, त्यांच्या अजुबाजूला खूप जागा होत्या. शहरांच्या अजूबाजूला रस्ते तयार करण्याची आवश्यकता होती आणि त्यावेळी तेथे भराव टाकण्याच्या ऐवजी कचरा टाकून भरावाचे रस्ते मोठया प्रमाणात तयार करता आले.आता हळूहळू शहर आणि शहराच्या अजुबाजूच्या परिसरामध्ये एवढी वस्ती वाढलेली आहे. अशा वेळी प्रत्येकाला असे वाटते की, आपल्या अजुबाजूला कचरा असू नये आणि शासनालाही तसेच वाटते. परंतु कचरा टाकला पाहिजे, त्याची विल्हेवाट लावली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी याच संदर्भातील शासनाची भूमिका काय आहे असा प्रश्न उपस्थित केला. म्हणून शासनाने ओला

. . . .आर-5

श्री.भास्कर जाधव . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कचरा वेगळा करावा, कोरडा कचरा वेगळा करावा आणि मग त्यावर प्रक्रिया करुन, त्यापासून खत निर्माण करुन आणि अद्ययावत असे प्लॅन्ट लावून जेणेकरुन त्याचा नागरिकांनाही त्रास होणार नाही आणि कचऱ्याची विल्हेवाट लावली जाईल या दृष्टीने शासन समन्वयाचा मार्ग सातत्याने शोधत आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, घनकचरा निर्मूलनाच्या संदर्भात या सदनामध्ये अनेक अधिवेशनामध्ये चर्चा झाली. पुणे शहरामध्ये देखील हा प्रश्न अतिशय जटील स्वरुपाचा झालेला आहे. तेथील आसपासच्या गावातील आरोग्य . . .. .

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी अगोदर भिवंडीच्या संदर्भातील प्रश्न विचारावा आणि नंतर त्यांनी पुणे शहराच्या संबंधातील विषय घ्यावा.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी :पुणे महानगरपालिकेच्या संदर्भात शासनाकडून नऊ महिन्यापूर्वी सहा महिन्यात हा प्रश्न सोडविला जाईल असे आश्वासन दिले होते. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, या संदर्भामध्ये शासनाने काय पावले उचललेली आहेत? हा प्रश्न या राज्यातील सर्व महानगरपालिकांचा प्रश्न आहे. या घनकचरा निमुर्लनाच्या संदर्भात राज्य शासन समितीच्या माध्यमातून प्रत्येक महानगरपालिकेला काही निर्देश देणार आहे काय? या घनकचरा व्यवस्थापनाचे अनेक प्रकल्प अनेक महानगरपालिका चांगल्या पध्दतीने राबवित आहेत तेव्हा तो पॅटर्न संपूर्ण राज्यभर राबविण्यात येणार आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, युआयडीएसएसएमटीमार्फतसुध्दा घनकचरा व्यवस्थापनाचे प्रकल्प राबवावेत यासंदर्भात शासनाने एक योजना आखली परंतु जागेचा प्रश्न निर्माण होत होता. पण तो प्रश्नही आता हळूहळू सुटत आहे. शासनाने हा प्रश्न खूप गांर्भीयाने घेतलेला आहे. म्हणून यावर्षी महाराष्ट्र सुवर्ण राज्य नगरोत्थान हा अत्यंत महत्वाकांक्षी कार्यक्रम राज्य शासनाने आणि विशेष करुन माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या पुढाकाराने घेण्यात आलेला आहे. घनकचऱ्याची विल्हेवाट हाच प्रश्न त्यामध्ये प्रामुख्याने घेण्यात आलेला आहे. नगरोत्थानमध्ये आपले शहर घ्यावयाचे असेल तर पहिल्यांदा या घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे तरच या नगरोत्थान योजनेमधून पैसे मिळत्ील अशा प्रकारची अट घालण्यात आलेली आहे. त्यमुळे या योजनेची पुढच्या काळात प्रभावीपणे अंमलबजावणी होईल.

सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेच्या संदर्भात याठिकाणी प्रश्न विचारण्यात आलेला आहे. पुणे महानगरपालिकेच्या संदर्भात परवाच याठिकाणी चर्चा झालेली आहे. पुणे महानगरपालिकेकडून बाजूलाच एक जागा डंपिंग ग्राऊंडसाठी शोधण्यात आलेली आहे आणि त्या जागेवर पुणे महानगरपालिकेचा कचरा टाकण्याचे काम सध्या सुरु झालेले आहे. त्याठिकाणी खत प्रकल्प तयार करण्याचे काम पुणे महानगरपालिकेने हातामध्ये घेतलेले आहे, त्यातून तो मार्ग निघत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पुन्हा ही चर्चा मी पुण्यावरुन भिवंडीकडे आणतो. दापोडा या गावी 26 हेक्टर जमीन घेण्यात आलेली आहे. या जमिनीवर श्री. दिलीप जैन नावाच्या बांधकाम व्यावसायिकाचे काही बांधकाम झालेले आहे काय? (अडथळा) हा दिलीप जैन कोण आहे हे मला माहीत आहे तो कोणाचा पार्टनर आहे हेही मला माहीत आहे पण मी ते येथे सांगत नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

पण त्या जागेवर काही बांधकाम झालेले आहे काय?प्रत्यक्ष वस्तीपासून म्हणजे जेथे लोक राहातात त्याठिकाणापासून ही जागा किती दूर आहे? जेणे करुन या वस्तीतील लोकांना त्रास होणार नाही. सभापती महोदय, ज्या बांधकाम व्यावसायिकाचा इंट्रेस्ट असतो तो गाववाल्यांना भडकवतो, आंदोलन उभे करतो, कोर्टात जातो. फ्रेट कॉरिडॉर जर तेथून जाणार असेल तर तेथील भाव वाढतात ही सगळी गणिते त्यामध्ये असतात त्यामुळे हा सगळा विषय पुढे जातो आहे. हा विषय कोर्टात असला तरी त्याठिकाणी असे काही बांधकाम प्रत्यक्ष झालेले आहे काय ?आणि जेथे माणसे राहातात त्या प्रत्यक्ष वस्तीपासून किती अंतरावर ही जागा आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यातील वस्तुस्थिती अशी आहे की, लक्षवेधी सूचनेमध्ये 26 हेक्टर जागेचा उल्लेख केलेला असला तरी प्रत्यक्षात ती 26 हेक्टर जागा नाही. खरे तर सर्व्हे नंबर 115 मध्ये 22.92 हेक्टर इतकी ती जागा आहे. ही जागा शासनाने सन 2002 साली या महानगरपालिकेला दिली आहे. पंरतु ही जागा या महानगरपालिकेच्याक्षेत्रा बाहेर असून ती ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये आहे.सन 2002 साली ही जागा दिल्यानंतर तेथे डंम्पिंग ग्राऊंन्ड तयार करण्याचे व खत प्रकल्प तयार करण्याचे टेंडर निघाले. परंतु नंतरच्या काळामध्ये तेथील लोकांनी खूप मोठा विरोध केला. अकरा गावांची एक समिती तयार झाली. ही समिती कोर्टामध्ये गेली. त्यानंतरच्या काळामध्ये याठिकाणी कोणत्याही प्रकारचे काम करता आले नाही. पण त्यानंतर नगरपालिकेने डम्पिंग ग्राऊंडला विरोध आहे, खत प्रकल्पाला विरोध आहे हे लक्षात घेऊन किमान आपल्या स्वतःच्या जागेची हद्द तरी नक्की करावी या दृष्टिकोनातून कम्पाऊंण्ड वॉल बांधण्याचा निर्णय घेतला.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. भास्कर जाधव .....

परंतु तेथील स्थानिक ग्रामस्थांनी त्या निर्णयाला विरोध केला. त्यामुळे हा प्रकल्प त्या ठिकाणी होऊ शकला नाही. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी श्री. दिलीप जैन यांचे नाव घेऊन या व्यक्तीचे बांधकाम त्या जागेवर आहे काय असा प्रश्न उपस्थित केला ? त्या ठिकाणी काही अनधिकृत बांधकामे झालेली आहेत पण ती नक्की कोणाची आहेत याची माहिती आता या क्षणाला शासनाकडे नाही.

श्री. विनोद तावडे : ती जागा लोकवस्तीपासून किती अंतरावर आहे ?

श्री. भास्कर जाधव : ती जागा लोकवस्तीपासून 950 मीटरवर आहे.

उपसभापती : अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे झाली असतील तर ती तोडणार काय ?

श्री. भास्कर जाधव : आता या क्षणाला शासनाकडे कोणत्याही प्रकारची माहिती नाही. आपण जे सांगत आहात तो मुद्दा तपासून पाहता येईल.

श्री. विनोद तावडे : अनधिकृत बांधकामे असतील तर ती तोडणार काय असा प्रश्न माननीय उपसभापती महोदयांनी विचारलेला आहे. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

उपसभापती : या सभागृहामध्ये एखाद्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला असेल आणि तो विचारत असताना त्यांनी काही माहिती दिली तर ती सत्य आहे असे गृहीत धरुन शासनाला त्याचे उत्तर द्यावे लागेल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, त्या जागेवर काही अनधिकृत बांधकामे आहेत हे मी मान्य केले.

श्री. विनोद तावडे : ती बांधकामे तोडणार काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आजच लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या सगळ्या गोष्टी समोर आलेल्या आहेत. शासनाला त्याची पुरेपूर माहिती घेतली पाहिजे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये काय माहिती घ्यावयाची आहे ? शासनाला अनधिकृत बांधकामांना पाठिंबा द्यावयाचा आहे काय ? ती बांधकामे पाडू असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, शासन याबाबतीत अत्यंत कर्तव्यकठोर आहे याबाबत सन्माननीय सदस्यांना शंका नसावी. अचानकपणे ही माहिती समोर आलेली आहे. त्याबाबत अधिक माहिती घेतली पाहिजे. ती माहिती न घेता विधान कसे करता येईल ? सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे त्याबाबत अधिक माहिती घ्यावी लागेल.

उपसभापती : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आपल्याला माहिती दिलेली आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, अनधिकृत बांधकाम असेल, चुकीचे असेल तर कारवाई करावी असे शासनाचे धोरण आहे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना कोणते अनधिकृत बांधकाम अभिप्रेत आहे हे त्यांनी सांगितले तर त्याची माहिती घेता येईल ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी माझे नाव घेतले त्यामुळे मला बोलू द्यावे.

उपसभापती : हा प्रश्न कचऱ्यासंबंधीचा आहे. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कारण नसताना इतर प्रश्न उपस्थित करुन वेळेचा कचरा करु नका. मूळ प्रश्नाला न्याय द्यावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कचऱ्यापासून खत तयार होते.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, कचऱ्याची विल्हेवाट लावणे हा राज्यासमोरचा प्रश्न आहे. संपूर्ण राज्याचा विषय एका लक्षवेधी सूचनेमध्ये मांडता येणार नाही, ही गोष्ट खरी आहे. पण वेळोवेळी या सभागृहामध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी शासनाचे आणि माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधू इच्छितो की, राज्यामध्ये आजच्या घडीला 16 मेट्रीक टन कचरा रोज निर्माण होत असतो. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी केंद्र शासनाचा सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट ॲक्ट, 2000 अस्तित्वात आहे. एवढेच नव्हे तर केंद्र शासनाकडून राज्य शासनाला, प्रत्येक नगरपालिकेला, महानगरपालिकेला निधी उपलब्ध होत असतो. दरवर्षी 200 ते 225 कोटी रुपये महाराष्ट्र शासनाला उपलब्ध होत आहेत. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सॉलिड वेस्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन ....

मॅनेजमेंट प्रकल्प उभे करण्यासाठी हा निधी येतो. सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट ॲक्ट, 2000 नुसार यासाठी जागा उपलब्ध करुन देणे आणि प्रकल्प उभे करणे आणि त्यासाठी लागणारी प्रत्येक गोष्ट उपलब्ध करुन देणे हे शासनाच्या अधिकाऱ्यांचे, महापालिकेकांच्या पदाधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे आणि ते कर्तव्य पार पाडले नाही तर त्याला दंड किंवा शिक्षा करण्याची सुध्दा तरतूद त्या कायद्यामध्ये आहे. असे असताना भिवंडी येथे जी 22 हेक्टर जागाशासनाने डंपींग ग्राऊंडसाठी दिली त्या जागेवर कंपाऊंड वॉलचे काम पूर्ण झाल्यानंतर, दोन तीन वर्षापूर्वी भिवंडी-निजामपूरमध्ये जेव्हा हे बांधकाम पूर्ण झाले तेव्हा बी.ओ.टी. तत्वावरील डंपींग ग्राऊंडचा प्रस्ताव महानगरपालिकेमध्ये येणार होता. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी त्याला स्थगिती दिली आणि त्यांनी काम थांबविले. आज सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो आरोप केलेला आहे त्यामध्ये सत्यता आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन....

संबंधित बिल्डरने कोर्टामध्ये धाव घेतल्यानंतर महानगरपालिकेने कोर्टासमोर आपली बाजू नीटपणे मांडली नाही. जर महानगरपालिकने त्यावेळी आपली बाजू सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट ॲक्ट 2000 च्या आधारावर मांडली असती तर त्याठिकाणी स्टेटस-को मिळाला नसता. हे मी 22 हेक्टर क्षेत्रासंबंधी बोललो. परंतु संपूर्ण महाराष्ट्रात कचरा उचलून तो डम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकण्यासाठी लाखो रुपयांची टेंडर्स दिली जातात. मग मिरा-भाईंदर महानगरपालिका असेल, पुणे महानगरपालिका असेल, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका असून या सर्व ठिकाणी सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट ॲक्टच्या तरतुदींचे पालन केले जात नाही. परंतु टेंडर्स मात्र त्याच दराने काढली जातात. सभापती महोदय, घनकचरा हा संपूर्ण राज्याच्यादृष्टीने महत्वाचा विषय असल्यामुळे या विषयाच्या खोलात जाणे आवश्यक आहे. मी सातत्याने 6-7 वर्षापासून हा विषय मांडत आहे. परंतु कच-याचा विषय निघाला की, त्यासाठी वेळ खर्च करु नये अशी सन्माननीय सदस्यांची भावना असल्याचे दिसून येते. परंतु या कचऱ्याचा मनुष्याच्या आरोग्याशी संबंध आहे. त्यामुळे हा विषय महत्वाचा आहे. मंत्रिमहोदयांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पहावे यासाठी मी बोलत आहे. भिवंडी व मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कचरा 7-8 महिने उचलला गेला नाही. त्याठिकाणचे 11 गावाचे गावकरी आहेत ते कचरा कोठे टाकतात ? प्रत्येकाला वाटते की, माझ्या दारासमोर कचरा असू नये. परंतु केंद्र सरकारने व राज्य सरकारने जो कायदा केला आहे त्यानुसार कचरा उचलला गेला पाहिजे, त्यावर प्रक्रिया केली पाहिजे. परंतु त्याचे कोणीही पालन करीत नाही. परंतु कचरा उचलण्याचे ठेके 100 टक्के त्या ॲक्टनुसार दिले जात आहेत. मंत्रिमहोदयांनी निवेदनात 11 गावक-यांचा उल्लेख केला आहे. त्या गावातील गावक-यांचा कचरा कोठे जातो ? त्या कच-याची विल्हेवाट शासनाकडून वा जिल्हा परिषदेकडून कोठे लावली जात आहे ? वस्तुस्थिती अशी आहे की, 22 हेक्टर क्षेत्रासाठी स्टेटसक्वो मिळाला आहे. त्यामुळे बाजूच्या जागेमध्ये कचरा डम्प केला जातो. मी मागील विधानसभेच्या निवडणुकीला उभा राहिलो होतो. त्यामुळे धारावी म्हणा अगर राज्यातील कोणत्याही झोपडपट्टीपेक्षा भिवंडी शहराची परिस्थिती

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.मुझफ्फर हुसेन....

अतिशय खराब आहे. त्याठिकाणी आपण चालू शकत नाही. मी मघाशी विचारल्याप्रमाणे मागील 2 वर्षात तेथील कचरा कोठे डम्प केला होता, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट ॲक्टनुसार टेंडर काढले होते काय आणि कोर्टासमोर महानगरपालिकेची बाजू नीटपणे मांडली नाही त्या अधिका-यांविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय या प्रश्नांची उत्तरे देण्यात यावीत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत माहितीपूर्ण, तितक्याच पोटतिडीकीने आपले मत मांडले आहे. हा जिव्हाळयाचा विषय सुटावा अशी अत्यंतिक भावना त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी पहिला प्रश्न असा उपस्थित केला की, तेथे कचरा टाकणे बंद केले असल्यामुळे आता तेथील कचरा कोठे टाकला जातो ? याबाबत मी सांगतो की, तेथे फेणे हे गाव आहे. सिटी सर्व्हे नं.17, हिस्सा 3 येथे खाजगी क्षेत्र आहे. तेथे 1.396 हेक्टर खाजगी मालकीची जागा आहे. त्या मालकांकडून ही जागा घेऊन त्या जागेवर सध्या कचरा टाकण्याचे काम सुरु आहे. त्या कचऱ्यावर रोलिंग करुन, त्यानंतर माती टाकण्याचे काम केले जात आहे.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, त्या शहरातील कचरा उचलला जात नाही.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी असा मुलभूत प्रश्न उपस्थित केला की, तेथे कचरा उचलला जात नाही, परंतु कचरा उचलण्यासाठी लाखो रुपयांची टेंडर्स दिली जातात. सध्या त्याठिकाणी महिना 60 लाख रुपयांचा ठेका दिलेला आहे. तरी देखील तेथील कचरा उचलला जात नसेल तर....

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शिघ्रलेखाची नाही

सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती ग्राह्य मानून हा ठेकेदार कचरा उचलित नसेल आणि पुन्हा पुन्हा त्याच ठेकेदाराला ठेका दिला जात असेल तर याबाबत तपसणी करुन संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश शासन निश्चितपणे देईल. 22.92 हेक्टर जागा शासनाने महानगरपालिकेला दिली होती. त्याजागेवर अतिक्रमण झाले असून त्यासंदर्भात महानगरपालिकेच्या वतीने कोर्टात जी बाजू मांडली गेली त्यासंदर्भात आपल्या जबाबदारीमध्ये जे कोणी अधिकारी कसूर करीत असतील आणि अनधिकृत बांधकाम करणा-या व्यावसायिकांना स्थगिती मिळवून देण्याच्या बाबतीत सहकार्य करीत असतील त्यांच्यावर कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : या लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केलेला प्रश्न हा ठाणे जिल्ह्यातील सर्वच महानगरपालिकांना लागू होतो. या प्रश्नाबाबत शासन गंभीर नाही. अधिवेशन काळात या प्रश्नासंबंधात माननीय सभापतींच्या दालनामध्ये मंत्री महोदयांच्या उपस्थितीत बैठका होतात. परंतु प्रश्न काही सुटत नाही. मागील 6 वर्षापासून हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आता ठाणे जिल्ह्याचे डंपिग ग्राऊंड होणार की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. एमएमआरडीए ही संस्था मुंबई आणि ठाण्यामध्ये काम करीत आहे. अंबरनाथ, डोंबिवली, बदलापूर या भागातील घनकच-याच्या संदर्भात प्रकल्प उभारण्याकरिता एमएमआरडीएने जागा शोधलेली आहे काय ? तत्कालीन नगरविकास राज्यमंत्र्यानी मुंलुंडमध्ये असलेले डंपिंग ग्राऊंड हे बेकादेशीर असून ते भांडूप-विक्रोळी यामधील जागेवर हलविण्यात येणार आहे असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा या कच-याच्या डंपिंगसाठी एमएमआरडीएने कुठे जागा पाहिलेली आहे काय ?

श्री. भास्कर जाधव :सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भातील निर्णयास अंतिम रुप आलेले नाही. कचरा डंपिंग करण्याकरिता किंवा त्यानुषंगाने प्रकल्पराबविण्याकरिता निश्चित धोरण झालेले नाही. सन्माननीय सदस्यांची माहिती खरी आहे. जागा शोधण्याचे काम सुरु आहे. मुलुंड येथे अनधिकृत प्रोजेक्ट राबविला गेला आहे, तो हलविणार का असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत माहिती घेऊनच उत्तर देणे उचित होईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : ही लक्षवेधी सूचना भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेपुरती मर्यादित असली तरी जेथे जेथे नागरीकरण झालेले आहे तेथे तेथे हा कच-याचा प्रश्न निर्माण झालेला आहे असे सर्वच सन्माननीय सदस्यांनी सांगितले. हा प्रश्न 6 वर्षापासून विचारला जात आहे असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. माझी माननीय मंत्री महोदयांनी विनंती आहे की, त्यांनी अधिकारी जे सांगातात तेच खरे असे गृहीत धरुन उत्तर देऊ नये. फेणे डंपिंग ग्राऊंडवर व आजूबाजूच्या परिसरात जंतुनाशकाची व दुर्गंधनाशकाची फवारणी योग्य प्रमाणात व प्रभावीपणे दररोज करण्यात येते व नागरिक श्वसनाच्या आणि दुर्धर रोगाने व्याधीग्रस्त नाहीत असे लक्षवेधीच्या निवेदनामध्ये म्हटलेले आहे. परंतु परिस्थिती नेमकी उलट आहे. लोकांच्या तब्येतीच्या तक्रारी आहेत म्हणून 11 गावातील लोक एकत्र आले.

....नंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असा प्रकार झाला नसता तर लोकांना एकत्र येण्याची गरज नव्हती. फक्त अधिकारी माहिती देतात त्यावर विश्वास न ठेवता तेथील वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेण्याचा शासन प्रयत्न करणार आहे का? या प्रश्नाची व्याप्ती मुंबईसहित अनेक शहरांपर्यंतची आहे. कचरा टाकण्याचा प्रश्न आला की डंपिंग ग्राऊंड नको अशी त्या त्या परिसरातील जनतेची भावना असते. ज्या प्रक्रियेचा उल्लेख केला त्या प्रक्रियेचे निकष पाळले जात नाहीत. ते निकष पाळले गेले असते तर हा प्रश्न उद्‌भवला नसता. संबंधित ठेकेदार आणि अधिकारी यांच्या संगनमताने हे काम चालले आहे. यामध्ये लक्ष घालून शासन कारवाई करणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्यांना सांगितले पाहिजे की, 2003 ते 2010 पर्यंत फेणे या गावामध्ये कचरा डंप केला जात नव्हता. 25.7.2009 नंतर कटई गावामध्ये 12 हेक्टर जागा भिवंडी महानगरपालिकेची आहे त्या जागेवर हा कचरा टाकला जातो. अगोदर फेणे गावामध्ये कचरा टाकला जात होता त्याची कारणे वेगळी आहेत. 25.7.2009 रोजी आंदोलन झाले. म्हणून त्याठिकाणी कचरा टाकणे बंद झाले. सायंटिफिक प्रक्रिया केली जाते की नाही याबद्दलचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, अधिकाऱ्यांकडून दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवू नये. जेवढी म्हणून अधिकाऱ्यांकडून तपासून घेऊन, खोलात जाऊन, क्रॉस प्रश्न विचारुन माहिती काढून घेता येईल ती काढून घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. शेवटी माहिती देणारी यंत्रणा तीच आहे. अधिकारी दुर्लक्ष करीत असतील तर सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे उच्च दर्जाचा अधिकारी पाइवून त्याची खात्री करण्यात येईल. ते तसे करीत नसतील तर ती प्रक्रिया शास्त्रशुध्द करण्यास भाग पाडण्यात येईल. इन जनरल मुंबईचा प्रश्न आहे त्या संदर्भात काटेकोरपणे लक्ष देण्याचा प्रयत्न केला जाईल. 2003 ते 2009 पर्यंत हा कचरा त्याठिकाणी डंप केला जात नव्हता.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, कचरा उचलणारे ठेकेदार टेंडर घेतात त्यांच्याकडून योग्यप्रमाणात काम होत नसेल तर त्यांना टेंडर दिले जाणार नाही असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आता ई-टेंडरिंग करणे सक्तीचे केलेले आहे. ई-टेंडरिंग होते त्यावेळी शासनाच्या हातामध्ये काही अधिकार असत नाहीत. मागील वर्षी माझ्या वडिलांवरील शस्त्रक्रिया करण्यासाठी मी त्यांच्यासोबत मॅनहटन येथे गेलो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.3... श्री.मुझफ्फर हुसेन....

होतो. तेथील हाय कमिशनर हे माझे मित्र असल्यामुळे मी त्यांची भेट घेतली. मी त्यांना सहज विचारले की, सध्या या शहरात क्लब, बार, प्रोस्टेट्स, गॅम्बलिंग प्रकार दिसत नाहीत याची कारणे काय आहेत? ते म्हणाले की, हे प्रकार आता बंद झाले असून मोठया माफियांनी आता कचरा जमा करण्याचे धंदे सुरु केले आहेत. ही गंमतीची गोष्ट नसून मी सत्य सांगत आहे. लंडनमध्ये तीच परिस्थिती आहे. न्यूयॉर्कमध्ये तीच परिस्थिती आहे. तुमच्या आमच्या राज्यात देखील तीच परिस्थिती आहे. हे टेंडर घेणारे छोटे मोठे ठेकेदार नसून मोठमोठे माफिया आहेत. जे कोणी माफिया आहेत ते टेररिस्ट आहेत असे मी म्हणणार नाही. परंतु त्यांनी वेगवेगळया प्रकारे टेंडर घेण्यासाठी दादागिरी, माफियाझम चालविला आहे. ते अधिकाऱ्यांना सोबत घेऊन टेंडर स्वीकारतात. मुंबई महापालिकेकडे मी गेली चार वर्षे पत्र लिहून माहिती घेण्याचा प्रयत्न करीत आहे. मुंबई महापालिकेकडून आरोग्य खात्यावर किती खर्च होतो याची माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. आमच्याकडे डिटेल माहिती नाही असे सांगितले जाते. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. मंत्रीमहोदय म्हणतात की, व्यवस्थित झालेले नसेल तर लक्ष घालू. लक्ष घालण्याची गरज नाही. तुमच्या राज्यातील व गावातील कचऱ्याची परिस्थिती काय आहे हे डोळ्यासमोर आहे. टेंडर मंजूर करण्याचे तुमच्या हाती राहिलेले नाही. यासंबंधी काय उपाययोजना करणार आहात, जेणेकरुन कॉन्ट्रॅक्टर चांगले काम करतील. काम व्यवस्थित होईल आणि राज्याचा व जनतेचा पैसा वाचेल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ई-टेंडरिंग पध्दतीने टेंडर काढले जातात. त्यामुळे ते टेंडर देण्याचे काम शासनाच्या हातामध्ये राहिलेले नाही.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

आपल्याला माहीत आहे की, ज्याप्रमाणे सध्या इको फ्रेंडली, ई-गव्हर्नन्स वगैरे सिस्टम्स येत आहेत त्यावेळी या सर्व गोष्टी आपोआपच पुढे येतील. जर ई-गव्हर्नन्स पध्दतीने टेंडरिंग सुरु झाले तर ते अधिक चांगले होईल. सन्माननीय सदस्यांचा मुद्दा असा आहे की, जे लोक कचरा उचलत नाहीत अथवा चांगले काम करीत नाहीत त्यांनाच टेंडर दिले जाते परंतु अशा प्रकारे आपण ई-टेंडरिंग सुरु केल्यानंतर ते आपोआपच बाद होतील व त्याचा फायदा एकंदर कामावर होईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, घन कचरा व्यवस्थापन या विषयाचे महत्व आणि गांभीर्य सगळीकडे इतके स्पष्ट झालेले असतना ज्या नव्या तंत्रज्ञानाचा आज सर्व क्षेत्रात वापर होत आहे त्यात मुलभूत प्रश्न असा आहे की, हा प्रश्न केवळ आपल्या राज्यापुरता किंवा शहरापुरताच मर्यादित राहिला नाही तर संपूर्ण देशातच ही अवस्था असण्याची शक्यता आहे. पण कुठे ना कुठे तरी या समस्येवर मात करण्यासाठी काही तरी वेगळा व इनोव्हेटिव्ह विचार केला गेला असण्याची शक्यता आहे. मध्यंतरीच्या काळात, सबंध शहराचा एकत्रित कचरा उचलून नंतर प्रक्रिया करण्यापेक्षा त्याचे डि-सेंट्रलायझेशन करुन छोट्या छोट्या ठिकाणी प्रोसेसची व्यवस्था झाली तर त्यावर मात करता येऊ शकते, अशा प्रकारचे काम करणारी एनजीओ दिल्लीमध्ये कार्यरत आहे. दुसरे महत्वाचे म्हणजे या घन कचरा व्यवस्थापनाचा संबंध सगळीकडेच आहे. म्हणून शहरात ज्या प्रक्रिया होतील आणि त्याची माहिती आपल्या खात्याने घेतली व जेथे चांगल्या पध्दतीने व किमान जागेमध्ये अशा घनकचरा व्यवस्थापनासंबंधीची योजना राबविली जात असेल तसेच योग्य त्या प्रक्रियेमध्ये या घन कचऱ्याची विल्हेवाट लावणार असेल त्यासंबंधीचा अभ्यास करण्याची गरज आहे. तसेच आपल्या खात्यातर्फे काही तज्ज्ञांना याचा अभ्यास करण्यासाठी जगातील व्यवस्थापनासंबंधीचे जे शास्त्र आहे त्याचा अवलंब करुन प्रयोगात्मक म्हणून किमान दोन तीन महापालिकांचा विचार करण्यास हरकत नाही. जेथे या प्रश्नाने जटिल स्वरुप धारण केले असेल अशा महानगरपालिकांच्या ठिकाणी असा प्रयोग करण्याची शासनाची तयारी आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाची माहिती दिली आहे. कारण 4 फेब्रुवारी, 2010 रोजी आपल्याकडे स्विडीश डेलिगेशन आले होते. त्यांनी त्यांच्या देशात कशा प्रकारे कचरा विल्हेवाट लावलेली आहे त्यासंबंधीचे उत्तम प्रेझेंटेशन दिले होते आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

योगायोगाने मी देखील तेथे उपस्थित होतो. त्यांनी मुंबईतील वेगवेगळे तज्ज्ञ, सायंटिस्ट, बिल्डर्स व व्यावसायिक यांनाही बोलावले होते. त्यांच्याकडे यासंबंधीचे एक तंत्रज्ञान असे आहे की, घन कचऱ्याचे मोठे प्रोजेक्ट राबविण्यापेक्षा छोटे छोटे प्रोजेक्ट राबवावे आणि यासंबंधीची माहिती शासन घेत आहे. त्या देशाची लोकसंख्या आणि आपली लोकसंख्या यामध्ये मुलभूत फरक आहे या सर्व गोष्टींचा विचार करुन आपल्या राज्यात सुध्दा असे छोटे छोटे प्रकल्प राबविता येतील काय यादृष्टीने शासनाला प्रयत्न करता येतील.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, इस लक्षवेधी सूचना के ऊपर अभी तक जो चर्चा हुई है, वह मुंबई, ठाणे और भिवंडी तक सीमित रही है. माननीय सदस्य श्री. मुजफ्फर हुसैन ने यहां पर बहुत अच्छी चर्चा उपस्थित की, इसके लिए मैं उनका आभारी हूँ. सभापति महोदय, मेरे 3 प्रश्न हैं. घन कचरे का प्रश्न पूरे राज्य का प्रश्न है. विदर्भ में नागपुर महानगरपालिका की यह समस्या है और चंद्रपुर महानगरपालिका की भी यह समस्या है. मेरा पहला प्रश्न यह है कि विदर्भ के नागपुर और अमरावती डिवीजनों की मिलाकर या अलग अलग मीटिंग लेकर क्या मंत्री महोदय घन कचरे की समस्या को दूर करने के लिए आगे कुछ कार्यवाही करेंगे ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि सन् 2002 में दापोडा गांव में भिवंडी महानगरपालिका को जमीन मिल गई. सन् 2008 में रिट पिटीशन दाखिल किया गया और दिसम्बर महीने में उसको स्टे मिल गया. स्टे मिलने के लिए कुछ लॅप्स रखे गए, इसलिए इस बारे में जांच होनी चाहिए. इसमें जान-बूझकर डिले किया गया है, इसलिए क्या मंत्री महोदय इस बारे में जांच करेंगे ?

मेरा तीसरा प्रश्न यह है कि भिवंडी में जमीन के लिए कोर्ट से स्टे मिल गया है तो जब तक कोर्ट का स्टे खत्म नहीं होता है, क्या तब तक शासन दूसरी व्यवस्था करेगा ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड ....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एकूण तीन प्रश्न विचारले आहेत.. त्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी प्रथम देतो. 2008 सालापर्यंत स्टेट्स-को मिळेपर्यंत यासंबधीची प्रक्रिया लांबली होती त्याला काहीजण कारणीभूत आहेत . त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे करण्याकरिता, इमारती बांधण्याकरिता ,शासनाची जमीन हडप करण्याकरिता जाणीवपूर्वक वेळ दिला गेला अशा प्रकारची भावना सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे आणि इतरही काही सन्माननीय सदस्यांची आहे.या संदर्भात नगर विकास विभागाचे सचिव (2) यांच्या मार्फत चौकशी केली जाईल आणि चौकशीचा अहवाल सभागृहासमोर ठेवला जाईल. सन्माननीय सदस्यांनी नागपूरला बैठक बोलाविण्याच्या संदर्भात एक मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी नागपूरला बोलाविल्यानंतर बैठक आयोजित करता येईल.सन्माननीय सदस्यांनी जो तिसरा प्रश्न विचारला होता त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की केणी या गावात कचरा टाकण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री .संजय केळकर यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की,एमएमआरडीएने भिवंडी जवळ दापोडे , कल्याण रोड, शिळफाटा, तळोदा, पनवेलला द्रुतगती मार्गाजवळ ,उल्हासनगर, अंबरनाथ व ऐरोली या ठिकाणी प्राथमिक स्वरुपाची जागेची पहाणी केलेली आहे.त्या संदर्भात अजून अंतिम निर्णय झालेला नाही.

श्री. सुभाष भोईर : सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी भिवंडी महानगरपालिकेच्या घन कचऱ्याच्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. ठाणे जिल्हयात मोठया प्रमाणावर नागरिकीकरण होत असून ठाणे जिल्हयात सर्वात जास्त महानगरपालिका आहेत हे आपल्यालाही माहीत आहे.त्यामुळे या ठिकाणी घन कचऱ्याच्या संदर्भातील प्रश्न मोठया प्रमाणावर भेडसावत आहे.या महानगरपालिकांना घनकचरा टाकण्यासबंधी काही जागा शासनाने दिली आहे परंतु त्या जागा योग्य नाहीत. या जागांवर घन कचरा टाकण्याच्या बाबतीत स्थानिक नागरिकांचा विरोध आहे.या निमित्ताने मला अशी सूचना करावयाची आहे की ठाणे महानगरपालिकेने आडवली भुतवली या ठिकाणी जागा पाहिलेली आहे तेव्हा ही जागा कचरा टाकण्यासाठी ठाणे महानगरपालिकेला देण्यासाबंधी शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष भोईर : आडवली भुतवली येथै घन कचरा टाकण्यासाठी जमीन दिल्यास त्यामुळे नवी मुंबईमधील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही ही जमीन जवळजवळ 25 ते 30 किलोमिटर्स आतमध्ये आहे. त्यामुळे येथे कचरा टाकल्यास कोणालाही उपद्रव होणार नाही.तेव्हा ही जमीन कचरा टाकण्यासाठी देण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांना नेमके काय म्हणावयाचे आहे ?

उपसभापती : सन्माननीय सादस्य श्री. सुभाष भोईर यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांच्या दालनात जाऊन भेटावे व त्या ठिकाणी चर्चा करावी.

श्री.भास्कर जाधव : आम्ही दोघेही जण आपल्या दालनात येतो.

श्री.सुभाष भोईर : सभापती महोदय,आडवली व भुतवली येथे महाराष्ट्र शासनाची वन जमीन आहे त्यामुळे राज्य शासन ही जागा ठाणे महानगरपालिकेला कचरा टाकण्यासाठी देऊ शकते अशी आम्हाला अधिकाऱ्यांकडून माहिती मिळालेली आहे. तेव्हा नवी मुंबई येथील आडवली भुतवली ही जागा ठाणे महानगरपालिकेला कचरा टाकण्यासाठी मिळेल काय ?

श्री.भास्कर जाधव : अशा प्रकारे जागा मागणीचा प्रस्ताव नसल्यामुळे त्यासंबंधी उत्तर देता येणे शक्य होणार नाही.

उपसभापती : सन्माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी तसेच श्री.एस.क्यु जमा आणि इतरही सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला होता त्य प्रश्नाला आपण बगल दिली आहे असे माझे म्हणणे आहे....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....

याठिकाणी ही जागा एका विशिष्ट हेतूसाठी राखून ठेवण्यात आली. महानगरपालिकेचे अधिकारी कोर्टामध्ये उपस्थित कां राहिले नाहीत? याची आपण चौकशी करा, आणि त्यांना शासन करा. परंतु मूळ मुद्दा असा की, त्याठिकाणी अनधिकृत बांधकाम झाले आहे हे आपण मान्य केले आहे. ते त्वरीत उठवून ती जागा महानगरपालिकेला देता येत असेल तर महानगरपालिकेला द्यावी किंवा शासनाची जागा असेल तर जिल्हाधिकाऱ्यांना देणार काय? अशाप्रकारे याठिकाणी विचारण्यात आलेल्या या महत्वाच्या प्रश्नाला आपण बगल दिली आहे असे माझे स्पष्ट मत आहे. या संदर्भात मी स्वत: देखील गेली सहा वर्षे तक्रार करुन थकलो आहे. त्याठिकाणी मोठया प्रमाणावर गोडाऊन बांधण्यात आले आहेत, त्यामुळे त्या लोकांची वित्तहानी होऊ नये म्हणून त्या गोडाऊनचा एरीया भिवंडी महानगरपालिकेकडे देण्यात यावा. कारण भिवंडी महानगरपालिकेकडे विकासासाठी निधी नाही. म्हणून हा एरीया आपण आमच्याकडे द्यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. त्या महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या ठरावाला आपण वाटाण्याच्या अक्षता लावल्या. त्याठिकाणी अनधिकृत असलेल्या बांधकामांना हात लावण्या संदर्भात आपण कोणतीही वाच्यता केली नाही . या दोन गंभीर बाबी मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मघाशी उत्तर देतांना म्हटले की, ज्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक काही बिल्डर्सना....

उपसभापती : तुम्ही अधिकाऱ्यांना फार तर फाशी द्याल...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे. ज्या लोकांनी त्या जमिनीवर जाणीवपूर्वक अतिक्रमण केले असेल तर त्याबाबत नगर विकास विभागाचे सचिव - 2 यांचेमार्फत चौकशी करुन ते बांधकाम तोडण्याची, निष्कासित करण्याची कारवाई केली जाईल.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, घनकचऱ्याबरोबर भूसंपादनाचा प्रश्न महत्वाचा आहे. राज्यामध्ये 222 महानगरपालिका व नगरपालिका आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, घनकचऱ्यासाठी वेगवेगळया ठिकाणी आरक्षण ठेवले जाते. कंटूर प्लॅन हा वेगळया ठिकाणी केलेला असतो. त्यामधून भूसंपादनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून मला असे विचारावयाचे आहे की, प्रत्येक नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये घनकचऱ्यासाठी कंटूर प्लॅन तयार केला असेल तर त्याप्रमाणे आपण आरक्षण ठेवणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. एखाद्या शहराचा डीपी प्लॅन पूर्वी तयार झाला असेल तर त्यामध्ये आता बदल करता येणे शक्य नाही. परंतु नवीन प्लॅन तयार करीत असतांना त्यामध्ये डंपिंग ग्राऊंडसाठी जागा राखीव ठेवण्यासाठी निश्चितपणे महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये तरतूद करण्यात येईल.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये चुकीची नोंद होऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, डीपी प्लॅनमध्ये बदल करण्याचा अधिकार महानगरपालिका व नगरपालिकांना आहे. संबंधित कायद्यातील कलम 37 नुसार डीपी प्लॅनमध्ये बदल करुन त्या जागेवर आरक्षण ठेवण्याचे अधिकार महानगरपालिकेला आहेत. हे खरे आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, कलम 37 अन्वये संबंधित नगरपालिकेने शासनाकडे परवानगी मागितली तर ती देता येते. परंतु नगरपालिकेने मागणी केली नाही तर परवानगी कशी देता येईल?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

पृ.शी.: मुंबई विद्यापीठाला दिलेला पंचतारांकित दर्जा नॅकने काढून घेतल्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष

मु.शी.: मुंबई विद्यापीठाला दिलेला पंचतारांकित दर्जा नॅकने काढून घेतल्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष यासंबंधी डॉ. दीपक सावंत, सर्वश्री दिवाकर रावते, किरण पावसकर, परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने समाजकल्याण उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"जगातील २०० नामवंत विद्यापीठांमध्ये मुंबई विद्यापीठाची होत असलेली गणना, लाखो विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण व त्यासाठी असलेल्या सर्वोकृष्ट सुविधा लक्षात घेवून केंद्र शासनाच्या नॅशनल असेसमेन्ट व ॲक्रीडीएशन कौन्सिल (नॅक) या संस्थेने मुंबई विद्यापीठाला पंचतारांकित दर्जा दिलेला असणे, नॅकने दिलेल्या दर्जानुसार विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठांना कोटयावधी रुपयांचे आर्थिक सहाय्य देत असणे, मुंबई विद्यापीठाला नॅकने दिलेल्या पंचताराकिंत या सर्वोत्कृष्ट दर्जामुळे देश - विदेशातील हजारो विद्यार्थी मुंबई विद्यापीठअंतर्गत असलेल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेत असणे, विद्यापीठाचा दर्जा हा नॅकने दिलेल्या ग्रेड वरुन ठरत असल्याने नॅकचा दर्जा हा अत्यंत महत्वाचा असणे, मुंबई विद्यापीठाअंतर्गत आज निरनिराळया विषयांची शेकडो महाविद्यालये कार्यरत असून त्यामध्ये लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असणे तथापि मुंबई विद्यापीठाला दिलेला पंचतारांकित दर्जा नॅकने काढून घेणे, याबाबत तातडीने चौकशी करुन संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कार्यवाही करण्याबाबत दाखविलेली अक्षम्य उदासीनता परिणामी मुंबई विद्यापीठाअंतर्गत शेकडो निरनिराळया विषयांतील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी व त्यांच्या पालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, मुंबई विद्यापीठाला पुन्हा नॅकचा सर्वोत्कृष्ट दर्जा मिळण्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, ल□बेधी सूच□सबंधीच्या □बेद□च्या प्रती मा□□य सदस्यां□ आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते □बेद□ आपल्या अ□मती□ सभा□हाच्या पटलावर ठवते.

उपसभापती : □बेद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

□बेद□

(प्रेस : येथे सोबतचे □बेद□ छापावे)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मघाशी जमा होणाऱ्या घनकचऱ्याच्या संबंधात लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्या लक्षवेधी सूचनेप्रमाणेच ही लक्षवेधी सूचना देखील अतिशय महत्वाची आहे.

सभापती महोदय, ज्या मुंबई विद्यापीठला 150 वर्षाची परंपरा आहे,इतिहास आहे आणि जागतिक दर्जाचे मानांकन आहे.दुर्दैवाने 2006 मध्ये नॅकचे मानांकन रद्द झालेले आहे.विद्यापीठाचे पुनर्मुल्यांकन 2008 मध्ये होणे आवश्यक आहे.पण नॅकचा नियम असा आहे की, जर तुम्ही त्याचे पुनर्मूल्यांकन केले नाही तर "It is deemed to be cancelled."त्यामुळे तसे ते रद्द झालेले आहे.आपण निवेदनामध्ये जरी असे म्हटलेले आहे की,"विद्यापीठाच्या विविध विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे स्वयं अभ्यास अहवाल (SSR) तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून सदर अहवाल नॅक संस्थेकडे मुंबई विद्यापीठाचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी पाठविण्यात येईल.विद्यापीठाचा पंचतारांकित दर्जा काढून घेण्यात येत असल्याचे सदर नॅक संस्थेकडून मुंबई विद्यापीठास कळविण्यात आलेले नाही."परंतु "It is deemed to be cancelled".त्या नियमा नुसार आपले नॅकचे नामांकन कॅन्सल झालेले आहे हे आपण लक्षात घ्यावे.या मुंबई विद्यापीठामध्ये नॅक साठी व्दि-सदस्यीय समिती नेमली होती. यामध्ये श्री.पेठे, श्री.मगरे यांचा समावेश होता. मात्र या व्दि-सदस्यीय समितीने कोणत्याही प्रकारचे काम केलेले नाही.दोन वर्षे झाली, 2006 ते 2008 आणि आता 2010 हे वर्ष सुरु झालेले आहे म्हणजे आता जवळजवळ चार वर्षे झाली आहेत.या कालावधीत वास्तविक पाहता नॅकचा दर्जा पुन्हा प्रस्थापित करणे अत्यंत आवश्यक होते.या विद्यापीठामध्ये शिकण्यासाठी अनेक परदेशी विद्यार्थी येत असतात आणि या परदेशी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने नॅकचा दर्जा हा महत्वाचा मानला जातो. सध्या या विद्यापीठामध्ये काय सुरु आहे याबाबतीत रोज प्रत्येक वर्तमानपत्रातून बातम्या येत आहेत. अगदी सुरक्षा रक्षकाचे पगार रखडण्यापासून ते कुलगुरुंची नेमणूक करण्याच्या बाबीपर्यंत हे विद्यापीठ वादाच्या भोवऱ्यामध्ये सापडलेले आहे.माझा पहिला प्रश्न असा आहे की,या विद्यापीठाला नॅक चा दर्जा प्रस्थापित करण्यासाठी जी समिती नेमली गेली होती, त्या समितीने काम केलेले नाही हे आपल्या लक्षात आलेले आहे काय ? जर ही गोष्ट खरी असेल तर आपण त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे सांगणार आहात काय ? दुसरा महत्वाचा प्रश्न हा नियमबाह्य नेमणुकांच्या बाबतीत आहे. याठिकाणी अनेक नियमबाह्य नेमणूका झालेल्या आहेत. या विद्यापीठाच्या रजिस्टार श्रीमती व्यंकटरमणी यांची माननीय राज्यपाल यांना ...

. . . .2 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हकालपट्टी करावी लागलेली आहे. उप कुलसचिव श्री.गोसावी यांना लाच घेताना पकडण्यात आले आहे. श्री.विजय खोले यांनी बेकायदेशीरपणे श्रीमती मौसमी गावणकर व श्री.राजेश कारंजाल यांची नेमणूक केली.तसेच श्रीमती अरुणा देशपांडे या पी.एच.डी.नसताना देखील त्यांची रीडर म्हणून नेमणूक केली आहे.एकीकडे माननीय मंत्री महोदय सांगतात की,आमचा रोड मॅप तयार आहे आणि दुसरीकडे तुमचे मुंबई विद्यापीठ अशा प्रकारचे आहे.आता कदाचित असे सांगितले जाईल की, हे विद्यापीठ स्वायत्त आहे.आमचा त्यावर कोणत्याही प्रकारचा कंट्रोल नाही. निवेदनामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की,"पुनर्मुल्यांकन नॅक या संस्थेकडून तात्काळ करुन घ्यावे अशा प्रकारच्या सूचना सर्व विद्यापीठांना जे.बी.व्ही.सी.च्या वेळोवेळी झालेल्या बैठकीत देण्यात आल्या आहेत.नॅक संस्थेकडे विद्यापीठाच्या पुनर्मुल्यांकनाचा प्रस्ताव लवकरात लवकर पाठविण्याबाबतची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे."माझा प्रश्न असा आहे की, ही कार्यवाही लवकरात लवकर कधी पूर्ण होणार आहे? मुंबई विद्यापीठाला नॅकचा दर्जा कधी प्राप्त होणार आहे? तसेच या विद्यापीठामध्ये घडत असलेले जे सर्व प्रकार सांगितलेले आहेत, त्याबाबत संबंधितांवर कधी कारवाई होणार आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी चार प्रश्न विचारलेले आहेत. त्यांनी असे सांगितले की, मुंबई विद्यापीठ हे जागतिक दर्जाचे आहे, हे बरोबर आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : होते.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, तसे ते आजही आहे. यु.जी.सी.ची विद्यापीठाला उत्कृष्ट अशी क्षमता असणारे, आता खरे म्हणजे मुंबई व पुणे या दोनच विद्यापीठांना "University with potential for excellence" हा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. त्या व्यतिरिक्त जागतिक विद्यापीठाने बजावलेल्या शैक्षणिक व संशोधनिक कार्यवाहीसाठी "कोरोनरी" या लंडनस्थित संस्थेने एशियातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून 137 वा क्रमांक दिलेला आहे आणि देशाच्या पातळीवर या विद्यापीठाचा 10 वा क्रमांक आहे.त्यामुळे जागतिक पातळीवर आणि देश पातळीवर मुंबई विद्यापीठ हे फार मोठे आहे.सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे,ती खरी आहे की, या विद्यापीठाला नॅकचे नामांकन 2001 रोजी मिळाले आहे आणि त्याचा कालावधी 2005-2006 पर्यंत होता.त्याचबरोबर पूर्वीच्या नॅकच्या नियमाप्रमाणे त्याचे जे रि-ग्रेडेशन असते, त्याला दोन ....

. . . .2 ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर्षाची मुदत आहे. त्यानुसार 2007-2008 पर्यंत आपल्याला नॅककडून नामांकन यावयास हवे होते. मी येथे मान्य करते की, यासंबंधातील प्रोसेससाठी आपल्याला उशीर झालेला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड.....

पण त्याबाबतीत काही कारणे आहेत. लेटर आफ इन्टेन्शन, पिअर ग्रुपला बोलावण्यासाठी पाठविण्यात येते ते सन 2007 लाचा पाठविले होते. मागच्या वेळी नॅकची समिती आली होती. पिअर समिती आली होती. त्या समितीने काही सूचना दिल्या होत्या त्यानुसार कम्पल्शन समिती तयार केली होती. नॅकच्या शिफारशी आणि कमिटीच्या पिअर ग्रुपच्या शिफारशी आल्या होत्या. त्याअंतर्गत नवीन नॅकला जातो त्यासाठी अहवाल तयार करावयाचा असतो तो अहवाल तयार करण्यासाठी समिती स्थापन केली होती. त्या व्यतिरिक्त ईंटरनल क्वालिटी ॲश्युरन्स सेलची स्थापना करण्यात येते, हा सेल शैक्षणिक दर्जाच्या बाबतीत विविध स्तरावरुन माहिती गोळा करतो (अडथळा) ...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, पेठे आणि मगरे या दोघांकडे जबाबदारी होती त्यांनी ती जबाबदारी पार पाडली नाही हे शासनाला मान्य असेल तर त्याच्यावर काय कारवाई करणार? याचे उत्तर द्यावे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मुल्यांकन 2007 आणि 2008 मध्ये व्हावयास पाहिजे होते त्याला उशीर झालेला आहे हे मी मान्य केलेले आहे. पण ते होत असताना प्रोसिजर नुसार एकत्र डेटा गोळा करणे, समिती तयार होऊन तो प्रोसेस होणे, त्यानंतर एसएसआर निर्माण करणे या प्रोसेसमध्ये ....

(काही सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे. सन्माननीय सदस्यांचे प्रश्न मी ऐकलेले आहेत तेव्हा त्या प्रश्नांचे उत्तर देण्याची मला संधी दिली पाहिजे. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.(अडथळा) सभापती महोदय, मी सांगितलेले आहे की, या प्रोसेसमध्ये एसएसआर तयार करण्याची जी प्रोसेस आहे ती पूर्णत:झालेली आहे. आणि ती होऊन

(काही सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, जरुर दोन महिन्यात हे सगळे नॅकला पाठवून पिअर ग्रुपला आमंत्रित करुन सहा महिन्यामध्ये नॅकचा दर्जा पुन्हा प्राप्त करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सहा महिन्यात ही प्रोसेस पूर्ण होईल्.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(काही सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, पेठे म्हणून आहेत ते कुलगुरु पदाच्या शर्यतीत आहेत.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, हा नॅकच्या रीॲक्रीडीटेशनचा प्रश्न आहे. कुलगुरुंचा प्रश्न हा वेगळा प्रश्न आहे.

(काही सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

डॉ. दीपक सावंत : जे दोन किंवा तीन सदस्य समितीमध्ये होते, ज्यांच्याकडे जबाबदारी होती ते दोषी आहेत की नाही याचा खुलासा करण्यात यावा.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे नॅक ॲक्रीडीटेशनसाठी पुष्कळसे क्रायटेरिया असतात.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, श्री. पेठे आणि मगरे समितीमध्ये होते की नाही ते सांगावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याला जोडूनच माझा मुद्दा आहे. नॅकचा दर्जा विद्यापीठाने घेतलला नाही तो वर्ष पूर्ण झाल्यानंतर घ्यावयास पाहिजे होता. त्यानंतर विद्यापीठाच्या ज्या ज्या जाहिराती आलेल्या आहेत त्या जाहिरातीमध्ये पंचतारांकित नॅक दर्जा प्राप्त अशा सगळया गोष्टी नमूद करण्यात आलेल्या आहेत. पदवीदान समारंभाचे जी निमंत्रणे आलेली आहेत त्यामध्ये सुध्दा लिहिलेले आहे. तेव्हा हे बेकायदेशीर कृत्य मुंबई विद्यापीठाने केलेले आहे हे शासनाला मान्य आहे काय?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, नॅकचा दर्जा जर योग्य वेळी घेतला नाही तर युजीसीची जी ग्रॅन्ट मिळते त्यामध्ये फरक पडतो हे खरे आहे काय?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी श्री. अभय पेठेजी समितीमध्ये आहेत काय?या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. सभापती महोदय, विद्यापीठामध्ये कम्पलशन कमिटी तयार करण्यात आलेली आहे. नॅक ॲक्रीडीटेशनसाठी मागच्यावेळी जेव्हा नॅकची समिती आली होती त्यावेळी ज्या शिफारशी व सूचना मागविण्यात आल्या होत्या त्याअंतर्गत जी समिती स्थापन झाली होती त्या समितीचे अध्यक्षपद श्री. अभय पेठे यांना देण्यात आलेले होते.

प्रा. वर्षा गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी असा प्रश्न विचारला की, विद्यापीठ जे लेटरहेड वापरते त्यावर पाच स्टार असतात. सभापती महोदय, विद्यापीठाला पंचतारांकितचा जो दर्जा दिलेला आहे त्याबाबतीत नॅक संस्थेकडून विद्यापीठाला तुमचा पंचतारांकितचा दर्जा कॅन्सल झालेला आहे असे कळविण्यात आलेले नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण ते रिन्यू केले नाही तर ते रद्द होते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाला कायद्यातील तरतुदी माहीत नाही काय ? म्हणून असा अतिरेक झाला.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना मी उत्तर देतो. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी या ठिकाणी प्रश्न विचारला. पहिला प्रश्न असा उपस्थित करण्यात आला की, उशीर झाला काय ? मी हे मान्य करतो की यामध्ये दीड ते दोन वर्षे उशीर झालेला आहे. सन 2008 ला ते पूर्ण व्हावयास पाहिजे होते. आता 2010 साल सुरु आहे. यामध्ये उशीर झाला आहे हे मी मान्य करतो. जो उशीर झाला त्याबाबत जबाबदारी निश्चित करणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये यासंदर्भात सेक्शन 8(4) खाली आमचा जो अधिकार आहे त्या माध्यमातून माहिती मागवू आणि यासंदर्भात जे जबाबदार असतील त्या जबाबदार लोकांवर निश्चितपणे आम्हाला विद्यापीठ कायद्याच्या अनुषंगाने जे अधिकार आहेत त्या अनुषंगाने त्यांच्यावर कारवाई होईल. याबाबतीत जातीने लक्ष घालून आम्ही ते बघू.

सन्माननीय सदस्यांनी नियमबाह्य प्रकरणाच्या संदर्भात विचारले. कुलसचिवांची काही नियमबाह्य प्रकरणे झाली असतील तर, काही गैरप्रकार असतील तर त्याची चौकशी करण्याच्या संदर्भात सूचना देण्यात येतील.

आज आपल्याजवळ काय दर्जा आहे असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. आज आपल्याजवळ दर्जा नाही. दर्जा नाही याचा अर्थ त्याचा कालावधी संपलेला आहे आणि कालावधी संपलेला असल्यामुळे नॅकला अधिकार असतो त्या नॅकने तो दर्जा परत दिल्याशिवाय आज आपल्याजवळ काय ग्रेड आहे हे सांगता येणे अवघड असते. कारण तशी ग्रेड दिल्यानंतर तो कालावधी संपलेला आहे. नियमानुसार रि-ॲक्रीडीटेशन करुन घेणे क्रमप्राप्त आहे. तरच तो ग्रेड परत वापरता येतो. हे नक्की आहे की, रिॲक्रीडीटेशन करुन घेण्याचा प्रश्न आहे. आताच माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहाला माहिती दिलेली आहे की, ती प्रोसेस अतिशय जलद गतीने चालू आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

उशीर झालेला आहे हे मी मान्य केले आहे तसेच जबाबदारी निश्चित करु हेही मी मान्य केले. जो सेल्फ स्टडी रिपोर्ट म्हणजे एस.एस.आर. असतो तो पूर्ण होण्याच्या दृष्टीने अंतिम टप्प्यात आहे. जी ड्राफ्ट कमिटी असते ती एस.एस.आर. तयार करते आणि एस.एस.आर. तयार करुन त्यानंतर युजीसी जी पीअर कमिटी पाठवते त्या कमिटीला निमंत्रण दिले जाते. ती पिअर कमिटी आल्यानंतर दोन महिन्यात ती कमिटी निर्णय घेते. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, हा एस.एस.आर. पूर्ण करण्यासाठी दोन महिने आणि त्यानंतर पिअर कमिटीला बोलवून त्यांचा अंतिम रिपोर्ट किंवा मानांकन निश्चित करण्यासाठी दोन महिने असे चार महिने लागतील. त्यामुळे सहा महिने नव्हे तर राज्य सरकारच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करुन येत्या चार महिन्यांमध्ये हे काम पूर्ण करुन घेण्यात येईल. ॲक्रीडीएशन कंपल्सरी करण्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, पूर्वी असा नियम होता की, कालावधी संपल्यानंतर दोन वर्षात ते पूर्ण करावयाच होते. परंतु आता ते ताबडतोबीने म्हणजे दुसऱ्या मिनिटाला पूर्ण करावे असा नियम आहे. डिसेंबर, 2008 मध्ये अशा प्रकारे नियमात बदल झालेला आहे. या अनुषंगाने कॉलेजेस असो किंवा विद्यापीठे असो ज्यावेळी त्यांचे ॲक्रीडीटेशन संपते त्याच्या चार सहा महिने अगोदर प्रक्रिया सुरु करणे अपेक्षित आहे. ती तारीख संपत असताना ताबडतोब लगेच रिॲक्रीडीटेशन किंवा मानांकन मिळवून घेणे विद्यापीठाला आवश्यक आहे. सभापती महोदय, नॅकचे महत्व अशासाठी आहे की, विद्यार्थ्यांच्या सुध्दा लक्षात आले पाहिजे की, आपण कोणत्या दर्जाच्या विद्यापीठामध्ये जात आहोत. आपण वर्तमानपत्रामध्ये सुध्दा वाचले असेल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

सर्व सन्माननीय सदस्यांना मी अधिकची माहिती देत आहे की, केंद्र सरकारच्या मानव संसाधन विभागाचे मंत्री श्री.कपिल सिब्बल यांनी मंत्रिमंडळासमोर एक प्रस्ताव क्लीअर केला आहे. त्या प्रस्तावानुसार कम्पलसरी ॲक्रिडिटेशनसंबंधी एक अधिनियम अंमलात येत आहे. परंतु तो येईल तेव्हा येईल, मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, विद्यापीठ कायद्यामध्ये कम्पलसरी ॲक्रिडिटेशनसंबंधीची नवीन तरतूद राज्य सरकारच्यावतीने सुध्दा समाविष्ट केली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर आणि आता सन्माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर यामधून विसंगती समोर आलेली आहे आणि ती सरकारने मान्यही केलेली आहे. माननीय राज्यमंत्री महोदया असे म्हणाल्या की, या विद्यापीठाला जागतिक दर्जा आजही आहे. मुंबई विद्यापीठाचा 200 देशांमध्ये 137 वा क्रमांक आहे. हे स्वत: त्यांनी कबूल केलेले आहे. तेव्हा मंत्री महोदयांना या विद्यापीठाचा दर्जा घसरला आहे हे कबूल करण्यासाठी काय अडचण आहे ? मुंबई विद्यापीठाची मघाशी उपस्थित झालेल्या डम्पिंग ग्राऊंडमधील कच-यासारखी स्थिती निर्माण झालेली आहे. विद्यापीठ चालविणा-यांनी ही वेळ आणलेली आहे. त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप होतो. पण त्यापेक्षा विद्यापीठ चालविणा-यांनी ही वेळ आणलेली आहे. हे ॲक्रिडिटेशन होईल तेव्हा होईल. पण मूळ ॲक्रिडिटेशन मिळणार की नाही हा खरा मुद्दा आहे. आजही हे विद्यापीठ पहिल्या 10 क्रमांकावर आहे, पहिल्या 5 मध्ये नाही. म्हणून याची शासन उच्चस्तरीय चौकशी करणार काय आणि याला जे जबाबदार आहेत त्या व्यक्ती पुढे कुलगुरु पदाच्या स्पर्धेमध्ये येणार नाहीत याची खात्री देणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आमच्या उत्तरांमध्ये विसंगती नाही. (अडथळा) मी उत्तर दिले आहे. मी आपल्याला सांगेन की, 137 वा क्रमांक आहे असे जे सांगितले आहे....

श्री.विनोद तावडे : असे असेल तर उत्तर मागे घेण्यात यावे.

श्री.राजेश टोपे : सायमंड नावाची जी जागतिक संघटना आहे त्यांनी 137 असे रेटिंग केलेले आहे. ज्याअर्थी 5 वर्षांचा ॲक्रिडिटेशनचा कालावधी संपलेला आहे. त्याअर्थी त्याला पंचतारांकित दर्जा आहे असे मानणे योग्य नाही. पण हा दर्जा परत मिळू शकेल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : माननीय राज्यमंत्र्यांनी आपले शब्द मागे घ्यावेत.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी जबाबदारीने सांगत आहे. याठिकाणी मी एवढेच सांगत आहे की, आज कोणत्याही परिस्थितीत हे काम ताबडतोबीने करणे आवश्यक आहे आणि ते केले जाईल. विद्यापीठाचा दर्जा कोठेही घसरणार नाही, यादृष्टीने त्यांचे जे मूल्यांकन असेल ते पियर समिती ठरविल. आज दर्जा घसरलेला आहे हे मी बिलकूल मान्य करणार नाही. ते ॲक्रिडिटेशन समिती ठरविल, त्यानंतर आपल्याला कनक्ल्यूजनवर येता येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : या विद्यापीठाला पंचतारांकित मानांकन प्राप्त झाले होते ते आज कायम आहे किंवा नाही यासंबंधी मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले आहे ते अंतिम मानले पाहिजे या मताचा मी आहे. कारण त्यांचे उत्तर सत्य आहे असे आपण मानतो. खरे तर हे त्या विद्यापीठाला माहीत पाहिजे. मुळात हे मानांकन 5 वर्षांसाठी दिलेले आहे. त्या मुदतीच्या आत प्रक्रिया पूर्ण करुन त्याचे जर पुनरुज्जीवन झाले नसेल तर ते तेथे संपते. सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. सबंध लोकांची, विद्यार्थ्यांची आणि बाहेरच्या देशातील लोकांची दिशाभूल करण्याचे काम चालू आहे. 5 वर्षांची मुदत संपल्यानंतर सुध्दा सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी पंचतारांकित मानांकनाचा वापर केला. याला जे जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. इतर विद्यापीठांमध्ये गोंधळ तर आहेच, पण याठिकाणी उत्युच्च गोंधळ झालेला आहे. या निवेदनामधील पहिल्या वाक्यात सांगितलेले आहे आणि शेवटीही सांगितलेले आहे की, "2001 मध्ये हे पंचतारांकित नामांकर नॅककडून त्यांना प्राप्त झाले. त्याची मुदत 5 वर्षांची असते." त्यानंतर ती मुदत संपली आहे. ती मुदत संपल्यानंतर सुध्दा हा जो पंचतारांकित नामांकनाचा वापर निरनिराळ्या जाहिरातीत, निमंत्रणात झाला त्याला जे जे अधिकारी जबाबदार होते त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल काय, असा माझा प्रश्न आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

श्री. राजेश टोपे : मी सुरुवातीलास सांगितलेले आहे की, ज्यांनी उशीर केला त्यांना सुध्दा जाबदार धरण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे गैरवापर केलेला असेल तर त्याबाबत अधिकची माहिती घेऊन त्याबाबत उचित कारवाई केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : मी माननीय मंत्री महोदयांना विद्यापीठातील भ्रष्टाचार जाणीवपूर्वक सांगितलेला असताना त्यांनी विद्यापीठाचा दर्जा घसरला नाही असे सांगितले. गोसावीला लाच घेताना पकडले, वेंकटरमणी यांना राज्यपालांनी काढून टाकण्याचे आदेश दिले. अभय पेठे यांनी वेळेत काम केले नाही, असे सर्व प्रकार घडलेले आहेत. तेव्हा या प्रकरणी उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : दर्जा घसरला हे शासनाने मान्य केले नाही. पण ॲक्रिडिटेशन मिळाले हे मान्य केलेले आहे. 1994 साली नवीन विद्यापीठ कायदा पारित झाला. परंतु त्याची नियमावली अद्याप बनविलेली नाही. ॲफिलिएशन फी किती जमा होते, यासंबंधीचे उत्तर विद्यापीठाला देता आले नाही. सिनेटमध्ये बहुमताच्या जोरावर बजेट पास करुन घेतले जाते. विद्यापीठ स्वायत्त संस्था आहे. त्यामध्ये आम्हाला हस्तक्षेप करता येणार नाही. परंतु ज्या प्रकारे विद्यापीठाचा कारभार चालत आहे त्यासंदर्भात आम्हाला बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. सिनेटच्या बैठका ह्या विधिमंडळ अधिवेशनाच्या कालावधीत लागतात त्यामुळे विद्यापीठाच्या समित्यांवर निवडून गेलेल्या विधिमंडळाच्या सदस्यांना त्या बैठकांना हजर राहात येत नाही. तेव्हा विद्यापीठाशी संबंधीत असलेले विविध प्रश्न सरकारकडे मांडण्याची संधी आम्हाला उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : विद्यापीठामध्ये ज्या काही अनियमितता असतील, गैरकारभार झालेले असतील तर त्या संदर्भात विद्यापीठाच्या कायद्यामध्ये विविध तरतुदी आहेत. विधिमंडळ हे सार्वभौम असल्यामुळे या सगळया प्रकाराची चौकशी करण्यात येईल. शेवटी कुलपती हा विद्यापीठाचा प्रमुख असतो. तेव्हा मुंबई विद्यापीठाच्याबाबतीत ज्या काही अनियमितता झालेल्या असतील त्याची चौकशी करुन त्यासंबंधीचा अहवाल कुलपतींकडे पाठविण्यात येईल. सन्माननीय सदस्यांना विद्यापीठाच्या संदर्भात शासनाला काही सूचना करावयाच्या आहेत, काही मुद्दे मांडावयाचे आहेत. तेव्हा मुंबई विद्यापीठाच्या संदर्भात चर्चा करण्यास जे सन्माननीय सदस्य उत्सुक असतील त्यांना तसेच कुलगुरुंना बोलावून माझ्या दालनामध्ये अधिवेशन संपल्यानंतर चर्चा करण्यासाठी बैठक घेण्यात येईल.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4.....

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, ज्या पध्दतीने केंद्र सरकारने अभिमत विद्यापीठांसाठी समिती नेमली, त्या समितीने चौकशी करुन आपल्या राज्यातील अनेक अभिमत विद्यापीठांच्या मान्यतेच्या संदर्भात अहवाल सादर केला आहे. केंद्र सरकारने परदेशी विद्यापीठांना परवानगी दिल्यामुळे या देशात परदेशी विद्यापीठे येऊ घातली आहेत. अशा वेळेला राज्यातील जी स्टेट विद्यापीठे आहेत ती किती सक्षम आहेत, किती मजबूत आहेत याचा रोडमॅप कसा असावा या संदर्भात पाहणी करण्यासाठी राज्यस्तरीय उच्च दर्जाची समिती नेमून पाहणी केली जाईल काय?

श्री.राजेश टोपे : हा प्रश्न या लक्षवेधी सूचनेशी संबंधित नसला तरी अभिमत विद्यापीठे ही राज्य सरकारशी संबंधित असलेली विद्यापीठे नाहीत. परदेशी विद्यापीठांचे बिल अद्याप लोकसभेमध्ये मंजूर झालेले नाही. फक्त कॅबिनेटमध्ये पास केले आहे. आज त्यावर भाष्य करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेऊन एवढेच सांगेन की, त्यांना वाटते की स्पर्धा निर्माण झाली त्या स्पर्धेमध्ये आपल्या विद्यापीठांना स्पर्धा करता येईल काय ही सन्माननीय सदस्यांची भावना रास्त आहे. त्यादृष्टीने आपली विद्यापीठे जागतिक दर्जाच्या स्पर्धेस पात्र ठरतील अशा दर्जाची बनविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने व्हिजन डॉक्यूमेंट आणि रोडमॅप तयार केला आहे. येणाऱ्या वर्षात त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणार आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी. : मुंबई-रत्नागिरी वायुदूत ही विमानसेवा पूर्ववत सुरु करणे

मु. शी. : मुंबई -रत्नागिरी वायुदूत ही विमानसेवा पूर्ववत सुरु करणे याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सुमारे 20 वर्षापासून सुरु असलेली मुंबई-रत्नागिरी वायुदूत ही विमानसेवा प्रवाशांची संख्या घटल्याने बंद पडणे, सध्या कोकणात पर्यटन व्यवसाय वाढत असणे, सध्या रत्नागिरी शहरातील विमानतळाच्या विकासासाठी शासनाने 4 वर्षापूर्वी 2.25 कोटी रुपयांचा निधी मंजूर करणे, परंतु प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे तो परत जाऊन विमानतळाचे काम प्रलंबित राहणे, सदर नागरी सेवा चालू ठेवण्याच्या अटीवर रत्नागिरी विमानतळाच्या विकासाचे काम नौदल विभागाकडे हस्तांतरण करण्यात येणे, पर्यटकांचा ओघ वाढल्याने प्रवासी उपलब्ध होऊन उद्योगवाढीला तसेच कृषी उत्पादन व फळ निर्यातीसाठी चालना मिळण्याची निर्माण झालेली शक्यता, कोकण विकासाच्या दृष्टीने मुंबई-रत्नागिरी-गोवा व गोवा-रत्नागिरी-मुंबई अशी विमानसेवा चालू करण्याची आवश्यकता. सदर विषय अतिमहत्वाचा व सार्वजनिक हिताचा असल्याने मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो.

अशुद्धीत मूल / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बस स्टॉप स्थलांतरित करण्यासाठी महापालिकेने रक्कमेची केलेली मागणी

मु. शी. : बस स्टॉप स्थलांतरित करण्यासाठी महापालिकेने रक्कमेची केलेली मागणी याबाबत श्रीमती अलका देसाई,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्या श्रीमती अलका देसाई यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

मुंबईतील शिवडी-कॉटनग्रीन येथील आर.ए.किडवाई मार्गावरील वर्दळ नसलेल्या जागेवरील बसस्टॉप प्रवाशांच्या सोयीसाठी अन्यत्र हलविण्यासाठी एका समाजसेवी संस्थेने बेस्ट प्रशासनाकडे मागणी केली असता त्या संस्थेकडे पैशाची मागणी करण्यात येणे, हा बसस्टॉप स्थलांतरित करण्यासाठी दोनवेळा कराव्या लागणाऱ्या खोदकामाच्या खर्चापोटी महापालिकेच्या वाहतूक नियोजन शाखेने बेस्टला 1.70 लाख रुपये जमा करण्यास सांगण्यात येणे, महापालिकेने या प्रस्तावाला मंजुरी देताना अट घालून त्या संस्थेकडून रक्कम वसूल करण्याची मागणी करण्यात येणे, त्यामुळे मागणी करणाऱ्या संस्थेला हा भूर्दंड सोसावा लागणार असणे, एखादी समाजोपयोगी बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून देताना त्याचा खर्च त्या संस्थेला करण्याची अट घालणे, ही बाब अत्यंत निंदनीय असून ती सभागृहाच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे असल्याने ही विशेष उल्लेखाची सूचना मी देत आहे. या संदर्भात शासनाने त्वरित उपाययोजना करावी अशी मी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आहारात वाढ करणे

मु. शी. : समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आहारात वाढ करणे याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.रमेश शेंडगे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत प्रत्येक जिल्हयात विद्यार्थी आणि विद्यार्थीनींसाठी वसतिगृहे चालविण्यात येणे, मात्र या वसतिगृहातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांना आहारात जे पदार्थ पुरविले जातात त्यामध्ये शासनाकडून भेदभाव केला जाणे, सदर भेदभावाचा प्रकार सुमारे 30 वर्षापासून सुरु असणे तसेच वाढत्या वयोमानामुळे मुलामुलींच्या आहारात वाढ न केली जाणे, त्यामुळे सर्वच विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या आहारात वाढ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने त्वरित उपाययोजना करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मौजे धामापूर (जि. सिंधुदुर्ग) येथे पर्यटकांसाठी विशेष आकर्षण निर्माण करणे

मु. शी. : मौजे धामापूर (जि. सिंधुदुर्ग) येथे पर्यटकांसाठी विशेष आकर्षण निर्माण करणे याबाबत श्री. सुभाषण चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रमणीय सुंदर पर्यटन क्षेत्र मौजे धमापूर येथील पर्यटकांची विशेषत: परदेशी पर्यटकांची वाढती संख्या पाहता या ठिकाणी पर्यटकांसाठी विशेष आकर्षणाची गरज निर्माण झालेली आहे. याबाबतीत ऑगस्ट, 2009 दरम्यान झालेल्या बैठकीत पर्यटन राज्यमंत्र्यांनी केंद्राकडून मिळणाऱ्या जंगल सफारीचा सुमारे 14 कोटीचा प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धमापूर या ठिकाणी घेण्याची शिफारस केली होती. त्यासंबंधी जंगल सफारीचे अंदाजपत्रक/आराखडा, जागेची उपलब्धता वगैरे कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीच्या शिफारशीने मागविण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना सूचना देण्यात आल्या, त्याचप्रमाणे या प्रकल्पासाठी एक सल्लागार नेमणे, याबाबत लागणारी आवश्यक ती रक्कम केंद्रशासनाकडून मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यासंबंधी चर्चा करण्यात आली. सदर प्रकल्प पर्यटन जिल्हा सिंधुदुर्ग येथील पर्यटन विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असल्याने मी या महत्वाच्या विषयाकडे या विशेष उल्लेख सुचनेद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देणे

मु. शी. : राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देणे याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

महोदय, राज्यातील शिक्षकांना कुठल्याही प्रकारची अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नये अशा प्रकारचे आदेश शासनाने वेळोवेळी निघाले असतानाही महसूल अधिकारी किंवा त्यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्यात येतात. मागील आठवड्यात माननीय मुंबई उच्च न्यायालयाने सुध्दा आदेश दिलेले आहेत की, शिक्षकांना कुठल्याही प्रकारची अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नयेत. सार्वत्रिक निवडणुका आणि जनगणना ही दोन कामे सोडून अन्य कामे देण्यात येऊ नयेत. सार्वत्रिक निवडणुका आणि जनगणना ही राष्ट्रीय स्वरुपाची कामे समजून शिक्षक प्रामाणिकपणे ती करतात. तथापि जनगणनेची कामे करण्याच्या संदर्भात राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना उन्हाळी सुट्टीमध्ये महसूल अधिकाऱ्यांकडून आदेश प्राप्त झालेले आहेत. शिक्षकांना अर्जित रजा नसतात, फक्त उन्हाळी सुट्टीच राहते. दोन तीन महिने अगोदर रिझर्व्हेशन करुन त्यांनी आपले कार्यक्रम निश्चित केलेले आहेत आणि विशेष म्हणजे ज्यांची आपल्याला जनगणना करावयाची आहे ते 30 ते 35 टकके लोक सुध्दा उन्हाळी सुट्टी असल्याने बाहेरगावी गेलेले असतात. त्यामुळे ही माहिती सुध्दा पूर्णपणे मिळू शकणार नाही. या विशेष उल्लेखाच्या सुचनेच्या माध्यमातून मी विनंती करु इच्छितो की, राज्यातील शिक्षक हे जनगणनेचे काम प्रामाणिकपणे करणार आहेत, त्याबद्दल त्यांचा आक्षेप नाही पण हे काम उन्हाळी सुट्टीत न ठेवता जून महिन्यात शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर हे काम शिक्षकांना देण्यात यावे, अशी मी विनंती करतो.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आदिवासी भागात काम करणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्त्याचे अतिप्रदान करण्यात येणे

मु. शी. :आदिवासी भागात काम करणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्त्याचे अतिप्रदान करण्यात येणे याबाबत श्री. केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.केशवराव मानकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आदिवासी विकास विभागाच्या 5 फेब्रुवारी, 1999 च्या परिपत्रकानुसार मूळ वेतनावर 15 टक्के प्रोत्साहन भत्ता देण्यात येणे, परंतु ऑगस्ट, 2005 मध्ये मूळ वेतनात 50 अक्के महागाई भत्ता समाविष्ट करुन प्रोत्साहन भत्त्याची सुधारित परिगणना करण्यात येणे, त्यानुसार नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मूळ वेतन व महागाई भत्त्याच्या एकूण रकमेवर प्रोत्साहन भत्ता दिलेला आहे. राजयातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, नांदेड जिल्ह्यातील बहुतेक कर्मचाऱ्यांना वेतनाच्या बेरजेवर 15 टक्के प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. परंतु प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत शासनाचे स्पष्ट निर्देश नसून शिक्षणाधिकारी कार्यालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणेच प्रोत्साहन भत्ता देण्यात येणे, मात्र 11 एप्रिल, 2008 रोजी महाराष्ट्र शासनाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ व नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांना, नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावरच प्रोत्साहन भत्ता देण्यात येत असल्याचे पत्र पाठविणे, परंतु गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथील गटविकास अधिकाऱ्यांनी मूळ वेतन व वेतनात समाविष्ट होणारे महागाई वेतन एकत्रित करुन या रकमेवर प्रोत्साहन भत्ता देणे, त्यामुळे एकट्या अहेरी तालुक्यात प्रोत्साहन भत्त्यात 49.47 लाख इतक्या रकमेचे अतिप्रदान करण्यात आल्याचे नागपूर येथील महालेखापाल कार्यालयाने निदर्शनास आणून दिले त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी मूळ वेतन व

....4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

महागाई भत्ता मिळून होणाऱ्या रकमेवर प्रोत्साहन भत्ता प्रगणित केला असला तरी गडचिरोली जिल्ह्याने प्रोत्साहन भत्ता मात्र केवळ मूळ वेतनावर प्रगणित केल्यामुळे घोळ निर्माण झाला असून यावर शासनाने त्वरित निर्णय घेऊन यासंदर्भात स्पष्ट निर्देश तात्काळ देण्याची आवश्यकता आहे. सदर विषय अतिमहत्वाचा व सार्वजनिक हिताचा असल्याने मी तो आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नियम स्थगित ठेवणे

मु.शी. : नियम स्थगित करण्याबाबत माननीय वित्त मंत्र्याचा प्रस्ताव

श्री.विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

" महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 228 (1) मधील सात दिवसांच्या कालावधी बाबतची तरतूद सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी "

प्रस्ताव प्रस्तुत झाला

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अर्थसकल्पावरील चर्चेच्या संदर्भातील सात दिवसांची मुदत आहे परंतु प्रत्येक वेळी ही मुदत कमी केली जाते त्यामुळे सन्माननीय सदस्याना अभ्यासाकरिता पुरेसा वेळ मिळत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांना चर्चेसाठी पुरेसा वेळ देण्यात येणार आहे किंवा नाही ? की ही चर्चा सुध्दा दोन दिवसात गुंडाळण्यात येणार आहे ? हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.प्रत्येक वेळा सात दिवसांची मुदत कमी केली जात असल्यामुळे सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही ही एक प्रकारे सभागृहाची थट्टाच आहे. सभागृहाच्या संमती शिवाय बजेट मंजूर केले जात नाही परंतु दरवेळी मुदत कमी करण्यासबंधीचा प्रस्ताव मांडून सभागृहाची थट्टा करणे आणि "मम" म्हटल्याप्रमाणे कामकाज करणे बरोबर नाही .या चर्चेसाठी पुरेसा वेळ देण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत मी मुद्दाम सांगू इच्छितो की, कामकाज सल्लागार समितीमध्ये विरोधी पक्षाचे दोन सदस्य आहेत. दर वेळेला सात दिवसांची मुदत दोन दिवसांची केली जाते तेव्हा ही मुदत कमी का करण्यात येते यासबंधीचा मुद्दा मी कामकाज सल्लागार समितीमध्ये उपस्थित केला होता. खालच्या सभ्ांगृहामध्ये 15 दिवस चर्चा होत असते. दोन दिवस अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा होते आणि त्यानंतर प्रत्येक विभागाच्या मागण्यांवर

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

सविस्तर चर्चा केली जाते. खालच्या सभागृहात कपात सूचना देण्याचा आणि मतदान घेण्याचा अधिकार असल्यामुळे सरकारला जागरुकपणे काम करावे लागते. वरच्या सभागृहात जे सन्माननीय सदस्य आहेत त्यांचा त्या त्या भागातील अनुभव वेगळा असतो.खालच्या सभागृहातील सान्माननीय सदस्य त्यांच्या मतदार संघातील व्यथा अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या निमित्ताने मांडत असतात परंतु विधान परिषदेतील सदस्य संपूर्ण् राज्यातील विविध समस्यांसंबंधी चर्चा करीत असतात. म्हणून जास्त दिवस चर्चा करण्यासाठी मिळावेत अशा प्रकारचा आग्रह मी कामकाज सल्लागार समितीमध्ये धरला होता. त्यावेळी मला असे सांगण्यात आले होते की, 31 तारखेच्या आत अर्थसंकल्प मंजूर होणे आवश्यक असल्यामुळे 29 आणि 30 मार्च असे दोनच दिवस चर्चेसाठी उपलब्ध आहेत. अर्थसंकल्पावर किमान चार दिवस तरी सर्वसाधारण चर्चा करता येईल.याचा विचार करुन पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात करण्यात यावी अशा प्रकारची मी विनंती केली होती. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मी कामकाज सल्लागार समितीमध्ये भूमिका मांडली होती. ही बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / अशुधारीत नाही

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.15 वाजता पुन: भरेल.

(3.50 ते 4.15 मध्यंतर)

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थनी - माननीय उपसभापती)

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

मु.शी.: सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

उपसभापती : आजपासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा दिनांक 29 व 30 मार्च, 2010 अशी एकूण दोन दिवस होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाच्या सदस्यांकरिता व स्वतंत्र सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत ज्यांना भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे व ते ज्या तारखेस बोलू इच्छितात ती तारीख आपल्या प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावीत.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते या चर्चेला सुरुवात करतील.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षापासून आम्ही याठिकाणी अर्थसंकल्पावर भाष्य करीत आहोत. अर्थसंकल्पामध्ये सगळेच काही वाईट असते असे नाही. राज्य शासनाच्या काही गौरवास्पद गोष्टी देखील असतात पण यावेळचा अर्थसंकल्प वाचल्यानंतर यावेळेला या अर्थसंकल्पातील कोणत्याही गौरवास्पद गोष्टीवर बोलावयाला मिळेल की नाही, यात शंका आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्र राज्याच्या आदरणीय मुख्यमंत्री महोदयांकडे सांस्कृतिक खाते आहे. हे सांस्कृतिक खाते ताकदीचे असेल, महाराष्ट्राच्या हिताचे असेल. महाराष्ट्राच्या भवितव्याचे असेल, महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचे असेल म्हणून त्यांनी ते त्यांच्याकडे ठेवले असेल. पुण्यामध्ये काल साहित्य संमेलन झाले. या सदनातील सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे या मराठी संमेलनाचे कार्याध्यक्ष होते. पण त्यांना व्यासपीठावरुन उतरता येत नव्हते आणि कुठे जाताही येत नव्हते अशी त्यांची परिस्थिती झाली होती. प्रत्येक साहित्य संमेलन आपले कंगोरे घेऊन चालू असते. या वर्षीचे साहित्य संमेलन हे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: भोवती फिरत ठेवण्याचे सामर्थ्य दाखविले आहे. याचे कौतुक करावे काय? वर्तमानपत्रामध्ये गेले चार दिवस या साहित्य संमेलनाला माननीय मुख्यमंत्री येणार का जाणार, कधी जाणार, कुठे जाणार, कसे येणार, आले आले, गेले गेले, कधी गेले, कुठे गेले असे सगळे चालू होते म्हणून मी या अर्थसंकल्पाचे सर्व पुस्तक चार वेळा चाळण्याचा प्रयत्न केला आणि आता सुध्दा एकदा चाळले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

पण यामध्ये महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण मांडलेलेच नाही. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये काय करण्यात येणार आहे याची संकल्पना एका परिच्छेदामध्ये दिलेली आहे पण सांस्कृतिक धोरणाचा उल्लेख केलेला नाही. मी विचार केला असे कां झाले? महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणाचा उल्लेख यात असायला पाहिजे होता. त्याचा शोध घेता धेता मी अनेक सन्माननीय सदस्यांना विचारले की, तुम्हाला सापडते काय ते बघा, तुम्हाला मला दाखविता येते काय ते बघा. परंतु महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणाचा उल्लेख यात करण्यात आलेला नाही. दुर्दैवाने काल जे साहित्य संमेलन झाले ते पुण्यामध्ये झाले.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

या महाराष्ट्राच्या पुण्यनगरीमध्ये म्हणण्यापेक्षाही सारस्वत नगरीमध्ये साहित्य सम्मेलन झाले आणि सर्व लोकांचे त्याकडे लक्ष लागले होते. कारण या सम्मेलनाला माननीय मुख्यमंत्री महोदय, माननीय उपमुख्यमंत्री महोदय आणि संपूर्ण हिंदुस्थानात आणि जगामध्ये ज्याला त्या क्षेत्रातील सर्वोच्च मान आहे ते अमिताभ बच्चन त्या ठिकाणी येणार होते. पण त्याच्या आठ दिवस अगोदर पूल बांधता बांधता तुटला आणि महाराष्ट्रामध्ये एवढा वादविवाद निर्माण झाला की, अमिताभ बच्चन आणि काँग्रेस हे साप-मुंगुस असावेत की काय अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले. तो त्यांचा प्रश्न आहे. पण हे सगळे करता करता माझ्या असे लक्षात आले की, महाराष्ट्राचे एवढे सगळे प्रश्न आपण या ठिकाणी चर्चेला घेणार असताना, महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्यांमध्ये एवढ्या समस्या निर्माण झाल्या असताना, या महाराष्ट्रामधील जे शेतकरी आत्महत्या करतात त्याची समस्या कशी सोडवावयाची, आदिवासींचा प्रश्न कसा सोडवावयाचा, आपल्या अहवालातील आकडेवारीप्रमाणे दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या आपल्याकडे वाढलेली असताना त्यांच्यासंदर्भात आपण कोणते भाष्य करावे आणि आपण राज्य सरकारला कोणत्या संकल्पना सांगावयाच्या हे सर्व प्रश्न असताना सुध्दा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अमिताभ बच्चन आणि माननीय मुख्यमंत्री यांचे साप-मुंगुसाचे नाते ज्यावेळी या महाराष्ट्रामध्ये जाहीर व्हावयास लागले त्यावेळी मी व्यथित झालो. त्यावर खूप काही भाष्य करावे असे माझे मत नाही. परंतु तात्यासाहेब उर्फ वि.वा.शिरवाडकर यांची कविता माझ्या हाताला लागली. ती कविता मी वाचून दाखवतो. ती कविता मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांच्याकडून कन्फर्म करुन घेतली.. या कवितेचा जर आपल्याला अर्थ समजला तर आपण किती दुर्देवी परिस्थितीमध्ये राजनीती नेत आहोत याचा उलगडा होईल्. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांना ही कविता आवडेल. तात्यासाहेब शिरवाडकर यांची ही कविता आहे. त्या कवितेचे शीर्षक 'आश्चर्य' असे आहे.

"ती आदिवासी म्हातारी,
प्राणांतिक भयाने धडपडत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

डोंगराच्या कडेला गेली
आणि चिकटून उभी राहिली
पालीसारखी, खडकाला.
उघडीवाघडी
हजार सुरकुत्यांच्या कातडीत कोंबलेली
हाडांची जीर्णाकृती
मी क्षणभर आदिवासी झालो
आणि तिच्याकडे पाहिले
अहो आश्चर्य --
तिच्या एका थानाच्या गाठोळीवरुन
लोंबत होते आपलं पार्लमेंट (त्याला आपण विधानसभा म्हणू)
आणि दुसऱ्या गोठोळीवरुन लोंबत होते
आमचे साहित्य सम्मेलन "

सभापती महोदय, एवढी बोलकी कविता त्या काळात तात्यासाहेबांनी लिहिली होती. ती कविता आजच्या दिवसाकरिता असेल असे मला कधी वाटले नव्हते. अशी महाराष्ट्राची दुर्दशा असताना आज ही परिस्थिती आहे म्हणून मी झालेल्या प्रकाराचा खेद व्यक्त करतो. या महाराष्ट्राला ते शोभा देणारे होते की नाही हे जनता ठरवील याची मला कल्पना आहे. दिल्लीमध्ये श्रीमती शिला कौल यांनी सुध्दा करुन दाखवले आणि महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये वेगळा संदेश गेला. अमिताभ बच्चन तुमचा आमचा कोण लागतो याच्यापेक्षा देशाचा जो सुपरस्टार आहे त्याचा अभिमान बाळगावयाचा की नाही हे ज्याने त्याने ठरवावे पण महाराष्ट्राच्या समस्यांबद्दल बोलत असताना गेले तीन दिवसामध्ये जो किळसवाणा प्रकार आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी दाखविला आणि महाराष्ट्राच्या एक लक्षात आले की, आपल्याला आपली मते नाहीत. 'खडग् राखीतो महाराष्ट्र माझा' असे म्हणणाऱ्या काव्य पक्तींमधून त्या मगरगट्टयाचे ते मनगट, आपण तिथे असो की इथे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. दिवाकर रावते .....

असो, ते असावयास पाहिजे परंतु ते दुर्दैवाने नाही हे लोकांना दिसले आणि आम्ही दिल्लीपुढे कुर्निसात घालतच फिरणार आहोत काय हा प्रश्न आता अमिताभ बच्चनच्या एका विषयावरुन महाराष्ट्राच्या सामान्य जनतेला पडावयास लागला. सभापती महोदय, तोच विषय घेऊन मला या अर्थसंकल्पावर बोलावेसे वाटते. दिल्ली आपल्याला मोजत नाही. दिल्ली आपल्याला विचारत नाही. मग या अर्थसंकल्पावर आम्ही का भाष्य करावयाचे हा आमच्यापुढे प्रश्न आहे. ज्यावेळी आम्ही विरोधी पक्षांनी चहापानावर बहिष्कार घातला त्यावेळी आम्ही असे म्हटले होते की, हे अर्थसंकल्पीय अधिवेशन असून योजना आयोगाने आपल्या ज्या प्लॅनला अजून मान्यता दिलेली नाही मग हे अर्थसंकल्पीय अधिवेशन कसे असेल ? संध्याकाळी आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य दूरदर्शनवर पाहिले. ते म्हणाले की, काही फरक पडत नाही, योजना आयोग वगैरे काही नाही. आम्ही ते सगळे निभावून नेऊ, तसे काही नाही, त्याचा काही अडथळा नाही. माणसाला अडथळा कशाचा असतो ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

एकदा कंबरेचे सगळेच सोडल्यानंतर काहीच अडथळा रहात नाही. सन्माननीय अर्थराज्यमंत्र्यांना अर्थसंकल्पीय भाषण करीत असताना 3 वेळा पाणी प्यावे लागले. एवढी त्यांना धाप लागली होती. या अर्थसंकल्पीय भाषणात 172 मुद्दे आहेत. शेवटी श्वास टाकताना मी उगाचच एवढे वाचले असा आविर्भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. त्यांनी कोटावर लावलेल्या गुलाबाच्या फुलाची एक पाकळी खाली पडली होती. ती 172 व्या कलमाच्या वेळी असे सांगत होती की, सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात महसुली जमा रुपये 97,43.90 कोटी व महसुली खर्च रुपये 1,04,698,41 कोटी अंदाजित केला असून, महसुली तूट रुपये 7,654.50 कोटी इतकी राहील. वार्षिक योजना 2010-11 बाबत योजना आयोगाशी अंतिम चर्चा झालेली नाही. तथापि, मंत्रिमंडळाच्या नियोजन उपसमितीच्या निर्णयानुसार या वर्षाच्या राज्य योजनेचे आकारमान रुपये 33,935 कोटी निश्चित करण्यात आले आहे. योजना आयोगाने राज्य सरकारला तीन वेळा परत पाठविले आहे. पहिल्यांदा सरकारने 35 हजार कोटींचा आराखडा सादर केला. तुमच्या राज्याचा महसूल 18 हजार कोटींच्या वर जात नाही, राज्यावरील कर्ज वाढलेले आहे, असे त्यांनी म्हटले. त्याचा ताळमेळ बसवून त्यांना शासन समजावून सांगू शकले नाही. म्हणून त्यांनी तुम्हाला परत पाठविले. पुन्हा वित्त विभागाकडून 33 हजार कोटींचा आराखडा घेऊन गेले, त्याला मान्यता द्यावी अशी विनंती करण्यात आली. अगदी रडतखडत 25 हजार कोटी रुपयांपर्यंत मान्यता मिळण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. ती सगळी मान्यता मिळण्यापूर्वी राज्याचा 33,935 कोटींचा अर्थसंकल्प मांडून बसलो आहोत. उद्या योजना आयोगाने 33 हजार कोटींचा आराखडा मंजूर न करता त्यापेक्षा कमी रकमेचा आराखडा मंजूर केला तर काय करणार ? कारण त्यांच्यावर कोणाचेही बंधन नाही. राज्याची आर्थिक परिस्थिती पाहून, मागील 5 वर्षाचा आलेख पाहून ते मंजूर करतील. मग त्यांनी आराखडा कमी मंजूर केला तर हा अर्थहीन अर्थसंकल्प असेल, हे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पातील दोन पळवाटांबद्दल मी बोलतो. खालच्या सभागृहामध्ये व्हॅटसंबंधीचा अध्यादेश अडकून पडलेला आहे. व्हॅटमध्ये 1 टक्का वाढ केल्यानंतर संपूर्ण राज्यातील विविध माध्यमातून चर्चा झाली. या वाढीव व्हॅटमधून 800 ते 1000 कोटी रुपये

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.दिवाकर रावते....

अधिक महसूल मिळणार आहे. म्हणजे कराचा प्रस्ताव विधिमंडळासमोर न आणता, अर्थसंकल्प मांडण्याच्या 8 अगोदर करवाढ केली. ही करवाढ योग्य की अयोग हे घटनात्मकरित्या योग्य आहे की नाही त्याचा निर्णय लागला असेल. पण रेटून नेण्यामध्ये शासन ठाम असते. पण बेकायदेशीररित्या कामाबाबत कोर्टकचेऱ्या झाल्या की सर्व चित्र साफ होते. शासनाने व्हॅटच्या माध्यमातून ही 800 ते 1000 कोटींची करवाढ बिनबोभाटपणे केलेली आहे त्याचा या अर्थसंकल्पात कोठेही उल्लेख नाही. करवाढीच्या प्रस्तावावर बोलताना मी अधिक विवेचन करीन. हे जे वित्तीय विवरण पत्र आहे. त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही, कारण या अर्थसंकल्पात पाहण्यात काही अर्थच नाही. कारण मुळात नियोजन आयोगाने राज्याच्या आराखडयाला मान्यताच दिलेली नाही. गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प नकारात्मक आहे. त्यामध्ये घट जास्त आहे. ती का येते याचे तुम्हाला आणि आम्हाला मिळून याविषयी गांभीर्याने विचार करावा लागेल. पान 4 वर 1601 अंतर्गत ही बाब आहे. त्यात असे नमूद केले आहे की, केंद्र सरकारकडून सहाय्यक अनुदाने या अंतर्गत 2873.40 कोटींची घट झाली. म्हणजे एवढे पैसे आले नाहीत. मला मंत्री महोदयांकडून ही घट का झाली याचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. मॅचिंग ग्रँटची घट झाली काय, राज्याचा वाटा देण्यामध्ये कमी पडला काय ते सांगितले पाहिजे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीरित्त प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

(श्री. दिवाकर रावते...

आपण भरपूर कामे करु शकला नाहीत. केन्द्र सरकारच्या अनुदानातील तूट 2673.40 कोटी इतकी आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. पान क्रमांक 6वर आपण असे म्हटलेले आहे की सन 2009-2010 या अर्थसंकल्पात एकूण 2645.67 कोटीची शिल्लक अपेक्षित होती. 2009-2010च्या अंदाजपत्रकाप्रमाणे 1237.42 कोटीची तूट दिसून आली. म्हणजे अडीच हजार कोटीची शिल्लक अपेक्षित असताना आपण दीड हजार पटीने मागे गेलात. ही तूट का झाली याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांकडून ओक्षित आहे. या राज्यावर कोणती आपत्ती ओढवली की ज्यामुळे ही तूट निर्माण झाली ? हा अर्थसंकल्प मांडत असताना कोणतेही ताळतंत्र ठेवलेले नाही हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. महसूल विभागाच्या जमा रकमेमध्ये रु. 562.24 कोटीची घट दिसून येते. खर्चामध्ये 10 टक्क्यानी वाढ झालेली आहे. खर्चामध्ये 544.24 कोटी रु. वाढ झालेली आहे. माझी एक रुपया मिळकत असेल तर मी सव्वा रुपयापर्यन्त खर्च केला तर एक वेळ समजण्यासारखे आहे. परंतु 1 रुपया मिळकत असताना 5 रुपये खर्च करणे अव्यवहार्य आहे. जेव्हा सरकार 10 पटीने खर्च वाढविते त्यावेळी ते राज्य कर्जातून बाहेर येण्याऐवजी बर्जातच बुडत जाते. तेव्हा हे राज्य कर्जबाजारी का होणार नाही हा प्रश्न आहे. दुग्ध व्यवसायामध्ये 125.60 लाख लिटर दुधाचे संकलन कमी झाल्याचे आपण सांगितले. मी शेतक-यांना दुधाचे भाव वाढवून देण्यासंबंधी लक्षवेधी सूचना लावली होती. मी सांगितले होते की तुम्ही शेतक-यांना 1 रुपया वाढवून द्या. इतर दूध डेअरीज शेतक-यांना जास्त भाव देतात म्हणून शेतकरी त्यांच्याकडे दूध नेतात. सरकारने जर भाव वाढवून दिले तर शेतकरी सरकारी डेअरीमध्ये दूध आणील. मुंबई शहराला 93 लाख लिटर दुधाची गरज असताना फक्त 9 लाख लिटर दूधच मुंबईत येते. बाकीची मागणी खाजगी दुग्ध व्यावसायिक पूर्ण करतात. आता त्या खाजगी शेठजींकडून काही मलिदा मिळतो म्हणून सरकारी दूधसंघ मारुन टाकण्याचा प्रयत्न चालू आहे काय ? खाजगी शेठज्ींच्या तिजो-या भरण्यासाठी दूध संकलनामध्ये घट झालेली आहे काय ? शासन नेहमी असे म्हणते की, दुधाला चांगला भाव मिळेल, दूध संकलन वाढेल. तेव्हा आमच्या शेतक-यांचे दूध संकलित करीत असताना त्याच्या दुधाला किती रुपये भाव देणार यासंबंधीची घोषणा शासनाने करणे आवश्यक आहे. नाही तर बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात. सन 2008-09 आणि 2009-10 मध्ये 240.26 कोटी इतके अपेक्षित कर्ज कमी प्राप्त झाले. राज्याला कुणी कर्ज देत नाही. कारण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

राज्याची पत कमी झालेली आहे. 238.6 कोटी इतकी वेतनावरील खर्चात वाढ झालेली आहे. 543.26 कोटी इतकी व्यवस्थापन खर्चाध्ये वाढ झालेली आहे. 288.66 कोटीची वाढ देखभाल आणि दुरुस्तीमध्ये झालेली आहे. सभापती महोदय, बिर्लाच्या महालात जेवढी देखभाल दुरुस्तीसाठी तोडफोड होत नाही तेवढी ती मनोरा आमदार निवासामध्ये होत आहे. तेथेही मला लक्ष द्यावे लागणार आहे. 928.41 कोटी इतकी वाढ 6वा वेतन आयोग लागू केल्यामुळे झालेला आहे. वैद्यकीय सेवा यासाठी 608.21 कोटी इतका अधिक खर्च झालेला आहे. स्वाईन फ्ल्यू प्रतिबंधक उपाययोजना करिता खर्च झालेला आहे.

...नंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, कुटुंबकल्याण यावरील खर्च रु.223.90 कोटी इतका असून वेतनावरील खर्चात वाढ झाल्यामुळे ही वाढ दिसून येत आहे. नगरविकास विभागासाठी रु.3079.60 कोटी इतकी तरतूद आहे. मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी अतिरिक्त तरतूद केल्यामुळे वाढ झाली आहे. मेट्रो रेल्वेचे तुम्ही कौतुक केले. अनुसूचित जाती जमाती व मागासवर्गीय कल्याण शिष्यवृत्ती. 2181.94 कोटी रुपये तरतूद केली आहे. शिष्यवृत्ती, वेतनावरील खर्चात वाढ. केवळ नोकरांना पगार देण्यसाठी तुम्ही हा कारभार चालू ठेवला आहे. पोषण आहार योजनेसाठी 1012.96 कोटी रुपयांची तरतूद केली त्याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. परंतु ती रक्कम नक्की या कामासाठी दिली की दलालांच्या खिशात गेली? गोरगरीब लोकांच्या लेकरांच्या तोंडापर्यंत घास पोहोचेल याची दक्षता सन्माननीय मंत्री श्री.सुभाष झनक यांनी घ्यावी. तरच पुढची कारकीर्द व्यवस्थित चालू राहील. अधिकार फार भन्नाट आहेत. सोयाबीन व इतर पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान दिले. त्याचा खर्च वाढला त्याबद्दल तक्रार नाही. संकटकाळी व नैसर्गिक आपत्तीमुळे मदत केली गेली. 127.17 कोटी रुपये वेतनावरील खर्चात वाढ झाली. ग्रामीण रोजगार अंतर्गत इंदिरा आवास योजनेसाठी अतिरिक्त तरतूद 834 कोटी रुपये इतकी केलेली आहे. खरोखर घरे बांधण्यात आली का? याचा शोध घेतला जावा. लहान पाटबंधारे यासाठी देखभाल व जादा खर्च यासाठी तरतूद केली आहे. हे सर्व जे काय आहे ते खर्चाचे आकडे मी वाचून दाखवित नाही. फक्त लोकांना पगार वाटण्यासाठी तिजोरी रिकामी होत आहे. काढलेले कर्ज तिजोरी रिकामी करण्यासाठी वापरले जात आहे. या अर्थसंकल्पात वाढ कशी होईल? संभाव्य वाढीमध्ये जमीन महसुलीद्वारे जी रक्कम मिळणार आहे त्याचा उल्लेख केला आहे. 2009-2010 या वर्षात जमीन महसूल 827.84 कोटीवरुन 1647.74 कोटी म्हणजे दुप्पट होणार आहे असे नमूद केले आहे. भाडेपट्टयामधील दरामध्ये वाढ केल्यामुळे उत्पन्न वाढणार आहे. नगरविकास विभागांतर्गत 120 कोटीवरुन 1206.76 कोटी रपुये म्हणजे दहा पट महसूल वाढणार आहे. एफएसआय विकण्याच्या प्रस्तावामुळे ही वाढ अपेक्षित आहे. मुंबई विकावयास काढली आहे. मुंबई शहरातील एफएसआय वाढविल्यामुळे दहापटीने महसूल वाढणार आहे. मी मुंबई मुद्रांक शुल्क विधेयकावर यासंबंधी बोलणार आहे. त्यावेळी अनेक गोष्टींचा उहापोह करणार आहे. अशी ही वाढीची संकल्पना आहे. वाहनांच्या बाबतीत मला शंका वाटते. वाहनांवरील कराबाबत म्हटले आहे की 511.37 कोटी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

रुपये इतके कमी उत्पन्न मिळणार आहे. टॅक्सी व रिक्षावरील कर एकरकमी गोळा केला असल्याने हे उत्पन्न कमी होणार असे म्हटले आहे. शासनाने मांडलेला हा अर्थसंकल्प किती तकलादू आहे हे सभागृहाच्या लक्षात येईल. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतल्याशिवाय या शासनाचे पान हलत नाही. ते त्यांचे तारणहारच आहेत. शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेतले की, सगळे काही पटते. मला या समाजाचे जे जे संबंधित आमदार याठिकाणी आहेत, किंबहुना या सदनातील जे जे आमदार दलित, पददलित समाजासाठी काम करतात, मी देखील प्रामाणिकपणे जमेल तेवढे काम करतो, त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला मी आवाहन करतो. शासनाची बनवाबनवी तुम्हाला सहन होते का पहा. या अर्थसंकल्पावर बोलताना तुम्ही आपले भाष्य करा. सरकार आपले आहे म्हणून सरकारविरुध्द बोलायचे नाही असे होता कामा नये. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी तसे करीत नाहीत. इतक्या वर्षाचा आमचा तसा अनुभव आहे म्हणून सांगतो. ते गुरुजी आहेत. शासनाला दोन खडे बोल सुनावतात. मला सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्याकडून ती अपेक्षा आहे. सरकारवर झोडपून बोलणारे तयार झाले की, त्यांना मंत्री करतात. त्यांचे तोंड बंद करतात. सरकारच्या उणिवा तुम्ही इतक्या मांडा की तुम्हाला मंत्री केले पाहिजे. सन्माननीय मंत्री श्री.वडेट्टीवार यांना कॅबिनेट मंत्री केले तर तुम्हाला राज्यमंत्रीपद मिळेल.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंद

श्री. दिवाकर रावते .....

मागासवर्गीयांच्या कर्जावरील व्याजाची रक्कम 86 लाख रुपये अडकवून ठेवली ती शासनाने दिलेली नाही. मंत्रिमंडळाच्या 29 जुलै, 2009 च्या बैठकीत निर्णय झाला होता व त्याच मंत्रिमंडळातील साक्षीदार असलेले तीन कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्या बैठकीत 15 दिवसात अंमलबजावणी करण्यासंबंधीचे स्पष्ट आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी सचिवांना दिले होते. यासंबंधी प्रधान सचिव, वित्त यांच्या अध्यक्षतेखाली सात सचिवांची एक समिती नियुक्त केली होती, परंतु त्या समितीची अद्यापपर्यंत एकही बैठक झाली नाही. यावरुनच दिसून येते की, दलित, पददलित व आदिवासी समाजाबद्दल या सचिवांना किती आदर आहे ? हे सचिव लाखा-लाखाने पगार घेतात, सरकारने दिलेल्या फ्लॅटमध्ये राहतात, सरकारकडून भूखंड घेऊन ते फ्लॅट भाडयाने देतात आणि पैसे कमावितात, अशा सचिवांना वठणीवर आणण्याची क्षमता या सरकारमध्ये नाही तर त्याला आम्ही काय करायचे ? ग्रामीण भागात असलेला दलित, पददलित आणि आदिवासी वर्ग यांच्यासाठी असलेल्या योजनांची अमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही आणि शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य करायचे दुसरीकडे मात्र या समाजाच्या हितासाठी एकही बैठक होत नाही किंवा अमलबजावणी सुध्दा होत नाही. याची सरकारला काहीच खंत वाटत नाही काय ? 31 मार्च, 2008 पर्यंत थकबाकीची आकडेवारी 86.45 लाख एवढी असून त्यात 65 आदिवासी व मागासवर्गीय अडकून पडलेले आहेत.

त्याचबरोबर सामाजिक न्याय विभागासाठी सुध्दा मोठी तरतूद शासनाने केली होती. सभागृहात बसलेले अनेक मंत्री यांनाही जाण असेल की याच मार्गावरुन आपण आलो आहोत. यावर्षी सुध्दा 3461 कोटीची तरतूद शासनाने केली पण मागे केलेली तरतूदच पूर्ण खर्च करीत नाहीत, मागासवर्गीयांना त्याचा फायदा देता येत नाही आणि पुढची तरतूद करायची मग कशासाठी ही बनवाबनवी करीत आहात ? मला सांगताना अत्यंत दु:ख होत आहे सन 2003 मध्ये शासनाने या खात्यासाठी 1803 कोटी एवढा खर्च केला होता पण त्यापैकी फक्त 20 टक्केच खर्च झाला. मागील वर्षी 4212 कोटीची तरतूद केली पण 2652 कोटी एवढाच खर्च झालेला आहे. अशा प्रकारे मागासवर्गीयांवर खर्च का होत नाही, त्यासाठी समिती नेमली तरी देखील त्यांच्या बैठकाही होत नाही, याचा अर्थ शासनाचा अंकुश राहिलेला नाही. शाहू-फुले यांचे नाव घेऊन शासन कशाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यांचा अपमान करीत आहे हे मला समजत नाही. त्यांचे विचार कृतीमध्ये आणले तरच त्यांच्या आत्म्यांना शांती मिळेल की आम्ही दिलेल्या वारसांनी लोकांचे भले केले. अर्थसंकल्पावर तर काय बोलावे हा प्रश्नच आहे, परंतु कर्तव्य म्हणून बोलावे लागते. यामध्ये "केंद्रशासनावर अवलंबून असलेल्या योजना" असा जो उल्लेख आहे त्याबाबत स्पष्ट करु इच्छितो की, राज्यशासनाचे काहीच नाही काय, शासनाच्या तिजोरीतून काहीच करावयाचे नाही काय ? याचा खुलासा व्हावा. रोजगार हमी योजना हा आयटेम 14 व्या क्रमांकावर दिलेला असून 1398 कोटी केंद्राकडून येणे आहेत. कृषी अवजारे खरेदीसाठी 25 टक्के केंद्राकडून येणे आहेत, विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी पंतप्रधान पॅकेजअंतर्गत 90 कोटी, राष्ट्री कृषी विकास, दुग्ध उत्पादनवाढ, अंडी व मांस यामध्ये 772 कोटीची वाढ, विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी विदर्भ पॅकेज, पीक कर्ज वाटप 9439 कोटी, पंतप्रधान ग्राम सडक योजना 1000 कोटी रुपये .....

यानंतर श्री. गायगवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

नक्षलग्रस्त भागासाठी 189 कोटी रुपये,इंदिरा आवास योजनेसाठी राज्याचे 1 हजार 65 कोटी रुपये आणि केन्द्र सरकारचें 685 कोटी रुपये, मागास क्षेत्र अनुदान निधी 253 कोटी रुपये, नाबार्ड पुरस्कृत मेगा पाणलोट क्षेत्रासाठी 1 हजार 738 कोटी रुपये, केन्द्र पुरस्कृत एकात्मिक पाणलोट क्षेत्रासाठी राज्याची दहा टक्के रक्कम वगळून 1 हजार 103 कोटी रुपये, राज्य कृषी विकास योजनेसाठी 124 कोटी रुपये केन्द्र सरकारचे,केन्द्र पुरस्कृत ग्रामीण आरोग्य योजनेसाठी 1 हजार 425 कोटी रुपये केन्द्र सरकारचे,पंतप्रधान स्वास्थ सुरक्षा योजनासाठी 120 कोटी रुपयापैकी 20 कोटी रूपये राज्य सरकारचे आणि 100 कोटी रुपये केन्द्र सरकारचे आहेत. नागपूर विद्यालयाकरता 125 कोटी रुपये केन्द्र सरकारचे,माहिती व तंत्रज्ञानासाठी 14 कोटी रुपये केन्द्र सरकारचे. किशोर वयीन मुले पोषण पूरक आहारासाठी 134 कोटी रुपयांची तरतूद असून त्यामध्ये राज्य सरकारचे 67 कोटी आणि केन्द्र सरकारचे 67 कोटी रुपये आहेत. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान मिशनसाठी 1 हजार 240 कोटी रुपये केन्द्र सरकारचे आहेत, वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमासाठी 1 हजार 270 कोटी रुपये केन्द्र सरकारचे आहेत आणि 134 कोटी रुपये राज्य सरकारचे आहेत. रस्ते चौपदरीकरणाचे एकूण 14 प्रकल्प आहेत. त्यासाठी 796 कोटी रुपये केन्द्र सरकारचे आहेत. केन्द्रीय मार्ग निधी योजनेमध्ये 600 कोटी केन्द्र सरकारचे आहेत, केन्द्र शासनाच्या आतंकवाद विरोधी पोलीस दल आधुनिकीकरण योजनेसाठी 1 हजार 301 कोटी रूपये केन्द्र सरकारचे आहेत. अशा प्रकारे एकूण 23 हजार 230 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केन्द्र सरकारकडून करण्यात आलेली आहे. या शिवाय पुढची कामे पूर्ण करण्यासाठी आपल्या जवळ पैसे असणे आवश्यक आहे. त्या बाबतीत माननीय अर्थ मंत्र्यांनी असे सांगितले आहे की, बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या पध्दतीने खाजगीकरणातून इतर कामे पूर्ण करण्यात येतील.

सभापती महोदय, केन्द्र सरकारच्या अनुदानाच्या बाबतीत मी मघाशी नमूद केल्या प्रमाणे, 2 हजार 873.14 कोटी रुपयांची घट झालेली आहे. केन्द्र सरकारकडून जास्त अनुदानाची अपेक्षा करीत असताना या योजनांचा सुध्दा बोजवारा उडणार आहे, असे यावरुन दिसून येते. या विविध

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

योजनांसाठी आपण जर पैसे मिळवू शकलो नाही तर या योजनांचा दुर्दैवाने बोजवाराच उडणार आहे. रस्त्याचे, पोलिसांचे, रोजगार हमी योजनेचे पैसे या कामासाठी शासन वापरणार आहे. इंदिरा आवास योजना, मागास क्षेत्राचा विकास करण्याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. शेतक-यांच्या मागण्याकडे मात्र शासनाकडून पुरेस लक्ष दिले जात नाही. फुले, आंबेडकर, शाहू यांच्या नावाने जो समाज उभा राहिलेला आहे, त्या समाजाचा विकास करण्यासाठी शासनाने विविध योजना जाहीर केल्या आहेत. परंतु त्या योजना मागे पडतात, अशी आजची स्थिती आहे. हा अर्थसंकल्प केन्द्रीय पुरस्कृत अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारकडे या योजनांसाठी पैसे नाहीत. राज्य सरकारावर 1 लाख 83 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यामुळे केन्द्र सरकार हाच राज्य सरकारचा आधार आहे. 1 लाख 83 हजार कोटी रुपयांचे कर्ज राज्य सरकारवर आहे. या वर्षी जो अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे, त्यावरुन असे दिसून येते की, पुढच्या वर्षाचा अर्थसंकल्प मांडण्यास ज्यावेळी माननीय वित्त मंत्री उभे राहतील त्यावेळी 2 लाख 20 हजार कोटी रुपयापर्यत कर्ज गेलेले असेल. आदिवासी विकास योजनेवर 3 हजार 20 कोटी आणि अनुसूचित जातीसाठी 3 हजार 461 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे या ठिकाणी उपस्थित आहेत मी त्यांना सांगू इच्छितो की, या समाजासाठी इतकी तरतूद अर्थसंकल्पात केली म्हणजे त्यांच्यावर मेहरबानी केलेली नाही. घटनेमध्ये जी तरतूद आहे, त्या तरतुदीनुसार आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात ही तरतूद अर्थसंकल्पात करणे अनिवार्यच आहे. ही बाब राज्य सरकारवर अवलंबून नाही. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लोकांच्या संदर्भात घटनेनेच ही तरतूद केलेली आहे. त्यामुळे राज्य सरकार या समाजासाठी फार काही देत आहे, अशातला भाग नाही. माननीय वित्त राज्य मंत्री ज्यावेळी उत्तर देण्यास उभे राहतील त्यावेळी गेल्या वर्षी शासनाने किती तरतूद केली होती आणि त्यापैकी किती खर्च करण्यात आला होता या बाबतीत त्यांनी खुलासा करावा. विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीवर एक महिना मी काम

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

केले होते. त्यावेळी मला वेगळा अनुभव आला होता. घटना दुरुस्ती झाल्यापासून आतापर्यंत या समाजासाठी करण्यात आलेल्या तरतुदीचा जर माननीय मंत्री महोदयांनी अभ्यास केला व आदिवासी विकास विभागासाठी गेल्या आठ दहा वर्षातील तरतुदीची बेरीज केली तर प्रत्येक कुटुंबाच्या वाटयाला एक कोटी रुपये मिळाले असते. तेव्हा हे पैसे कोठे गेले आहेत ?

नंतर श्री.सरफरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्या पैश्याचे काय झाले? तुम्ही दारिद्रय रेषेखालील लोकांना 8 रुपये किलोने धान्य देण्याचे यामध्ये जाहीर केले. त्याचा हिशेब केला तर आदिवासींना आपण 2 हजार रुपये खावटी कर्ज देता, त्यामध्ये धान्याचे फक्त 1500 रुपये असतात. त्यामध्ये आपण कोणते दर लावले ते सांगा? त्यांना खावटी कर्जाच्या नावाने कशासाठी कर्जबाजारी करता? त्यांना 8 रुपयांनी धान्य द्या. तुम्ही खावटी कर्जामधील एकेक आयटेमचे 20 ते 25 रुपये लावले आहेत. म्हणजे दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी तुम्ही जाहीर केलेल्या दराच्या दुप्पट भावाने त्यांना कर्ज देत असतांना त्याच भावाने त्यांना धान्य मिळणार आहे. त्यामुळे त्या आदिवासींच्या डोक्यावर तेवढेच कर्ज राहणार आहे. जो कुणी हा ठेका घेणार असेल त्या ठेकेदाराला यामधून कोटयावधी रुपये मिळणार आहेत. माननीय वित्त राज्यमंत्री श्री. वडेट्टीवार साहेब आपण त्या भागामधून निवडून आलेले आहात. म्हणून याबाबत आपण चौकशी करावी अशी माझी मागणी आहे. अगोदरच अंगावर कपडे नसलेल्या आदिवासीचे कपडे उतरविण्याचे काम खावटी कर्जाच्या माध्यमातून होत आहे. आपण खावटी कर्ज माफ केले तर त्याचा आपल्या तिजोरीवर भार पडेल, पण यामधून तो ठेकेदार कमवून गेला त्याचे काय? सभापती महोदय, तेलाचे भाव काय, डाळीचे भाव काय, गव्हाचे भाव काय? हे भाव भयानक आहेत. तेव्हा ज्या समाजाने आपल्याला निवडून पाठविले आहे त्यांचे उत्तरदायित्व तरी आपण स्वीकारावे. होऊन होऊन काय होईल, फार तर आपले मंत्रीपद जाईल. किमान आपल्या समाजासाठी तरी झुंजा. या महाराष्ट्रामध्ये झुंजणाऱ्या समाजाला सन्मानित केले जाते. तेव्हा या लुटणाऱ्या लोकांचा आपण कुठेतरी बंदोबस्त करणार आहात की नाही? हा माझा प्रश्न आहे. याठिकाणी केलेली तरतूद मोठी असली तरी त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही ही व्यवथा आहे.

सभापती महोदय, या राज्याचा विकास सार्वजनिक व खाजगी भागिदारीमधून म्हणजेच बी.ओ.टी. तत्वावर करणार आहात असे मघाशी सांगितले. रोजगार हमी योजनेच्या बाबतीत आपण छाती फुगवून सांगितले. हे सांगत असमतांना सरकारला काहीच वाटत नाही. 5 कोटी मनुष्य दिवस एवढा रोजगार आपण निर्माण केला. या महाराष्ट्र राज्यामध्ये एवढे दारिद्रय निर्माण झाले आहे की, लोकांना आता कामाशिवाय पर्याय राहिलेला नाही. तुम्ही सांगितलेल्या 5 कोटी मनुष्य दिवसाचा मी हिशेब केला असता जवळ जवळ 1 कोटी 37 लाख माणसांना रोजगार मिळाला असल्याचा अर्थ निघतो. या महाराष्ट्रातील जवळ जवळ 17 टक्के जनता कामावर जाते काय? सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. दिवाकर रावते....

ठेकेदार यंत्रे लावून कामे करतात आणि मोठी बिले उचलतात. ज्याच्याकरिता रोजगार हमी योजना निर्माण झाली आहे, आणि केद्र सरकारची रोजगार हमी योजना ज्यांच्यासाठी आली तो मात्र उपाशी रहात आहे. आणि छातीवर थाप मारुन आम्हाला सांगता की, आम्ही रोजगार हमी योजनेच्या मजूरीचा दर 70 रुपयांवरुन 100 रुपये केला आहे. हे आपण कुणासाठी केले? ठेकेदारासाठी केले. तो कोटयाधीश होत आहे. गरीबाच्या पोटामध्ये दोन वेळचे अन्न जावे याकरिता राज्यामध्ये रोजगार हमी योजना निर्माण झाली. यंत्राची कामे थांबवून जागेवरच 100 माणसे कामाला लागली तर त्या 100 माणसांच्या पोटामध्ये अन्नाचा घास जाईल. त्याकरिता ही योजना निर्माण झाली असतांना ठेकेदारांची घरे कोटयावधी रुपयांनी भरण्याचे प्रकार सुरु झाले. रोजगार हमी योजना समिती ही सर्वांना हवीहवीशी वाटणारी आहे.

सभापती महोदय, मी स्वत: या सभागृहामध्ये कृषी अवजारांमधील भ्रष्टाचार दाखविला. तुम्ही दिलेला शेतकऱ्याचा नांगर मी माझ्या हाताने वाकवित होतो हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. मी एवढा बलदंड माणूस आहे काय? मी हर्क्युलीस आहे काय? आपण सर्वजण शेतकरी आहात. माणसाच्या हाताने वाकविला जाणारा असा नांगर असतो काय? तो नांगर मी वाकवून दाखविला. त्यावर या सभागृहामध्ये इत्यंभूत अडीच तास चर्चा झाली. मी याठिक्राणी नांगर दाखविला, तुमचा गांडूळ खत प्रकल्प दाखविला, तुमचा मोटर पंप दाखविला, आम्ही तुमच्या बैलगाडीचे प्रदर्शन मांडले. कुणीही घ्यायला तयार नसतांना आपण या भाषणामध्ये कौतुकाने म्हटले आहे की, पंतप्रधान पॅकेजमध्ये आम्ही कृषी अवजारे देणार आहोत. सभापती महोदय, आजसुध्दा पंतप्रधान पॅकेजमधील ही अवजारे शेतकरी घ्यावयास तयार नाहीत. ही अवजारे वणी, आर्णी, दिग्रस, दारव्हा, पांढरकवडा, मोर्शी, रिसोड, पुलगाव आणि वर्धा येथे पडून आहेत. त्याचे फोटो वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहेत.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

ही अवजारे इतक्या निकृष्ट दर्जाची आहेत की, शेतकऱ्यांनी ती घेतलीच नाहीत. एका बंडीमध्ये पाच किलो कापूस टाकला तरी ती बंडी उलटते. या अर्थसंकल्पाचे कसले कौतुक करीत आहात?

सभापती महोदय, आम्ही याठिकाणी एकाही भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. सभापती महोदय, येथे मांडलेले विषय परत परत येथे मांडण्याची माझी इच्छा नाही तसेच मला त्याबाबतीत सभागृहाचा वेळही घ्यावयाचा नाही. आम्ही भ्रष्टाचाराची प्रकरणे येथे मांडलेली आहेत. पण शासनाने त्याबाबतीत काहीच कारवाई केलेली नाही. त्या अधिकाऱ्यांवर धाकच नाही. माननीय पंतप्रधांनी येथे येऊन सात जिल्हयाकरिता पैसे दिलेले आहेत. त्या माननीय पंतप्रधांनाचा अवमार होईल असे आपल्याला वाटत नाही काय? माननीय पंतप्रधान असे म्हणाले की, मी दिलेल्या पॅकेजच्या संदर्भात माननीय पंतप्रधान कार्यालय मॉनिटरिंग करेल. त्यावेळी माननीय पंतप्रधान कसे काय हस्तक्षेप करणार म्हणून आपल्याला राग आला होता. पण त्यांना कल्पना आहे. येथील राज्यकर्त्यांवर माननीय पंतप्रधानांचा देखील विश्वास नाही, अशी परिस्थिती त्यांच्या त्या एका वाक्यातून निर्माण झालेली होती आणि ते तुम्ही खरे करुन दाखविले. माननीय पंतप्रधान म्हणत आहेत तेच खरे आहे आता मी राज्यकर्ते म्हटले तर तुम्हाला राग येईल पण अधिकाऱ्याचे जे काय असते ते आपल्या अंगावरच घ्यावे लागते. माननीय पंतप्रधानांनी राज्यकर्त्यांवर अविश्वास दाखविला आणि तो किती सार्थ होता. सर्व अवजारांचे फोटो माझ्याकडे आहेत. काल रात्री संध्याकाळी मी हे फोटो काढून आणलेले आहेत. अवजारे पडून आहेत. शेतकरी ते घेत नाहीत. माननीय पंतप्रधान पॅकेजमधील अवजारांचे कसले कौतुक सांगता?. शेतकऱ्यांच्या बाबतीतील हे विषय अत्यंत गांभीर्याने घेणार की नाही? हा प्रश्न आहे. कृषि कार्यालयात ही सगळी अवजारे पडून आहेत. त्यासाठी 25 टक्के केंद्र शासनाचे आणि 25 टक्के राज्य शासनाचे पैसे खर्च झालेले आहेत. सभापती महोदय, हा खरेदीतील भ्रष्टाचार आहे. याच्या बाबतीत शासन कोणती कारवाई करणार आहे हे या ठिकाणी सांगण्यात येणार आहे काय? शेतकऱ्यांचे जीव जात आहेत. शेतकरी मरत आहेत.

सभापती महोदय, मी आजच एक नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हे सरकार आल्यापासून 139 आत्महत्या झालेल्या आहेत. सत्तेत येऊन तुम्हाला किती दिवस झालेले आहेत हे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मोजा.काल 20 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. माझ्याकडे या आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांची यादी आहे. सन्माननीय मत्रिमहोदय, नाईक साहेब आपण येथे बसलेले आहात. तुम्ही कधी या सभागृहात येत नाही. तुमचे दर्शन झाले की, आम्हाला बरे वाटते. पण तुम्ही या सभागृहात येतच नाही. गेल्या पाच वर्षात तर आलाच नाहीत. आज आलात त्याबद्दल आम्हाला आनंद आहे. (अडथळा) मी म्हटले नाही, ते श्री. मधु चव्हाण बोलले होते. मी तुम्हाला नेहमी बघतो. तुम्ही या सभागृहात बसता याबद्दल मला आनंद आहे.

सभापती महोदय, संवेदनशील असलेले लोक मग ते कोणत्या पक्षाचे आहेत याला मोल नाही. मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, ज्यावेळी मी हा आत्महत्येसंबंधीचा विषय मांडला त्यावेळी मला सताधारी बाकावरुन काय सांगण्यात आले, मी त्या मंत्र्यांचे नाव घेत नाही पण मला खुप यातना झाल्या. निवडणुका आणि आत्महत्यांची सांगड घालण्यात आली. याठिकाणी रुबाबात सांगण्यात आले की, सगळयात जास्त आत्महत्या असलेल्या यवतमाळ जिल्हयामध्ये सगळे कॉन्ग्रेसचे आमदार निवडून आले. आमच्या छातीवर लावलेला बिल्ला बघा मग शेतकरी मेले तरी चालतील. आम्ही निवडून आलो याचा आमच्या छातीवर बिल्ला आहे. सभापती महोदय, अशा प्रकारचे या सभागृहाच्या रेकॉर्डवर वाक्य आहे. तुम्हाला काहीच खंत वाटत नाही. मला याचे खूप वाईट वाटले. मी कोणाचे नाव घेत नाही. पण तुम्ही अशी तुलना करीत असाल की, लोकांनी आम्हाला निवडून दिलेले आहे मग आत्महत्या झाल्या काय, मेले काय, जगले काय? अशा प्रकारची भावना या सभागृहात व्यक्त करण्यात आलेली आहे. या आपल्या जनतेबद्दलच्या जाणीवा आहेत काय? सरकार म्हणजे मायबाप सरकार असते. लोकांच्या अपेक्षा असतात. आम्ही तुमच्याशी भांडतो ते त्यांच्याकरिता भांडतो. पण अशा पध्दतीने या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे धिंडवडे काढण्यात आलेले आहेत. आम्ही आलो ना निवडून? तुम्ही कसे निवडून आलात यावर चाडेचार ते पाच तासाची एक चर्चा ठेवा. म्हणजे आम्ही बारीक-सारीक, खडानखडा यांच्या निवडून येण्याच्या क्लूप्या मी याठिकाणी सांगतो. परंतु या सभागृहाचा तो चर्चेचा विषय असू शकत नाही. कारण ते अमंगल आहे. राजकारणातील जे अमंगल आहे ते या सदनामध्ये बोलणे अयोग्य आहे. ते बोलूही नये. परंतु हे सांगितले तेव्हा मला व्यथा झाल्या होत्या. 139 आत्महत्या झालेल्या आहेत त्या थांबल्या पाहिजेत असे तुम्हाला वाटले पाहिजे आणि मलाही वाटले पाहिजे. आत्महत्यांचे राजकारण

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मी माझ्या जीवनात कधी केले नाही आणि कधी करु नये, कधी केले गेले तर ते मला आवडत नाही, हे मी याठिकाणी प्रामाणिकपणे मांडतो. आत्महत्येच्या बाबतीत मी कधीही कुठल्या राजकीय पक्षाला दोष दिला नाही. व्यवस्था सुधारली पाहिजे. माणूस जगला पाहिजे. तुमचे-आमचे राजकारण चालू राहील.

सभापती महोदय, मी याठिकाणी शेतकरी या विषयावर मुद्दाम मला जेवढे जमेल तेवढे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. भरपूर सांगण्यासारखे आहे. सगळेच मी याठिकाणी सांगणार नाही कारण तो विषय नाही. परंतु ते नकारात्मक असता कामा नये.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

12150 लाभार्थ्यांना 21339 जनावरांचे वाटप केले असे आपण म्हटले आहे. ती जनावरे कोठे आहेत ? माननीय मंत्रिमहोदय श्री. वडेट्टीवार साहेब, आपण सांगू शकाल काय ? मी आपल्याबरोबर येईन. आपण सगळ्या जिल्ह्यांमध्ये फिरु. मला आपण अर्धी जनावरे दाखवली तरी मी आपल्यापुढे लोटांगण घालीन. काय चालले आहे हे आपल्यालाही माहीत आहे. ते मी सांगण्याची गरज नाही. ज्या जनावराचे वाटप झाले ती जनावरे कोठे आहेत हे आपण दाखवू शकाल काय ? काही ठिकाणी भाकड गायींचे वाटप केले हे सर्व आपल्याला माहीत आहे. ही सर्व दुर्दशा परवा ई.टी.व्ही.वर दाखवली. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत दिलेली जनावरे मेलेली दाखविण्यात आली. या ठिकाणी आपले अर्थसंकल्पीय भाषण झाले आणि दुसऱ्या दिवशी ती बातमी दाखविण्यात आली. हंबरडा फोडणाऱ्या त्या शेतकऱ्यांच्या मायभगिनी आणि मेलेली जनावरे दाखविण्यात आली. त्यांना दिलेला जो आधार होता तोही गेला. अशा पध्दतीची सगळी जनावरे आपण वाटली. आमच्याकडे दूध संकलन वाढले पाहिजे म्हणून आपण जनावरे वाटली. ज्या पश्चिम विदर्भामध्ये मी काम करतो त्या ठिकाणी 24 हजार लिटर दूध जमा व्हावयाचे. जनावरे वाटल्यानंतर ते संकलन 30 हजार लिटर व्हावयास पाहिजे, 35 हजार लिटर व्हावयास पाहिजे. पण ते दूध संकलन 8 हजार लिटरवर आले. हे अधिकृत आकडे आहेत. दूध संकलन 24 हजार लिटरवरुन 8 हजार लिटरवर आले आणि जनावरे वाटल्याचे मिशीवर तूप मारुन सांगितले जाते. अधिकाऱ्यांनी जे लिहून दिले ते वाचून सांगतात. त्या खात्यानेच आपल्याला लिहून दिले. त्यांनी अभिमानाने सांगितले. ते आमच्या विदर्भातील वीर आहेत. काय करावयाचे ? तुमचे दुधाचे संकलन 8 हजार लिटरवर आले आहे. जनावरे कोठे गेली याचा शोध घेणार काय ? जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही. सभापती महोदय, मी आज विषय मांडत आहे ते आपल्याला जाणवेल. चारा नाही. पण ज्यांच्याकडे पाणी आहे ते जनावरांना पाणी देण्यासाठी 500 रुपये घेत आहेत. ते जनावरांना पाणी देण्यासाठी 500 रुपये महिना घेत आहेत. अनुदानातून जनावरे आली आणि जे जेमतेम चरितार्थ चालवितात त्यांना या सगळ्या लोकांनी त्या ठिकाणी सावकारी पध्दतीने पंधरा दिवसासाठी किंवा महिन्यासाठी जनावरांना पाणी पाजण्याचे दर लावले आहेत. आपल्या राज्यामध्ये अशा पध्दतीने शेतकऱ्यांची पिळवणूक चालू आहे. मग 149 आत्महत्या होणार नाही काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, 2005 मध्ये 550 आत्महत्या मी या ठिकाणी मांडल्या होत्या. मला असे वाटले कीआपण ज्यावेळी बोलतो त्यावेळी परिस्थितीमध्ये काही तरी सुधारणा करुन जावे. हे पॅकेज आले, ते पॅकेज आले, कर्ज माफी आली, अमुक झाले, मग परिस्थिती का सुधारली नाही ? 2009 पर्यंत 1012 आत्महत्या झाल्या. म्हणजे पाच वर्षात बरोबर दुप्पट आत्महत्या झाल्या. आत्महत्या कमी न होता त्या वाढत आहेत. आत्महत्या का होत आहेत याचा शोध घेताना जाधव समितीने लिहिले होते. प्रत्येक खेड्यामध्ये रोजगार हमी योजनेचे मशिनने चाललेले काम थांबले पाहिजे. मघाशी मी रोजगार हमीचा विषय मांडला. त्या ठिकाणी यंत्राने चाललेले काम थांबले पाहिजे. या उद्ध्वस्त शेतकऱ्यांच्या हाताला काम दिले पाहिजे यासाठी मशिनने चाललेले काम थांबवून शेतकऱ्यांना काम दिले पाहिजे. तरच तो जगेल. मशिनने चाललेले सर्व काम थांबवा आणि शेतकऱ्यांना काम द्या. माननीय मुख्यमंत्री एकाही घरी जाण्यास तयार नाहीत. मागे माननीय महसूल मंत्री म्हणाले की, शेतकरी दारु पिऊन मरतो, तेव्हा वाईट वाटते. मघाशी माननीय मंत्रिमहोदय श्री. गणेश नाईक असे म्हणत होते की, या राज्यामधील दारुची गरज लक्षत घेता आम्ही मद्य निर्मितीच्या कारखान्यास मान्यता दिली. काय त्यांचे असेसमेंट आहे ? शेतकऱ्यांच्या जनावरांच्या चाऱ्याचे असेसमेंट करण्याची गरज यांना वाटत नाही. शेतकऱ्यांच्या घरी धान्य पोहोचविण्याची गरज यांना वाटत नाही. शेतकऱ्यांच्या लेकरांना दूध द्यावे असे यांना वाटत नाही. सामूहिक विवाहाच्या नावाने आपलीच बोगस लग्ने लावून पैसे लाटतात हे यांना कळते पण मुलीच्या लग्नामुळे शेतकऱ्याची हात्महत्या होते हे यांना कळत नाही आणि दुसरीकडे राज्यामधील दारुची गरज वाढल्यामुळे आम्ही कारखान्यास मान्यता दिली असे सांगतात. एका बाजूला मंत्री म्हणतात की, शेतकरी दारु पिऊन आत्महत्या करतात आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांची दारुची गरज लक्षात घेऊन आपण धान्यापासून दारु बनविण्याचे कारखाने वाढविले काय ? तुझीच ज्वारी दे, तुला दारु तयार करुन देतो. आपण या सभागृहामध्ये किती केविलवाणे,किती किळसवाणे बोलता ? समाजाबद्दल आपल्या सरकारच्या या भावना आहेत काय ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

हे सर्व मी मनापासून बोलत नाही, बोलताना मनाला सुध्दा यातना होत आहेत. परंतु मी सर्व अनुभवत असल्यामुळे बोलत आहे. शेतकरी जीवंत राहतील यादृष्टीने व्यवस्था कशी करणार आहे ? या भाषणात शेतक-यांना बिनव्याजी 25 हजार रुपयांवरुन 50 हजार रुपये पीक कर्ज मिळणार असल्याचा उल्लेख आहे. हे पीक कर्ज ज्यांनी अगोदरचे कर्ज फेडले आहे त्यांनाच मिळणार आहे. परंतु ज्याच्याकडे काहीच नाही त्यांना कर्ज मिळण्याची व्यवस्था काय केली आहे ते यामध्ये नमूद केलेले नाही. आमच्या विदर्भातील 216 कोटी रुपये पीक कर्जाचे माफ केले जातील हे जाहीर करण्यात यावे. या घडीला तरी 216 कोटींची माफी केलेली नाही. सभापती महोदय, सोयाबीन व कापसाच्या पिकासाठी हेक्टरी 10 हजार रुपयांवरुन 20 हजार रुपये केले तर त्याच्या पदरी काही तरी पडू शकेल अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, आजच सकाळी ई.टीव्ही वर सोयाबीनचे भाव 2600 रुपये प्रती क्विंटलवरुन 2100 रुपयांवर गेल्याचे जाहीर झाले. या वाहिनीवरुन सकाळी 6 वाजता संपूर्ण महाराष्ट्रातील बाजारभाव समजतात. व्यापारी वर्गाने फूल करुन सोयाबीनचा भाव पाडला. शेतक-यांनी दोन पैसे अधिक मिळतील म्हणून सोयाबीनचा साठा उशिराने बाहेर काढला, पण हा साठा बाहेर आल्यानंतर सर्व व्यापारी एकत्र आले आणि प्रती क्विंटल 400 रुपयांनी सोयाबीनचा भाव कमी करुन टाकला आहे. म्हणजे आजच त्यांच्या तोंडचे पाणी पळले आहे अशी परिस्थिती आहे. या सोयाबीनच्या नुकसानीसाठी या अर्थसंकल्पात तरतूद केली आहे असे दिसले नाही. यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे ते सांगितले तर बरे होईल.

सभापती महोदय, डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशी स्वीकारल्या असे सांगितले. त्या अहवालाची शासनाने चिरफाड केली, त्यावर थोडीशी चर्चा झाली. त्याबाबत गोंधळ निर्माण झाला, आरडाओरड झाली. त्या अहवालात असे नमूद केलेले आहे की, शेतक-यांना त्यांच्याकडे शेती असल्यामुळे बीपीएलचे कार्ड मिळत नाही. शासनाने या भाषणात असे नमूद केले आहे की, 5 वर्षात 5 वस्तुंचे भाव स्थिर ठेवणार आहोत. आम्ही हे सर्व तळमळीने बोलत आहोत. कोणासाठी बोलावयाचे ? माननीय राज्यमंत्री नोंद घेऊन उत्तर देणार आहेत. परंतु कोणाला असे वाटत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

असेल की, काय खवचटपणे बोलत आहेत, काही सहका-यांना चांगले भाषण केल्याबद्दल आनंद वाटेल, कोणाला कौतुक वाटेल. परंतु आमच्या भाषणाचा ज्या प्रशासनावर परिणाम होईल, जे अदृश्य स्वरुपात सभागृहात असतात असे एकही प्रमुख अधिकारी आमच्या भाषणातील मुद्यांची नोंद घेण्यासाठी बसले असल्याचे दिसत नाहीत. काय तुमचे खाते आहे, काय तुमचे प्रशासन आहे ? या अधिका-यांना काहीच वाटत नाही. केवळ सोपस्कार म्हणून येथे दोन दिवस चर्चा करावयाची. पण त्यांना असे वाटत असेल की, येथे दोन दिवस भाषणे करतील, घसा कोरडा करतील, त्यानंतर उत्तर होईल, आपण दप्तर गुंडाळायचे आणि लाल दिव्याची गाडी घेऊन जायचे, अधिवेशन संपले की, आपण फिरण्यासाठी मोकळे. या खात्यातील कोणाही अधिका-यांवर मंत्रिमहोदयांचा धाक नाही, या अधिका-यांवर तुमचा दबाव नाही ? काय हिंमत आहे त्यांची ? कोणीही प्रमुख अधिकारी आमच्या भाषणातील मुद्दे लिहून घेण्यासाठी उपस्थित नाहीत. ते काय लिहून घेत आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, खालच्या सभागृहामध्ये अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे...

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी असे बोलणे योग्य नाही.

श्री.विजय वडेट्टीवार : गॅलरीत वित्त विभागाचे उप सचिव उपस्थित आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला सन्माननीय राज्यमंत्र्यांना सांगावयाचे आहे की, या सभागृहात अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा केवळ दोनच दिवस होते. त्यामुळे मंत्री म्हणून तुम्ही आम्हाला समजून घ्यावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या भाषणातील मुद्दे मी लिहून घेत आहे. त्यामुळे अधिकारी गॅलरीत कोणी असावे कोणी नसावे यावर किंवा येथे अदृश्य स्वरुपात असणा-या अधिका-यांबाबत आपल्याला येथे चर्चा करता येत नाही. सन्माननीय सदस्यांनी त्यांचे प्रश्न मांडावेत, त्यांच्या प्रश्नांना सरकार उत्तर देणार आहे.

श्री.दिवाकर रावते : आपण प्रशासकीय मजबुती दाखविली आहे त्याबद्दल धन्यवाद.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदय असे म्हणाले की, याठिकाणी नोंद केली जात आहे. परंतु आम्ही अनेकवेळा येथे बोलल्यानंतर त्याचे उत्तर आम्हाला मिळत नाही. पुरवणी मागण्यांवर बोललो की, अर्थसंकल्पावर बोललो तरी त्याचे उत्तर आम्हाला मिळत नाही. कारण वेळ अपुरा असतो. मंत्रिमहोदय सभागृहात जे सांगतील आणि आम्ही ते ऐकून घेऊ असे होणार नाही. आम्ही भाषणातून जे जे मुद्दे मांडतो त्याला प्रत्येक मुद्याला उत्तर दिले पाहिजे असे संकेत आहेत. या सभागृहात जेवढे सन्माननीय सदस्य बोलतील त्या प्रत्येक सदस्यांच्या मुद्यांना उत्तर दिले पाहिजे. परंतु अनेकदा चर्चेला 5 मिनिटात उत्तर देऊन भाषण पूर्ण संपविले जाते.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या सभागृहाच्या कामकाजाची उंची दिवसेंदिवस खालावत चालली आहे हे मला येथे दुर्दैवाने सांगावे लागत आहे. त्याबाबत माझी हरकत आहे.

श्री. दिवाकर रावते : आदरणीय राज्यमंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे. उद्या पासून गॅलरीमध्ये अधिकारी असण्यास आमची अशी हरकत असणार आहे. आम्हाला अधिका-यांची गरज नाही, आम्ही समर्थ आहोत असे राज्यमंत्री महोदय म्हणत असतील तर या सदनाच्या लॉबीमध्ये अधिकारी असता कामा नये. मंत्री महोदय समर्थ असतील तर मग अधिकारी कशाला ? राज्यमंत्री महोदय चुकीचे बोलले आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये चर्चा चालू असल्यामुळे अधिकारी त्या सभागृहामध्ये गेलेले आहेत असे सांगितले. विधानसभेमध्ये कोणते कामकाज सुरु आहे याच्याशी आमचा काही संबंध नाही. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या कामकाजाची तुलना करता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करणे आवश्यक आहे. विरोधी पक्षाचे सदस्य विविध मुद्दे येथे मांडतात. परंतु सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी मांडलेल्या किती मुद्यांना उत्तरे दिली जातात ? सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी योग्य मुद्दा उपस्थित केला. या सभागृहामध्ये अर्थसंकल्पावर फक्त दोन दिवस चर्चा होते आणि विधानसभेमध्ये ती 15 दिवस होते. उत्तर देण्यास मंत्री महोदय सक्षम आहेत हे ऐकून आनंद झाला.

सभापती महोदय, शेतक-याला बीपीएल कार्ड नाही, असे नरेंद्र जाधव समितीने सांगितले. शेतकरी बीपीएलच्या आणखी खाली गेला आहे. दारिद्र्य रेषेखालील माणसापेक्षाही दयनीय अशी शेतक-याची अवस्था झालेली आहे. नैराश्येने त्याला ग्रासलेले आहे. त्याला स्वस्तात अन्नधान्य मिळत नाही, आरोग्य सुविधा मिळत नाही. त्याला दोन-तीन रुपयात धान्य मिळू शकत नाही, म्हणून तो मरतोय. नरेंद्र जाधव समितीचा अहवाल सरकारने स्वीकारला. तर मग शेतक-याच्या बाबतीत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

धोरणात्मक निर्णय का घेतला नाही ? बीपीएलखालचा शेतकरी कोण ? 10 एकरवाला, 5 एकरवाला की त्या खालील ? याबाबतीत शासनाने धोरणात्मक निर्णय का घेतला नाही ? आजारी शेतक-यांच्या घरी कोणी जात नाही. आजारी शेतक-यांचा सर्व्हे कुणी घेतलेला नाही. शेतक-याला त्याच्या मुलींच्या लग्नाचा प्रश्न भेडसावतोय. मागच्या वेळी शासनाने असे सांगितले होते की, ज्या शेतक-याच्या घरी मुलगी जन्माला येईल त्या मुलीच्या नावावर 1 लाख रु. फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवले जातील. मला वाटले होते की, त्या फिक्स डिपॉझिट संबंधीची तरतूद अर्थसंकल्पामध्ये असेल. पण ती तरतूद नाही. किती शेतक-यांच्या घरी मुली जन्माला आल्या ? याची माहिती सरकारकडे आहे काय ? अहवालामध्ये फक्त स्त्रियांची संख्या कमी आणि पुरुषांची जास्त झाली आहे असे नमूद केलेले आहे. किती शेतक-यांच्या मुलींच्या नावे 1 लाख रु. फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवलेले आहेत ? सामूहिक विवासाठी 10 हजार रुपये मदत दिली जाते. त्यातही भ्रष्टाचार केला जातो. हा भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतर त्यातील एकावरही गुन्हा दाखल झाला नाही. शेतक-यांची लूट करा, शेतक-यांना फसवा. शेतक-याला फसविणारे राजरोस फिरत असतात. त्यांच्या अंगावर खादी असते. इतरांशी त्यांना काही देणे घेणे नसते.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पक्ष बदनाम करतात, नेत्यांना बदनाम करतात. वरिष्ठ नेते ते करायला सांगत नाहीत. ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, जाधव समितीच्या शिफारशीप्रमाणे शेतकऱ्यांविषयी तुम्हाला धोरण मांडावे लागेल. ज्याप्रमाणे कर्जाबद्दल धोरण मांडले त्याच धर्तीवर हे धोरण मांडावे लागेल. ज्या 7 ते 8 हजार विधवा आहेत त्यांना किमान पेन्शन देणार आहात की नाही? अकोला जिल्हयाचे प्रशासकीय अधिकारी यांचे मी कौतुक केले. त्यांनी जी.आर.काढला की, शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींना किंवा त्यांच्या घरातील एका मुलीला अंगणवाडी सेविका या पदावर सामावून घ्यावे. मी सन्माननीय मंत्री श्री.झनक यांना विनंती केली होती. फक्त अकोला जिल्हयाने याची अंमलबजावणी केली. त्यांचा गौरव करावा. अकोला जिल्हयामध्ये 50 विधवा भगिनींना अंगणवाडी सेविका म्हणून सेवेत घेण्यात आले. महाराष्ट्रातील इतर जिल्हयांना याबाबत काही करावेसे वाटले नाही. त्यांना शासन नोटीस देणार की नाही? 2007 साली शासनाने घेतलेल्या निर्णयाचे पालन का केले जात नाही? 7 हजार विधवा असताना 1 हजार विधवांना नोकरीत सामावून घेण्यात आले असते तर हा प्रश्न मिटला असता. माझी शासनाला विनंती आहे की, ज्यांना 1 लाख रुपयांची मदत दिली नाही त्यांना एकरकमी पेन्शन द्या किंवा अंगणवाडी सेविका या पदावर सामावून घ्या. यासाठी कालबध्द कार्यक्रम जाहीर करावा. 4-6 महिन्यात याची अंमलबजावणी करावी. आज शेतकऱ्यांची कुटुंबे उद्ध्वस्त परिस्थितीत जीवन जगत आहेत. सावकारी कायदा आणला जाईल असे शासनाने सांगितले. 2007 साली सावकारी कायद्याचा मसूदा तयार केला. 2010 साल उजाडले तरी शासन का थांबले आहे? तीन-तीन वर्षे का लागतात? हजारो शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सावकारांमुळे घडत आहेत. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत आणि एक कायदा करण्यासाठी शासनाला तीन-तीन वर्षे लागतात. लँड सिलिंग ॲक्ट केंद्राने रिपिल केल्याबरोबर त्याची अंमलबजावणी केली जाते. कावळा फांदीवर बसतो कधी आणि फांदी तुटते कधी याची वाट पहात होते. केंद्राने अंमलबजावणी केल्याबरोबर लगेच पुढच्या आठवड्यात राज्य शासनाने तो कायदा पारित केला. कारण जमिनीमध्ये करोडो रुपये गुंतले आहेत. ही काय तुकड्यावर जगणारी माणसे आहेत. यांच्यासाठी कशाला करायचे. सावकारांना सरकार संरक्षण देते हा माझा आरोप आहे. या संदर्भात कोणत्या पध्दतीने आमच्या भावना व्यक्त कराव्यात? 2009 या वर्षात 9439 कोटी रुपयांचे पीक कर्ज दिले असे शासनाने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

म्हटले आहे. 9439 कोटी रुपयांपैकी विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र अशा विभागामध्ये किती कर्ज दिले याची विगतवारी शासनाने द्यावी. विदर्भातील आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांची ज्वारी जादा दराने खरेदी करणार, शेतकरी लक्षाधीश होणार आहे. त्याच्या घरामध्ये लक्ष्मी उभी राहणार आहे. आमच्या शेतकऱ्यांच्या ज्वारीतून दारु बनणार आणि त्याच्या घरामध्ये लक्ष्मी उभी राहणार. किती गोंडस चित्र निर्माण केले आहे. 20240 गावे 50 पैशाहून कमी आणेवारी दाखविली याचा उल्लेख केलेला आहे. त्या संदर्भात घोषणा नाही. टंचाईग्रस्त गावांचा उल्लेख पुस्तिकेमध्ये आला आहे. "त्या संदर्भात करण्यात येईल" म्हणजे काय? इतर सर्व करता मग हे करण्यात येईल काय याबाबत ठोस काही सांगितले जात नाही. 20240 गावे टंचाईग्रस्त, 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेली आहेत. त्या गावात पाणी नाही, चारा नाही, जनावरे मरत आहेत. याचा अहवाल तुम्ही जाहीर केला. काही महत्वाचे निर्णय घेतले. परंतु अर्थसंकल्पामध्ये उपाययोजना नाही. तुमच्या अर्थसंकल्पाचा लोकांनी काय अर्थ घ्यायचा. नियोजन समितीने तुम्हाला मान्यता दिलेली नाही. पंजाबराव देशमुख विद्यापीठाला निधी जाहीर केला परंतु तो त्यांना मिळालेला नाही. वृक्ष लागवड केली असे म्हटले आहे. मी दरवर्षी किमान एक लाख झाडे लावतो. जाहीर कार्यक्रम घेऊन वृक्ष लागवड करतो. आपल्या अंगणात एक तरी फळझाड असावे असे आपल्याला वाटते. मी प्लास्टीक जमा केले. आमचे शिवसैनिक हैराण झाले. आम्हाला हे काय भंग्याचे काम लावले असे ते म्हणू लागले. 20 टन प्लास्टीक जमा केले. आमच्या मराठवाड्यातील सहा जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: बोलावून सांगितले. एवढे प्लास्टीक तुम्ही जमा केले, आम्ही काय करायचे ते सांगा. ते प्लास्टीक कसे डिस्पोज करायचे ते सांगा. बाबा आमटेंचा फोन आला.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनाची नाही

श्री. दिवाकर रावते .....

माझ्याकडे प्लॉस्टिक पाठवून देण्याची व्यवस्था करा असे बाबा आमटे यांनी सांगितले. त्यांच्याकडे असलेल्या कुष्ठरोग्यांनी या प्लॉस्टिकपासून उशा व विटा बनविण्याचा कारखाना चालविला आहे. 20 टन प्लॉस्टिक आम्ही पाठवून दिले आहे. त्याचे कौतुक या सरकारने तर केले नाही, खरे तर ही अपेक्षाही नाही व त्यासाठी मी हे केले नाही. परंतु बाबा आमटे यांनी धन्यवाद मानणारे पत्र मला पाठविले. हे आपल्या पर्यावरण संतुलन कार्यक्रमामध्ये आहे.

महोदय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी 25 हजार शाळांमध्ये संगणक पुरविण्याची संकल्पना शासनाची आहे. परंतु हे संगणक चालविण्यासाठी विजेचा पत्ता नाही आणि शिक्षक सुध्दा नाहीत. शिक्षक नसल्याची चर्चा आपण वारंवार सभागृहात करीत असतो. अशा प्रकारे वीज निर्मितीच्या संदर्भात मला बोलावयाचे झाल्यास 92 वीज प्रकल्प आपण विदर्भात आणण्याचा विचार केलेला आहे. अशा प्रकारे विदर्भातील पर्यावरणाचे संतुलन देखील बिघडविणार आहात. विदर्भातील सिंचन प्रकल्पांचा प्रश्न ऐरणीवर आहे. मोठ्या मेहनतीने म्हणा की माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादांच्या दादागिरीमुळे म्हणा काही प्रकल्प होत असतील. अशा प्रकारे विजेचे प्रकल्प घेऊन विदर्भातील लोकांना नागवावयाचे, कोकणात अशा प्रकारचे प्रकल्प घेऊन कोकण उद्ध्वस्त करण्याचा विचार हे शासन करीत आहे त्यामुळे या दोन्ही प्रदेशातील लोकांच्या जीवनमानाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

महोदय, शासनाने हेअर पिनवरील कर माफ केल्याचे अर्थसंकल्पात म्हटले आहे. वास्तविक खेड्यातील महिला 2 रुपये किंवा 5 रुपयाची हेअर पिन विकत घेतात त्यांना या करमाफीचा फायदा नसून हिरेजडित हेअर पिन विकत घेणाऱ्यांनाच त्याचा फायदा होईल आणि त्यांच्यासाठीच ही करमाफी आहे. अशा प्रकारे राज्यातील जनतेची टिंगल-टवाळी करण्याचे काम हे शासन करीत आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या बाबतीत हा अर्थसंकल्प उदासीन आहे, त्याला कुठलीही दिशा नाही, तो भरकटलेला अर्थसंकल्प आहे, कोणत्याही नियोजनाची मान्यता नसलेला अर्थसंकल्प आहे म्हणून मला खेदाने सांगावेसे वाटते की या राज्याचे भवितव्य चांगले दिसत नाही. माननीय अर्थ राज्यमंत्री सक्षम आहेत, अधिकारी सक्षम असोत अथवा नसोत ते सक्षम आहेत त्यांची सक्षमता लक्षात घेऊन त्यांनी चांगुलपणा दाखवून काही व्यवस्था केली तर मला आनंद होईल. एवढे बोलून या अर्थसंकल्पाला विरोध करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, राज्याच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेऊन त्याबाबतीत माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या अर्थसंकल्पाचा एकंदरित भाग पाहिला, त्याची चौकट पाहिली तर असे लक्षात येईल की, संपूर्ण देशात तसेच जगात मंदीची लाट असताना सुध्दा केंद्राचा अर्थसंकल्प असो अथवा राज्याचा असो इतक्या कुशलतेने हा अर्थसंकल्प हाताळला गेला ....

यानंतर श्री. गायकवाड ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

म्हणूनच आपल्या देशाची आणि राज्याची प्रगती आपण पहात आहोत. पुढील वर्षाच्या प्रगतीचा आढावा या अर्थसंकल्पात मांडण्यात आला आहे त्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांचे आभ्ंार मानतो.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांच्या मनात अर्थसंकल्पाच्या बाबतीत काही शंका आणि कुशंका होत्या . विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या मनात तर ब-याच शंका कुशंका होत्या. राज्याचा अर्थसंकल्प अशा प्रकारचा मांडला जाईल की तो अर्थसंकल्प समोर ठेवून आपल्याला भरपूर टीका करता येईल अशा प्रकारचे मनसुबे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या मनात होते. परंतु माननीय वित्त मंत्र्यांनी अत्यंत पारदर्शक, सकारात्मक आणि राज्याला खऱ्या अर्थाने दिशा देणारा अर्थसंकल्प सादर केलेला असल्यामुळे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना तशा प्रकारे बोलण्याची संधीच मिळालेली नाही. सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर बोलत असतांना अमिताभ बच्चनच्या विषयापासून सन्माननीय सदस्यांनी बोलण्यास सुरुवात केली होती.या विषयाकडे मी फारशा गांभीर्याने पाहणार नाही. परंतु राज्यातील महागाई सबंधी. राज्यातील धोरणात्मक विषयासंबंधी , कामगार विषयक धोरणासबंधी विरोधी पक्षातील सन्माननीय
।सदस्य आपले मौल्यवान विचार माडतील अशी आमची अपेक्षा होता. त्याचबरोबर राज्यातील ज्या विविध योजना आहेत त्यामध्ये जर कदाचित काही त्रृटी असतील तर त्या त्रृटी दाखवून त्या व्यवस्थित करुन घेतील असे आम्हाला अपेक्षित होते परंतु त्यावर न बोलता इतर बाबीवरच बोलण्याचा सन्माननीय सदस्यांचा जास्त भर दिसून आला.कोणत्या गोष्टी मांडाव्यात आणि कोणत्या बाबीवर बोलावे हा प्रत्येक सन्माननीय सदस्यांचा अधिकार आहे.परंतु अकरा कोटी जनतेच्या संदर्भातील अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असतांना वर्ष भराच्या राज्याच्या आर्थिक व्यवस्थेला दिशा देणा-या विषयाचे मात्र गांभीर्य ठेवले गेले नाही असे मला वाटते.

सभापती महोदय,अर्थसंकल्पावर बोलत असतांना सन्माननीय सदस्यांनी कवितेचा उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, विंदांच्या कवितेला थोडेसे महत्व दिले गेले पाहिजे. त्या कवितेमध्ये विंदानी असे सांगितले आहे की,

"देणाऱ्याने देत जावे, घेणा-याने घेत जावे
आणि देता देता घेणा-याचे हातच घ्यावे "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणते हात घ्यावयाचे आहे हे तुम्हीच ठरवावे. या अर्थसंकल्पाच्या बाबतीत या दोन ओळी अतिशय चपखलपणे लागू होत आहेत.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेत असतांना सन्माननीय सदस्यांनी असे सागितले की, हेअर पीनवरील कर माफ करण्यात आला आहे.ही गोष्ट खरीच आहे. ती खोटी आहे असे आम्हीही म्हणत नाही.परंतु या देशात आणि राज्यात अवकाळी पाऊस पडतो,ज्यावेळी पाऊस पडावयास पाहिजे त्यावेळी पडत नाही, हया गोष्टी कोणाच्याही हातात नाही. पाण्याच्या बाबतीत नियोजन करण्यात आलेले आहे परंतु नियोजन करण्यासाठी पाणी असावयाला पाहिजे.पाणी नसेल तर त्याचे नियोजन कसे करावयाचे यासबंधी देखील काही योजना अर्थसंकल्पात सांगितलेल्या आहेत. हेअर पीनवरील कर माफ करण्यात आला आहे त्यामुळे हेअरपीन स्वस्त झालेल्या आहेत त्याचबरोबर इतरही अनेक जीवनावश्यक वस्तू स्वस्त झालेल्या आहेत. या वस्तुंवर चार टक्के कर आकारण्यात यावा असे कमिटीने सांगितले असतांना देखील राज्यातील अकरा कोटी जनतेच्या भावना विचारात घेऊन माननीय वित्त मंत्र्यांनी तांदूळ,गहू, डाळी, पीठ, मिरची, हळद, गुळ, चिंच, नारळ, धने इत्यादी जीवनावश्यक सर्व वस्तूंवर एकाही पैशाचा कर लावला नाही. त्यामुळे माननीय वित्त मंत्री अभिनंदनास पात्र आहेत असे मला सांगावयाचे आहे. या राज्याचा अर्थसंकल्प ज्यावेळी मांडण्यात येत होता त्यावेळी आम्हीसुध्दा एक सदस्य म्हणून व नागरिक म्हणून त्याच्याकडे पहात होतो.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भाई जगताप...

आणि ते जस जसे वाचत गेले तस तसे तीन वेळा पाणी प्यायले हे खरे आहे. परंतु विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना काही मिळाले नाही म्हणून त्यांच्याकडील पाण्याचा ग्लास त्यांना दिसला. ते काय करीत होते याकडे आमचे बारकाईने लक्ष होते. आणि म्हणून सर्वसाधारण परिस्थितीत साडे सात हजार कोटींचा तुटीचा अर्थसंकल्प मांडीत असतांना सर्वसामान्य माणसाला आपण काय दिलासा देतो, कष्टकऱ्याला काय दिलासा देतो, कामगाराला काय दिलासा देतो हे सर्वात महत्वाचे होते. आणि म्हणून आपण पाहिले आहे की, जीवनावश्यक वस्तूंशी आपला दररोजचा संबंध येतो त्याच्या किंमतीमध्ये एक पैश्याची देखील वाढ केली नाही. त्यामध्ये आमच्या विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना काही दिसले नाही. त्यांना फक्त हेअर पीन कशी दिसली? मला वाटते की, त्यांच्या विरोधाच्या फुग्यातील हवा हेअरपीनने काढण्याचे काम आपण करणार आहोत. आणि म्हणून आपण पाहिले आहे की, या देशामध्ये पंचायत राज आणून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे स्वप्न स्वर्गीय इंदिरा गांधींनी पाहिले होते. ज्याप्रमाणे दिल्लीमध्ये सरकार चालते त्याप्रमाणे देशाच्या विविध राज्यामध्ये सरकार चालते. एका विशिष्ट पध्दतीने काम चालत असल्यामुळे त्यामध्ये लोकशाहीचे वैभव आपल्याला दिसते.. त्या लोकशाहीच्या चौकटीमध्ये काम करीत असतांना केंद्र सरकार, राज्य सरकारच्या काही योजना मंजूर होत असतील परंतु त्यांची अंमलबजावणी ही एक जटिल समस्या अनेक वर्षापासून होती. सर्वसामान्य माणसापर्यंत त्या योजनेचा फायदा पोहोचेपर्यंत वर्षानुवर्षे जायचे. उदा. राज्यामधील एखाद्या गावामध्ये राबवावयाची योजना या सभागृहामध्ये मंजूर झाली तर तिचा फायदा मिळेपर्यंत वर्ष - 2 वर्षे लागायची. त्याकरिता आपण डीपीडीसी सक्षम केली. त्या सक्षम केलेल्या डीपीडीसीच्या माध्यमातून त्या जिल्हयातील प्रत्येक गावाच्या विकास साध्य करणे हे आपल उद्दिष्ट होते. आपण या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पाहिलेतर गेल्या 2009-10 या वर्षी 2500 कोटींचा आराखडा होता. आणि या अर्थसंकल्पामध्ये या वर्षासाठी 3816 कोटींनी म्हणजे 53 टक्के त्यामध्ये वाढ झाली आहे. हे कशाचे द्योतक आहे? या लोकशाहीची फळे, विकासाची फळे शेवटच्या घटकापर्यंत, सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या पवित्र भावनेने घेतलेल्या निर्णयाचे आपण स्वागत केले पाहिजे. परंतु विरोधी पक्षाचे माननीय सदस्य या गोष्टींचे स्वागत कसे करतील? हे सर्व विषय सोडून त्यांना अमिताभ बच्चन आठवला. या अर्थसंकल्पामध्ये बोलण्यासारखे जर बरेच काही असते तर कदाचित या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. भाई जगताप...

सभागृहामध्ये विरोधी पक्षाच्या बाजूला माननीय सदस्यांची उपस्थिती पहावयास मिळाली असती. या राज्याच्या विकासाचा ध्यास घेऊन डीपीडीसीच्या माध्यमातून, तालुका पंचायत समितीच्या माध्यमातून गावचा विकास साध्य करावयाच्या पवित्र भावनेने या आराखडयामध्ये 53 टक्के वाढ करण्यात आली आहे. त्यामध्ये अनेक गोष्टी आल्या असून मी त्याच्या डिटेलमध्ये जाणार नाही. माझे सहकारी त्या विषयावर बोलतील.

सभापती महोदय, या राज्याच्या विकासाची गती वाढविण्यासाठी जनहिताच्या दृष्टीने या अर्थसंकल्पामध्ये काय केले आहे? आपण अनेक वेळा पाहिले की, या सभागृहात दोन्ही बाजूकडून पोटतिडिकीने प्रश्न विचारले जातात. आपण योजना तयार करतो, परंतु त्या योजनेसाठी आर्थिक तरतूद करण्यात येते. ती तरतूद केल्यानंतर प्रत्यक्षात त्या योजनेची अंमलबजावणी त्याठिकाणी होते काय? कदाचित त्यामध्ये कालावधी थोडा मागेपुढे होतो. म्हणून या अर्थसंकल्पामध्ये राज्याच्या विकासाची गती वाढविण्याच्या दृष्टीने व जनहिताच्या दृष्टीने योजनेची अंमलबजावणी कशापध्दतीने होत आहे, व त्या योजनेचा फायदा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो की नाही हे पहाणे महत्वाचे ठरेल. आणि त्यासाठी त्या योजनेचे यंत्रणेमार्फत मूल्यमापन करुन निधी उपलब्ध करुन दिला आहे. सभापती महोदय, केवळ कागदावर योजना केल्या नाही तर त्या योजना विहित मुदतीत पूर्ण केल्या पाहिजेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

त्या कुठपर्यंत आलेल्या आहेत याचे आत्मपरिक्षण करुन, याठिकाणी केवळ तरतूदच नाही तर वेगळया निधीची देखील तरतूद करण्यात आलेली आहे. याठिकाणी विरोधी बाकावरील शिवसेनेच्या गटनेत्यांनी भाषण करताना सार्वजनिक आणि खाजगी भागीदारांचा उल्लख केला. मी याठिकाणी नम्रपणे सांगतो की, या देशाने, आपण सर्वांनी हे समीकरण स्विकारलेले आहे. आमची प्रगती कशी वाढेल, आमच्याकडे काही मर्यादित रिर्सोसेस आहेत, ते वापरत असताना अधिकची प्रगती गाठावयाची असेल तर आपल्याला अशा प्रकारे सार्वजनिक आणि खाजगी भागीदारांना ज्याला आपण पी.पी.पी.म्हणजे पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप म्हणतो,यामुळे विकासाची गती वाढलेली आहे. बी.ओ.टी.आहे म्हणून या गोष्टींचे स्वागत केले नाही. त्यांनी दुसऱ्याच भलत्या गोष्टीचे स्वागत करावयाचे ठरविले. मागच्या चार वर्षापासून राज्यात बारा जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी दोन तालुक्यामध्ये मानव विकास दर सुधारण्यासाठी 60 ते 65 कोटी रुपये खर्च करुन आपण हा कार्यक्रम हातामध्ये घेतला होता. कारण माननीय राज्यपालांनी सुध्दा अभिभाषणामध्ये याचा उल्लेख केला होता. म्हणून त्याला महत्व देऊन, एवढेच नव्हेतर तर आपले आद्य कर्तव्य समजून या योजनेसाठी जवळजवळ 172 तालुक्यांमध्ये हा निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणा मध्ये देण्यात आलेली काही मार्गदर्शक तत्वे, आपली जबाबदारी आणि कामाची गती वाढविण्यासाठी सुध्दा सरकारने जे काम केलेले आहे, त्याबद्दल माननीय मंत्री महोदय तुम्ही नक्कीच अभिनंदनास पात्र आहात.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेबाबतीत सांगावयाचे आहे. यापूर्वी मी पाच वर्षे विधानसभेमध्ये होतो. या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या बाबतीत जेव्हा-जेव्हा चर्चा झाल्या, त्यावेळेला सगळयांनी टाहो फोडून म्हणा किंवा हे विधान परिषद असल्याने, हा शब्द येथे वापरणे योग्य आहे की नाही हे मला माहिती नाही. परंतु बेंबीच्या देठापासून सगळेजण ओरडून सांगत होते, म्हणजे आमची महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजना यांनी संपविली अशा प्रकारची भाषणे रेकॉर्डवर आहेत. तशी ती येथेही झाली असतील. त्यावेळी देखील सरकारने आश्वासन दिले होते. खरे म्हणजे आपल्या सर्वांना अभिमान वाटला पाहिजे की, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या बाबतीत सांगावयाचे तर आपला कित्ता देशाने गिरवलेला आहे. म्हणून आम्ही पुरोगामी महाराष्ट्र आहे असे म्हणतो. परंतु आपल्याला वाटते तेच खरे आहे, आपल्याला जे

. . . .2 झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . . .

वाटते तसेच घडणार आहे असे गृहीत धरुन विरोधी पक्षाच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांकडून वक्तव्ये करण्यात येतात. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना तर आहेच आहे, परंतु महाराष्ट्र राज्य रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत 1398 कोटी रुपयांचा नियतव्यय याठिकाणी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. म्हणून कष्टकऱ्यांच्या हाताला काम दिले पाहिजे, परंतु सरकार एवढ्यावरच थांबले नाही तर रोजगार हमी योजनेच्या बाबतीत मी आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विधानसभेमध्ये विचार मांडले आणि येथेही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात बोलत असताना आम्ही सूचना दिल्या होत्या.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप.....

तत्कालीन असलेला रोजगाराचा रेट वाढविला पाहिजे. त्याप्रमाणे तो वाढविण्यात आला. रोजगाराचा रेट 60 रुपये होता तो 100 रुपयापासून 120 रुपये करण्यात आला. खऱ्या अर्थाने कष्टकऱ्याच्या हाताला काम दिले पाहिजे आणि त्याचा योग्य मोबदला त्याला दिला पाहिजे या भावनेतून शासनाने या रोजगार हमी योजनेच्याबाबतीत जी तरतूद केलेली आहे तिचे मी स्वागत करतो. सभापती महोदय, महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत प्रत्येक तालुक्यात सरासरी 200 शेततळी याप्रमाणे 70400 शेततळयांचे काम हातामध्ये घेण्यात आलेले आहे. (अडथळा) सभापती महोदय, पाण्याच्या प्रश्नाच्या नियोजनाच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख करण्यात आला म्हणून मी त्यावरही थोडासा दृष्टीक्षेप टाकणार आहे आपणही तो टाकाल. पाणी तुम्हाला आणि आम्हाला तयार करता येत नाही. म्हणून आहे ते पाणी, पडणारे पाणी, महाराष्ट्रातील पर्जन्यमानाचे कसे नियोजन करता येईल याचा वर्षभराचा एक रोडमॅप या अर्थसंकल्पामध्ये मांडला गेला आहे. या राज्यातील कष्टकऱ्याला काम द्यावयाचे असेल, शेतकऱ्याला काम द्यावयाचे असेल,त्याला सक्षम करण्याचे काम असेल, तरुणांना सक्षम करण्याचे काम असेल, कामगारांच्या दृष्टीने कायद्याची पूर्तता करावयाची असेल त्या बाबतीत भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आपल्या सगळयांची जी श्रध्दास्थाने आहेत, आपण ज्या ठिकाणी श्रध्देने डोके टेकतो, या श्रध्दास्थळांच्या विकासासाठी अनेक प्रकारच्या योजना तयार करण्यात आलेल्या आहेत. फक्त योजनाच नाही तर या योजनांसाठी लागणाऱ्या पैशाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये श्रीक्षेत्र देहू असेल, आळंदी असेल, भंडारा डोंगर असेल या सगळयांबरोबर शेगाव असेल, पैठण असेल या सगळयासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, मला याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांचे आभार व्यक्त करावे लागतील आणि आपल्याला धन्यवादही द्यावे लागतील कारण. कोकणातील तीर्थक्षेत्रांकडे फारसे कधी पाहिले गेले नव्हते. तथाकथित युती सरकार असतानासुध्दा पाहिले गेले नव्हते. ज्या भराडी देवीला त्या सरकारमध्ये असलेले तिकडे जाऊन श्रध्देने नतमस्तक होतात. आम्हीही होतो. पण त्या भराडी देवीच्या विकासाच्या बाबतीत कोणाच्या मनामध्ये काहीच आले नव्हते. या सरकारने ते काम केले. भराडी देवीच्या यात्रेच्या वेळी लाखो भाविक त्याठिकाणी येतात. या भराडी देवीच्या विकासाठी दोन कोटी रुपयाची तरतूद केली आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

(अडथळा) या भराडी देवीच्या विकासास सुरुवात झाली असे डॉ. दीपक सावंत आपल्याला वाटत नाही काय?आपण कधी तरी 'हो' म्हणा. या शासनाने काही तरी सुरुवात केलेली आहे. (अडथळा) तुम्ही कुणकेश्वरचे म्हणता आहात. कुणकेश्वरच्या बाबतीतसुध्दा दोन कोटी रुपयाची तरतूद झालेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जगताप कुणकेश्वरच्या बाबतीत सांगत आहेत. त्याबाबतीत मी माझ्या भाषणामध्ये सांगेन पण युतीच्या काळामध्ये काय झाले यापेक्षा गेली पाच वर्ष आणि आता पुढची पाच वर्षे आपल्याला मिळालेली आहेत. एवढया कालावधीमध्ये भराडी देवीच्या विकासासाठी आणि कुणकेश्वरच्या विकासासाठी दोन कोटी रुपये दिले तर एवढी महती गायचे कारण नाही. कम्पॅरिटिव्हली बाकीच्या ठिकाणांचा विचार केला तर साडेतीनशे ते चारशे कोटी रुपये तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील सगळी देवस्थाने सारखी आहेत.त्यामुळे अशा प्रकारचे स्टेटमेंट करणे योग्य नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, नेमकी हरकत कशा बद्दल आहे हेच मला कळले नाही. सरकारने आमच्या श्रध्दास्थळांना मदत करण्याची भूमिका स्वीकारलेली आहे त्यालाच जर यांची हरकत असेल तर परमेश्वरच यांना माफ करो. भराडीदेवी यांना माफ करो. कुणकेश्वर यांना माफ करो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला याठिकाणी असे सांगावयाचे आहे की, सगळी श्रध्दास्थाने सारखी आहेत त्यामुळे या तरतुदीच्या बाबतीत सर्वत्र समन्वये असणे आवश्यक आहे.

श्री. भाई जगताप : बरोबर आहे, मी त्यावर बोलणार आहे. शिर्डीपासून, पैठणपासून या सगळया श्रध्दास्थांनाना मदत करण्याची सुरुवात अशीच दोन-दोन, तीन-तीन कोटी रुपयापासून पाच-पाच कोटी रुपयापर्यंत तरतूद झालेली आहे. एकदम तीनशे कोटी रुपये मदत करण्यात आलेली नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

या राज्याचा विकास करीत असताना तसेच या राज्याच्या सगळ्या भावना जपत असताना असे कधी झाले नाही. तुळजापूर असेल हे सर्व आपल्या राज्याचे वैभव आहे. आपल्या मराठी मनाचे ते वैभव आहे. आमचे लोटे-परशुराम कोणाला माहीत नव्हते. मी माननीय अर्थमंत्री तसेच माननीय अर्थराज्यमंत्री या दोघांचेही अभिनंदन करतो. हे कोणाच्या लक्षात नव्हते. त्यांनी ते लक्षात आणून दिले. शिवकालीन असलेले परशुरामाचे मंदिर आहे. काही सन्माननीय सदस्य शिवाजी महाराजांच्या मंदिराचा उल्लेख करीत आहेत. आपण आणि आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतो त्यांच्या नावाचा उदोउदो करतो. ज्यावेळी युतीचे राज्य आले त्यावेळी ते मंदिर त्याच ठिकाणी होते. शिवाजी महाराजांचे एकमेव शिवकालीन मंदिर आहे. ते काही दहा वर्षात तयार झालेले नाही. त्याला शेकडो वर्षे झाली. मध्यंतरी शिवशाहीच्या नावाने आपण साडेचार वर्षे राज्य केले. परंतु त्या ठिकाणी साडेचार रुपयांची सुध्दा तरतूद करु शकला नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु भावनिक प्रश्न तयार करावयाचे, भावना बोलावयाची आणि या ठिकाणी नोंद घेणारे जे अदृश्य असतात त्यांच्याकडून दुर्दैवाने तेवढेच चौकटीत छापून येते. आपला आणि आमचा वाद असण्याचे कारण नाही. आमचे काही चुकले आणि ते दाखविले तर त्यामध्ये सुधारणा करण्याचा आम्ही प्रयत्न करु. परंतु हा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा अर्थसंकल्प आहे असे जर मी म्हटले तर त्यामध्ये अतिशयोक्ती आहे असे कोणाला वाटू नये. या ठिकाणी उल्लेख करीत असताना अनेक योजनांच्या बाबतीत मी स्पष्ट करु इच्छितो. विदर्भाच्या बाबतीत या ठिकाणी तावातावाने बोलले जाते आणि ते बोलावयास पाहिजे. विदर्भाचा अनुशेष असेल, तेथील भौगोलिक परिस्थिती असेल त्याबाबतीत बोलावयास पाहिजे. पण फक्त बोलून चालणार नाही. या ठिकाणी तरतूद केलेली आहे. विदर्भ, मराठवाडा विकास पॅकेज असेल किंवा विदर्भ विकासाच्या दृष्टीने करावयाच्या बाकीच्या योजना असतील त्याबाबत यामध्ये नुसते बोलले गेले नाही तर तशा तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, या राज्याला जवळजवळ 740 कि.मी.चा समुद्र किनारा आहे. याबाबत कधी तरी चर्चा झाली होती काय ? आपल्याला त्याही काळात काही तरी करता आले असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

सागरी हायवे असेल किंवा अन्य तत्सम योजना असतील, या चारपाच जिल्ह्यांना जोडणाऱ्या योजना असतील त्या सगळ्या बाबतीत नुसते जाहीर केले नाही तर त्यासाठी तरतुदी केलेल्या आहेत. यामध्ये आपण जर पाहिले तर जवळजवळ 79 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये कष्टकऱ्यांसाठी, मासेमारी करणाऱ्या घटकांसाठी, मासे उतरविण्याकरिता असलेल्या 30 जेटी असतील, शीतगृह असेल, मासे सुकविण्यासाठी ओटी असतील या सगळ्या गोष्टींसाठी या ठिकाणी तरतूद करण्यात आलेली आहे. मी कर्जमाफीबद्दल फार बोलणार नाही. 72 हजार कोटी रुपये म्हणजे त्यामध्ये किती शून्य असतात हे मला कोणी विचारले असते तर सांगता आले नसते. मी माझ्याबद्दल बोलतो. काही हुशार सन्माननीय सदस्य असतील ते म्हणतील की, आम्हाला माहीत आहे म्हणून मी माझ्याबद्दल बोललो. आपण या देशातील एखादे राज्य तरी दाखवावे. या ठिकाणी 72 हजार कोटी रुपये आले. केवळ ते आलेच नाही तर ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे पवित्र काम या सरकारने केले.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मी हे लक्षात आणून देत आहे की, 72 कोटी रुपये संपूर्ण देशासाठी आहेत. त्यापैकी 7 हजार कोटी रुपये राज्यासाठी आले आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, यापेक्षा अधिक महत्वाचे प्रश्न पुढे आहेत....

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, पहिल्या वक्त्यांना अधिक वेळ दिला जातो. आमचा नंबर सर्वात शेवटी आल्यावर आम्हाला अतिशय अपुरा वेळ उपलब्ध होतो. त्यामुळे आम्हाला घाईघाईने बोलावे लागते. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण कोणत्या सन्माननीय सदस्यांना किती वेळ दिला आहे ते सांगावे. सभापती महोदय, महिलांवर अन्याय होऊ नये.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, राज्यात अल्पभूधारक शेतक-यांचा प्रश्न होता. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटना घडल्या आहेत, तो प्रश्न महत्वाचा आहे. या प्रश्नासंबंधी सरकारने 7,500 कोटींची तरतूद केलेली आहे. शासन केवळ घोषणा करुन थांबले नाही तर त्या लाभधारकाला मदत मिळावी या भावनेतून ही तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, या भाषणात जीवनदायी योजनेचा उल्लेख केलेला आहे. या योजनेचे पूर्वीचे निकष बदलण्यात आले आहेत. ही योजना आता राजीव गांधी जीवनदायी योजना नावाने कार्यान्वित होत आहे. या शासनाने सर्वात महत्वाचा ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. तो म्हणजे राज्यातील बीपीएल खालील लोकांची व्याप्ती वाढविली आहे. आता केशरी कार्डधारकांना सुध्दा या योजनेत सामावून घेतले आहे. सर्वसामान्य, कष्टकरी लोकांना या जीवनदायी योजनेच्या माध्यमातून न्याय देता येईल.

सभापती महोदय, राज्याच्या अर्थसंकल्पावर बोलत असताना मला आणखी एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. क्रीडा, सांस्कृतिक वारसा या सगळयांचा या भाषणात उल्लेख केला आहे.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.भाई जगताप.....

सभापती महोदय, सचिन तेंडुलकर याचा तुम्हाला, आम्हाला व क्रिकेट विश्वाला अभिमान वाटतो. हा उगवता तारा सगळयांना हवा हवासा वाटतो. परंतु काही दिवसांपूर्वी सचिन तेंडुलकरवर टीका केली जात होती. सचिन असा कसा म्हणू शकतो, अशी भाषा त्यावेळी वापरली गेली. पण त्या टीकेला त्याने बॅटद्वारे उत्तर दिले आहे. त्या टीकेच्या खोलात मी जात नाही. पण तुम्हाला आणि आम्हाला, महाराष्ट्राला नव्हे तर संपूर्ण देशाला व क्रिकेट विश्वाला त्याचा अभिमान आहे. क्रिकेट विश्वाचे ते वैभव आहे. सचिन तेंडुलकरच्या नावाने राज्यामध्ये एक भव्य क्रीडा संग्रहालय स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय सरकारने घेतलेला आहे. यासाठी निधीची तरतूद केलेली असल्यामुळे मी माननीय अर्थमंत्र्यांना धन्यवाद देतो.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे. सर्व सन्माननीय सदस्यांना इतका वेळ द्यावयाचा झाल्यास दोन दिवसात ही चर्चा संपणार नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या अर्थसंकल्पीय भाषणात आणखी महत्वाचे निर्णय नमूद केलेले आहेत. ज्यांनी महाराष्ट्राचे वैभव वाढविले आहे, ज्या विभूती आहेत त्यांचे स्मारक उभे केले जाणार आहे. कर्मवीर मा.सा.कन्नमवार, पद्मभूषण डॉ.जे.पी.नाईक, नरहर कुरुंदकर, नानासाहेब धर्माधिकारी, कान्होजी आंग्रे, संताजी धनाजी यांची स्मारके उभी केली जाणार आहेत. या सगळया स्मारकांची घोषणा केली आहे असे नाही तर त्यासाठी निधीची तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीची नोंद

(श्री. भाई जगताप ...

या सरकारने अतिशय चांगला ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हिंदवी स्वराज्याचे प्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी जीवनकार्याचे सर्वांना स्फूर्तीदायक दर्शन व्हावे, यासाठी हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडच्या पायथ्याशी वीरमाता जिजामातेच्या वास्तव्याने पुनित झालेल्या पाचाड, जिल्हा रायगड येथे शिवसृष्टीचा प्रकल्प उभा करण्यात येणार आहे. हे अतिशय अभिनंदनीय काम सरकार करीत आहे. त्याचप्रमाणे अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवरायांच्या उभारवयाच्या भव्य पुतळयासंबंधी आपण नेहमी येथे बोलतो. हा शिवरायांचा पुतळा हे तुम्हा आम्हा सर्वांना आणि या देशासाठी प्रेरणास्थान आहे. पण या पुतळयासाठी या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली दिसती नाही.

सभापती महोदय, जाता जाता मी एवढेच सांगू इच्छितो की, काही विभागामध्ये पैसे वापरले गेले नाहीत. ते वापरले गेले पाहिजेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या बाबतीत जवळ जवळ 2652 कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला होता आणि सप्टेंबर2009 पर्यन्त फक्त 5.35 टक्के एवढाच निधी खर्च झाला. आपल्याकडे निधी आहे परंतु तो खर्च होत नाही, याकडे शासनाने लक्ष द्यावयास पाहिजे. असे अनेक विभाग आहेत की ते निधी पासून वंचित आहेत. विकास कामावर ठरलेल्या वेळी खर्च होत नाही. शंभर टक्के खर्च होण्यासाठी आपली यंत्रणा सक्षम करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी विकास विभागासाठी 285.61 कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित होता. परंतु खर्च 9.4 टक्के झाला. ही चिंतेची बाब आहे. प्रत्येक विभागासाठीचा नियतव्यवय एक-एक हजार कोटी रुपयांनी वाढविलेला आहे. 2652 कोटी इतका असलेला नियतव्यय 3 हजार पेक्षाही अधिक प्रस्तावित केलेला आहे. हा खर्च कसा होणार यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये करावा अशी माझी मनापासून इच्छा आहे. हा अर्थसंकल्प ख-या अर्थाने राज्यातील कष्टक-याला, राज्यातील जनतेला दिलासा देणारा तसेच आमच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक परंपरांना वैभव प्राप्त करुन देणारा, राज्यातील प्रत्येक घटकाला वैभवाची वेगळी दिशा देणारा आहे. या अर्थ संकल्पाचे स्वागत करुन मी माझे भाषण संपवितो.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उद्या एक लक्षवेधी सूचना घेतली आणि बाकीचा वेळ अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी दिला गेला तर अधिक सन्माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घेण्याची संधी मिळेल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्याचे अर्थमंत्री आणि माझे मित्र श्री. सुनील तटकरे यांनी अर्थसंकल्पामध्ये रायगडसाठी भरीव तरतूद केल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. ब-याच कालावधीनंतर नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्मारकासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. रेवदंडा हे तीर्थक्षेत्र म्हणून जाहीर करावे अशी मी गेल्या 10 वर्षापासून या सभागृहामध्ये मागणी करीत आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

म्हणून मी पहिल्यांदा माननीय अर्थमंत्र्यांचे मनापासून स्वागत करतो आणि आभार मानतो. परंतु सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, राज्य शासन तरतूद करते पण प्रत्यक्ष कोकणामध्ये ती रक्कम खर्ची पडत नाही हा आमचा मागील दहा वर्षापासून अनुभव आहे. या अर्थसंकल्पावरील चर्चेला माननीय राज्यमंत्री उत्तर देणार की कॅबिनेट मंत्री उत्तर देणार याची मला माहिती नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी धन्यवाद देतो. सभागृहात मी दहा वर्षापासून सदस्य आहे. गेल्या दहा वर्षात अशा प्रकारचे भाषण सत्ताधारी पक्षाकडील सदस्यांकडून एकदाही झालेले नाही. म्हणून मी त्यांचे खास अभिनंदन करतो. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर मंत्रीमंडळात वाढ होणार आहे असे आम्ही वृत्तपत्रात वाचले. राज्यमंत्र्यांचा चार्ज त्यांच्याकडे यावा याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना शुभेच्छा देतो. या अर्थसंकल्पामध्ये सन्माननीय सदस्य श्री.अण्णा हजारे यांनी ज्या पतसंस्था डबघाईला आल्या आहेत त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद करावी म्हणून उपोषण केले. अशा पतसंस्थांना अर्थसहाय्य करण्याची घोषणा अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी शासनाकडून करण्यात आली. परंतु अर्थसंकल्पामध्ये तशी तरतूद कुठेही दिसून येत नाही. या सभागृहात मी अनेकवेळा सांगितले आहे की, या पतसंस्थांवर रिझर्व्ह बँक किंवा नाबार्डचे नियंत्रण नाही. सहाय्यक निबंधक 5-10 हजार रुपये घेऊन त्यांना योग्य वाटेल तशा अर्थाचे निर्णय घेतात. बुलढाणा नागरी पतसंस्थेमध्ये मध्यवर्ती बँकेपेक्षा जास्त ठेवी गोळ्या केल्या गेल्या आहेत. केवळ सहाय्यक निबंधक व जिल्हा उपनिबंधक यांचेच या पतसंस्थांवर नियंत्रण आहे. त्या माध्यमातून अनेक आर्थिक घोटाळे होत आहेत. पतसंस्थांना ठेवी स्वीकारण्यासाठी मर्यादा घालून दिली पाहिजे. कमाल 10 कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी स्वीकारता येणार नाहीत असे बंधन घातले पाहिजे. पतसंस्था या अर्बन किंवा शेड्यूल्ड बँका नाहीत. या पतसंस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तसे नियंत्रण घालण्याबाबत अर्थसंकल्पामध्ये कुठेच उल्लेख झालेला नाही. राज्यात अनेक पतसंस्थांमध्ये करोडो रुपयांचे घोटाळे झाले आहेत, अजूनही होत आहेत. या पतसंस्थांवर ताबडतोब नियंत्रण ठेवून ठेवी स्वीकारणे व कर्ज वितरण यावर मर्यादा घातल्या पाहिजेत. राज्याच्या अर्थसंकल्पातील रक्कम अपुरी पडेल एवढ्या मोठ्या रक्कमेचे घोटाळे पतसंस्थांच्या माध्यमातून झालेले आहेत. या संदर्भात मी माननीय अर्थराज्यमंत्री यांच्याबरोबर चर्चा केली. या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

पतसंस्थांमध्ये स्थैर्य आणण्याच्या दृष्टीकोनातून किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी या पतसंस्था नाबार्ड वा रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली आणण्याचे काम राज्य शासनाने केले पाहिजे. मी या सभागृहाचा सदस्य आणि तसे सभापती महोदय, आपणही सदस्य आहात. तालुका किंवा जिल्हा स्तरावर विधानपरिषद सदस्यांना समित्यांमध्ये स्थान दिले जात नाही.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

नुकतीच मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यामुळे एक-एका मतदारसंघात तीन-तीन, चार-चार तालुक्यांचा समावेश होतो. काही मतदारसंघात तर पाच तालुके सुध्दा आहेत. विधानसभा सदस्य श्री. धैर्यशील पाटील यांच्या मतदारसंघात तर 4 तालुक्यांचा समावेश आहे. या निमित्ताने मी शासनाकडे अशी मागणी करतो की, प्रत्येक तालुक्यातील आमदार हा तेथील समन्वय समितीचा चेअरमन असतो. परंतु एका मतदारसंघात अनेक तालुके असल्याने इतर ठिकाणी मात्र शासनाकडून, सत्ताधारी पक्षाचा, जी व्यक्ती निवडून आलेली नसते त्यांच्याकडे इतर तालुक्यांच्या कमेटीचे चेअरमनपद दिले जाते. माझी अशी मागणी आहे की, विधानपरिषद सदस्याला त्यातील एका तालुक्याच्या ठिकाणचे कमिटी चेअरमनचे पद दिले पाहिजे. जेणेकरुन या सर्वोच्च सभागृहाचा दर्जा राखला जाईल. या सदनात माननीय राज्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्री देखील उपस्थित आहेत. त्यांनी कॅबिनेटच्या बैठकीत आमची भूमिका सांगावी व आमच्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचवाव्यात अशी मी त्यांना विनंती करतो.

महोदय, मी मंत्रालयात फारच कमी वेळा जात असतो आणि कमीत कमी मंत्र्यांना भेटतो. ज्यावेळी एक आमदार म्हणून आपल्या भागातील प्रश्नांच्या बाबतीत मंत्री महोदयांसोबत चर्चा करण्यासाठी आम्ही जात असतो त्यावेळेस मंत्र्यांकडे बरेच कार्यकर्ते आलेले असतात, अधिकारी असतात त्यामुळे आम्हाला आमच्या प्रश्नांच्या बाबतीत बोलता येत नाही. अथवा अधिकाऱ्यांची तक्रार वगैरे करावयाची असेल तरी देखील खाजगीतही चर्चा करता येत नाही. अँटी चेंबरमध्ये सुध्दा हीच परिस्थिती आहे. त्याचबरोबर काही मंत्री तर मंत्रालयात 1-1, 2-2 महिने येतच नाहीत. बंगल्यावरच बसून असतात. बंगल्यावर त्यांना भेटण्यासाठी गेलो तर आम्हाला सांगण्यात येते की, "साहेब झोपलेले आहेत", "साहेब आंघोळीला गेले आहेत", "साहेब खाजगी चर्चा करीत आहेत" अशा प्रकारे कारणे दाखवून बोळवण केली जाते. म्हणून या निमित्ताने मी अशी सूचना करणार आहे की, शासनाने मंत्रालयात एक दिवस फक्त आमदारांच्या तक्रारी, त्यांच्या अडचणी वगैरे ऐकून घेण्यासाठी राखीव ठेवला पाहिजे. त्या दिवशी कितीही काम असो अथवा नसो तसेच कुठलीही बैठक न घेता त्या दिवशी आमदारांचे प्रश्न ऐकून घेतले पाहिजे. सध्या तर अशी परिस्थिती आहे की, मंत्री महोदयांची बैठक सुरु आहे असे सांगून मंत्र्यांच्या दालनाच्या बाहेरुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

किंवा बंगल्यावरुन शिपाई सुध्दा बाहेर काढतो. त्या विभागाचा सचिव सुध्दा धक्का मारुन निघून जातो अशी वेळ राज्यकर्ते असून आज आमदारांवर आली आहे. मंत्र्यांची भेट मिळत नाही म्हणून खऱ्या अर्थाने आमचे प्रश्न सोडविण्यासंबंधी चर्चा करता यावी म्हणून आठवड्यातून किंवा 15 दिवसातून एक दिवस फक्त आमदारांनाच भेटणार व त्या दिवशी कोणतीही शासकीय बैठक घेऊ नये असा निर्णय शासनाने घेतला पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ...

सभापती महोदय, सहकारी तत्वावर चालणारे सहकारी साखर कारखाने विकण्याचा सपाटा राज्य मध्यवर्ती सहकारी बॅकेने व राज्य शासनाने चालविला आहे . ज्या क्षेत्रात सहकारी साखर कारखाने बंद आहेत त्या क्षेत्रातील शेतकऱ्यांनी जर सहकारी साखर कारखाना चालविण्याची मागणी केली तर तो कारखाना सुरु करण्याची परवानगी दिली पाहिजे आणि त्यासाठी अर्थसहाय्य दिले पाहिजे अशी मला या निमित्ताने मागणी करावयाची आहे.

सभापती महोदय, हे कारखाने शेतकऱ्यांचे होते परंतु तेथील व्यवस्थापनाने ते बुडविले आहेत. राज्य सहकारी बॅकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या बैठकीमध्ये मी अशी मागणी केली होती की हे कारखाने ज्याने बुडविले आहेत त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती त्या कारखान्याची सभासद म्हणून राहता कामा नये तसेच कारखान्याच्या कोणत्याही समितीवर त्याने राहता कामा नये या संदर्भात कायद्यात तरतूद करण्यात आली पाहिजे.तेव्हा मी केलेली मागणी राज्य सरकारने प्रत्यक्षात कार्यवाहीत आणावी. खाजगी कारखाने चांगल्या प्रकारे चालविले जाऊ शकतात. त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातील श्री. विनय कोरे आणि माननीय जल संपदा मंत्री श्री अजित पवार हे विदर्भात आणि मराठवाडयात जाऊन कारखाने चालवू शकतात तर त्या भागातील शेतकरी हे कारखाने का चालवू शकत नाहीत ? याचा विचार केला पाहिजे. त्या भागातील शेतकरी जर साखर कारखाने चालवू शकत नसतील तर ते राज्य शासनाचे अपयश आहे तसेच तेथील पुढा-यांचे अपयश आहे असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते. ज्यांनी हे कारख्ाने बुडवले आहेत त्यांना त्या संस्थेमध्ये सभासद म्हणून ठेवता कामा नये. त्याचबरोबर बंद असलेले कारखाने त्या भागातील शेतक-यांना चालविण्यासाठी शासनाने परवानगी दिली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, धुळे जिल्हयातील साक्री येथील सहकारी साखर कारखाना बंद प्डला असून तो चालविण्यासाठी परवानगी देण्यात यावी अशा प्रकारची मागणी शेतक-यांनी केली आहे.राज्य शासन आणि महाराष्ट्र राज्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक तो कारखाना विकण्याचा प्रयत्न करीत आहेत या कारखान्यावर 150 कोटी रुपयांचे कर्ज असतांना 10 कोटी रुपयास तो कारखाना विकला जात आहे तेव्हा हा प्रकार थांबविण्यात आला पाहिजे. कारखान्यामध्ये गुंतविण्यात आलेले कराडो रुपये हे जनतेचे पैसे आहेत . कारखाना चालविणा-यांनी या पैशाची लयलूट केली

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ...

होती. काही जणांनी गाडया खरेदी केल्या, काही जणांनी तमाशावर पैसे खर्च केले, कोणी बा-यांवर पैसे उडविले हे किस्से ऐकल्यानंतर आम्हाला अत्यंत वाईट वाटते. कोणी मराठवाडयातून चौफुल्याला येतात आणि त्या ठिकाणी पैसे उडवितात. आम्ही बैठकीत बसलो असतांना ऊस तोडणीकरिता किती पैसे द्यावयाचे हा विषय चर्चेला आल्यानंतर त्या रकमेतील 25 टक्के रक्कम चौफुल्यावर खर्च करण्यासाठी जाईल असे आम्ही ऐकले होते .ही गोष्ट काही बरोबर नाही त्यामुळे हे प्रकार थांबविण्यात आले पाहिजे आणि त्या संदर्भात या अर्थसंकल्पात ठोस असे धोरण असावयास पाहिजे परंतु तसे दिसून येत नाही असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सभापती महोदय, या साखर कारखान्याची पुनर्उभारणी करु शकतो व त्या भागातील शेतक-यांना न्याय देऊ शकतो असे मला वाटते.

सभापती महोदय, अतिरेक्यांचा मोठया प्रमाणावर अतिरेक झाला असल्याचे आज दिसून येत आहे.सागरी तट बंदीच्या दृष्टीकोनून शासनाने स्पीड बोटी खरेदी केल्या असून त्या संबंधी या पूर्वी मी सभागृहात बोललो होतो.स्पीड बोटीसंबंधी मला थोडेसे ज्ञान आहे. शासनाने या स्पीड बोटी खरेदी करीत असतांना त्याच्या दर्जाकडे लक्ष दिले नाहीत. ॲल्युमिनियमच्या स्पीड बोटी खरेदी न करता फायबरच्या स्पीड बोटी खरेदी केल्या आहेत . त्यामुळे अतिरेक्यांनी जर गोळी मारली तर पाच मिनिटामध्ये ती स्पीड बोट बुडणार आहे. त्यासबंधी शासनाने कोणतीही काळजी घेतलेली नाही मला जेव्हा संधी मिळेल तेव्हा मी या संबंधी विस्तृतपणाने बोलणार आहे. ज्या बोटी खरेदी करण्यात आलेल्या आहेत त्याकरता जेटी बांधण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे या बोटी कोठे उभ्या करण्यात येणार आहेत.? पावसाळयामध्ये या बोटी कोठे उभ्या करावयाच्या.? पाऊस पडत असल्यामुळे अतिरेकी येथे येण्याचे थांबणार नाही. ज्या ठिकाणी बारमाही धक्के होऊ शकतात , ज्या ठिकाणी ओपन सी नाही , त्या ठिकाणी सागरी पोलीस स्टेशन उभारण्याची गरज आहे. परंतु आज सागरा पासून दूर अंतरावर सागरी पोलीस स्टेशन आहे. मांडव्याचे सागरी पोलीस स्टेशन सागरा पासून तीन किलोमिटर्स अंतरावर आहे. त्यामुळे जर अतिरेकी सागरी मार्गाने आले तर या पोलिसांना कसे कळणार ? सागरी किना-यावर फक्त दोनच पोलीस असतात त्यामुळे त्यांची संख्या देखील वाढविण्यात आली पाहिजे.ज्या ठिकाणी खाडया आहेत, ज्या ठिकाणी बारमाही धक्के आहेत त्या ठिकाणी सागरी पोलीस स्टेशन असले पाहिजे ...

नतर श्री.सरफरे

अशुद्धलिखित प्रत / ऑफ दि रिकॉर्ड नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, मुंबईलगत जो खुला समुद्र आहे, त्या खुल्या समुद्रामध्ये 7 महिने स्पीड बोटी चालू शकत नाहीत. तुमच्यासाठी हे अतिरेकी 7 महिने थांबणार आहेत काय? मुंबईवर त्यांचा होणारा हल्ला थांबणार आहे काय? म्हणून मी आपणास निश्चितपणे सांगतो की, याबाबत एक वेगळे धोरण ठरविले पाहिजे, याकरिता परदेशामधील तज्ज्ञ व त्यांच्याकडील ज्ञान आपल्याला आत्मसात करावे लागेल. तरच आपल्याला यावर खऱ्या अर्थाने नियंत्रण ठेवता येईल.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपविणार आहे. याठिकाणी माननीय सदस्य श्री. भाई जगताप म्हणाले की, आपण महागाईबद्दल बोलले पाहिजे. होय, आम्ही महागाईबद्दल जरुर बोलू. महागाई वाढलेली आहे हे आपण कबूल करीत आहात. ही महागाई कुणी लादली? मी युती सरकारचे समर्थन करीत नाही. त्यांना तर साडे चार वर्षे मिळाली होती. परंतु आपण याठिकाणी साठ वर्षे राज्य करीत आहात. या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून या देशावर व राज्यावर तुम्ही राज्य करीत आहात. त्यामुळे मागील साडे चार वर्षाच्या कालखंडामध्ये विरोधी पक्षाचे सरकार सत्तेवर आले म्हणून आपण त्यांच्यावर टीका करु शकत नाही. मी जाहीरपणे सांगतो की, मी फक्त कॉंग्रेसच्याच विरोधात आहे. तुम्हाला पाहिजे तेव्हा तत्वज्ञान सुचते, तुम्हाला पाहिजे तेव्हा तुम्ही स्वत:ला धर्मनिरपेक्ष समजता? माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, याठिकाणी राजकारणावर बोलत असतांना मी वयाच्या आठव्या वर्षापासून डाव्या विचारानी वाढलेला माणूस आहे. म्हणून मी निश्चितपणे सांगतो की, हे तत्वज्ञान मांडण्याचे व्यासपीठ नाही. मी आपणाला निश्चितपणे सांगतो की, महागाई वाढलेली आहे. आपण ज्या कष्टकऱ्यांचे नाव याठिकाणी घेता तो कोणत्या जीवनमानामध्ये जगतो हे आपण बघा.

सभापती महोदय, या राज्यातील सर्वसामान्य मध्यमवर्गीयांचे विजेचे बिल त्याच्या उत्पन्नातील 25 टक्के रक्कमेने भरावे लागणार आहे. विजेचे दर याठिकाणी वाढलेले दिसत नसले तरी अप्रत्यक्षपणे वेगवेगळया बाबींवरील विजेचे कर त्याच्या बिलामध्ये लावले जात आहेत. सर्वसामान्य गरीब, आदिवासी माणूस हा दररोज 2 तास विजेचा दिवा लावतो व नंतर तो बंद करतो अशी परिस्थिती आहे. पुढील महिन्यात डाव्या पक्षांच्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने विजेच्या बिलाच्या बाबतीत तीव्र आंदोलन करणार आहोत.. आणि म्हणून मी याबाबत पूर्ण अभ्यास करुन याठिकाणी सांगतो की, वीज ही आज गरीबांची राहिलेली नाही तर ती श्रीमंतांसाठी राहिलेली आहे. म्हणून मी निश्चितपणे सांगतो की, या अर्थसंकल्पामध्ये गरीबांसाठी कोणत्याही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयंत प्र.पाटील....

सोयी केलेल्या नाहीत. माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी ज्या गोष्टी याठिकाणी मांडल्या आहेत त्यांचे वाटप कसे होते याबाबत माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले आहेत. हे वाटप करीत असतांना त्यामध्ये ज्यांनी ज्यांनी भ्रष्टाचार केला आहे, ज्यांनी ज्यांनी या योजना लुटल्या आहेत त्या संदर्भात उद्या या सभागृहात तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमधील माझा पाचवा प्रश्न येणार आहे. माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, "अलिबाग येथे संजय गांधी निराधार योजनेमध्ये जिल्हा परिषदेच्या 50 कर्मचाऱ्यांना संजय गांधी निराधार योजनेचे पैसे देण्यात आले आहेत." ज्या अधिकाऱ्यांनी हा भ्रष्टाचार केला आहे त्यांना आपण अधिकार पदावर ठेवणार काय? गरीबांचे, दलितांचे पैसे लुटणाऱ्या या अधिकाऱ्यांना आपण घरी पाठविले पाहिजे. संजय गांधी निराधार योजना गरीबांसाठी आहे. महिना 30 हजार रुपये पगार घेणाऱ्याला आपण संजय गांधी निराधार योजनेचे पैसे दिले. त्याबद्दल रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी तक्रार केली की, ज्या लोकांचे पैसे घेतले त्यांचे त्यांना परत द्या. त्याबाबत तहसिलदारांनी पत्र पाठविले आहे. यासारखे आणखी उदाहरण हवे आहे काय? तेव्हा या अधिकाऱ्यांना आपण घरी पाठविणार काय? अशी अनेक भ्रष्टाचारांची प्रकरणे आहेत. तुम्ही सत्ताधारी असल्यामुळे या अर्थसंकल्पाला गोंजारले आहे. परंतु हा अर्थसंकल्प दिशाहीन आहे, या अर्थसंकल्पामधून गरीब जनतेला न्याय मिळण्याची कोणतीही छाप किंवा सावलीसुध्दा यामध्ये दिसत नाही हे मी निश्चितपणे सांगतो.

सभापती महोदय, जातां जातां एवढेच सांगतो की, या सभागृहाचे काही संकेत आहेत हे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी कोणतेही निर्णय किंवा कोणताही अध्यादेश काढावयाचा नाही. परंतु हे संकेत आपण पायदळी तुडविले. अर्थसंकल्पाच्या आठ दिवस अगोदर आपण व्हॅट वाढविला. आणि पुन्हा सांगता की, आम्ही कोणताही कर लावला नाही. हे कशासाठी? माननीय सदस्य श्री. भाई जगताप तुमच्यासारख्या कामगारांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांनी याची तरफदारी करावी याचे मला वाईट वाटते . सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. भाई जगताप हा कामगारांसाठी लढणारा नेता चुकीच्या गोष्टींचे समर्थन या सभागृहामध्ये करीत आहे. तुम्ही मंत्रीच काय मुख्यमंत्री व्हा अशी मी सदिच्छा आपणास देतो. अशाप्रकारे चुकीचे समर्थन आपण याठिकाणी करुन दिशाभूल करु नका. अशाप्रकारे सभापती महोदय, आपण या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्याची संधी दिल्याबद्दल आपणास मनापासून धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

खरोखर वाईट वाटते. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे गरीब कामगारांसाठी लढणारे एक नेते आहेत. परंतु ते या सदनामध्ये भाषण करीत असताना जे चुकीचे आहे, त्याचे ते समर्थन करीत आहेत. तुम्ही गरीबांसाठी लढा मग तुम्ही मंत्री नाहीतर मुख्यमंत्री देखील व्हाल अशा मी तुम्हाला शुभेच्छा देतो. पण तुम्ही याठिकाणी अर्थसंकल्पाचे अशा प्रकारे समर्थन करु नका. सभापती महोदयह, आपण मला अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी संधी दिली, त्याबद्दल मी मनापासून धन्यवाद देतो आणि आपली रजा घेतो.

. . . .3 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या राज्याचे सन्माननीय वित्तमंत्री आणि आमचे मित्र श्री.सुनील तटकरे यांनी विधानसभेमध्ये या राज्यातील जनतेसमोर 2010-2011 या वर्षासाठी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. तसेच विधान परिषदेमध्ये या राज्याचे सन्माननीय वित्त राज्यमंत्री श्री.विजय वडेट्टीवार यांनी अर्थसंकल्प सदनामध्ये सादर केला आहे. मी सत्ताधारी पक्षाचा सदस्य असल्यामुळे मी या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो. या राज्यामध्ये 1960 पासून 2010 पर्यंत राज्याची पुढे वाटचाल सुरु आहे. सरकारे येतात आणि जातात. मग नवीन सरकार येते. परंतु यावेळी कोकणातील माणसाला पहिल्या प्रथम या राज्याचा माननीय वित्तमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. याठिकाणी माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे उपस्थित नाहीत. परंतु ते सुध्दा कोकणातील आहेत असे मला कधी-कधी वाटते. त्यांना जो आमदार निधी मिळतो, त्यातून कोकणासाठी किती रक्कम खर्च होते याबद्दल मला कल्पना नाही. परंतु त्यांनी या अर्थसंकल्पाचे जे विश्लेषण केले आहे, ते पाहिल्यानंतर मला खरच त्यांची कीव आली आणि अशी शंका निर्माण झाली की, ते खऱ्या अर्थाने कोकणातील प्रतिनिधी म्हणून या सदनामध्ये बसतात की नाही ? त्यांनी अर्थसंकल्पाचे वर्णन करताना सांगितले की,हा रायगड जिल्हा परिषदेच्या सभापतींनी मांडलेला अर्थसंकल्प आहे असे वाटते.परंतु त्यांनी हा अर्थसंकल्प रायगड जिल्हा परिषदेच्या सभापतींनी मांडलेला आहे अशा प्रकारचे वर्णन कोणत्या हेतूने केले हे मला समजले नाही. एक गोष्ट आहे की, अर्थसंकल्पामध्ये कोकणवासियांचे गेल्या कित्येक वर्षापासूनचे जे मुलभूत प्रश्न होते,त्याची उत्तरे मिळत नव्हती, ते प्रश्न सोडविण्यासाठी निधीची तरतूद केली जात नव्हती. पण मी असे म्हणणार नाही, माझा असा दावा नाही की, या अर्थसंकल्पामुळे कोकणातील सर्व प्रश्न सुटलेले आहेत.पण या निमित्ताने कोकणातील सर्व प्रश्नांना चालना मिळाली आणि ते राज्याच्यासमोर आले. म्हणून मी माननीय वित्त मंत्री श्री.सुनील तटकरे यांचे अभिनंदन करतो. या वर्षीचा अर्थसंकल्प तुटीचा आहे, यापूर्वीचे दोन अर्थसंकल्प देखील तुटीचे होते. तसेच यावर्षी जो अंदाज व्यक्त करण्यात आला होता, त्यानुसार हा अर्थसंकल्प तुटीचा न रहाता, शिलकी अर्थसंकल्प राहील अशा प्रकारे त्याचे नियोजन करण्यात आले होते. पण दुर्दैवाने आज वस्तुस्थिती अशी आहे की, याठिकाणी 7754.50 लाख इतका तुटीचा अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

म्हणजे महसुली उत्पन्न 9743.90 लक्ष रुपये इतके दाखविण्यात आलेले आहे. आणि सन 2010-2011 चा जो खर्च दाखविलेला आहे तो साधारणत: 1,4698.91 लक्ष रुपये इतका दाखविण्यात आला आहे तसेच 7654.50 लक्ष रुपये इतकी तूट दाखविण्यात आली आहे. ही तूट दाखवत असताना ज्यावेळी वार्षिक योजना अर्थसंकल्पात नमूद केली जाते त्यावेळी त्या वार्षिक योजनेचा केवळ अंदाज नसतो तर निश्चत झालेला आकडा अर्थसंकल्पात येत असतो. यावेळी सन 2010-2011 चा वार्षिक योजनेचा जो एकंदर आराखडा देण्यात आलेला आहे तो 33,934 कोटी रुपयांचा आहे. पण त्यासंदर्भात प्रामुख्याने राज्य शासनाच्या वतीने एक भूमिका मांडावयास पाहिजे होती ती म्हणजे या वार्षिक योजनेला नियोजन आयोगाने मंजुरी दिलेली आहे.नियोजन आयोगाने मंजुरी दिल्यानंतर 33,934 कोटी रुपयाचा हा वार्षिक योजनेचा मंजूर झालेला आराखडा आहे, तो मंजूर झालेला आराखडा आणि या राज्याचे होणारे महसुली उत्पन्न आणि एकंदरीत खर्चासंबंधीची सर्व आकडेवारी द्यावयास पाहिजे होती.

सभापती महोदय, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाण आणि रत्नागिरी या पाच जिल्हयाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी 650 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. या अर्थसंकल्पाचे स्वागत करीत असताना समाजिक समतोल साधणारा सामाजिक न्यायाच्या ज्या संपूर्ण संकल्पना आपल्या मनामध्ये आहेत त्या संकल्पनेला कुठे तरी वाचा फोडणारा किंवा त्या दिशेने जाणारा हा अर्थसंकल्प आहे. सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील निरनिराळया वर्गासाठी निरनिराळया विशेष योजनांचे चांगल्या प्रकारचे नियोजन या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेले आहे. रोजगार हमी योजनेसाठी 1398 कोटी रुपये इतक्या खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे. रोजगार हमीचा कायदा या राज्यामध्ये सर्वप्रथम 1972 साली आला. देशामधील महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे की, ज्या माणसाला काम पाहिजे त्या माणसाच्या दोन हाताला काम देण्यासाठी या राज्याने 1972 साली ही योजना आणली आणि गेली कित्येक वर्षे या योजनेच्या माध्यमातून या राज्यातील निरनिराळया विकासाची कामे होत आहेत. या योजनेसाठी जवळ जवळ साडे अकराशे ते बाराशे कोटी रुपये जमा करण्यात येतात हे पैसे येतात कुठून? डॉक्टर्स, इंजिनियर्स, आर्किटेक्चर्स, प्रोफेसर, छोटे छोटे दुकानदार या सर्वाकडून प्रोफेशनल टॅक्स वसूल करण्यात येतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

तो प्रोफेशनल टॅक्स या रोजगार हमीच्या कामावर खर्च करण्यात येतो. अशा पध्दतीने ही योजना निरंतर या राज्यामध्ये सुरु आहे. या राज्याचे अनुकरण म्हणून केंद्र शासनाने काही जिल्हयांमध्ये ही योजना सुरु केलेली आहे. त्या योजनेचे स्वरुप आता व्यापक प्रमाणात झालेले आहे. केंद्र शासनाची रोजगार हमीची योजना शंभर दिवसांपुरती मर्यादित योजना आहे. मात्र महाराष्ट्र राज्याची रोजगार हमी योजना ही 365 दिवस ज्या हातांना काम पाहिजे त्या हातांना काम देणे देणारी योजना आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

जवळजवळ 1398 कोटी रुपये एवढी तरतूद या योजनेच्या अंतर्गत करण्यात आलेली आहे. छोट्या छोट्या शहरांच्या सर्व समावेशक विकासासाठी एकात्मिक योजनेकरिता 145 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तीर्थक्षेत्र विकासासाठी 494 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तुळजापूर असेल किंवा संत तकाराम महाराजांच्या परिनिर्वाणाला 400 वर्षे पूर्ण झालेली आहेत त्याबद्दलचा कार्यक्रम असेल किंवा अन्य तीर्थक्षेत्रांचा विकास असेल यासाठी तरतूद केलेली आहे. विशेषत: कोकणामध्ये चिपळूण येथील लोटे परशुराम तीर्थक्षेत्रासाठी तरतूद केलेली आहे. आंगणेवाडीसाठी 2 कोटी रुपये देण्याचा शासनाने निर्णय केलेला आहे. आंगणेवाडीला मोठ्या प्रमाणावर जत्रा भरते. कुणकेश्वरला 2 कोटी रुपये देण्याचा निर्णय झालेला आहे. कोकणातील तीर्थक्षेत्र विकासाकरिता पैसे मिळाले नसते परंतु ते मिळाले आहेत. मला असे वाटते की, या राज्याचे जे माननीय अर्थमंत्री आहेत त्यांनी पुढाकार घेतला म्हणून कोकणाला काही गोष्टी मिळालेल्या आहेत. राज्याची जी न्याय व्यवस्था आहे त्यांच्या निरनिराळया कामांसाठी 116 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यांच्या निरनिराळ्या इमारती असतील ते सुध्दा महत्वाचे काम आहे. अनेक नवीन तालुके निर्माण झालेले आहेत. त्या ठिकाणी न्यायालये नाहीत. काही सत्र न्यायालयांना इमारती नाहीत. या सर्व व्यवस्थेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी 93500 नवीन घरे बांधण्याचा कार्यक्रम या अर्थसंकल्पामध्ये घेतलेला आहे. त्यासाठी 905 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. कोकणातील काही महत्वाच्या बाबींचा उल्लेख मी या ठिकाणी करीन. विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. राज्यामध्ये सर्वात जास्त पाऊस जर कोठे पडत असेल तर महाबळेश्वर, आणि कोकणात सिंधुदुर्ग येथे पडतो. एवढा पाऊस पडून सुध्दा त्या ठिकाणी उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळत नाही अशी अवस्था आहे. त्या जिल्ह्यामध्ये शहरे वाढत आहेत. जिल्ह्यामध्ये सावंतवाडी, वेगुर्ला, मालवण अशा चार पाच नगरपरिषदा आहेत. तिलारी धरणाच्या पाण्यावर आमचा अधिकार कमी आहे. गोव्याला 75 टक्के पाणी द्यावयाचे आहे आणि 25 टक्के पाणी सिंधुदुर्गच्या वाट्याला येणार आहे. हे वाट्याला येणारे पाणी न वापरता वाहून जात आहे. त्या ठिकाणी 150 कोटी रुपये खर्च करुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

सावंतवाडी असेल, वेंगुर्ला असेल, मालवण असेल ही शहरे आणि आजूबाजूच्या परिसरासाठी पाण्याची लाईन करण्याचा उल्लेख केलेला आहे. त्यासाठी 150 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ओरोस ही सिंधुदुर्ग जिल्ह्याची राजधानी आहे. त्या ठिकाणी नर्सिन्ग स्कुलची योजना केलेली आहे. त्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे स्वागत करतो. रत्नागिरीला मत्सव्यवसाय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करावयाचे आहे. त्या ठिकाणी माध्यमिक शालांत परीक्षा केंद्र किंवा उच्च माध्यमिक शालांत परीक्षा केंद्र सुरु करण्याच्या बाबतीत या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा केली. या राज्याच्या निरनिराळ्या विभागांमध्ये अशी केंद्रे झालेली आहेत. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीच्या विद्यार्थ्यांना कोल्हापूर माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाला जोडलेले आहे. बाकी सर्व ठिकाणी विभागीय मंडळे झालेली आहेत. कोकणासाठी स्वतंत्र केंद्र करावे अशी मागणी सातत्याने आम्ही करीत आहोत. आम्ही या वर्षी केंद्र सुरु करतो, जागा पाहिलेली आहे, याबाबतीत निर्णय झालेला आहे अशी उत्तरे दिली जातात. आजही सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीच्या विद्यार्थ्यांना इयत्ता बरावीची परीक्षा असेल, इयत्ता दहावीची परीक्षा असेल त्यासाठी कोल्हापूर केंद्र आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

माझी मागणी आहे की, रत्नागिरीला ते केंद्र होणार होते त्याबद्दल शासनाने जरुर निर्णय घ्यावा. परंतु रत्नागिरीला मत्स्यव्यवसाय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे 6 ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ प्रशिक्षण शाळा व 11 जनरल नर्स मिडवाईफ प्रशिक्षण शाळा ओरस, रत्नागिरी व अलिबाग येथे सुरु होणार आहे. सभापती महोदय, ज्याच्या हातामध्ये फावडे व खोरे असते तो आपल्याकडेच माती ओढणार. त्यामुळे मी माननीय वित्त मंत्र्यांना दोष देत नाही. परंतु यानिमित्ताने मी एक आठवण करुन देऊ इच्छितो. माननीय श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असताना श्री.दिग्विजय खानविलकर आरोग्य मंत्री होते. त्यांनी राज्यात 3 ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. अकोला, लातूर व कोल्हापूर जिल्हयात ती स्थापन होणार होती. त्या न्यायानुसार आता जर का कोकणातील रायगड येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु होणार असेल तर माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. सभापती महोदय, रोहा येथे कृषी महाविद्यालय व नर्सिंग स्कूल स्थापन केले जाणार आहे. रायगडच्या पायथ्याशी पाचाड येथे शिव सृष्टी निर्माण करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला आहे, त्यासाठी 15 कोटी रुपये खर्च प्रस्तावित असून यावर्षी त्या कामासाठी 5 कोटींची तरतूद केली आहे. त्याचप्रमाणे मुरुड, जंजीरा येथे प्रवासी जेटी बळकट करणे, रायगड येथे कोकण विभागीय क्रीडा संकूल निर्माण करण्यात येणार आहे. त्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, 1980 साली श्री.ए.आर.अंतुले हे राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी सागरी महामार्गाची संकल्पना समोर आली होती. त्यावेळी राज्यात सागरी महामार्ग बांधण्याचा सरकारने निर्णय घेतला होता. आज 30 वर्षानंतर रायगडपासून गोव्यापर्यंत सागरी महामार्गावरील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व महत्वाचे पूल बांधून पूर्ण झालेले आहेत. रायगडमधील मंडणगड, बाणकोट खाडीवरील पूल, या पूलासाठी 100 कोटी रुपये खर्च होतील इतका तो पूल मोठा आहे, इतकेच पूल या सागरी महामार्गावरील बांधण्याचे शिल्लक राहिले आहेत. या सर्व पुलांसाठी 350 कोटींची तरतूद केलेली आहे. 350 कोटी रुपये खर्च करुन हे 4-5 पूल बांधून

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

पूर्ण झाले तर आज गोव्याला जाण्यासाठी 12 तास लागतात त्याऐवजी 8 तासात गोव्याला जाता येईल. म्हणजे इतके अंतर या सागरी महामार्गामुळे कमी होणार आहे. ठराविक कालावधीत ही कामे पूर्ण झाली तर कोकणाला पर्यटन विकासाचे दालन खुले होईल. या सागरी महामार्गाचा कार्यक्रम माननीय वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पात नमूद केलेला आहे त्यासाठी त्यांनी तरतूद केली आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प सामाजिक न्याय आणि समतेवर आधारित आहे. हा अर्थसंकल्प समाजभिमुख आहे. पण हा अर्थसंकल्प समाजभिमुख आहे असे म्हणत असताना मला थोडीशी चिंता व्यक्त करावीशी वाटते.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

या अर्थसंकल्पावर बोलत असताना काही गोष्टींच्या बाबतीत चिंता व्यक्त करणे अत्यंत आवश्यक आहे. हा तुटीचा अर्थसंकल्प आहे ही वस्तुस्थिती आहे. या अर्थसंकल्पात करवाढ केलेली नाही ही देखील वस्तुस्थिती आहे. पण 8 दिवस आधी व्हॅटमध्ये वाढ केली ही वस्तुस्थिती देखील नाकारता येणार नाही. मला आठवते की, जेव्हा राज्यामध्ये युतीचे शासन होते, त्यावेळी राज्यावर 40 हजार कोटीचे कर्ज होते. हे युतीचे शासन गेल्यानंतर आघाडी सरकारने हे कर्ज का झाले, कशामुळे इ ाले याची कारणे शोधण्यासाठी नागपूरच्या अधिवेशनामध्ये एक श्वेतपत्रिका काढली होती. ही श्वेतपत्रिका काढल्यानंतर पुढील दोन-तीन वर्षे तुटीचे अर्थसंकल्प सादर झाले. 1999-2000, 2000-2001, 20001-2002 आणि 2002-2003 या वर्षी महसुली तुटीचे अर्थसंकल्प सादर झाले. राज्याचा सर्वांगीण विकास साधत असताना माझ्या सारख्याला राज्याच्या डोक्यावर असणा-या कर्जाची चिंता आहे. आज या राज्याच्या डोक्यावर साधारणत: 1 लाख 86 हजार कोटीचे कर्ज आहे. राज्याची लोकसंख्या 10 कोटी गृहीत धरली तर राज्यातील लहान बालकापासून प्रत्येकाच्या डोक्यावर 10 हजार रुपयाचे कर्ज आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. हे कर्जाचे प्रमाण जीडीपीच्या तुलनेत 23.5 टक्के आहे. जास्तीत जास्त तुम्हाला 25 टक्क्यापर्यंत जाता येईल. भारत सरकारच्या डेफिसिट फायनान्सच्या कन्सेप्ट प्रमाणे 25 टक्क्यापर्यन्त कर्ज उभे करण्याची परवानगी मिळते. आपण आता 23.5 टक्क्यावर येऊन पोहोचलो आहोत. या कर्जाच्या व्याजापोटी साडेपंधरा ते सोळा हजार कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. मागच्यावेळी 1 लाख 58हजार कोटीचे कर्ज होते. यावर्षी तो आकडा वाढला. पुढचा अर्थ संकल्प जर तुटीचा असेल तर राज्य सरकारला पुन्हा कर्ज काढावे लागेल. मग 1 लाख 86 हजार कोटीचे कर्ज 2 लाख 86 हजार कोटी रुपयापर्यन्त गेले तर तुम्हाला आश्चर्य वाटायला नको.ही बाब अत्यंत गंभीर असून यावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विचार करायला पाहिजे. आज राज्यामध्ये सिंचनाचा अनुशेष आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पात मात्र कृषी आणि निगडित सेवांसाठी जो निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे तो फक्त 3.66 टक्के एवढाच आहे. मागील तीन वर्षांची कृषी विभागासाठी असलेली तरतूद पाहिली तर सन 2008-09 मध्ये 6402 कोटी रुपये, सन 209-10 मध्ये 6564 कोटी एवढी तरतूद करण्यात आली होती. परंतु दुर्दैवाने यावर्षी मात्र ही तरतूद फक्त 4741 कोटी एवढीच करण्यात आली आहे. म्हणजे कृषी सारख्या अत्यंत महत्वाच्या विभागासाठी, शेतकऱ्यांशी निगडित असलेल्या विभागासाठी भरीव तरतूद करण्याऐवजी 1822 कोटीची तूट दाखविण्यात आली याबाबत खेद वाटतो.

महोदय, शिक्षण विभागाच्या बाबतीत जी तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली त्यात शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, या राज्यातील कायम विना अनुदानित संस्था आहेत त्यातील "कायम" हा शब्द शासनाने काढलेला आहे. या निर्णयामुळे अशा शाळांना अनुदान द्यावे लागेल. अपेक्षा अशी होती की, ज्या शाळांची पाच वर्षे पूर्ण झालेली आहेत त्या शाळांना या वर्षात काही प्रमाणात का होईना, पहिला टप्पा 20 टक्के वगैरे अनुदान मिळणे आवश्यक होते. परंतु असा "कायम" शब्द काढलेला असतना देखील विना अनुदानित शाळांसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. या सदनातील सन्माननीय सदस्य आणि आपण शिक्षक आमदार सातत्याने प्रयत्न करीत आहोत, सातत्याने मागणी करीत आहोत की, शिक्षण सेवकांचे मानधन वाढवून मिळावे. त्या अनुषंगाने या राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी सभागृहात परवाच घोषणा केली की शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्यात येईल. हा प्रश्न मागील कॅबिनेटसमोर चर्चेला होता. त्यावेळेस ठराव केला आणि येत्या अधिवेशनापूर्वी यासंबंधीचा निर्णय घेऊन त्याची सभागृहात घोषणा करण्यात येईल असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले होते. परंतु या बजेटमध्ये शिक्षण सेवक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कुठलाही विचार केलेला दिसत नाही. शिक्षकेत्तर कर्मचारी अत्यल्प वेतनावर काम करीत आहेत त्यांच्यासाठी देखील यामध्ये खरे पाहता तरतूद करण्याची अपेक्षा होती परंतु त्याचाही शासनाने अर्थसंकल्पात विचार केलेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

महोदय, आदिवासी क्षेत्रातील ज्या शाळा आहेत त्यांचे शासनाच्या माध्यमातून मुल्यांकन करुन काही शाळा आणि काही वर्ग तुकड्या अनुदानास पात्र घोषित करण्यात आल्या आहेत. शासनाच्या एका निकषानुसार जर या शाळा अनुदानास पात्र ठरल्या असतील तर त्या शाळा आणि वर्ग तुकड्यांना अनुदान देण्याची जबाबदारी आदिवासी विकास विभागाची आहे. परंतु तसा प्रस्ताव त्यांनी संबंधित विभागाकडे पाठविलाच नाही. म्हणून अशा शाळा आणि वर्ग तुकड्या ज्या अनुदानास पात्र झाल्याअसताना सुध्दा त्यांना अद्यापही अनुदान मिळालेले नाही व त्यांच्या बाबतीत देखील या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आलेली दिसत नाही. तसेच वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भात सुध्दा सातत्याने मागणी करण्यात येत आहे आणि अनेक वेळा सभागृहातही चर्चा झालेली आहे. राज्याच्या तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा शालेय शिक्षण विभागाला आदेश दिले होते की, राज्यातील शिक्षण संस्थांचे जे वेतनेत्तर अनुदानाचे प्रश्न आहेत ते तातडीने सोडवावेत. त्यासाठी समिती घोषित झाली, त्या समितीचा अहवाल सुध्दा आलेला आला. मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन केली त्या समितीचाही अहवाल आलेला आहे परंतु या अर्थसंकल्पात मात्र आमच्या संस्थाचालकांसाठी कुठल्याही प्रकारे वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी तरतूद केलेली नाही.

यानंतर श्री. गायगवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते .....

सभापती महोदय,वर्ग तुकडया अनुदानावर आल्यानंतर शिक्षकांना काही प्रमाणात अनुदान मिळते. टप्पा निहाय अनुदान असेल तर त्याचा काही हिस्सा शासनाकडून मिळतो आणि बाकीची रक्कम संस्था चालकांकडून मिळते. परंतु ज्यावेळी एखादा वर्ग किंवा शाळा अनुदानावर येते, शिक्षकांना अनुदान मिळते त्यावेळी जे शिक्षकेतर कर्मचारी असतात त्या ठिकाणी अनुदान तत्वावर काम करीत असतात त्यांच्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद शासनाकडून केली जात नाही त्यामुळे आम्ही सातत्याने शासनाकडे मागणी करीत असतो की ,शिक्षकांबरोबरच मान्यता प्राप्त जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांच्या अनुदानाचा प्रश्न सोडवावा. शिक्षकांना अनुदान मिळते शिक्षकेतर कर्मचा-यांना मात्र अनुदान मिळत नाही त्यासाठी या वर्षाच्या अथसंकल्पात तरतूद होईल अशा प्रकारचे आश्वासन शासनातर्फे देण्यात आले होते परंतु या अर्थसंकल्पामध्ये या कर्मचा-यांसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. वाढीव पदांना मान्यता देण्याच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे गेल्या चार वर्षापासून पायाभूत पेक्षा वाढीव पदांचे प्रस्ताव प्रलबित आहेत. शासनाने या पदांना अद्यापी मान्यता दिलेली नाही. गेल्या चार पाच वर्षापासून शासनाने या पदांना मान्यता न देणे, प्रस्ताव प्रलंबित ठेवणे , शिक्षण संचालकांनी जाणीवपूर्वक तीन चार वर्षे शासनाला प्रस्ताव सादर न करणे यामुळे या पदांना मान्यता मिळण्यास विलंब होतो परिणामत: या वाढीव पदांवर काम करणाऱ्या शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे वेतन मिळत नाही. त्या पदांना शासनाची मान्यता मिळणे आवश्यक आहे ही तांत्रिक बाब आम्ही समजू शकतो परंतु त्या त्या वर्षात या पदांना मान्यता दिली गेली, अर्थसंकल्पात तरतूद केली गेली तर त्यांना वेतनही मिळू शकेल. चार पाच वर्षे पदांना मान्यता न मिळाल्यामुळे या शिक्षकांना चार पाच वर्षे विना वेतन काम करावे लागत असेल तर ही अत्यत खेंदाची गोष्ट आहे. या अर्थसंकल्पामध्ये या वाढीव पदांसाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. या पदांची संख्या फार मोठी आहे. गणित आणि संख्या शास्त्र या विषयासाठी पायाभूत पेक्षा जी वाढीव पदे निर्माण झाली त्याची संख्या 900 पेक्षा अधिक आहे परतु त्यांच्यासाठी कोणतीही तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, यानतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. सर्व शिक्षा अभियानातर्गत मध्यान्ह भोजन दिले जाते व त्या विद्यार्थ्यासाठी पोष्ंण आहाराची योजना राबविण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते .....

येते. परंतु अनुदानित शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठीच ही योजना आहे बाकीच्या विद्यार्थ्याना ही योजना लागू नसल्यामुळे प्रसार माध्यमांनी हा विषय लावून धरला होता. परंतु विना अनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्याना पोषण आहार न देणे ही बाब भेदभाव करणारी आहे. एका शाळेतील एका वर्गात शिकणा-या विद्यार्थ्याना खिचडी देण्यात येते परंतु त्याच्या बाजूला दुस-या वर्गात बसणा-या विद्यार्थ्याना मात्र खिचडी मिळत नाही . त्या विद्यार्थ्याना खिचडी देण्याच्या संदर्भात राज्य सरकारने जबाबदारी स्वीकारावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. केन्द्र शासनाच्या योजनेमध्ये जर या विद्यार्थ्याना मध्यान्ह भोजन देणे बसत नसेल तर, नियमानुसार ते देणे शक्य नसेल तर राज्य सरकारने या योजनेवरील खर्च सहन करावा आणि राज्य शासनाने याकरता निधी देऊन सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून जबाबदारी उचलावी अशा प्रकारचा विचार पुढे आला होता त्या अनुषंगाने चर्चा झाली होती आणि ही बाब शासनाने मान्यही केली होती परंतु या अर्थसंकल्पात या विद्यार्थ्याना पोषण आहार देण्यासबंधी कोणतीही तरतूद केलेली नाही.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाचा विचार केला असतांना सात लाख पेक्षा अधिक कर्मचारी या क्षेत्रात काम करीत आहेत . शिक्षणासाठी 21 हजार कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे परंतु वेतनाव्यतिरिक्त अन्य सुविधा पुरविण्यासाठी किमान चार टक्के निधीची तरतूद असावी अशी अपेक्षा धरली, परंतु एक टक्कासुध्दा तरतूद शासनाने केलेली नाही म्हणून वेतना बरोबरच इतर सुविधा पुरविण्यासाठी भरघोस निधीची तरतूद करणे आवश्यक होते. हा खर्च न मानता ती गुंतवणूक आहे असे मानून अधिक रक्कमेची तरतूद करावयास पाहिजे होती परंतु ती तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली नाही.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयाचा विचार करता या अर्थसंकल्पामध्ये या जिल्हयावर मोठया प्रमाणावर अन्याय झालेला आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्ये पैकी दहा टक्के लोकसंख्या ठाणे जिल्हयात असून या जिल्हयात सात आदिवासी तालुके असून ठाणे जिल्हा हा आदिवासींचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. ठाणे जिल्हयामध्ये पिण्याच्या पाण्याची, शहरातील घन कच-याची, सांडपाण्याची औद्योगिक प्रदूषण, बेरोजगार, गुन्हेगारी, अनधिकृत बांधकामे इत्यादी अनेक प्रश्न आहेत.

यानंतर श्री. सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत करावयाच्या उपाय योजनेसंबंधी या अर्थसंकल्पामध्ये कोणताही विचार व्यक्त करण्यात आलेला नाही. ठाणे जिल्हयामध्ये मुरबाडसारख्या औद्योगिक वसाहतीमध्ये रस्ते आणि कौटुंबिक न्यायालये देण्याव्यतिरिक्त ठाणे जिल्हयाला काहीही मिळाले नाही. ठाणे जिल्हयामधून संपूर्ण मुंबई शहराला पाणी पुरवठा केला जातो. परंतु या जिल्हयातील धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणताही उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला नाही. वर्षानुवर्षे हे लोक पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी कोणतीही तरतूद याठिकाणी करण्यात आलेली नाही. एमएमआरडीएच्या माध्यमातून साडे चार हजार कोटी रुपये या जिल्हयातील धरणांच्या बांधकामासाठी देण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. परंतु त्या संदर्भात या अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा ही केवळ लोकांची दिशाभूल करण्यासाठी केली होती की काय? अशी शंका माझ्या मनामध्ये निर्माण होते.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयाला प्रचंड ऐतिहासिक वारसा लाभला आहे. यामध्ये कल्याणचा सुभेदार असेल, चिमाजी अप्पा यांचा वारसा असेल, हाजी मलंग गड असेल, वसईचा किल्ला असेल, जीवदानी देवीचे मंदिर असेल, अर्नाळयाचा किल्ला असेल, बोर्डीची किनारपट्टी असेल या परिसरांचा विकास करण्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली नाही. ठाणे जिल्हयामध्ये सात महानगरपालिका आहेत. त्यामुळे मुंबई महानगरपालिका वगळता यापैकी एकाही महानगरपालिकेची स्वत:ची पाणी पुरवठयाची योजना नाही. या सर्व महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये झपाटयाने नागरिकीकरण होत असतांना या महानगरपालिकांच्या क्षेत्रातील रहिवाश्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली नाही. त्याकरिता अपेक्षित असलेल्या योजनेकरिता तरतूद करण्याची आवश्यकता होती. परंतु पिण्याच्या पाण्याची कोणतीही योजना या अर्थसंकल्पामध्ये केलेली दिसत नाही.

सभापती महोदय, वालधुनीच्या प्राधिकरणाचा विषय सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला होता व त्यावर चर्चा झाली होती. परंतु या वालधुनीच्या प्राधिकरणासाठी अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, ठाणे जिल्हयामध्ये ज्या महानगरपालिका आहेत त्या सर्व महानगरपालिकांचे एकत्रित प्राधिकरण करण्यासाठी व त्यामधून एक परिवहन सेवा देण्याचा विचार पुढे आला असून त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/ KGS/ MMP/

श्री. रामनाथ मोते....

होता. परंतु तो निर्णय केवळ कागदावरच राहिला. या एकत्रित परिवहन योजनेसाठी कोणतीही तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली नाही.

सभापती महोदय, होमगार्डचे मानधन वाढविण्यासाठी सरकारने घोषणा केली होती. परंतु त्याबाबत या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. याबाबत माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी होमगार्डसच्या मानधनामध्ये वाढ करु असे सांगितले होते. आज ते अत्यंत महत्वाची जबाबदारी संभाळीत आहेत.परंतु त्याबाबतचा निर्णय केवळ कागदावरच राहिला असून तो प्रत्यक्षात अंमलात आणावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आपण मला याठिकाणी अर्थसंकल्पावर विचार मांडण्याची संधी दिली आहे. परंतु या सभागृहामध्ये आम्ही मांडीत असलेल्या मुद्यांची नोंद कुणीही घेत नाही. तरमग आम्ही याठिकाणी कशासाठी बोलायचे? यापूर्वी माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आपल्या भाषणामध्ये मांडलेल्या विविध मुद्यांची नोंद घेण्यात आलेली नाही....

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये उपस्थित असून त्यांनी याबाबत जबाबदारी घेतली आहे...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी माननीय वित्त मंत्र्यांनी सभागृहामध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे. मंत्रिमहोदय, पाच ते दहा मिनिटांसाठी सभागृहाबाहेर गेले असतील तर मी समजू शकतो.परंतु बऱ्याच वेळेपासून मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

तालिका सभापती : कॅबिनेट मंत्री नोंद घेत आहेत...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्हाला दिलेल्या ठराविक वेळेतच आम्ही बोलले पाहिजे अशाप्रकारचे वेळेचे बंधन आमच्यावर घातले आहे. आणि हे सभागृह साडे आठ वाजेपर्यंत चालणार आहे. अशापरिस्थितीत माननीय वित्तमंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर आम्ही काय करायचे? काही ठराविक माननीय सदस्य बोलत असतील त्यावेळी माननीय अर्थमंत्र्यांनी उपस्थित रहावयाचे, इतरांच्या बाबतीत "सब घोडे बारा टक्के" असे ठरविले आहे काय? असे असेल तर आम्ही कशासाठी याठिकाणी बोलायचे?

तालिका सभापती : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आपण आपले भाषण सुरु करावे. आपल्या मुद्यांची नोंद मंत्रिमहोदयांकडून घेतली जाईल....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदय चहा प्यायला किंवा टॉयलेट गेले असतील तर आम्ही समजू शकतो...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : याठिकाणी सदनामध्ये माननीय कॅबिनेट मंत्री, माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी मुद्दा मांडला होता की, अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी सात दिवसांची मुदत देण्यात यावी, आम्हाला अभ्यास करावयाचा आहे. चर्चेसाठी वेळ द्यावा, पण त्यासाठी वेळ देत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एकतर दोन दिवसामध्ये बोलावयाचे आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माझी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्य आपापल्या भाषणामध्ये जे मुद्दे मांडत आहेत, त्याची अतिशय सिरिअसली नोंद घेतली जात आहे आणि माननीय राज्यमंत्री सदनामध्ये आल्याबरोबर त्यांना सन्माननीय सदस्यांनी भाषणामध्ये जे काही मुद्दे मांडलेले आहेत त्याची टिप्पणी दिली जाणार आहे. तसेच आपल्या नियमाप्रमाणे सदनामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. याबाबतीत संयुक्त जबाबदारी असल्याने, निश्चितपणे त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांना टिप्पणी दिली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सदनामध्ये नियमाप्रमाणे कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत, त्यामुळे सदनाचे काम पुढे सुरु राहू शकते. पण या सदनाचे काही संकेत आहेत. आज अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु झाली, तेव्हा या चर्चेसाठी असलेली सात दिवसांची मुदत कमी करुन आजच चर्चेला सुरुवात केली, त्यावेळी मी मुद्दा मांडला होता की, अशा प्रकारे या चर्चेला न्याय मिळेल काय ? आमची शासनाकडून अशी अपेक्षा होती की, या चर्चेला पुरेसा न्याय दिला जाईल. ज्यावेळी सन्माननीय सदस्य 11 कोटी जनतेच्या बजेटबद्दल गांभीर्याने चर्चा करीत असतात, तेव्हा सरकारने ही चर्चा गांभीर्याने घेतली पाहिजे.मला आपले म्हणणे पटते की, माननीय मंत्री महोदयांना सुध्दा काही काम असू शकते, टॉयलेटला जाणे आवश्यक असते. म्हणून माझी अशी विनंती आहे की, सदनाचे काम दहा मिनिटांसाठी तहकूब करावे आणि आम्ही पुन्हा सदनामध्ये येतो.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर होईल, त्यावेळी जर त्यांनी आपल्या मुद्याला उत्तर दिले नाही तर मग आपण . . . .

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, तसे नाही. तो भाग वेगळा आहे. दहा मिनिटांसाठी सभागृह तहकूब करावे.

. . . .3 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण मांडलेल्या किती मुद्यांना आतापर्यंत उत्तरे मिळालेली आहेत हे मला सांगावे. एकाही मुद्याला उत्तर मिळत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा सभागृहाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्या ही बाब लक्षात आलेली आहे की, सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे कोणीही लिहून घेत नव्हते. ती लक्षात आली नसती तर ठीक आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी नोटीस केलेले आहे की, सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे कोणीही लिहून घेत नव्हते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय वित्त मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले होते की, अधिकारी असोत किंवा नसोत पण आम्ही आहोत असे छातीवर हात ठेऊन सांगितले, तर मग आम्हाला ती छाती येथे पाहिजे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण दहा मिनिटांसाठी सभागृह तहकूब करावे. त्यानंतर सुरु करावे.

तालिका सभापती : याठिकाणी माननीय कॅबिनेट मंत्री, माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय पाच मिनिटांमध्ये येत आहेत. परंतु तोपर्यंत सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे, याठिकाणी मुद्दे लिहून घेतले जात आहेत.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी वारंवार सांगण्यात आले की, हा तुटीचा अर्थसंकल्प आहे. पण यातून मुंबईला काय मिळाले हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. वांद्रा-सी लिंकसाठी 5.6 कि.मी.इतका रस्ता केला, त्याचे उद्घाटन देखील केले ही आंनदाची गोष्ट आहे. पण एमएमआरडीए तर्फे मुंबई, ठाणे इ.भागामध्ये जे स्काय वॉक बांधलेले आहेत. मी स्काय वॉकच्या चौकशीची मागणी केली होती आणि आपणच या उच्च स्थानावर असताना ती उचलून धरली होती. परंतु एमएमआरडीए ने बांधलेल्या स्काय वॉकची चौकशी झालेली नाही. मी माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधवसाहेबांना पत्र देऊन विचारले की, ही चौकशी कधी करणार आहात ? मला गेल्या अधिवेशनापासून या अधिवेशनापर्यंत उत्तराच्या बाबतीत टोलवाटोलवी करण्यात आली. सुरुवातीला या कामाचे 600 कोटी रुपयांचे बजेट होते आणि आज ते किती झालेले आहे हे मला

. . . .3आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

माहिती नाही. तसेच या स्काय वॉक वरुन किती माणसे जातात ? हे पाहिले पाहिजे. आपण बांद्रा येथे आलेल्या स्काय वॉकबाबत पहाणी करावी की, त्यावरुन किती लोक जातात. तसेच सांताक्रुझ (पूर्व) येथे देखील नवीन स्काय वॉय बांधलेला आहे. आपण तेथे माणूस पाठवून माहिती घेतली तर समजले की, जेमतेम दोन किंवा तीन माणसे स्काय वॉकवरुन जातात. यासाठी करोडो रुपये खर्च होत आहे. हा केंद्र शासनाचा, तुमचा-आमचा सर्वांचा पैसा आहे. जर या पैशाचा उपयोग गरीबांसाठी झाला असता तर आनंद वाटला असता. पण केवळ श्री.रत्नाकर गायकवाडसाहेब सांगतात म्हणून, कमिटी सांगते म्हणून स्काय वॉक बांधावयाचे हे योग्य नाही आणि कमिटीने सांगितलेल्या स्काय वॉकपेक्षाही श्री.प्रभू आणि फिशरमन यांच्या कमिटीने जो अहवाल दिलेला होता, तो अहवाल बाजूला ठेऊन स्काय वॉक बांधण्यात आले आहेत, याची न्यायालयीन चौकशी करावी अशी माझी सर्वात प्रथम मागणी आहे.

यांनतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक बांधण्यात येणार आहे असे गेल्या अंदाजपत्रकीय अधिवेशनात सांगण्यात आले होते. 300 कोटी रुपयाचा तो प्रकल्प आहे.पण अर्थसंकल्पात याबाबतीत कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. यासाठी किती रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे ते सांगावे. थोडयावेळा पूर्वी सन्माननीय सदस्य बोलताना सांगत होते की, आम्ही संस्कृती पाहिली, आम्ही पुतळे उभे करीत आहोत, देवस्थानांचा विकास करीत आहोत ही आनंदाची गोष्ट आहे. त्याला आमचा पाठिंबा आहे. पण छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक उभे करणार अशी भीम गर्जना केली होती त्याचे आज काय झाले? त्यासाठी किती पैशाची तरतूद करण्यात आलेली आहे? सभापती महोदय, मिड-डेमध्ये छापून आलेली प्रतिक्रिया मी याठिकाणी वाचून दाखवितो त्यामध्ये असे म्हटले आहे की, "They should be solving the problems of farmers. In fact, the income of even the religious trusts should be used for public welfare." तसेच यानंतर पुढे दुसरी एक प्रतिक्रिया मी आपल्याला वाचून दाखवितो, त्यात असे म्हटले आहे की, "It is a bad idea. Most of the monuments are not maintained" सभापती महोदय, आपले हे दु:ख आहे. आपण स्मारके तयार करतो पण त्या स्मारकांचे जतन करण्यासाठी, त्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी कुठल्याही प्रकारची सोय करण्यात येत नाही.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षणाच्या संदर्भात जे.जे. रुग्णालयासाठी 150 कोटी रुपये आणि नागपूर रुग्णालयासाठी 150 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. जे. जे. रुग्णालयासाठी 120 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत असा उल्लेख मी गेल्या तीन अधिवेशनापासून ऐकत आहे. हे पैसे सन 2008 मध्ये दिलेले आहेत. माझ्याकडे जे.जे.रुग्णालयाचे पत्र आहे. सभापती महोदय, मी ते आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांकडे पाठवितो. जे.जे. रुग्णलयात कमीत कमी 65 इक्वीपमेंट्स अंडर इन्स्टॉलेशन आहेत. त्यापेकी निम्मी इक्विपमेंट्स राज्य शासनाने घेतलेली आहेत तर निम्मी इक्विपमेंट्स केंद्र शासनाकडून घेतलेली आहेत. सभापती महोदय, ही इक्विपमेंट्सची नावे वाचून दाखवू इच्छितो. पण त्यामध्ये सभागृहाचा वेळ जाईल. ही अत्यंत महत्वाची इक्विपमेंट्स आहेत. व्हेन्टीलेटर्स हाय ॲन्ड आयसीयु, ॲनेस्थेशिया चेस्ट ॲन्ड टी.बी., ते मेडीट्रॉनिक कंपनीकडून घेतलेले आहे. सीव्हीटीएस, इमर्जन्सी ओटी, ईएमजी, जनरल सर्जरी, नेफ्रॉलॉजी,

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेडिकल सीसीयु, न्यूरो सर्जरी, ऑर्थोपेडिक, प्लॅस्टिक सर्जरी आणि सेंटजॉर्जमधील कार्डियॉलॉजी, गॅस्ट्रो सर्जरी, ॲनेस्थेशिया अशी अनेक इक्विपमेंट्स अंडर इन्स्टॉलेशन आहेत. ही इक्विपमेंट्स मी याठिकाणी थोडीशी वानगीदाखल सांगितलेली आहेत. आता या इक्विपमेंट्सची वॉरन्टी संपेल. त्यामुळे ती नादुरुस्त झाल्यानंतर तिला रिपेअर कोण करणार? ती तशीच कचऱ्यात पडून राहील. जे.जे. रुग्णालयात असे किती इक्विपमेंट्स अंडर इन्स्टॉलेशन आहेत याचे एकदा ऑडिट करण्यात यावे, अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, हेल्थकार्ड इश्यू करण्याबद्दल याठिकाणी सांगण्यात आले आहे. आपलयाकडे अनेक जणांकडे कॅशलेश कार्ड उपलब्ध असेल. महाराष्ट्रात पाच जिल्हयामध्ये ही जीवनदायी योजना लागू केलेली आहे. यातील बारकावे माननीय मंत्रि महोदयांना माहीत आहेत काय? इन्शुअरन्स कंपनीला प्राधन्य देण्यासाठी ही योजना पुढे आणलेली आहे असा माझा स्पष्ट आरोप आहे. ज्यावेळी एखादा सामान्य माणूस कॅशलेश पॉलिसी घेऊन एखाद्या नर्सिंगहोममध्ये जातो त्यावेळी त्याला औषधोपचार मिळायला किती त्रास होतो, किती ऑब्जेक्शन्स काढली जातात याची आपल्याला कल्पना आहे काय? माननीय मंत्रिमहोदय, आपल्याकडे मेडिक्लेम असेल तर ही कॅशलेश पॉलिसी घेऊन एखाद्या ऑपरेशनसाठी जा. नर्सिंगहोममध्ये पहिल्यांदा ती कॅशलेश पॉलिसी घेतच नाहीत. ॲडमिशन नाही म्हणून सांगतात. कॅशलेश पॉलिसी असेल तर ॲडमिशन नाही पण पेमेंट करत असाल तर ॲडमिशन आहे अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, कॅशलेश पॉलिसीसाठी ठराविक रुग्णालये नोटिफाय केलेली असतात. पण कॅशलेस पॉलिसीचा फायदा घेतल्यानंतर त्यामध्ये क्वेरी काढण्यात येतात. ते पैसे मिळायला अनेक दविस लागतात. हा गरीब ग्रामीण भागातील माणूस हे हेल्थकार्ड कसे वापरणार आहे?

श्री. राजेश टोपे (बसून) : परदेशात अशाच प्रकारच्या पॉलिसीची पध्दत आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण एवढे पुढारलेले नाही. ग्रामीण भागातील प्रत्येक माणसाला साधी ए,बी,सी,डी. माहीत नाही. सभापती महोदय, हा जीवन-मरणाचा प्रश्न असतो. आपण मेडिकल एज्युकेशनचे मंत्री होतात. आपण जे.जे. रुग्णालय पाहिले आहे. लोक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

माझा पेशंट आताच्या आता ॲटमिट करुन घ्या असे सांगतात. त्यावेळी हेल्थकार्ड पुढे केल्यानंतर जर त्यांनी सांगितले की, हे हेल्थकार्ड लागू नाही किंवा याची वॉरन्टी संपलेली आहे तर काय करणार? असा प्रश्न आहे.

सभापती महोदय, याबाबतीत प्रत्यक्षात खूप अडचणी आहेत तेव्हा हे हेल्थकार्ड देत असताना इन्शुअरन्स पॉलिसीचा पुनर्विचार होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, एनआरएचएम हे भ्रष्टाचाराचे एक मोठे कुरण आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

मी आपल्या माहितीसाठी काही आकडेवारी देतो. यामध्ये चिकुनगुनिया, एनकॅफेलायटीस असे जे अनेक व्हेक्टरबॉण्ड डिसीज असतात ते कव्हर होतात. राज्य शासनाकडून आणि केंद्र शासनाकडून सुध्दा याकरिता अनुदान मिळते. सन 2008-09 मध्ये 1140.69 लाख रुपये रोख स्वरुपात आले आणि 540.16 लाख रुपये वस्तू स्वरुपात आले. त्यातील 733.32 लाख रुपये खर्च झाले आणि वस्तूस्वरुपात जे आले त्यामध्ये 230.79 लाख रुपये खर्च झाले. म्हणजे 1680.83 लक्ष रुपयांपैकी केंद्राचे 964 लक्ष रुपये परत गेले. आणखी एक बाब म्हणजे रोगी कल्याण समिती आणि अनटाईड फंड्स हेल्थ इन्स्टिट्यूशन. यावर कधी चर्चा झाली नाही. या शीर्षकाखाली मिळून 1,09,116 लाख रुपये आले. माझ्याकडे रिपोर्ट आहे. एनआरएचएमचा रिपोर्ट मी नेटवरुन डाऊनलोड केला त्यामध्ये मला ही सगळी माहिती मिळाली. मी एनआरएचएमला पत्र लिहिले. एनआरएचएमने गेल्या तीन महिन्यात एकाही पत्राला उत्तर दिलेले नाही. याचा विनियोग झालाच नाही. हे पैसे कोठे गेले ? 1,09,116.8 लक्ष रुपये कोठे गेले याचा पत्ता नाही. नर्सेसचे प्रशिक्षण आणि स्टाफ बिल्डींग प्लॅन यासाठी 1780.51 लक्ष रुपये आले. हे पैसे शालेय आरोग्य कार्यक्रमासाठी असतात. सिकलसेल ॲनिमिया, आरसीएच अंतर्गत खरेदी, सेवा बळकटीकरण, टेलिमेडिसिन, माहेर स्किम, वृध्द सेवा, मूख आरोग्य, कम्युनिकेशन सोयी, क्वालिटी ॲश्युरंस प्रोजेक्ट, आयईसी प्रोजेक्ट आणि पीपीपी प्रोजेक्ट अशासाठी मिळून 10730 कोटी रुपये आले. हे पैसे कोठे गेले ? कोट्यवधी रुपये आले ते कोठे गेले ? याची चर्चा सभागृहात होत नाही. कारण एनआरएचएम हा जो प्रकल्प आहे त्याचा कोणी हिशेब मागत नाही. त्याचे एक कार्यालय आरोग्य भवनमध्ये चौथ्या किंवा पाचव्या मजल्यावर आहे. त्या ठिकाणी फक्त दोन अधिकारी आहेत आणि बाकीचे कर्मचारी कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर आहेत. त्यांना या एनआरएचएमशी काही देणे-घेणे नाही. सन 2005 पासून एनआरएचएम सुरु झाले. 2009-10 मध्ये 2908.89 कोटी रुपये एनआरएचएममार्फत मंजूर झाले. 2009-10 मध्ये किती खर्च झाले याबाबत त्यांनी सांगितले की, याची आकडेवारी आमच्याकडे उपलब्ध नाही. 2008-09 पर्यंत 1299.91 कोटी रुपये खर्च झाले. यामध्ये राज्य सरकारचा 15 टक्के हिस्सा असतो. मंजूर रकमेच्या 88 टक्के रक्कम खर्च झाली आणि ती सुध्दा जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या शेवटच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

डॉ. दीपक सावंत .....

तीन महिन्यात खर्च झाली. याबाबत कॅगचा रिपोर्ट आहे. माननीय वित्त राज्यमंत्री सांगत आहेत की, जिल्हा परिषदेमध्ये पैसे जातात. पण कोठे तरी हिशेब असावयास पाहिजे की नाही ? यामध्ये राज्याचे 15 टक्के आपल्याकडे आहेत. त्याचा हिशेब असावयास नको का ? आरसीएच प्लेक्सीफूल आहे. आपल्याला ते माहीत असेल. अशा अनेक गोष्टींसाठी एनआरएचएममार्फत पैसे येतात. रिपेअर कंस्ट्रक्शनसाठी पैसे येतात. नवीन बांधकामासाठी 7076 लक्ष रुपये आले. किती बांधकामे झाली ? ट्रेनिंगसाठी 996.4 लाख रुपये आले. अपग्रेडेशन आणि इंस्टॉलेशनसाठी 1 लक्ष 31 हजार 18 लाख रुपये आले. आपल्या गडचिरोली, गोंदियासाठी 350.06 लक्ष रुपये आले. या एनआरएचएमची एकदा चौकशी करणे अत्यंत आवश्यक आहे. कोट्यवधी रुपये येतात त्याचा कोठेही हिशेब नसतो. सार्वजनिक आरोग्य विभाग सांगते की, एनआरएचएम ही केंद्राची योजना आहे. त्याचा हिशेब नाही. त्यांच्याकडे हिशेब मागितला. माझ्याकडे पत्र आहे. तीन तीन महिने अगोदर पत्रे पाठविलेली आहेत. आजपर्यंत एकाही पत्राचे उत्तर आलेले नाही. या योजना अशा आहेत की ज्या सर्वसामान्य लोकांना माहीत नाहीत. डॉक्टर्सना सुध्दा माहीत नाहीत किंवा पेशन्टला सुध्दा माहीत नाही. तीच गोष्ट पूरक पोषण आहाराची आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

शासनाने 58 कोटी रुपये पूरक पोषण आहारासाठी दिले आहेत. सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत एकात्मिक विकास योजना यासारख्या सर्व योजना जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यान्वित होतात. पूरक पोषण आहार योजनेची व्याख्या शासनाने आता बदलली आहे. आशिया खंडामध्ये 74 टक्के कुपोषित बालकांची संख्या आहे. युनिसेफच्या अहवालात नमूद केलेले आहे. नवीन धोरणानुसार अन्न घटकांसोबत आयोडिन असणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने पूरक पोषण आहारामध्ये आयोडिनचा समावेश करावा असे मी सुचवित आहे. पूरक पोषण आहाराची योजना बचत गटामार्फत राबविली जाते. गेल्या 10 वर्षामध्ये 2 लाख 2 हजारापेक्षा जास्त बचत गटांची निर्मिती झाली आहे. एकूण 129 योजना राबविल्या जातात. त्यापैकी आरोग्य खात्याच्या योजना राबविल्या जातात त्याची काय परिस्थिती आहे ते मंत्री महोदयांनी सांगावे. मेळघाट भागात शाळेतील मुलांची वैद्यकीय तपासणी केली जाते. धारर्णी, चिखलदरा या भागातील किती मुलांची वैद्यकीय तपासणी केली आहे ते सांगावे. 4 हजार मुले तपासणीविनाच राहतात. चिखलदरा भागात केवळ 30 टक्के मुलांची तपासणी केली जाते. नवीन धोरणानुसार कुपोषित बालकांच्या 4 ऐवजी 3 ग्रेड केल्या जाणार आहेत. सर्वसाधरण, तीव्र कुपोषित आणि कुपोषित अशा त्या ग्रेड असतील. या ग्रेडचे सर्वेक्षण केव्हा केले जाणार आहे ? कारण आजपर्यंत ग्रेड-1, ग्रेड-2, ग्रेड-3 आणि ग्रेड-4 असा सर्व्हे केला जात होता. यासाठी नवीन कर्मचारी वर्ग कधी नेमला जाणार आहे असा माझ्यासमोर प्रश्न आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य खात्यामध्ये प्रजनन बाल आरोग्य योजना नावाची योजना आहे. ही योजना दिनांक 1 एप्रिल, 2005 पासून ही योजना सुरु झाली. दिनांक 1 एप्रिल, 2010 पासून ही योजना बंद होणार आहे. या योजनेसाठी 224.64 लक्ष रुपये निधी मंजूर होता. प्रत्यक्षात 52.16 लक्ष रुपये इतका खर्च झाला. म्हणजे गेल्या 5 वर्षामध्ये या योजनेवर केवळ 23 टक्के खर्च झाला आहे. ऑक्टोबर, 2009 पर्यंत हा खर्च झाला आहे आणि पुढे या योजनेवर खर्च कसा करणार ते सांगावे. 2007-08 मध्ये 53 टक्के आणि 2008-09 मध्ये 48 टक्के खर्च झाला आहे. ही आकडेवारी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवालातील आहे. ही योजना कागदवरच राहते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

डॉ.दीपक सावंत.....

सभापती महोदय, जननी सुरक्षा योजना अंतर्गत आरोग्य संस्थांमध्ये डिलिव्हरी होण्यासाठी इन्स्ट्रूमेंटस वापरले जाते. प्रसुतिनंतर 7 दिवसांमध्ये पैसे मिळणे आवश्यक असते. पण ते पैसे महिन्यानंतर दिले जातात. त्याची कागदपत्रे माझ्याजवळ आहेत. कारण ते पैसे आलेले नसतात. शहरी भागामध्ये 600 रुपये, ग्रामीण भागात 700 रुपये दिले जातात. सभापती महोदय, योजनांची कशी गल्लत केली जातो ते सांगतो. जननी सुरक्षा योजनेचे ऑक्टोबर, 2009 पर्यंत 1 लाख लाभार्थी आहेत. दरवर्षी लाभार्थ्यांची संख्या 1.50 लाख ते 1.62 लाख इतकी असते. ही गेल्या 3 वर्षांची सरासरी आहे. ऑक्टोबर महिन्यानंतर 4-5 महिने राहिले आहेत. 5 महिन्यामध्ये हा आकडा बरोबर 1.62 लाखापर्यंत नेऊन ठेवला जातो. गरोदर मातांची सरासरी संख्या पाहिली तर ती 1.25 लाख इतकी आहे. म्हणजे या विभागाचे अधिकारी गिमिक्स खेळतात. हया पैशांची अक्षरश: लूट केली जाते असा माझा स्पष्ट आरोप आहे. ऑक्टोबर पर्यंत 45 टक्केच खर्च होत असताना त्यानंतरच्या काळात 100 टक्के पैसा खर्च कसा काय होतो, हा एक चमत्कार आहे. मंत्री महोदयांनी याबाबतची माहिती आर्थिक पाहणी अहवालात पहावी. तेच नवसंजीवनी योजनेमध्ये आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...

मातृत्व योजनेच्या बाबतीतही तिच परिस्थिती आहे. या योजनेवर शेवटच्या महिन्यामध्ये खर्च केला जातो. या योजनेमध्ये 400 रुपये औषधासाठी आणि 400 रुपये रोख दिले जातात. या मातृत्व योजनेचे पैसे कसे लाटले जातात याबाबतची माहिती माझ्याकडे आहे.गेल्या वर्षीच्या आकडेवारीनुसार 2008-2009मध्ये 1.17 लाख महिलांसाठी 7.15 कोटी रुपये खर्च केले आणि 2009-2010 या वर्षात डिसेंबर पर्यन्त 54 हजार महिलांसाठी 2.17 कोटी खर्च केले. ही शासनाचीच आकडेवारी आहे. किटकजन्य रोग नियंत्रण आणि राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रमांतर्गत देखील निधीचा गैरवापर होतो. हे पैसे कोणाच्या अधिकारात आहेत ?..(अडथळा)... माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री हे स्वच्छ आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, तुमच्या आरोग्य विभागामध्ये किती जिल्हा आरोग्य अधिका-यांची पदे रिक्त आहेत ? किती जणांकडे जिल्हा आरोग्य अधिका-याचा अतिरिक्त कार्यभार आहे ? आपण सार्वजनिक आरोग्य विभागाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी मागील तीन वर्षामध्ये जिल्हा आरोग्य अधिका-याचे एकही पद भरले गेले नाही. पदे रिक्त असतील तर तुमचे खालच्या स्तरापर्यन्त नियंत्रण कसे काय राहील ?अतिरिक्त कार्यभार ज्याच्याकडे असेल तो चांगल्या प्रकारे काम करणार नाही.

सभापती महोदय, मी आता आदिवासी विकास विभागाकडे वळतो. आदिवासी विकास महामंडळासाठी, विदर्भ विकास मंडळासाठी, मराठवाडा विकास मंडळासाठी, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळासाठी निधीची तरतूद केली जाते. हे पैसे खरंच मिळतात का हो ? आदिवासी उपयोजनेमध्ये धान्यकोष ही योजना 1995 पासून सुरु केलेली आहे. 50 ते 500 कुटुंबे असलेल्या गावामध्ये धान्याची बँक असते आणि त्यातून धान्याचा पुरवठा केला जातो. महाराष्ट्रामध्ये या योजनेचे लाभार्थी किती आहेत याची माहिती मंत्री महोदय देऊ शकतील काय ? यासंबंधीची आकडेवारी कुठेही उपलब्ध नाही. आदिवासी उपयोजनेच्या पुस्तकामध्येही यासंबंधीची आकडेवारी नाही. खावटी कर्जासाठी 50 कोटी रुपये दिलेले आहेत. या योजनेअंतर्गत किती लाभार्थींना खावटी कर्जाचे वाटप केलेले आहे ? एकूण आदिवासींची संख्या किती ? चार माणसे असलेल्या कुटुंबाची संख्या किती, 5 माणसे असलेल्या कुटुंबांची संख्या किती ? ही माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. 2008-2009मध्ये अनुसूचित जमातीसाठी देण्यात आलेल्या दुधाळ म्हशींच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उल्लेख केलेला असल्यामुळे मी त्याचा पुनरावृत्ती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ.दीपक सावंत...

करणार नाही. 2009-2010मध्ये घरगुती गॅस योजनेसाठी 2000 लाख रु. दिले. शासनाने 1 लाख लोकांना गॅस देण्याचे उद्दिष्ट ठेवलेले होते. मग शासनाने किती लोकांना गॅस दिला त्याची आकडेवारी मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी. आश्रमशाळांच्या बळकटीकरणासाठी 1000 लाख रुपये देण्यात आले. 551 आश्रमशाळापैकी किती आश्रमशाळा स्वत:च्या जागेमध्ये आणि किती आश्रमशाळा भाड्याच्या जागेमध्ये आहेत ? फक्त 12 टक्के आश्रमशाळामध्ये मुलींसाठी स्नानगृहे आहेत. बाकीच्या आश्रमशाळातील मुली उघड्यावर आंघोळ करतात.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

लाज वाटली पाहिजे सरकारला. एवढे करोडो रुपये येतात. 870 कोटी रुपये खर्च न केल्यामुळे परत जातात. नियोजनाचा अभाव असल्यामुळे हे घडते. शेतकऱ्यांना पाईप पुरवठा करणे. किती लोकांना पाईपचा पुरवठा केला? 1936.25 लाख रुपयांची तरतूद 2009-10 या वर्षात केली होती. किती शेतकऱ्यांना पाईपचा पुरवठा केला? आकडेवारी नाही. गेल्या वर्षी फक्त 35 टक्के लोकांना शासनाने पाईपचा पुरवठा केला. का लोकांना फसवित आहात. कन्यादान योजनेसाठी 1000 लाख रुपयांची तरतूद केली. किती मुलींची लग्ने लावली? ग्रेड 3 आणि 4 मधील मुले रुग्णालयात दाखल झालेल्यांच्या पालकांना सहाय्य देण्याची योजना आहे. त्यांचा रोजगार बुडतो त्याची परतफेड केली जाते. या योजनेसाठी 149.56 लाख रुपये वर्ग केले होते. शासन म्हणते की, कुपोषणाचे प्रमाण कमी झाले. मग या तरतुदीतील रक्कम शिल्लक का राहिली नाही? किती बालके ॲडमिट झाली? याची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे का? माझ्याकडे आकडेवारी उपलब्ध आहे. ठक्कर बाप्पा योजनेसाठी 15122.65 लाख रुपये दिले गेले. किती घरे बांधली? मला या संदर्भात शासनाचे उत्तर रेकॉर्डवर हवे आहे. शासन म्हणते की, आश्रमशांमध्ये संगणकीकरण केले जात आहे. किती संगणकीकरण करणार आहात? या योजनेसाठी 231.04 लाख रुपये दिले गेले. 20 दिवसांचे संगणकीकरण सुरु केले असा दावा शासनाने केला होता. मी जितक्या आश्रमशाळांमध्ये गेलो त्यापैकी एकाही आश्रमशाळेमध्ये मला संगणकीकरण झालेले आढळले नाही. कनिष्ठ महाविद्यालयांसाठी योजना राबविली. 162 लाख रुपये तरतूद केली. बारावी व दहावीमध्ये शिकणारी किती मुले आहेत? आकडेवारी आहे का? मी सांगू का? कनिष्ठ महाविद्यालयात 127 शासकीय आश्रमशाळांमधून 4312 मुले व 3066 मुली अकरावीसाठी कला विभाग व विज्ञान विभागामध्ये 2706 मुले व 1905 मुली दाखल झाल्या होत्या. मग हा निधी गेला कुठे? कनिष्ठ महाविद्यालयामधून 9079 मुले शिक्षण घेत आहेत ही बोलकी आकडेवारी आहे. खरोखरच हे अतिशय दुर्भाग्यपूर्ण आहे. अनेक गोष्टी याठिकाणी मांडता येतील.

सभापती महोदय, आपण नेहमीच आग्रही असता तो प्रश्न मी याठिकाणी मांडू इच्छितो. धर्मादाय रुग्णालयांमध्ये 10 टक्के खाटा या गरीब रुग्णांसाठी राखून ठेवल्या जातात. आपण या प्रश्नाबाबत आम्हाला बरीच मदत केली आहे. राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांबाबत या सभागृहाने कायदा केला आहे. त्या कायद्यातील बंधनातून निसटण्यासाठी या सर्व धर्मादाय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

रुग्णालयांनी कंपनी ॲक्ट, 1925 अंतर्गत कॉर्पोरेट म्हणून नोंदणी करावयास हालचाल सुरु केली आहे. सरकारच्या जोखडातून मुक्त होऊ पहात आहेत. त्यासाठी माझी अर्थसंकल्पाच्या निमित्ताने शासनाकडे मागणी आहे की, राज्यातील सर्व 80 धर्मादाय रुग्णालयांपैकी एकाही धर्मादाय रुग्णालयाला कॉर्पोरेट व्हायला देऊ नये. अन्यथा शहरातील गरीब रुग्णांची परवड सुरु होईल. आज ज्या 10 टक्के खाटा या गरीब रुग्णांसाठी उपलब्ध होतात ती सुविधा यापुढे बंद होईल. मी मांडलेल्या सर्वच प्रश्नांची उत्तरे मंत्रीमहोदय देतील अशी अपेक्षा करतो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अर्थसंकल्पाबद्दल बोलताना त्यामध्ये ज्या तरतुदी केलेल्या आहेत आणि जी कोट्यावधींची आकड्यांची मांडणी झालेली आहे त्या प्रत्येक बाबीवर बोलावयाचे झाले तर कोणत्याही सदस्याला पुरेसा वेळ मिळेल याची शक्यता नाही. सर्वसाधारण अर्थसंकल्पाबद्दल बोलत असताना माझ्या विवेचनातून आकडे नसतील असा माझा प्रयत्न राहणार आहे. सुरुवातीला मला असे वाटते की, अर्थाचा अनर्थ झाला तर संकल्प सिध्दी होणार नाही.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

अर्थसंकल्पातून जे जे योजिले आहे त्याचा चुकीचा अर्थ लावायला लागले तर तो संकल्प सिध्दीस जाणार नाही हे स्पष्टपणे नमूद करावेसे वाटते.

आपण सुवर्ण महोत्सवी वर्षात पुढच्या प्रगतीच्या प्रवासाची आखणी करताना मागील काळातील चुकांची आणि अडचणींची पुनरावृत्ती होता कामा नये याकडे लक्ष द्यायला हवे. सर्वसामान्य जनतेने विश्वासाने सत्तेची सुत्रे दिल्यानंतर शासनकर्त्यांचे उत्तरदायित्व फार महत्वाचे असते. सर्वांगीण समतोल विकास, प्रशासनातील पारदर्शकता आणि काळ-काम-वेगाचे गणित स्पष्टपणे रेखाटले गेले पाहिजे. योजना कितीही चांगली असली परंतु दिलेल्या मुदतीत पूर्ण झाली नाही तर वाढत जाणारा खर्च आवाक्याबाहेर जातो. शेवटी त्याचा भार राज्यातील सर्वसामानय जनतेला सोसावा लागतो. झपाट्याने वाढणारे शहरीकरण, ओस पडणारी गावे, शेती, शिक्षण, आरोग्य व्यवस्थेमधील मरगळ, पायाभूत सुविधा निर्माण करताना स्थानिकांचा अनेक वेळा होणारा विरोध, विजेची मागणी व पुरवठा यातील तफावत कमी करीत जाणे, पर्यावरणाचे निर्माण झालेले नवे प्रश्न, संकटग्रस्तांसाठी सातत्याने द्यावी लागणारी मदत हे सर्व जटिल आणि आव्हानात्मक प्रश्न आहेत. पण हे प्रश्न सोडविण्याचे आव्हान आता शासनासमोर आहे. हे सर्व आवाक्यात असलेला हा राज्याचा अर्थसंकल्प आहे म्हणून मी त्याचे स्वागत करतो. राज्यकर्त्यांनी राज्याच्या कारभाराचा गाडा हाकण्यापुरता मर्यादित विचार करुन चालणार नाही तर राष्ट्रीय संपत्तीत आपण किती अंशाने भर घालणार आहोत, त्याचेही उद्दिष्ट समोर ठेवले पाहिजे आणि ते साध्य करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. अर्थसंकल्पाकडे दोन पध्दतीने बघता येते. अर्थशास्त्रीय परिभाषेत "मायक्रो" आणि "मॅक्रो" असा प्रयोग सांगितलेला असतो. यातील "मायक्रो" चा भाग म्हणजे आपण अर्थ खात्याच्या करवसुलीचे प्रशासन असा विचार करु शकतो. राज्याचे एकूण महसुली उत्पन्न कोणकोणत्या स्त्रोतांमधून येते त्यासाठी आपली यंत्रणा "ऑप्टिमम युटिलायझेशन " करते का, राज्याचा कॅश फ्लो मॉनिटर करण्याची जबाबदारी निश्चित केली आहे काय यामध्ये जर नकारात्मक गोष्टी होत असतील तर त्याचा तातडीने निपटारा व्हायला हवा. विक्रीकर कार्यालयाचे आधुनिकीकरण, आय.टी. चा वापर वाढविणे यासारख्या बाबींबरोबर कर्मचारी वर्गाला अत्यावश्यक असलेले प्रशिक्षणही महत्वाचे असते. त्यासाठी अर्थमंत्र्यांनी विशेष निधीची तरतूद करावी अशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

माझी नम्र विनंती आहे. सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी केल्यानंतर राज्याच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा या वेतनावर खर्च होतो. शासकीय कर्मचाऱ्यांना त्यामुळे आर्थिक स्थैर्य प्राप्त झालेले आहे पण नुसतेच वेतन वाढविणे कदाचित योग्य ठरणार नाही, त्याचबरोबर प्रशासकीय उत्तरदायित्वही तपासले जावे. चांगले काम करणाऱ्यांना प्रोत्साहन आणि कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना आर्थिक स्वरुपाचे शासन अशी रचना करता येईल काय, याचाही विचार झाला पाहिजे.

महोदय, या अर्थसंकल्पात अनेक देवस्थाने आणि अनेक महात्म्यांच्या स्मारकांसाठी तरतूद आहे. जवळपास एकत्रितपणे ही तरतूद पाहिली तर 300 कोटीच्या दरम्यान अर्थसंकल्पात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांसाठी जरुर त्या सुखसोई हव्या असतात त्या निश्चितपणे द्याव्यात पण अशा भक्तीस्थळांमधून, संतांच्या शिकवणुकीची, ज्यांची स्मारके उभारली त्यांनी जे समाजाला दिले त्या नैतिक मुल्यांचाही प्रसार व्हावा यासाठी या निधीमधून प्रत्येक ठिकाणी ज्ञानदानाची सुविधा करुन सुदृढ आणि सशक्त समाज जीवन निर्माण करण्यासाठी त्यांना तयार करायला हवे असे मला नम्रपणे सुचवावयाचे आहे.

महोदय, पर्यटनाच्या बाबतीत सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. त्यासाठी तरतूद करणे आवश्यक तर आहेच परंतु त्याचबरोबर पर्यटन या विश्वाचा एकूण आवाका एवढा प्रचंड मोठा आहे आणि आपल्यासमोर एकूण काही राज्यांमध्ये पर्यटन हा त्यांच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग असू शकतो. महाराष्ट्र राज्याकडे यासाठी खूप संधी आहे पण त्याचा पुरेसा उपयोग त्यामध्ये झालेला दिसत नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले ....

सभापती महोदय, पर्यावरणाच्या प्रश्नासंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा होत असते.परंतु त्या संबंधात करण्यात आलेली तरतूद इतर खात्यासाठी वितरीत केली गेली आहे.यापेक्षासुध्दा पर्यावरण हे केन्द्रस्थानी ठेवून त्यासाठी विशेष योजना राज्याने आखणे आवश्यक आहे असे मला येथे नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, दुर्घटनांमध्ये आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या व्यक्तिना सहाय्य करण्यासाठी किंवा समाजातील दुर्बल घटकांना सहाय्य करण्यासाठी राज्य शासनाकडून मदत दिली जाते परंतु त्यासाठी तरतूद करीत असताना आपण त्यांना अधिक दुर्बल तर करीत नाही ना? याचाही विचार करण्याची वेळ आलेली आहे. सामान्य माणसाच्या जीवनात किमान एक दिवस तरी असा उगवावा की , त्याला मदतीची गरजच पडू नये. निदान या दिशेने राज्याचा प्रवास सुरु व्हावयाला हवा. असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मानव विकास निर्देशांक हा मूलभूत पाया असावयास हवा . वर्ल्ड बॅन्क आणि आय.एम.एफ. सारख्या आंतरराष्ट्रीय सस्थांकडून कमी व्याज दराने अर्थ सहाय्य मिळविण्यासाठी राज्य सरकार काही प्रयत्न करीत आहे काय किंवा तिकडून मिळणारे अर्थसहाय्य आपल्याला उपलब्ध होऊ शकेल काय ? याचा देखील विचार व्हावयास हवा.

सभापती महोदय, ज्या प्रमाणे आपण भक्ती मार्गाने जाणा-या लोकांसाठी काही सुख सोयी आणि सुविधा देतो त्याच प्रमाणे एकूणच समाज अधिक विज्ञाननिष्ठ होण्यासाठी विशेंष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र सायन्स मिशनची स्थापना करुन समाजातील अनिष्ठ प्रथांना रोखले पाहिजे. श्रध्दा जरुर असावी परंतु त्या नावावर गरीब व भोळया भाबडया जनतेची जर कोणी दिशाभूल करीत असेल तर ते थांबविले गेलेच पाहिजे.

सभापती महोदय, सर्वासाठी आरोग्य सेवा देत असतांना राज्यभर बोगस पदव्यांवर धंदा करणा-यांना शासन देणारी यंत्रणा अधिक सशक्त करावयास हवी.

सभापती महोदय, अर्थव्यवस्थेची भक्कम चौकट निर्माण केल्यावरसुध्दा त्यातून पळवाटा शोधणारे अनेक महाभाग असतात. वैयक्तिक स्वार्थापोटी संपूर्ण व्यवस्थेचे तीन तेरा वाजविले जातात.सातत्याने या अपप्रवृत्तींचा शोध घेऊन त्यांना वेळीच दूर करावयाला हवे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, नरेगा म्हणजेच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि राज्याची ग्रामीण रोजगार हमी योजना कागदावरची आणि प्रत्यक्षातील यातील विरोधाभास आता संपायला हवा. निकृष्ट दर्जाचे भोजन शालेय विद्यार्थ्यांना मिळणे,शासकीय बांधकामाची गुणवत्ता योग्य नसणे,शालेय गणवेषात बेईमानी होणे, आरोग्य योजनांमधील औषधे आणि साधनसामुग्री कमी दर्जाची दडपून सामान्य माणसांचे जीवन असहय केले जाते. असे करीत असतांना कोणाच्या घरचे काय जात आहे, हा पैसा तर शासनाचाच आहे ना ? मग कशाला काळजी करावयाची अशा प्रकारची प्रवृत्ती निश्चितपणे बदलली पाहिजे.

सभापती महोदय, स्त्री भृण हत्या हा राज्यापुढील असलेल्या महत्वाच्या प्रश्नापैकी सर्वात संवेदनशील प्रश्न आहे. पुरुष आणि स्त्री यांचे व्यस्त प्रमाण जर वेळीच दुरुस्त झाले नाही तर फार मोठया सामाजिक समस्येला आपल्या राज्याला सामोरे जावे लागेल. विशेष बाब म्हणून यासाठी वेगळया निधीची भरपूर व्यवस्था करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा,आरोग्य,शिक्षण या पंचसूत्रीवर प्राधान्याने अर्थसंकल्प केन्द्रीत झाला आहे एकदा हे सर्व व्यवस्थित करु या मग पर्यटनांच्या गरजा, सांस्कृतिक गरजां इत्यादी बाबीकडे सावकाश लक्ष देता येईल.

सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याचा विचार करण्यात यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक): सभापती महोदय, 2010-2011 सालच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मला आपण परवानगी दिल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

सभापती महोदय,104 हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पात 7 हजार 500 कोटी रुपयांची तूट असलेल्या अर्थसकल्पासंबंधी बोलावयाचे म्हणजे शिक्षण विभागासाठी सुमारे 24 हजार कोटी रुपयांची तरतूद असतांनासुध्दा वेतनेतर अनुदानाचा प्रश्न गेल्या सहा वर्षापासून सुटलेला नाही ही शोकांतिका आहे. 2004 सालापासून वेतनेतर अनुदान बंद करण्यात आले होते ते सुरु करण्याकरिता सभागृहात वारंवार प्रश्न उपस्थित केले आदोलने केली आणि मॅनेजमेन्ट असोसिएशनकडून देखील आंदोलने करण्यात आली परंतु त्यांना शासनाने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील शाळा चालविणे अतिशय कठीण झालेले आहे. माननीय अर्थ मंत्र्यांनी या मागणीचा विचार करुन हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे...

सभापती महोदय, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर अनेक शिक्षक, मुख्याध्यापक, ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक, सिनियर कॉलेजचे प्राध्यापक यांच्यासाठी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी आपण लागू केल्या. परंतु केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे जशाच्या तशा त्या लागू करण्यात आलेल्या नाहीत. त्या संदर्भात पे बँड आणि ग्रेड पे मध्ये असलेल्या त्रुटींचे निवारण करण्यासाठी आपण त्रुटी निवारण समितीची स्थापना केली. या समितीचा अहवाल तातडीने येण्याची आवश्यकता असून त्या संदर्भात निश्चितपणे निर्णय होण्याची आवश्यकता आहे. दि. 3 ऑगस्ट 2009 रोजी माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांची शिक्षक संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा झाली. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या इतिवृत्तामधील काही गोष्टी मान्य करण्यात आल्या. परंतु त्यामधील दोन-तीन मुद्यांच्या बाबतीत शासनाने निर्णय घेतला नाही. विशेषकरुन वाहन भत्ता आणि आठ टक्के महागाई भत्ता केंद्र सरकारने अलिकडेच मंजूर केला आहे. त्यासंबंधीचा जी.आर. राज्य शासनाने काढण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता 1977 साली शासकीय कर्मचारी व शिक्षकांनी 54 दिवसांचा संप केला आहे. तेव्हा आठ टक्के महागाई भत्ता वाढवून देण्यासंबंधीचा निर्णय शासनाने तातडीने घ्यावा.

सभापती महोदय, माझी विशेष विनंती अशी आहे की, शासन नवीन शाळा देण्याचा विचार करीत आहे. आज राज्यामध्ये शाळा चालवायला जागा नाही. अशा परिस्थितीमध्ये आपण आणखी नवीन शाळा देण्याचा विचार करु नये. त्यापेक्षा आहेत त्या शाळांची गुणवत्ता वाढविण्याचा आपण प्रयत्न करावा. तेव्हा नवीन शाळा देण्याचे धोरण शासनाने मागे घेतले पाहिजे. सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आल्याची बातमी टी.व्ही.वर पाहिली. परंतु काही वेळातच आपण घेतलेला निर्णय मागे घेतला. आज त्यांना अल्पशा मानधनामध्ये काम करावे लागते. तेव्हा त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा निर्णय याच अधिवेशनामध्ये घेतला पाहिजे.

सभापती महोदय, शालेय पोषण आहारसाठी 528 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु मला याठिकाणी खेदाने नमूद करावेसे वाटते की, राज्यातील 50 टक्के शाळांमध्ये शिजविलेले अन्न मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. कांही शाळांमध्ये नोव्हेंबरपासून तर काही शाळांमध्ये सप्टेंबरपासून अनुदान मिळाले नाही. आपण मंत्रालयामधून अनुदान मंजूर केल्यानंतर ते ग्रामीण भागामध्ये पोहोचण्यासाठी 3-4 महिने लागतात. यासाठी आपण मागील वेळेस एका वी.डी.ओ. ला सस्पेंड केले आहे. त्यामुळे ज्या शाळांना सप्टेंबर, नोव्हेंबरपासून अनुदान पोहोचले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे....

नाही त्या शाळा शालेय पोषण आहार योजनेपासून वंचित आहेत. तेव्हा त्याठिकाणी तातडीने अनुदान पोहोचविण्याची व्यवस्था केली पाहिजे.

सभापती महोदय, नागपूर हे महाराष्ट्राच्या उपराजधानीचे शहर आहे. महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांच्या क्षेत्रातील शाळांना आपण सहावा वेतन आयोग लागू केला आहे. परंतु केवळ नागपूर महानगरपालिकेने त्यांच्या शिक्षकांना अजून पर्यंत सहावा वेतन आयोग लागू केलेला नाही. इतकेच नव्हेतर नागपूर महानगरपालिकेने 1996 ते 1998 पर्यंतची पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी सुध्दा दिलेली नाही. शालेय शिक्षण विभागाने दोन महिन्यापूर्वी 5 कोटी 81 लाख रुपयांची तरतूद केली. परंतु हे पैसे शिक्षक व कर्मचाऱ्यांकरिता न देता ते नाले,रस्ते व इतर कामांसाठी खर्च केले आहेत ही बाब आपण तपासून पाहिली पाहिजे. ज्या कामासाठी आपण तरतूद केली आहे त्याच कामासाठी ती खर्च केली पाहिजे.परंतु ती खर्च न केल्यामुळे त्याची दखल घेऊन शासनाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी आपण अनेक समित्या जाहीर केल्या आहेत. त्याकरिता आपण 12 कोटींची तरतूद केली आहे.परंतु या संदर्भात सांगावयाचे झाल्यास आपण शेतकऱ्यांना शून्य व्याज दराने कर्ज देणार आहात. परंतु त्याची मर्यादा किती आहे? त्याच्या शेतीला लागणारा खर्च विचारात घेता ही मर्यादा कमी आहे असे मला वाटते. विदर्भामध्ये आपण शेतकऱ्यांना 25 ते 30 हजारापेक्षा जास्त कर्ज देत नाही. आणि म्हणून शासनाने ही मर्यादा वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. किंबहुना ती वाढविली पाहिजे. सभापती महोदय, नागपूर विभागामध्ये उच्च शिक्षणाच्या संदर्भात 350 प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. 750 महाविद्यालयांमध्ये 50 टक्के प्राचार्यांची पदे रिक्त आहेत ही एक मोठी शोकांतिका आहे. त्याठिकाणी गेल्या दोन-तीन वर्षापासून नवीन कॉलेजेस उघडण्यात आली असल्यामुळे कॉलेजचा पूर आलेला आहे. परंतु त्याठिकाणी एक टक्का सुध्दा पूर्णवेळ प्राध्यापक देण्यात आलेले नाहीत. सर्व प्राध्यापक हे रोजंदारीवर नेमण्यात आले आहेत. त्यांना फक्त पॉकेट मनीसाठी पैसे दिले जातात. आणि म्हणून त्याठिकाणी फुल टाईम प्राध्यापकाची नियुक्ती करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे शॉर्ट टाईम कोर्सेसचा खुला धंदा सुरु झाला आहे. यु.जी.सी. च्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी स्कॉलरशीप संस्थाचालक गिळंकृत करीत आहेत, ती स्कॉलरशीप त्या विद्यार्थ्यांपर्यंत जात नाही याबाबत सुध्दा विचार होणे आवश्यक आहे.

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे . . . .

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात सांगावयाचे आहे की, अपंगांसाठी शाळा सुरु आहे. त्यांची जी हॉस्टेल्स् आहेत, मघाशी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उल्लेख केला की, जेथे मुलींचे होस्टेल आहे, तेथील अधीक्षका ही महिलाच असली पाहिजे. पण या अनेक जागा रिक्त आहेत. खरे या हॉस्टेलच्या इमारती आणि तेथील सोयी पाहिल्या तर त्या चांगल्या प्रकारच्या किंवा उत्कृष्ट अशा नाहीत. म्हणून त्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. तसेच या घटकांना अजूनही सहावा वेतन आयोग लागू झालेला नाही म्हणजे सामाजिक न्याय विभागातील आश्रमशाळा आणि आदिवासी विभागातील आश्रमशाळा आहेत, तेथील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी अजूनही झालेली नाही, ती होणे गरजेचे आहे. सभापती महोदय, आपण आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करतो. पण सर्पदंशाने मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांसाठी एक लाख रुपयांचा विमा काढण्याची योजना शासनाने मान्य केलेली आहे. पण ती शेतकऱ्यांचा मृत्यू झाला तर तेवढयापुरती मर्यादित आहे. परंतु त्या शेतावर काम करणारे जे शेतमजूर आहेत त्यांच्यासाठी सुध्दा ही योजना लागू करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे. गडचिरोली जिल्हा हा आदिवासी आणि दुर्गम भाग आहे. तेथे नॉन सॅलरी म्हणून 12 कोटी रुपयांची तरतूद झालेली आहे. पण त्याच गावात किंवा त्याच भागामध्ये ज्या माध्यमिक किंवा उच्च माध्यमिकच्या शाळा आहेत, त्यांना याचा लाभ होणार नाही. म्हणून जर तो भाग हा आदिवासी, दुर्गम आणि नक्षलग्रस्त आहे, तर इतर भागांसाठी जर ही योजना लागू असेल तर ती या भागातील शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शाळा-कॉलेजेस्नां सुध्दा लागू व्हावी अशी माझी विनंती आहे. मी अधिक वेळ न घेता, आपण मला येथे भाषण करण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आभार मानतो व आपली रजा घेतो.

. . . .4 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मांडलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्री आणि माननीय वित्त राज्यमंत्री यांनी अर्थसंकल्पामध्ये एकही नवा कर प्रस्तावित केलेला नाही. महाराष्ट्रातील गेल्या 25 अर्थसंकल्पातील हा पहिला अर्थसंकल्प असेल की ज्यामध्ये एकही नवा कर किंवा करामध्ये, दरामध्ये वृध्द करण्यात आलेली नाही त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. तुम्ही गहू, तांदूळ,पीठ,डाळी,मसाले, मिरची, हळद, सोलापूरी चादर, नारळ, टॉवेल या सर्व वस्तूंचा कर कमी केला म्हणजे एक्झमशन एका वर्षासाठी वाढविले. त्यामुळे महागाई होण्यामध्ये त्याचा काही उपयोग होईल असे मला वाटते. साबुदाणा, चिवडा, फरसाण या यादीमध्ये टाकलेला आहे. धूप, कापूर इ.कितीतरी वस्तूंमध्ये माननीय मंत्री महोदय आपण जनतेला दिलासा दिलेला आहे. सरकी, पेंड वरील कर माफ केला आहे, हेअर पीनच्या बाबतीत मी बोलत नाही. तो मुद्दा येथे मांडण्यात आलेला आहे. खादी ग्रामोद्योगचा साबण त्यावरील कर माफ केला. सौरऊर्जा, गांडूळ खत, नकली दागिने, मनुका, बेदाणा, चहा यावरील कर माफ केला. अशा प्रकारे आपण कितीतरी चांगले निर्णय घेतले. कलम 61 मध्ये व्हॅटचे ऑडीट करताना 40 लाखाची मर्यादा आपण 60 लाखापर्यंत आणली आहे. ऑटोरिक्षा, टॅक्सी यांना दरवर्षी जो कर द्यावा लागत होता, तो आता एकरकमी वसूल करण्याच्या बाबतीत आपण तरतूद केलेली आहे. त्याच पध्दतीने आपण सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून अल्पसंख्यांकांसाठी तरतूद केली. अनुसूचित जातींसाठी 3400 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अनुसूचित जमातीसाठी 3020 कोटी तरतूद केली. त्याच पध्दतीने पाटबंधाऱ्यासाठी 7 हजार कोटींची तदतूद केली. पंजाबराव देशमुख संबंधात जी योजना आहे, त्यामध्ये 50 हजार रुपयांपर्यंत शेतकऱ्यांना व्याज द्यावे लागणार नाही अशा पध्दतीची तरतूद करणारे देशातील पहिल्या क्रमांकाचे महाराष्ट्र राज्य आहे आणि आम्ही याचे निश्चितपणे स्वागत करतो.

सभापती महोदय, तुळजापूर विकास प्राधिकरण, शेगाव येथील गजानन महाराज मंदिरासाठी 307 कोटी रुपये, पालखी मार्ग, परशुरामच्या संदर्भात तरतूद केलेली आहे. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून आपण अनुदान वाढविलेले आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबियांना घरकुले बांधून देण्याच्या संदर्भात तरतूद केलेली आहे. त्याच प्रकारे मानव विकास संदर्भात आपण यावेळी 500 कोटी रुपये दिले.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

सभापती महोदय, 178 तालुक्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. हा अर्थसंकल्प सामाजिक न्याय देणारा अर्थसंकल्प आहे. महागाई वाढत आहे त्याला प्रतिबंध करण्याचा विचार या अर्थसंकल्पात दिसत आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळया विषयावरील, वेगवेगळया क्षेत्राच्या संदर्भातील माहिती देण्यात आलेली आहे. माननीय मंत्रिमहोदय, मागच्या आर्थिक पाहणीमध्ये "भांडवलाची निर्मिती" असे सदर होते ते या सन2009-2010 च्या आर्थिक पाहणीच्या पुसतकात दिसत नाही. कुठे वेगळया पध्दतीने ते मांडले असेल तर मला ते सापडले नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी या पुस्तकाचे पान 49 ते 64 वर "लोक वित्त" याबाबतचे जे प्रकरण दिलेले आहे ते अत्यंत महत्वाचे. या माध्यमातून या अर्थसंकल्पाचा आढावा घेणे, त्याचे सिहांवलोकन करणे, त्याच्यामध्ये काही कमी जास्ती तरतूदी असतील त्या पाहता येतात. यामध्ये महसुली 89 हजार कोटी दाखविण्यात आलेला आहे पण खर्च 96 हजार कोटी रुपये दाखविण्यात आलेला आहे. महसुली तूट 60,123 कोटी रुपये दाखविण्यात आलेली आहे ही महसूल तूट कशी भरुन काढणार? याचे वर्णन, याचा तपशील याठिकाणी दिलेला नाही. भांडवली जमा 32678 कोटी आणि खर्च 26578 कोटी. म्हणजे भाडवली जमामध्ये पाहिले तर 5900 कोटी रुपयाची सरप्लस आहे आणि अर्थसंकल्पीय तूट 1223 कोटी रुपये येते. आपल्याला महसुली खर्च पूर्ण करावयाचा असेल तर "Captial expenditure out of revenue" भांडवली खर्च न करता महसुली खर्चामध्ये तो निधी वळवावा लागेल. आणि मला असे वाटते की, ज्यावेळी आपण भांडवली खर्चातून महसुली खर्च करतो त्यावेळी राज्याच्या दृष्टीकोनातून ती बाब योग्य होत नाही म्हणून याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, राज्याच्या स्वत:च्या महसुलाकडे लक्ष वेधतो. पान क्रमांक 50. राज्याच्या स्वत:चा कर महसूल. माननीय मंत्रिमहोदय, मगच्या वर्षीचा व्हॅट 28439 कोटी होता. सन 2009-2010 चा अंदाजाप्रमाणे तो 27006 कोटी. एका वर्षात 1400 कोटी रुपये व्हॅट कमी होत आहे याची कारणमिमांसा काय हे शोधले पाहिजे आणि सभागृहाला सांगितले पाहिजे. मुल्यवर्धीत करामध्ये महागाई वाढले, वस्तुचे दर वाढले आणि व्हॅट कमी झाला याची कारणे काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

एखाद्या विशिष्ट वस्तुमुळे तो कमी झाला. एखाद्या विशिष्ट जिल्हयात तो कमी झाला याचा शोध घेणे अत्यंत गरजेचे आहे. कारण 1400 कोटी ही रक्कम लहान नाही. याची आपण मागच्या वर्षाशी तुलना केली तर सन 2007-2008 या वर्षात व्हॅट 26700 कोटी रुपये होता आणि 2008-2009 ला तो 28439 कोटी होता म्हणजे मागच्या वर्षी 1700 काटी रुपयाचे व्हॅट वाढला आणि चालू वर्षाला 1400 कोटी रुपयाचे व्हॅटची रक्कम कमी झाली यासंदर्भात सभागृहाला माहती द्यावी. मला वाटते याचे चिंतन करणे अत्यंत गरजेचे राहील.

सभापती महोदय, मुद्रांक शुल्क हजार कोटी रुपयाने वाढलेले आहे. राज्य उत्पादन शुल्कात पाचशे कोटीने वाढ झालेली आहे. विजेवरील शुल्कात रक्कम वाढलेली आहे. महसूल खर्च लक्षात घेतला तर 2003-2004 ला महसुली खर्च 42680 कोटी रुपये होता. तो 2007-2008 ला 64780 कोटी रुपये झालेला आहे. आणि 2009-2010 ला 96,184 कोटी रुपये इतका वाढलेला आहे. दोन वर्षात महसुली खर्च 32000 कोटी रुपयाने वाढला आहे. याची कारणे शासनाला सांगता येतील. सहाव्या वेतन आयोगामुळे खर्च वाढला. वेतन, मजुरी, निवृत्ती वेतन यामुळे खर्च वाढलेला आहे. 8000 कोटी रुपये दिलेले आहेत. मी त्यासंदर्भात तपशीलवार माहिती देईन. पण 2003-2004 ला वेतन,मजुरी आणि निवृत्ती वेतन याची टक्केवारी 56 होती. 2008-2009 ला ती कमी करुन आपण ती 38 टक्क्यावर आणली आणि 2009-2010 ला ती परत 46 टक्के झालेली आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

मला असे वाटते की, वेतन, मजुरी, निवृत्तिवेतन वगैरे जे असेल त्याचा खर्च 25 टक्क्यापेक्षा जादा असता काम नये यासंदर्भात शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. व्याजाशी महसुली जमेचे प्रमाण पाहिले तर 2003-04 ला ते 28 टक्के होते. ते कमी करण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न केले. मागचे वित्त व नियोजन मंत्री यांनीही प्रयत्न केले आणि ते प्रमाण 15 टक्क्यावर आले आणि पुन्हा 2009-10 मध्ये ते वाढून 16.7 टक्क्यापर्यंत झाले. कर्जाच्या संदर्भात आणि व्याजाच्या संदर्भात आपली ऋणसेवा पाहिली तर आपले कर्ज कसे वाढत गेले हे दिसून येईल. आर्थिक पाहणी पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक 56 वर ते दिलेले आहे. 2004-05 ला 1 लाख 9 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते आता 2009-10 मध्ये 1 लाख 85 हजार 800 कोटी रुपयांचे कर्ज आहे. पहिल्या वर्षाला 12 हजार कोटीने कर्ज वाढले. 2005-06 ला 13 हजार कोटीने कर्ज वाढले. 2006-07 ला 9 हजार कोटीने कर्ज वाढले. 2007-08 ला परत 9 हजार कोटीने कर्ज वाढले पण नंतर 2008-09 ला 19 हजार कोटीने कर्ज वाढले. म्हणजे कर्ज वाढण्याचा वेग दुप्पट झाला आणि त्यानंतर आपण पाहिले तर या वर्षाला 24 हजार कोटी रुपयांनी कर्ज वाढलेले आहे. म्हणजे एका वर्षात अडीच पटीने कर्ज वाढले याचा शोध घेणे आवश्यक आहे. कर्ज वाढल्यानंतर, ही ऋणस्थिती झाल्यानंतर त्याचे व्याज आपोआप वाढले. त्यानंतर आपण कर्जावर जी हमी देतो ती हमी देण्याची आवश्यकता आहे काय तेही तपासून बघावे. ज्याला आपण अकाऊंट्सच्या भाषेमध्ये कॉन्टींजंट लायबिलिटी म्हणतो म्हणजे जे आपले देणे नाही पण जे दुसऱ्याने दिले नाही म्हणून ते आपल्याला द्यावे लागेल ती रक्कम देखील 36 हजार कोटी रुपये आहे. म्हणजे 1 लाख 85 हजार कोटी रुपये ते आणि परत त्याच्यात हे 36 हजार कोटी रुपये मिळवले तर 2 लाख 25 हजार कोटी रुपयांपर्यंत आपले हे कर्ज जाते. या कॉन्टींजंट लायबिलिटीची आपल्याला गरज आहे काय ? सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग 15,433 कोटी रुपये, जलसंधारण 5563 कोटी रुपये, ऊर्जा कामगार 4967 कोटी रुपये ही प्रमुख खात्यांची 26 हजार कोटी रुपयांची देणी आहे. राज्याच्या हिताचा एखादा धोरणात्मक निर्णय आपण घेऊ या काय की, या पुढच्या काळामध्ये आम्ही कोणालाही शासकीय कर्जाची हमी देणार नाही. मी तर असे म्हणेन की बजेटला थोडी कात्री लावली तरी चालेल पण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

आम्ही पुढच्या काळामध्ये दहा बारा हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज घेणार नाही. राज्याची एकूण ऋणस्थिती आणि आपण देत असलेले व्याज यामध्ये व्याजाच्या संदर्भात देखील अशी परिस्थिती आहे की, आधी आपण 12 टक्के प्रमाणे व्याज देत होतो आज 8.5 टक्के प्रमाणे व्याज देतो. आपल्याला अडीच ते तीन टक्के व्याजदराने पैसे कसे मिळतील, जागतिक बँकेच्या माध्यमातून पैसे मिळतील काय हे पाहून आपण तिकडचे कर्ज घेऊन यांचे कर्ज परत देऊन टाकू. पुष्कळ वेळा कमर्शियल क्षेत्रात पाहिले तर ज्यांचा जागतिक बँकेशी संबंध नाही त्यांच्याकडे परदेशातून अडीच ते तीन टक्के दराने भारतात कर्ज आलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे सोन्याचांदीचे जे व्यापारी आहेत ते परदेशातून तेवढ्या व्याजाने कर्ज घेतात पण त्यांचा डॉलरशी वगैरे काय संबंध आहे याची मला पूर्ण माहिती नाही. पण आपण याचा अभ्यास करुन हा व्याजाचा दर अडीच ते तीन टक्क्यापर्यंत आणण्याचा प्रयत्न करणे हे राज्याच्या हिताचे आहे. आपण स्थूल राज्य उत्पन्न पाहिले तर 2008-09 पेक्षा म्हणजे गतवर्षीपेक्षा आता 13.5 टक्के वाढ आहे. याबाबतीत आशादायक चित्र आहे असे मला वाटते. दरडोई उत्पन्न 2007-08 मध्ये 49 हजार 58 रुपये होते ते 2008-09 मध्ये 54 हजार 867 रुपये झाले. पण याबाबतीत देशात आपल्या राज्याचा पहिला क्रमांक नाही. दरडोई उत्पन्नात हरियाणा राज्य आपल्या पुढे आहे. आपल्या राज्याचा दुसरा क्रमांक आहे. याबाबतीत आपल्या राज्याचा पहिला क्रमांक कसा येईल यादृष्टीने प्रयत्न करावयास पाहिजे. राज्याचे जे सरासरी दरडोई उत्पन्न आहे त्यापेक्षा 15 जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न कमी आहे. आमच्या जळगाव जिल्ह्याचे माननीय पालकमंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. आपल्या माहितीसाठी सांगेन की, दारिद्र्यरेषेच्या आतील सर्वात जास्त कुटुंबे कोठे असतील तर ते जळगाव जिल्ह्यामध्ये आहेत. महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची एकूण संख्या 52 लाख 65 हजार आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

ही माहिती विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक 37302, दिनांक 8.4.2008 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दि.28.3.2000 रोजीच्या परिशिष्ट-अ नुसार दिलेली आहे. म्हणून मी पालकमंत्र्यांना विनंती करु इच्छितो की, यातून जळगांव जिल्हयाला बाहेर काढावे. खानदेशातील जळगांव, धुळे व नंदुरबार या जिल्हयांचा विचार केला तर 6 लाख 83 हजार कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहेत. विदर्भाचा किती अनुशेष आहे हे आपण सांगू शकतो, मराठवाडयाचा अनुशेष किती आहे हे माहीत आहे. परंतु उर्वरित महाराष्ट्रात खानदेशाचा समावेश असल्यामुळे आमचा अनुशेष किती हे आम्हाला माहीत नाही. कारण आमची कोकण, पश्चिम महाराष्ट्राबरोबरी केली जाते. कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ असावयास पाहिजे. 6 वर्षापूर्वी खानदेशासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत या सभागृहात ठराव मंजूर करण्यात आला होता. कोकणासाठी मंडळ स्थापन झाल्यानंतर 5-6 महिन्यानंतर खानदेशासाठी ठराव झाला. 6 वर्षात कोकणासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याच्या संदर्भात राज्य शासनाकडून प्रयत्न झाले का ? केंद्र शासनाच्या माध्यमातून हे आपण का मिळवू शकलो नाही ? निदान पुढील काळात कोकणासाठी वैधानिक विकास मंडळ, खानदेशासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून व्हावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, कोकण आमच्या खानदेशापेक्षा फार पुढे आहे. मुंबई, ठाणे सोडल्यानंतर विभागवार पाहिले तर खानदेशाचे दरडोई सरासरी उत्पन्न कमी आहे. मुंबईचे 89 हजार रुपये, कोकणाचे 78 हजार रुपये, म्हणजे मुंबईच्या फार मागे नाही. त्यानंतर नाशिक विभागाचे दरडोई उत्पन्न 46 हजार, पुणे विभागाचे 60 हजार, औरंगाबाद विभागाचे 34 हजार, अमरावती विभागाचे 33 हजार आणि नागपूर विभागाचे 47 हजार रुपये इतके आहे. नाशिक विभागाचा या सातही विभागात पाचवा क्रमांक आहे. शासनाने काही दिवसांपूर्वी खानदेशसाठी पॅकेज जाहीर केले आहे. मघाशी कोणी तरी असे म्हटले की, ज्याच्या हातात फावडे आहे तो आपल्याकडे माती ओढणारच. त्यामुळे मी आमच्या पालकमंत्र्यांना असे सुचवितो की, आपल्याकडे ते फावडे तरी घ्यावे. म्हणजे

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

आम्ही आपल्याकडे माती ओढण्याचा प्रयत्न करु. खानदेशासाठी जाहीर केलेल्या पॅकेजपैकी यावर्षी 6 हजार कोटींची तरतूद केली आहे. त्याबद्दल मी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.भुजबळ, सन्माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावित आणि सन्माननीय पालक मंत्री श्री.देवकर यांचे अभिनंदन करतो. परंतु पॅकेजचा निधी उपलब्ध करुन देण्याचा विचार झालेला नाही. मला या अर्थसंकल्पात खानदेश दिसत नाही. खानदेशासाठी ज्या पध्दतीने निधी मिळाला पाहिजे होता तसा मिळालेला नाही. नाशिकमध्ये झालेल्या बैठकीप्रमाणे खानदेशासाठी पॅकेज दिले असले तरी त्याच्या व्यतिरिक्त रस्त्यासाठी, पाटबंधारेसाठी निधी मिळालेला नाही, कोणत्याही खात्याला निधी मिळालेला नाही. जसा सामाजिक न्याय एखाद्या व्यक्तीला दिला असे आपण म्हणतो तसा सामाजिक न्याय खानदेशाला देण्याची संकल्पना असावयास पाहिजे.

सभापती महोदय, केंद्र सरकारला राज्यातून जो कर जातो. त्या कराच्या माध्यमातून राज्याचा वाटा वाढला पाहिजे. पूर्वी 30.5 टक्के मिळत होता आता 32.5 टक्के मिळाला आहे. त्यामुळे केंद्राकडून जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मी मघाशी म्हटले आहे की, महसुली खर्च वाढलेला आहे. 78 हजार कोटींवरुन 96 हजार कोटींवर गेला आहे, म्हणजे 22 हजार कोटींनी वाढला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...

कर्जाच्या संदर्भातील आकडेवारी देखील मी सांगितली. राज्याच्या एकूण उत्पन्नाचा विचार करता आपल्याला कृषी क्षेत्राकडे जास्त लक्ष देण्याची गरज आहे. कृषी क्षेत्रात 9.5 टक्क्यांनी घट झालेली आहे. माननीय कृषी राज्यमंत्री सभागृहामध्ये हजर आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, साधारणत: 25 हजार कोटी कोठून येतील याचा विचार करावयाचा झाला तर चांगला खरीप आणि रब्बी हंगाम झाला तर ही विकासाच्या संदर्भातील तूट आपण कमी करु शकू. उद्योग क्षेत्र 19.6 टक्के आणि सेवा क्षेत्रामध्ये 16.4 टक्के वाढ झाली आहे. आज उद्योग क्षेत्रापेक्षा, कृषी क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्र जास्त महत्वाचे झालेले आहे. सेवा क्षेत्राची टक्केवारी सर्वात जास्त आहे. चक्रवाढ वार्षिक वाढ पाहिली तर गुजराथ राज्याची 9.6टक्के, हरियाणाची 9.2 टक्के, आंध्रप्रदेशची 7.8 टक्के वाढ झालेली आहे आणि आपले महाराष्ट्र राज्य हे चौथ्या क्रमांकावर आहे. औद्योगिक गुंतवणुकीच्या संदर्भात फॉरिन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट होणारी जी राज्ये आहेत त्यामध्ये महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. छत्तीसगड औद्योगिक गुंतवणुकीमध्ये आपल्या पेक्षा पुढे आहे. आपण गुजराथ राज्याच्या मागे आहोत. ओरिसा हे राज्य देखील औद्योगिक गुंतवणुकीमध्ये पुढे गेलेले आहे. 20 वर्षापूर्वी एफडीआय ही फक्त मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये होत होती. आता ती स्थिती राहिलेली नाही. आता स्पर्धा वाढलेली आहे. या स्पर्धेमध्ये आपल्या राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसाठी जास्तीत जास्त निधी कसा येईल यादृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक या पाच जिल्ह्याचा औद्योगिक गुंतवणुकीमध्ये 55 टक्के वाटा आहे आणि उर्वरित महाराष्ट्राचा 45 टक्के वाटा आहे. तेव्हा समतोल विकासासाठी प्रयत्न करावा अशी मी या प्रसंगी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी राज्यातील सहकार चळवळीचा मुद्दा मांडला. ठेवीदारांना रकमा परत देता याव्यात यासाठी पतपेढयांसाठी 200 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. हा निधी किती पुरेल मला माहीत नाही. प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक यांनी निवृत्तीनंतर पतसंस्थामध्ये ठेव ठेवली. कुणाच्या तरी उठाठेवीमुळे ही ठेव ठेवली. आज त्यांना पैसे परत मिळत नाहीत. विधवा असतील तर त्यांना 5 हजार रु. 10 हजार रु. देण्याच्या संदर्भात शासनाने काय कृती केलेली आहे ? गरिबांचे, मयमवर्गीयांचे पैसे परत दिले जात नाहीत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी....

या संदर्भात शासन का हालचाल करीत नाही ? आमच्या जळगाव जिल्ह्यामध्ये जास्त पतपेढया आहेत. जळगाव जिल्हयातील सर्व पतपेढयावर प्रशासक का नेमला जात नाही ? सरकार कुणाच्या दबावाखाली आहे ? कुणाचा भीतीमुळे सरकार प्रशासक नेमत नाही ? 200 कोटीतील 20 कोटी जळगावला दिले. पण ते अजून मिळालेले नाहीत. हे 20 कोटी त्वरेने यावयास पाहिजेत. तसेच आवश्यकता असेल तेथे प्रशासक नेमून ठेवीदारांना न्याय देण्याच्या संदर्भातील विचार केला पाहिजे. या सहकार चळवळीला धोका निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, आमच्या जळगाव जिल्हयामध्ये वादळाचा तडाखा बसून जे नुकसान झाले त्यासंबंधीचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. राज्य शासनाने 24 कोटीची तरतूद केलेली आहे. दोन महिने झाले तरी हा निधी देण्यासंबंधी काहीच हालचाल दिसत नाही. हा निधी लवकरात लवकर द्यावा अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. माननीय कृषी राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यांनी जास्त निधी दिला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

शासन 2 ते 2.5 रुपये केळयाच्या झाडामागे देते. एकूण विचार केला तर ती रक्कम फार कमी आहे. तो निधी वाढवून देण्याच्या संदर्भातील प्रयत्न करावा. शेवटचा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. राज्य शासनाचे प्रशासन सुधारले पाहिजे. Excellence in administration. Excellence in Governance हे महत्वाचे आहे. आपण पाहिले तर केंद्र शासनाचे गव्हर्नन्स सुधारले आहे. त्या पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनाला योग्य दिशा, गती आणि पारदर्शकता येणे अत्यंत आवश्यक आहे. रुपया येतो कसा आणि रुपया कसा जातो याची माहिती याठिकाणी दिलेली आहे. 50 टक्के रक्कम वेतन आणि व्याज देण्यासाठी खर्ची पडते. उर्वरित 50 टक्के प्लॅन एक्स्पेंडिचर आणि नॉन प्लॅन एक्स्पेंडिचरवर खर्च होते. नॉन प्लॅन एक्स्पेंडिचर हा प्लॅन एक्स्पेंडिचरच्या दुप्पट असतो. विकास कशा पध्दतीने होईल? म्हणून खर्च काटकसरीने करावा लागेल. आपल्यावर कर्ज आहे हे लक्षात घ्यावे लागेल. कर्ज वाढणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. कर्जावरील व्याजाचा दर कमी करुन घेण्याच्या संदर्भात विचार करावा लागेल. विकासाचा वाटा प्रत्येक जिल्हयाला त्या पध्दतीने मिळेल या प्रकारची विनंती करतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाचा बजेट ॲट ग्लान्स दिलेला आहे. त्यांनी किती सुधारणा केली हे नमूद केले आहे. मागील वर्षी त्यांचा Revenue deficit 5.3 टक्के होता तो यावर्षी 4 टक्क्यावर आणला आहे. Fiscal deficit 6.7 टक्क्यावर होता तो 5.5 टक्क्यावर आणला आहे आणि Primary deficit 3.2 टक्के होता तो 1.9 टक्क्यावर आणला आहे. पहिल्या पृष्ठावर हे नमूद केले आहे. आपला बजेट ॲट ग्लान्स कसा आहे? आपण अडचणीत आहोत. या अडचणीच्या काळात जास्त चांगल्या पध्दतीने राज्य पुढे नेण्यासाठी आणि या देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य व्हावे यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. पहिल्या क्रमांकाचे राज्य सर्व बाबतीत कायम ठेवण्याच्या संदर्भात आर्थिक शिस्त, आर्थिक अनुशासन, काटकसरीने काम करण्याच्या पध्दतीने पुढे गेलो तर हे राज्य निश्चितपणे पहिल्या क्रमांकावर राहील. आपल्या सर्वांच्या दृष्टीकोनातून हे वर्ष फार महत्वाचे आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षात मागील पाच वर्षात जे झाले नाही त्या पध्दतीची प्रगती, त्या पध्दतीचा विकास आणि त्या पध्दतीची भरभराट व सामाजिक न्याय देण्याच्या संदर्भात कार्य केले तर असे होईल. पुनश्च एकदा अर्थसंकल्पाचे स्वागत करीत

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

असताना, मंत्री महोदयांचे अभिनंदन करीत असताना जे महत्वाचे मुद्दे आहेत त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशा प्रकारची विनंती करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. खरे म्हणजे महसुली तूट 6454.50 कोटी आणि ती सुध्दा सुवर्ण महोत्सवी वर्षात असणे हे फार चांगले लक्षण नाही. जर एखादा व्यापारी असेल आणि दरवर्षी त्याच्या व्यवसायात तूट येत असेल तर दोन-चार वर्षात त्याचे दिवाळे निघते. खऱ्याअर्थाने या सरकारचे दिवाळे निघणार आहे का हा खरा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी जो उपदेश दिला तो अत्यंत मार्मिक होता. या राज्यावर 1.85 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. ही कर्ज मर्यादा एकूण सकल उत्पन्नाच्या 23.5 टक्के आहे. आणखी दीड टक्के कर्ज मर्यादा शिल्लक आहे. उत्पन्नाशी निगडित यापेक्षा जास्त कर्ज घेता येणार नाही. अशा वेळेला या राज्याचा अर्थसंकल्प सादर करीत असताना कोणतेही नवीन कर लावले नाहीत आणि राज्याचे उत्पन्न वाढविले नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे. महागाईच्या संदर्भात अर्थसंकल्पात कोणताही उल्लेख नाही. महागाईची साधी प्रतिक्रिया या अर्थसंकल्पात आलेली नाही. मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे की, अर्थसंकल्पीय भाषणाच्या दोन्ही भागामध्ये एकूण 195 मुद्दे आहेत, त्यावर प्रत्येक सदस्याने किमान 20 मिनिटे भाषण केले तर 25 ते 26 तास या चर्चेसाठी वेळ दिला गेला पाहिजे. दुपारी 2.15 वाजता अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु झाली.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

सहा तास झाले, अजून 20 तास या अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी देऊन सदस्यांना न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे. आता एक-एक मिनिटात जरी मुद्दा मांडायचे म्हटले तरी 195 मिनिटे मला लागतील आणि एवढा वेळ देणे शक्य नाही म्हणून काही मुद्यांनाच मी स्पर्श करणार आहे. या अर्थसंकल्पात महागाईशी संबंधात मी माननीय अर्थमंत्र्यांना निवेदन करणार आहे की, आपण 13 क्रमांकाच्या मुद्यामध्ये तांदूळ, गहू, डाळ, मीठ, मिरची, हळद, गूळ वगैरे बाबींवर 31 मार्च 2010 पर्यंत करमाफी केलेली आहे. त्यानंतर ज्या वस्तुंवर 4 टक्के कराची शिफारस केली आहे. तसेच नंतर यावर जनरल सेल्स टॅक्स लावणार आहेत. मला शासनाला विनंती करावयाची आहे की, जोपर्यंत महागाईला आळा बसत नाही तोपर्यंत अशा वस्तुंवर कर लावता कामा नये. कारण या जीवनावश्यक वस्तू असून त्यांच्यावर कुठलाही कर लावू नये तरच मी शासनाला धन्यवाद देईन. असा जनरल सेल्स टॅक्स लागू होईपर्यंत कालावधी कमी असेल अथवा जास्त असेल महागाई कमी होत नाही तोपर्यंत अशा वस्तुंवर कर लावू नये. सरकारने पहिल्या पानावर आपलीच पाठ थोपटून घेतली आहे, वाहवा करुन घेतली आहे, त्याबद्दल आमचे म्हणणे नाही परंतु खेदाने बोलावेसे वाटते की, विदेशी गुंतवणुकीसाठी प्रथम पसंतीचे आपले राज्य आहे असे सरकार म्हणते परंतु नॅनोचा प्रकल्प महाराष्ट्राऐवजी गुजरातमध्ये गेला. अगोदर हा प्रकल्प पश्चिम बंगालमध्ये गेला होता, नंतर महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न झाला पण त्यात यश आले नाही म्हणून तो गुजरात मध्ये गेला. तरीही शासन म्हणते की आपल्या राज्यात विदेशी गुंतवणूक येणार. वास्तविक अशा प्रकारे सुविधा नसताना गुंतवणूक कशी येणार हा प्रश्न आहे. त्या गुंतवणुकदारांना देण्यासाठी आपल्याकडे जमीन आहे काय, वीज आहे काय, पाणी आहे काय याचा विचार शासनाने करावा.

महोदय, राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे सुतोवाच या अर्थसंकल्पात केले आहे परंतु हे फक्त मोघम शब्दातच सांगण्यात आले. प्रत्यक्षात किती तरुणांना शासनाने रोजगार दिला व किती लोकांना देणार यासंबंधीची माहिती मंत्री महोदयांनी दिली पाहिजे.

यानंतर महसूल विभागाच्या संदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, महसूल विभाग हा फार मोठे उत्पन्न मिळवून देणारा राज्यातील एक महत्वाचा विभाग आहे. परंतु मुद्रांकाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

रुपाने महसूल मिळवून देणाऱ्या जिल्हा उप निबंधकांची कार्यालये जी आहेत त्यांना इमारती नाहीत, अशी कार्यालये बांधण्याची गरज आहे. कारण या अधिकाऱ्यांना बसण्याची जागा व्यवस्थित नाही. लोड शेडिंगमुळे अनेक तास बसून रहावे लागते त्यामुळे मुद्रांक वसुलीचे काम खोळंबून राहते.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास अत्यंत गंभीर अशी परिस्थिती या राज्यात आहे. 100 दिवसांच्या कामाची हमी परंतु कामावर कोणी नाही अशी स्थिती आहे. डिटेलमध्ये जात नाही परंतु "काम नाही आणि रोजगार हमी योजनेच्या कामात रामही नाही", "महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमीची राज्यात दशा, कोट्यवधीचा निधी धूळ खात" अशी या योजनेची स्थिती आहे. 554 पैकी फक्त 142 ग्रामपंचायतींमध्ये एमआरईजीएसची कामे सुरु आहेत. जलसंधारण समितीच्या बैठकीस मुख्य कार्यकारी अनुपस्थित आणि काम सुरु नसल्याने बेरोजगारांवर संकट ही गोंदिया जिल्ह्याची स्थिती आहे. 66 हजार मजुरांपैकी फक्त 1000 लोकांनाच एमआरईजीएसची कामे मिळाली.....अडथळा.....कारण ही योजना सामान्य माणसासाठी आहे व शासनाने या मजुरांना 66 रुपयावरुन 100 रुपयावर रोजंदारी वाढवून दिली असून या अर्थसंकल्पात 120 रुपयापर्यंत ही वाढ करण्यात आली आहे. खऱ्या अर्थाने या सामान्य माणसाचे जीवनमान उंचावण्यासाठी या योजनेची मदत होणार आहे.....

यानंतर श्री. गायकवाड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..

ज्या चांगल्या योजना आहेत त्याचा निश्चितपणे येथे उल्लेख करावयास पाहिजे.

सभापती महोदय, या नंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. हिंदुच्या तीर्थक्षेत्राचे रक्षण करण्याच्या फार मोठया कल्याणकारी योजनांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात आला आहे.त्याचे मी स्वागत करतो. श्री क्षेत्र परशुराम, भराडी देवी माता ,कुणकेश्वर, जेजुरी इत्यादी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. मराठवाडयातील नांदेड जिल्हयातील श्रीक्षेत्र रेणुकादेवी मंदीरासाठी अर्थसंकल्पाच्या परिच्छेद 66 मध्ये उल्लेख करण्यात आला आहे परंतु त्याकरता भरीव आर्थिक तरतूद केली गेली नाही.तेव्हा या कामासाठी निधी देण्याची गरज आहे माननीय मुख्यमंत्र्याचाहा जिल्हा आहे तेव्हा याकरिता निधी द्यावा अशी मी मागणी करतो. त्याचबरोबर वर्धा जिल्हयात गिरड येथे बाबा फरीदचा दर्गा असून सर्व धर्माचे लोक तेथे जातात . तेथे सुपारी घासल्यावर रोग्याला आराम मिळतो. मी एकदा तेथे गेलो असातांना पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती म्हणून माझा स्थानिक विकास निधी त्यासाठी दिला होता . या दर्गाच्या विकासासाठी निधी द्यावा. अशी मी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करतो.

सभापत महोदय,चिमूरसाठी 2 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत त्याचे मी स्वागत करतो. तसेच विदर्भातील कन्नमवाराच्या जयंतीसाठी जो निधी दिला आहे त्याचे देखील मी स्वागत करतो गोदिंया जिल्हयात न्यायालये स्थापन करण्यासाठी शासनाने मंजुरी दिली आहे ती स्वागतार्ह आहे परंतु हे काम लवकरात लवकर कार्यान्वित करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय,गडचिरोली जिल्हयात बांबू लागवडीचे क्षेत्र 50 टक्के आहे ही गोष्ट खरी आहे. या कार्यक्रमासाठी मोठया प्रमाणावर निधी दिला तर दोन लाख लोकांना रोजगार मिळणार आहे बांबू लागवडीची योजना अतिशय चांगली असून त्यासाठी जास्तीत जास्त निधी देण्यात यावा अशी माझी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर पुष्कळ बोलण्यासारखे आहे परंतु वेळ अत्यंत कमी असल्यामुळे मी एवढेच सांगू इच्छितो की, या अर्थसंकल्पात सर्वात जास्त पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.कोकणासाठी जी तरतूद करण्यात आलेली आहे ती सर्वच तरतूद जर या वर्षी खर्च करण्यात आली तर पुढच्या वर्षी मी शासनाचे अभिनंदन करीन.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..

परंतु कोकणासाठी दिलेले पैसे खर्च न करता ते पश्चिम महाराष्ट्राकडे वर्ग केले जातील अशी भीती मला वाटते. या अर्थसंकल्पात विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशचा विचार करण्यात आला नाही. विदर्भाच्या बाबतीत बोलावयाचे म्हणजे पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ अशा दोन भागात विदर्भाची विभागणी करण्यात आलेली आहे.पश्चिम विदर्भासाठी भरपूर पैसे दिलेले आहेत परंतु पूर्व विदर्भावर मात्र अन्याय केलेला आहे.अशा प्रकारे भेदभाव करणे योग्य नाही. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प तयार करीत असतांना समतोल विकासाचा विचार केला पाहिजे. विदर्भाचा अनुशेष एक लाख कोटी रुपयाचा आहे.असे असतांना विदर्भाला पैसे न देता विदर्भावर अन्याय केला जात आहे.

सभापती महोदय, मागच्या आठवडयात पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात मी अशासकीय ठराव आणला होता त्यावर बोलत असतांना पिण्याच्या पाण्याच्या योजनेसंबंधी मी माहिती दिली होती.. महाराष्ट्रातील 200 पेक्षा जास्त तालुक्यामध्ये पाण्याची टंचाई आहे परंतु त्यासाठी या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आल्याचे मला दिसून आले नाही.तेव्हा या कामासाठी तरतूद करावी अशी माझी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे.

(वेळ संपल्याची बेल वाजविण्यात येते)

सभापती महोदय, मला कमीत कमी 20 मिनिटे तरी बोलू द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. अर्थसंकल्पात विदर्भासाठी पुरेसा निधी दिला जात नाही निदान त्यावर आम्हाला बोलण्यासाठी वेळ तरी पुरेसा द्यावा. अन्यथा वेगळा विदर्भ देण्यात यावा. आम्हाला स्वतंत्र विदर्भ दिल्यास त्याचा विकास आम्ही करु. सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे तो निव्वळ मृगजळ आहे, स्वप्न आहे. या स्वप्नात राज्यातील माणूस आणि सामान्य शेतकरी जगू शकत नाही. या अर्थसंकल्पामध्ये शेतक-यांना न्याय दिला नाही. त्याला सवलतीच्या दराने खते उपलब्ध व्हावीत अशी व्यवस्था करण्यात आली नाही. शेतक-यांना रासायनिक खते सवलतीच्या दराने उपलब्ध व्हावीत यासाठी वित्त मंत्र्यांनी मोठया प्रमाणावर निधीची व्यवस्था करावयास पाहिजे. असे मला या चर्चेच्या निमित्ताने माननीय वित्त मंत्र्यांना सांगावयाचे आहे. या अगोदर राज्य शासनाकडून मोठे दिवा स्वप्न दाखविण्यात आले होते तसेच आदिवासी समाजाच्या विकासाकरिता मोठया योजना जाहीर करण्यात आल्या होत्या . हिवाळी अधिवेशनामध्ये

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..

माननीय मुख्यमंत्र्यांनी विदर्भासाठी 13 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते परंतु त्या संबंधी अर्थसंकल्पात मात्र तरतूद केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करु शकत नाही. सभापती महोदय, आपण वारंवार बेल वाजवत असल्यामुळे मी माझ्या शब्दांना येथेच विराम देतो. जय विदर्भ .

(नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या शासनाने नेहमीप्रमाणे सादर केला जातो त्याप्रमाणे सन 2010-2011 चा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पामध्ये मोठ मोठी आकडेवारी देऊन लोकांना खुष करण्याचा प्रयत्न केला आहे. मी कालच कोकणात जाऊन आलो आहे. त्या ठिकाणी अर्थसंकल्पाबाबत वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातम्या वाचल्यानंतर कोकणासाठी शासनाने भरभरुन दिले असे सांगितले जात असतांना त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्हयाला किती वाटा मिळाला? अशी माझ्या मनामध्ये शंका उत्पन्न झाली.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे): सभागृहाची वेळ 8.30 वाजेपर्यंत होती. अजून चार माननीय सदस्यांची भाषणे व्हावयाची असल्यामुळे ती होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री हे रायगड जिल्हयातील असतांना त्यांनी कोकणचे अर्थमंत्री म्हणून कोकणाला भरपूर दिले असे वर्तमानपत्रामधून छापून आले. परंतु सिंधुदुर्ग जिल्हयाच्या पदरामध्ये काहीही पडलेले नाही असे या जिल्हयातील नागरिक म्हणू लागले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयाचे पालकमंत्री सिंधुदुर्ग जिल्हयाकडे निधी वळविण्यामध्ये अयशस्वी ठरले आहेत. सर्व योजना रायगड या एकाच जिल्हयामध्ये देण्यात आल्या आहेत. त्या देत असतांना शासनाने उपवासाच्या पदार्थावर कर माफ केला आहे. महागाईवर पडदा टाकण्यासाठी देवदेवतावरील करमाफ केले आहेत. अशाप्रकारे हे शासन "करुन करुन भागले आणि देव पूजेला लागले" असे कोकणातील लोक बोलावयास लागले आहेत.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये कोकणातील भराडी देवीची आठवण केली, कुणकेश्वर देवस्थानाची आठवण केली त्याबाबत मी शासनाला धन्यवाद देतो. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये मुंबईत उभारल्या जाणाऱ्या शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी 300 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु त्याबाबत यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत: बांधलेल्या किल्ल्यामध्ये पेशवेकालीन शिवमंदिर असून त्याठिकाणी शिवाजी महाराजांचे स्मारक करण्यासाठी एक कोटी रुपये दिले जात नाहीत ही शोकांतिका दिसून येते. अशाप्रकारे कोकणाची फसवणूक करण्याचे काम या सरकारने केले आहे. दि. 24 जून रोजी कोकणामध्ये मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात आली. या बैठकीला बरेचसे मंत्री सकाळी आले व मंत्रिमंडळाची बैठक संपल्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. परशुराम उपरकर....

संध्याकाळी परत निघून गेले. त्यासंबंधीच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये रंगल्या की, कोकणासाठी 5232 कोटींचे पॅकेज दिले. काही वर्तमानपत्रांनी असे छापले की, कोकणाला सरकारने कागदावर श्रीमंत केले,काही वर्तमानपत्रांनी असेही छापले की, कोकणामध्ये भानामती आली. एक दिवसाची मंत्रिमंडळाची बैठक झाली व 5232 कोटींचे पॅकेज देऊन कोकणाला फसविले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारने जवळ जवळ दि. 20 जुलै रोजी 53 योजनांसाठी सन 2009-10, 2010-11 व 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने निधी देण्याबाबत जी.आर. काढला. सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांमध्ये दोन बाबींवर सुमारे 10 ते 20 कोटी रुपये या जिल्हयाला देण्यात आले. संपूर्ण कोकणासाठी 40 ते 50 कोटी रुपये मिळाले असतील. परंतु जी.आर. मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीप्रमाणे निधी न देता शासनाने याही बाबतीत कोकणाला फसविले. त्याकरिता या अर्थसंकल्पमध्ये कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. एकूण तीन वर्षाच्या कालावधीमधील दोन वर्षाचा कालावधी संपून गेला आहे. आता फक्त एकच वर्ष शिल्लक राहिले आहे. अन्य जिल्हा परिषदांमध्ये मार्च महिन्यामध्ये खर्च न झालेली रक्कम पुढील तीन महिन्यामध्ये खर्च केली जाते. तशापध्दतीने आमच्या जिल्हयामध्ये ही रक्कम खर्च केली जाईल काय? योजनेवर खर्च करीत असतांना त्यामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी काढल्या जातात त्यामुळे तो निधी खर्च होत नाही.

सभापती महोदय, युती शासनाच्या काळात कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी 800 कोटींचे प्रकल्प सुरु करण्यात आले. त्यापूर्वी 1970 सालापासून कोकणामध्ये प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. गेल्या 40 वर्षामध्ये त्यापैकी एकही प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे या प्रकल्पांची किंमत चारपट वाढली आहे. या प्रकल्पांकरिता यावर्षी 729 कोटी रुपये द्यावयाचे होते ते दिले गेले नाहीत. परंतु शासनाने याही बाबतीत कोकणाला फसविण्याचे काम केले आहे. कोकणासाठी असलेल्या मूलभूत गरजा आणि त्या अनुषंगाने कोकणावर होत असलेला अन्याय याबाबत कुठेही नामोल्लेख करण्यात आला नाही. मुंबईवर 26/11 रोजी जो अतिरेक्यांचा हल्ला झाला त्यापूर्वी 1993 मध्ये बॉम्बस्फोट झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

त्या बॉम्बस्फोटामध्ये वापरले गेलेले आरडीएक्स समुद्रमार्गे कोकणातून आले अशा बातम्या आल्या. त्यानंतर 26/11 रोजी हल्ला झाला. मग राज्य शासनाने गृह विभागाला सुमारे 100 कोटी रुपये दिले.गृह विभागाने सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी चार गस्ती नौका दिल्या.आज सकाळी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी हा विषय उपस्थित केला होता. परंतु सध्या या चार गस्ती नौका समुद्रामध्ये उभ्या आहेत.या गस्ती नौकांचे उद्घाटन झाले,परंतु या गस्ती नौकांवर प्रशिक्षित स्टाफ उपलब्ध करुन न दिल्यामुळे या नौका गस्त घालत नाहीत, तर भाड्याच्या नऊ गस्ती नौका तेथे गस्त घालत आहेत, त्यामध्ये देखील भ्रष्टाचार आहे.मालवण मध्ये असलेली गस्ती नौका सिंधुदूर्ग किल्ल्याच्या पाठिमागे जाते आणि नांगर टाकून उभी रहाते.मग त्या गस्ती नौकांसाठी दिवसाला मिळणारे 10 हजार रुपयातील अर्धेअधिक पैसे एस.पी.ला जातात,पोलीस स्टेशनला जातात आणि केवळ गस्त घातल्याचे दाखविले जाते.अशा प्रकारे गस्त घालण्यामध्ये देखील फसवणूक करण्यात येत आहे.अजूनही 26-11 सारखीच हाय अलर्टची परिस्थिती असल्याचे सांगितले जाते.तेथील मच्छिमारांना हाय अलर्टच्या सूचना दिल्या जातात.परंतु खऱ्या अर्थाने या गस्ती नौका तेथे गस्त धालतात की नाही ? या गस्ती नौका किती फेऱ्या मारतात ? किती डिझेल भरतात ? त्यांना ठरवून दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे बंदरामध्ये गस्ती नौका फेऱ्या मारतात की नाही हे पाहिले जात नाही.यामुळे कोकणचा किनारा असुरक्षित झालेला आहे.तसेच रेडीचे बंदर बी.ओ.टी.तत्वावर देण्यात आले आहे.शासनाने या रेडी बंदराच्या बाबतीत जो करार केला, त्यावेळी हे काम करणाऱ्या कंपनीकडून चार कोटी रुपये इमारतीकरता घेतलेले आहेत.परंतु येथील विकासकांनी कोणतीही सुधारणा न करता ते ताब्यात देऊन टाकले.आता त्यांच्याकडून कर वसूल करताना 40 रुपये टनाला घेत होता,ते आता 20 रुपये टनाला घेणार आणि महाराष्ट्र शासनाला टनामार्ग फक्त 3 रुपये देणार.आज याबाबतीत करार करुन बी.ओ.टी.तत्वावर देऊन,त्यामध्ये कोणतीही सुधारणा न करता ताब्यात दिले.पण त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे हत्यारधारी किंवा पोलीस किंवा सुरक्षा गार्ड न ठेवता ते बंदर एका खाजगी विकासकाच्या ताब्यात दिल्यानंतर तेथे विकासकांनी यावर्षी सुमारे 20 ते 25 कोटी रुपये मिळविले. त्याला बीओटी तत्वावर देताना आपण त्याच्याकडून फक्त 4 कोटी रुपये घेतले. 3 रुपये पर टन शासनाला भरणार आणि त्यातले 10 ते 12 लाख टन निर्यात केल्यानंतर त्याला 20 ते 25 कोटी रुपये मिळणार. उद्या त्याने पैसे मिळवून 20 वर्षासाठी

. . . .4जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर . . ..

करार केला आणि तो निधून गेला तरी महाराष्ट्र शासन काही करणार नाही. म्हणून माझी मागणी आहे की, याबाबतीत कारवाई करण्यात यावी.

सभापती महोदय, आंब्याच्या बाबतीत सांगावयाचे तर मी सन्माननीय सदस्यांना आंबे देतो, पण यावेळेस उशीर झाला आहे. आंब्याच्या पिकावर रोग पडला आहे. त्यामुळे मार्केटमध्ये आंबा वेळेवर आलेला नाही. आज परप्रांतीय बिहारी लोक मद्रासचा आंबा आणून तो देवगडचा हापूस आंबा आहे असे सांगून विकतात आणि लोकांची फसवणूक करतात. प्रत्यक्षात आंबा बागायतदार चिंतेमध्ये असून त्याला केवळ दहा ते पंधरा हजार रुपये, प्रति झाड 150 रुपये मदत देऊन चालणार नाही, तर प्रति झाड 500 रुपये म्हणजेच 50 हजार रुपये प्रति हेक्टरी शासनाने मदत करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये 125 कोटी रुपयांच्या नळ योजनेबाबत उल्लेख केलेला आहे. 125 कोटीच्या नळ योजनेसाठी तिल्लारी धरणातून पाणी देणार आहेत. या तिल्लारी धरणाचा करार हा शेतकऱ्यांच्या वापरासाठी करण्यात आला. हा करार करताना वेंगुर्ला व मालवणमध्ये कालव्याच्या रुपाने पाणी देण्याची शासनाची योजना होती. पण आता कालव्याव्दारे पाणी न देता आता पाईपव्दारे पाणी देण्याचा विचार आहे. सध्या तेथे पिण्यासाठी पाणी नाही. त्याठिकाणी असलेले मायनिंग प्रकल्प, पॉवर प्रकल्प किंवा औद्योगिक प्रकल्पांसाठी पाणी देण्याची योजना बनविली जात आहे. जर याचा लाभ खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना द्यावयाचा असेल तर कालव्याची जी योजना बंद केली आहे, . . .

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापी नाही

श्री. परशुराम उपरकर....

त्या कालव्याच्या योजनेद्वारे शेतकऱ्यांना पाणी द्यावे आणि जर ही योजना करण्यातच येणार असेल तर त्या भागात येणाऱ्या सर्व ग्रामपंचायतीना पहिल्यांदा नळपाणी पुरवठयासाठी पिण्याच्या पाण्याची योजना म्हणून राबवावी आणि नंतरच त्याठिकाणी औद्योगिक क्षेत्रातील लोकांना पाणी द्यावे नाही तर ही योजना फक्त उद्योगासाठी होईल.

सभापती महोदय, डीपीडीसीला 53 टक्के वाढ दिलेली आहे. 148 योजना हस्तांतरीत करणे किंवा एकत्रिकरण करणे किंवा वगळणे यासंदर्भात नियोजन विभागाने 3 डिसेंबरला एक शासन निर्णय काढलेला आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या बजेटमध्ये असलेल्या योजना जिल्हा नियोजन आराखडयाला जोडलेल्या आहेत. त्यामुळे राज्याकडून येणारा निधी बंद होणार आहे. जिल्हा नियोजनचा आराखडा 53 टक्क्याने वाढविल्याची या ठिकाणी घोषणा करण्यात येत आहे. पण खऱ्या अर्थाने राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातून जिल्हया-जिल्हयाला मिळणारा निधी कमी होणार आहे याचा शासनाने कुठेही उल्लेख केलेला नाही. खऱ्या अर्थाने तो निधी अर्थसंकल्पातील हेड तसेच ठेवून तो निधी त्या त्या विलागाला देण्याची गरज आहे अन्यथा राज्य अर्थसंकल्पात असलेले सर्व हेड बंद होतील आणि त्याठिकाणी मिळणारा निधी कमी होईल व जिल्हा नियोजनकडे दिलेला निधी वेळच्यावेळी योग्य पध्दतीने खर्च न झाल्यास तो परत जाण्याची भिती प्रत्येकाच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. याही बाबतीत लक्ष देण्याची गरज आहे. सभापती माहेदय, आपण मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या अर्थसंकल्पातील काही मुद्यांकडे मी लक्ष वेधणार आहे. आपल्या राज्यातील पूर्व प्राथमिक शाळा ज्याला आपण बालवाडया म्हणतो त्या विशेषत: मराठी माध्यमाच्या शाळा, खासगी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून किंवा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या माध्यमातून जरी चालू असल्या तरी शासनाच्या तिजोरीतून त्यावर पाच पैसेही खर्च केले जात नाहीत. या पूर्व प्राथमिक शाळा ज्याला आपण बालवाडया म्हणतो त्या एका अर्थाने अनाथ अवस्थेत वावरत आहेत. याचा गैर फायदा घेऊन इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी के.जी.च्या माध्यमातून प्रचंड माया गोळा केली जात आहे. मराठी माध्यमाच्या ज्या बालवाडया आहेत त्यांच्यासाठी या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून काही ना काही तरतूद केली जाईल अशी अपेक्षा होती. पण दुर्दैवाने तशा प्रकारची तरतूद केलेली दिसत नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मराठी प्राथमिक शाळांचे जाळे विणलेले होते परंतु नवीन धोरणानुसार आज या प्राथमिक शाळा बंद पडत आहेत, त्यांची संख्या घटत आहे. एखाद्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात गेलो तर आपल्या असे लक्षात येते की, तेथील 50 टक्के प्राथमिक शाळा बंद पडत आहेत आणि तेथे इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढत आहेत. या प्राथमिक शाळां बंद पडत असल्यामुळे त्याचे दोन अनिष्ट परिणाम तुम्हा आम्हाला जाणवत आहेत. एक म्हणजे महाराष्ट्रातून मराठी भाषेचे उच्चाटन होत आहे आणि दुसरे म्हणजे गरीब आणि मध्यम वर्गियांचे शिक्षण बंद करुन अर्थोपायाधिष्टित फिनान्स बेस एज्युकेशन आणले जात आहे. या सगळया पार्श्वभूमीवर या सदनामध्ये यावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. या मराठी माध्यमांच्या शाळांचे सक्षमीकरण करण्याची गरज आहे. या अर्थसंकल्पामध्ये या मराठी माध्यमांच्या शाळांच्या सक्षमीकरणासाठी काही तरतूद केली जाईल अशी अपेक्षा होती. अजून सुध्दा वेळ गेला नाही. शासनाने तिकडे लक्ष द्यावे आणि या शाळांच्या सक्षमीकरणासाठी खास एखादी मोहीम राबविण्यात यावी, अशा प्रकारची मी विनंती करतो.

सभापती महोदय, दिनांक 20 जुलै, 2009 ला निवडणुकीच्या पाश्वभूमीवर महाराष्ट्रामध्ये एक चांगला व क्रांतीकारी निर्णय घेण्यात आला. सुमारे 2000 प्राथमिक शाळांचा आणि सुमारे 1700 माध्यमिक शाळांचा कायम शब्द काढला पण त्यांना अनुदान देण्याच्या संबंधामध्ये, त्यांचे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे....

मुल्यांकन करण्याच्या संबंधामध्ये, आर्थिक तरतूद करण्याच्या संबंधामध्ये कोणतीही दखल घेतलेली नाही. तेथे राबणारा शिक्षकवर्ग आजही आशळभूतपणे आहे. दहा-दहा वर्षे पाच पैसेही पगार न घेणारा शिक्षकवर्ग वैफल्यग्रस्त झालेला आहे. या निमित्तने मी शासनाला अशी विनंती करतो की, या शाळांसाठी युध्दपातळीवर काही ना काही तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, इयत्ता दहावीच्या निकालाची टक्केवारी 50 टक्क्यावरुन 95 टक्क्यावर गेलेली आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिकमध्ये प्रवेश देण्याची गरज भासते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा लोंढा आहे. गेल्या पाच सात वर्षामध्ये कनिष्ठ महाविद्यालये ज्याला आपण उच्च माध्यमिक विभाग म्हणतो अशी कनिष्ठ महाविद्यालये कायम विनाअनुदानित तत्वावर मोठ्या प्रमाणावर दिलेली आहेत. त्या ठिकाणी एम.ए.एम.एड. झालेले शिक्षक कमी वेतन घेऊन राबत आहेत. त्या ठिकाणी सुध्दा कायम शब्द काढण्याची आवश्यकता आहे. उच्च माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी आमची नाही असे वक्तव्य न करता त्यांचाही कायम शब्द काढण्याची गरज आहे. म्हणून या उच्च माध्यमिकसाठी शासनाने याच अर्थसंकल्पात काही ना काही तरतूद करावी अशी मी विनंती करतो. आज आझाद मैदानावर हे शिक्षक चार पाच दिवस उपोषण करीत आहेत. दुर्दैवाने त्यांच्याशी शासनाने वाटाघाटी केलेल्या नाहीत. याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यामध्ये 288 केंद्रीय आश्रमशाळा गेल्या सात आठ वर्षापासून सुरु आहेत. या केंद्रीय आश्रमशाळांना महाराष्ट्रामध्ये साक्षरतेच्या टक्केवारीचे प्रमाण जास्त आहे म्हणून केंद्र सरकारने दूर केले आणि त्यांच्याकडे पाठ फिरवली तसेच राज्य सरकारने सुध्दा अद्याप त्यांना जवळ घेतलेले नाही. या 288 आश्रमशाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी आणि त्या ठिकाणी शिकविणारे शिक्षक शासनाकडे डोळे लावून बसलेले आहेत. माझी शासनाला विनंती आहे की, या अर्थसंकल्पामध्ये या 288 केंद्रीय आश्रमशाळांसाठी कोणती ना कोणती तरतूद करण्याची आवश्यकता आहे. परवा सदनामध्ये माननीय मंत्रिमहोदया प्रा. फौजिया खान यांनी उत्तर दिले तेव्हा आमच्या अपेक्षा पल्लवित झाल्या होत्या. राज्यामध्ये जी एकात्मिक अपंग शिक्षण योजना चालू आहे त्या योजनेमध्ये काम करणारे केंद्र शासनाच्या माध्यमातून पगार घेणारे जे एक हजार शिक्षक आहेत त्या शिक्षकवर्गाकडे केंद्र शासनाने पाठ फिरवली आहे. त्यांना राज्य शासनाने जवळ घ्यावयास पाहिजे. या ठिकाणी शब्द देऊन सुध्दा त्यासंदर्भात कोणतीही आर्थिक तरतूद झालेली नाही. ती आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, युती शासनाच्या काळात राज्यामध्ये एम.सी.सी. हा एक उत्तम उपक्रम सुरु केला. देशातील सर्व राज्यांपेक्षा हा उपक्रम प्रभावी होता. एम.सी.सी.च्या माध्यमातून आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण देत होतो. आज ती योजना चालू आहे पण शासनाने गेल्या दहा वर्षामध्ये एम.सी.सी. साठी पाच पैशाची देखील तरतूद केलेली नाही. मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो. महाराष्ट्र राज्यात गेल्या दहा वर्षामध्ये त्यांना बूट पुरविलेले नाहीत तसेच कपडे पुरविलेले नाहीत. त्या शिक्षकांना मानधन देत नाही. त्यांसाठी काहीही करीत नाही. ती योजना कशी तरी रखडत राबविली जात आहे. या योजनेचे सक्षमीकरण करण्यासाठी आर्थिक तरतूद केली पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात वैभव प्राप्त केलेले कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ आहे. या विद्यापीठाचे पुढच्या वर्षी सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्याची दखल घेऊन राज्याच्या अर्थसंकल्पात शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने काही आर्थिक तरतूद करावयास पाहिजे. आणखी एका बाबीकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. शिक्षणाचे व्यापारीकरण प्रचंड प्रमाणात होत आहे. आहे. राज्यामध्ये एम.डी.ला प्रवेश देण्यासाठी दीड कोटी रुपयांचा व्यवहार होतो. एम.एड.ला प्रवेश देण्यासाठी 2 लाख रुपये घेतले जातात. बालवाडीला प्रवेश देण्यासाठी 1 लाख रुपये घेतले जातात. शिक्षणाचे व्यापारीकरण रोखणे, त्याच्यावर अंकुश ठेवणे यासाठी योजना अर्थसंकल्पात दिसावयास पाहिजे पण अशी कोणतीही योजना दिसून येत नाही.

सभापती महोदय, आपल्याकडे कायम विनाअनुदान तत्वावर सिनियर कॉलेजेस आहेत. तेथील शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे प्रचंड शोषण होते. तेथील शिक्षकवर्ग आता रस्त्यावर आलेला आहे. सिनियर कॉलेजला सुध्दा अनुदान देण्याची गरज आहे. सिनियर कॉलेजचे प्राध्यापक माननीय मंत्रिमहोदय श्री. राजेश टोपे यांना भेटणार आहेत. त्यांच्या भेटीसाठी हे सर्व प्राध्यापक वाट बघत आहेत. आपल्या राज्यामध्ये स्वतंत्र राज्य शिक्षण निधी निर्माण करण्याची गरज आहे. जसे केंद्र सरकारमध्ये रेल्वेचे स्वतंत्र बजेट असते त्याप्रमाणे राज्यामध्ये स्वतंत्र स्टेट एज्युकेशन फंड निर्माण करावा. पूर्वप्राथमिक पासून उच्च शिक्षणापर्यंत तसेच रिसर्च यासाठी स्वतंत्र निधी निर्माण करुन त्या माध्यमातून बालवाडीपासून पोस्ट ग्रॅज्युएटपर्यंत सर्वांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. त्याचा विचार केला जाईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आपल्या शिक्षणाची व्यवस्था निरनिराळ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंके .....

ठिकाणी केलेली आहे. ते सर्व एका छताखाली आणले पाहिजे. पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, व्यवसाय शिक्षण तसेच प्रशासन हे सर्व एका छताखाली आणण्याच्या दृष्टीने पावले उचललेली दिसत नाहीत. ती पावले उचलली जावीत अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या अर्थसंकल्पाचे मनापासून स्वागत करण्यासाठी आणि समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सुवर्ण महोत्सवी वर्षात या वर्षाचा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसांना दिलासा देणारा आहे. बेरोजगार, दलित, मागासवर्गीय, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग या सर्वांना विकासाभिमुख करणारा व सामाजिक न्याय देणारा अर्थसंकल्प आहे याबद्दल मी राज्याचे माननीय अर्थमंत्री आणि या सभागृहात सन्माननीय अर्थराज्यमंत्री श्री.विजय वडेट्टीवार यांनी अर्थसंकल्प मांडल्याबद्दल त्यांचे आभार मानतो आणि अभिनंदन करतो. या अर्थसंकल्पात शेतक-यांच्या अवजारासाठी 50 टक्के अनुदान देण्याची भूमिका शासनाने घेतली आहे. शेतक-यांसाठी जास्तीत जास्त कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने 12 हजार कोटी रुपयांचे पीक कर्ज देण्याची महत्वकांक्षा योजना जाहीर केली आहे. यामध्ये 25 हजार रुपयांचे बिनव्याजी कर्ज, 25 हजार ते 3 लाखापर्यंत 2 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाणार आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत नालाबंडिंग, चेकडॅम्प, बंधारे कोकणाप्रमाणे खानदेशामध्ये बांधणे आवश्यक आहे. या कामासाठी जी तरतूद केलेली आहे ती फारच कमी आहे. त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी मी विनंती करतो. खते, औषधे, बी-बियाणे यासाठी तरतूद असणे गरजेचे होते. या अर्थसंकल्पात आदिवासी बांधवांसाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत 3020 कोटींची केलेली तरतूद निश्चितच भूषणावह आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी दिलेला निधी सुध्दा भरीव आहे. आदिवासी बांधवांसाठी असलेल्या उपयोजनेच्या अंतर्गत त्या भागात ज्ञान देणारा जो शिक्षक वर्ग आहे त्यांची पगाराची थकित रक्कम देण्याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, सर्वात महत्वाच्या गोष्टीकडे मी शासनाचे लक्ष वेधतो. जिल्हयातील विकास योजनांचा आराखडा त्या त्या जिल्हयातील लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांनी करावयाचा असतो आणि तो आराखडा राबवून घेण्याची व्यवस्था असते. या संकल्पनेसाठी 3,816 कोटींची तरतूद अर्थसंकल्पात केली असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करीन. या निधीमध्ये 53 टक्के वाढ केली आहे, हा एक उच्चांक आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. डीपीडीसीच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे.....

माध्यमातून नाविन्यपूर्ण कामे करण्यासाठी 3 टक्के, 4 टक्के, 5 टक्के अशी राखीव निधीची तरतूद केली आहे ही चांगली गोष्ट आहे. यासंदर्भात सुवर्ण महोत्सवी वर्षात ग्रामपंचायतींमार्फत लहान मोठया स्वरुपाच्या मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी 75 हजार कोटींची तरतूद केलेली आहे. पण शेवटच्या माणसांपर्यंत या सुविधा पुरविण्यासाठी ही तरतूद आणखी वाढवून दिले तर बरे होईल.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात तीर्थक्षेत्र विकासासाठी तरतूद केलेली आहे. पण मला यानिमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे की, नाशिक जिल्हयात अनेक तीर्थक्षेत्र असताना त्यासाठी तरतूद झालेली नाही. ती तरतूद केली तर बरे होईल.

सभापती महोदय, इंदिरा आवास योजनेंतर्गत प्रत्येक घरकुलासाठी 70 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून 2.5 लाख घरे देण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. ही चांगली बाब आहे. मागास क्षेत्र विकासाठी 12 जिल्हयांची निवड करुन 253 कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर केला आहे ही महत्वाची गोष्ट आहे. नाबार्ड आर्थिक सहाय्य विभाग अंतर्गत मेगा पाणलोट विकास घेतला आहे, हा अतिशय चांगला कार्यक्रम या अर्थसंकल्पात नमूद केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यामध्ये 66 विकास कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यासाठी दोनच कार्यक्रम आलेले आहेत. हा पाणलोट विकास कार्यक्रम अत्यंत महत्वाचा असून तो मोठ्या प्रमाणावर राज्यात राबविला जाणे आवश्यक आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये डार्कझोन निर्माण झालेल्या भागामध्ये हा पाणलोट विकास कार्यक्रम राबविणे अत्यंत गरजेचे असून त्यासाठी तरतूद केली पाहिजे.

आरोग्य विभागांतर्गत राजीव गांधी जीवनदायी योजना पहिल्या 6 टप्प्यामध्ये राज्यामध्ये सुरु करण्यात आलेली आहे. कुपोषित बालकांसाठी आणि किशोरवयीयन मुलींसाठी पूरक आहार योजना राबविण्यात येणार आहे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या संदर्भात श्रेणीवर्धन हा चांगला कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला आहे. वैद्यकीय महाविद्यालयांना उपकरणे घेण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला तर फार चांगले होईल.

सभापती महोदय, शिक्षण विषयाशी माझा संबंध असल्यामुळे मला त्या विषयाबद्दल बोलणे आवश्यक आहे. शिक्षणाशी संबंधित चांगला असा कार्यक्रम या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शासनाने राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. 2500 माध्यमिक शाळामध्ये संगणक प्रयोगशाळा सुरु करण्यात येणार आहेत. टप्प्याटप्प्याने हा आकडा 5000 पर्यन्त नेण्याचा शासनाचा प्रयत्न राहाणार आहे. हे शासनाचे शिक्षण क्षेत्रातील काम वाखाणण्याजोगे आहे. पहिली ते दहावी पर्यन्तच्या आदिवासी मुलांना शिष्यवृत्ती योजनेसाठी तसेच अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या इयत्ता 1ली ते 10 वी या वर्गातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सन 2008-2009 या वर्षापासून मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. राज्यातील युवा वर्गाला रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. त्यासाठी ठराविक उद्दिष्ट शासनाने ठरविले पाहिजेत. राज्यात जल स्वराज्य प्रकल्प आणि महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. त्याचप्रमाणे देशाच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये तसेच राज्य घडविण्यामध्ये ज्यांनी बहुमोल योगदान दिले अशा थोर पुरषांची स्मारके करण्यासाठी निधीची तरतूद केलेली आहे. साने गुरुजींची कर्मभूमी ही जळगाव जिल्ह्यातील अंमळनेर येथे होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.दिलीपराव सोनावणे...

तसेच बहिणाबाई चौधरी या कवयित्री देखील जळगावच्याच. त्यांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

न्यायालय स्थापण्याच्या संदर्भात पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी 16 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी न्यायालयाची इमारत होणे गरजेचे आहे. बांधकाम विभागाच्या माध्यमातून या कामासाठी निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जळगाव तालुक्यातील भडगाव येथे न्यायालय इमारत होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, चक्रीवादळ, अवेळी पाऊस, गारपीट या नैसर्गिक आपत्तींनी बाधित झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासाठी 246 कोटीची तरतूद केलेली आहे. परंतु मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, नाशिक विभागातील आणि विशेषत जळगाव जिल्ह्यातील केळी बागायतदार, फळ बागायतदार हे नुकसान भरपाई पासून वंचित राहिलेले आहेत. त्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, खानदेश पॅकेजसाठी केलेली तरतूद अजून वितरित केलेली नाही. खानदेशच्या नावाने पॅकेज दिलेले आहे परंतु जळगाव जिल्हा त्या पॅकेजपासून पूर्णपणे वंचित राहिलेला आहे. जळगाव जिल्ह्यासाठी तरतूद करावी अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

सिंचनाच्या संदर्भात मी एवढेच सांगेन की, शासनाने तापी खोरे विकास महामंडळासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन त्या भागातील रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करावेत.

सभापती महोदय, विधानपरिषदेचे सभागृह हे वरिष्ठ सभागृह समजले जाते. या सभागृहातील आमदारांचे मतदारसंघ फार मोठे असतात.

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे.....

तरी निधी मात्र तालुक्याच्या आमदारांएवढाच आहे. काम करण्याच्या दृष्टीने हा निधी वाढवून दिला तर खूप मदत करता येईल. म्हणून स्थानिक विकास निधी वाढवून द्यावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्था□त होऊ□ उद्या मंगळवार, दि□ 30 मार्च, 2010 रोजी स□ळी 11.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ रात्रौ 9 वाजू□ 01 मि□टां□ मंगळवार, दि□ 30 मार्च, 2010 रोजीच्या स□ळी 11.00 वाजेपर्य□त स्था□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही